


किंमत साडेतीन रुपये

# भ्रमंती

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २०९०८ वि:
क्रमांक ..... नों: दि:

प्रल्हाद केशव अत्रे

REFBK-0009226

प्रकाशन क्रमांक
१३२

ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर, मुंबई ४

मूल्य साडे तीन रुपये

आवृत्ति पहिली : १२ ऑगस्ट १९५६

(सर्वाधिकार प्र. के. अत्रे यांचे स्वाधीन)

मुखपृष्ठ सजावट
केशव फडके

मुद्रक : वि. पु. भागवत, मौज प्रिंटिंग ब्यूरो, खटाववाडी, मुंबआी ४
प्रकाशक : ग. पां. परचुरे, ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर, गोरेगांवकर चाळ क्रमांक २, गिरगांव, मुंबआी ४

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें.
20006 क्र. ५५१२
क्रमांक 293 आ. दि. 2019


# अनुक्रम


| | |
|---|---|
| सानेगुरुजींच्या जन्मभूमींत | १ |
| महाराष्ट्रांची सौंदर्यनगरी : महाबळेश्वर | १६ |
| आळंदीच्या कीर्तनगंगेंत : १ : | २८ |
| आळंदीच्या कीर्तनगंगेंत : २ : | ३७ |
| आळंदीच्या कीर्तनगंगेंत : ३ : | ४६ |
| वारली मुलुखामधली मुशाफरी : १ : | ५४ |
| वारली मुलुखामधली मुशाफरी : २ : | ७१ |
| वारली मुलुखामधली मुशाफरी : ३ : | ८३ |
| वारली मुलुखामधली मुशाफरी : ४ : | १०० |
| नाशिक काँग्रेसच्या जत्रेंत : १ : | १२० |
| नाशिक काँग्रेसच्या जत्रेंत : २ : | १३९ |
| नाशिक काँग्रेसच्या जत्रेंत : ३ : | १५९ |

# आचार्य प्र. के. अत्रे–साहित्य

## नाटकें

साष्टांग नमस्कार
घराबाहेर
अुद्यांचा संसार
भ्रमाचा भोपळा
मी अुभा आहें !
पराचा कावळा
वंदे भारतम्
पाणिग्रहण
जग काय म्हणेल ?
अेकच प्याला
कवडीचुंबक
गुरुदक्षणा
वीरवचन
वसंतसेना
ब्रह्मचारी

## काव्य

झेंडूचीं फुलें
गीतगंगा

## कथासंग्रह

बत्ताशी आणि अितर कथा
ब्रँडीची बाटली
साखरपुडा
वामकुक्षी

## अितर

मी कसा झालों ?
हंशा आणि टाळ्या
हास्यकथा
पत्रकार–अत्रे
चांगुणा (कादंबरी)
ललित वाङ्मय
अत्रेअुवाच
स्वराज्याचा अरुणोदय
निशिगंध
दूर्वा आणि फुलें
मराठी माणसें, मराठी मनें
मुद्दे आणि गुद्दे
साहित्ययात्रा
भ्रमंती
पंचामृत
समाधीवरील अश्रू
पांच भावांची गोष्ट
मोहित्यांचा शाप

मुंबईपासून हर्णै बहात्तर मैल दूर आहे. जहाज ताशीं दहा ते अकरा मैल जातें. त्याखेरीज जंजिरा आणि श्रीवर्धन ह्या मधल्या दोन बंदरांत उतारूंच्या चढउतारामध्यें कमींत कमी दीड तास तरी खर्च होतो. म्हणजे मुंबईहून हर्णैला पोहोंचावयाला आठ तास तरी लागतात. 'चंपावती' हें एक नवें आणि सुंदर जहाज आहे; त्याची वरच्या वर्गाचीं 'कॅबिन्स' उत्कृष्ट आहेत. यांतून प्रवास करणें हा एक अत्यंत आल्हादकारक अनुभव आहे. साने गुरुजींच्या 'श्यामच्या आई'चें मूळ हस्तलिखित प्रा. बापट ह्यांनीं बरोबर घेतलें होतें. गुरुजींचीं सर्वच हस्तलिखितें पराकाष्ठेचीं सुंदर आहेत. कोठें खाडाखोड नाहीं. काटाकाट नाहीं. सुवाच्य अक्षरांच्या एकसारख्या ओळी एकामागून एक धांवताहेत. बकुळीचीं लहान लहान फुलें हारीनें कागदावर मांडून ठेवल्यासारखें वाटतें. 'श्यामच्या आई'चें हस्तलिखित बघतांना हृदय भरून येतें. अनेक स्मृति आणि भावना त्या हस्तलिखिताशीं निगडित झालेल्या आहेत. 'श्यामच्या आई'मध्यें एकंदर बेचाळीस रात्रींच्या गोष्टी आहेत. त्यांपैकीं नाशिकच्या तुरुंगांत गुरुजींनीं छत्तीस प्रकरणें लिहिलीं. त्यांपैकीं त्यांनीं तीन गोष्टी गाळल्या. आणि नऊ तुरुंगांतून बाहेर आल्यानंतर नव्या लिहिल्या. ह्या तीन गाळलेल्या रात्रीचीं प्रकरणें आम्हीं बोटीवर वाचलीं. गुरुजींच्या वडिलांना आठ सालीं स्वदेशीच्या प्रकरणीं सहा महिन्यांची सजा झाली होती. त्या संबंधींचें एक प्रकरण आहे. घराच्या मागें अंगणांत अंधारांत कांहीं उजेड दिसला. तेव्हां त्या ठिकाणीं संपत्ति पुरलेली असावी असें वाटून श्यामच्या आईनें नि दुर्वांच्या आजीनें रात्रभर श्रम करून खड्डा खांडला तें दुसरें प्रकरण आहे. अन् वडिलांशीं भांडणाऱ्या एका चुलत्यानें श्यामला नि त्याच्या भावाला दोन रुपये दिले पण ते सद्धेतूनें दिले नसल्यानें आईच्या सांगण्यावरून श्यामनें ते रुपये किंवा 'पांढरे दगड' आडांत टाकले हें तिसरें प्रकरण. ह्यांतलें वडिलांना स्वदेशी चळवळीमध्यें शिक्षा झाल्याचें प्रकरण चित्रपटाच्या दृष्टीनें मला महत्त्वाचें वाटलें. नि त्याचा उपयोग करून घेण्याचें मीं त्याच वेळीं ठरविलें. पावणेचाराच्या सुमारास हर्णैचा सुवर्णदुर्ग नि त्याच्या शेजारचा दीपस्तंभ डाव्या बाजूकडे दिसूं लागला. 'हर्णैच्या किल्ल्यावरी। तोफा मारल्या दुहेरी। चंद्र काढिला बाहेरी। इंग्रजांनीं ॥' ह्या ओवीची आठवण झाली. समुद्रांत उभा राहिलेला हा काळ्या दगडाचा बळकट किल्ला लांबून पाहणाऱ्याचें लक्ष वेधल्याखेरीज राहात नाहीं. हर्णै बंदर हें जरा त्रासाचेंच

आहे. बंदरापासून अंतरावर समुद्रांत बोट उभी राहते. तेथून पडावांत बसून किनाऱ्यावर जावें लागते. आतां ह्या पडावासाठीं किनाऱ्यावर उताराचा दगडी धक्का बांधलेला आहे. पण गुरुजींच्या काळीं हा धक्का नव्हता. त्यामुळें कमरेइतक्या पाण्यांत पडाव थांबत. नि तेथल्या तांडेलाच्या खांद्यावर बसून किनाऱ्यावर जावें लागे. 'श्यामच्या आई' मधील शेवटच्या हृदयद्रावक प्रकरणाचा प्रारंभ हर्णैच्या बंदरावर होतो. अखेरच्या दुखण्यांत आई आजारी असते. श्याम विद्याभ्यासासाठीं दूर राहिलेला असतो. त्याच्या स्वप्नांत आई येते नि 'भेटायला ये' म्हणून सांगते. त्याबरोबर तो मुंबईहून बोटीनें आईला भेटायला निघतो. पण हर्णैला पोहोंचण्याच्या तीन दिवस आधीं आई मरण पावली असते. ही बातमी श्यामला हर्णैच्या बंदरावर त्याची मावशी सांगते. ती परत पुण्याला जावयाला निघालेली असते. श्यामच्या नि त्याच्या मावशीच्या भेटीचा हा हृदयद्रावक प्रसंग किनाऱ्यावर पाऊल ठेवतांना आम्हांला आठवला नि सुन्न अंतःकरणांनीं आणि शून्य दृष्टीनें समुद्राच्या आदळणाऱ्या लाटांकडे किती वेळ तरी आम्ही पाहात उभे राहिलों. समुद्राला देखील त्या प्रसंगाची आठवण होत असावी असा आम्हांला भास झाला. ज्या धर्मशाळेंत श्याम आणि त्याची मावशी शोक करीत बसली ती धर्मशाळा केविलवाणी मुद्रा करून अद्यापिहि तशीच त्या ठिकाणीं बसलेली आहे. हर्णैहून दापोली आठ मैल आहे. दापोलीची उंची समुद्रसपाटीपासून अकराशें फूट असल्यानें रस्ता घाटांतून वर चढत जातो. येथून तांबडी माती सुरू होते. आजूबाजूला हिरवीगार दाट झाडी आहे. उजव्या बाजूला समुद्राचा अर्धचंद्राकृति किनारा मधून मधून दिसतो. हर्णैहून दापोलीला जातांना डोळ्यांना नि मनाला फारच आल्हाद वाटतो. पांचगणी किंवा वेळगांव ह्यांसारख्या प्रदेशांतून आपण चाललों आहोंत असा क्षणोक्षणीं भास होतो. पण सुपारीच्या उंच उंच नि नाजुक झाडांचे ठिकठिकाणचे घनदाट समूह आपण कोंकणांत असल्याची आपल्याला आठवण करून देतात. डोंगराच्या उतरणीवर शेतें करण्याची ह्या भागांतील पद्धत नवीन वाटली. पावणेसहाच्या सुमारास आम्ही दापोलीला पोहोंचलों.

दापोली हा एक मोठा सुंदर गांव आहे असें गुरुजींनीं 'श्यामच्या आई' त म्हटलें आहे. गांवांत प्रवेश करतांच डाव्या बाजूला मोठमोठीं ऐसपैस मैदानें दृष्टीस पडतात. त्यामुळें गांवाला एकप्रकारचा शोभिवंत रुबाब प्राप्त झाला आहे.

मैदानाच्या पलिकडे टेकड्या आहेत. ह्या टेकड्यांवर सुरूचीं आणि इतर उंच उंच झाडें आहेत. ह्या झाडींतून डोकावणारी उर्दू शाळेची शुभ्र इमारत प्रथम डोळ्यांत भरते. गुरुजी लहानपणीं दापोलीला ज्या शाळेंत जात होते ती हीच शाळा अशी आरंभीं आमची कल्पना झाली. लाल माती, उंचसखल जमीन, हिरवीगार वनश्री अन् थंड हवा यांचा मनोहर समन्वय मावळत्या सूर्याच्या सोनेरी किरणांत आम्हांला विशेषच रमणीय वाटला. टेकडीच्या पायथ्याशीं असलेल्या एका आंबराईमध्यें डॉ. मंडलीक ह्यांचा अत्यंत टुमदार बंगला आहे. दर्शनींच ऐसपैस ओट्यावरच्या फुलबागेंतील उंच दांड्यावरचीं पिवळीं धमक सूर्यफुलें खडी ताजीम देण्यास नेहमींच उभीं आहेत. सौ. मंडलीक ह्यांनीं सस्मित वदनानें आमचें स्वागत केलें. मंडलीक पतिपत्नी हें दापोलीमध्यें एक अत्यंत रसिक, हौशी आणि पुरोगामी विचारसरणीचें दांपत्य आहे. आतिथ्या-बद्दल त्यांची विशेष ख्याति आहे. त्यामुळें बाहेरून येणाऱ्या आमच्यासारख्या पाहुण्यांचा मारा त्यांना एकसारखा सहन करावा लागतो. थोडीशी विश्रांति घेतल्यानंतर आणि प्रवासाचे श्रम अल्पोपहारानें दूर केल्यानंतर डॉ. मंडलीक आपल्या मोटारीमधून आम्हांला घेऊन वर टेकडीवर गेले. ह्याच टेकडीवरच्या मिशनच्या शाळेंत चाळीस वर्षांपूर्वीं साने गुरुजींनीं प्रवेश केला. महाराष्ट्रांत अनेक ठिकाणच्या शाळा मीं पाहिल्या आहेत. पण असें निसर्गरम्य स्थळ कुठल्याहि शाळेला लाभलेलें मला आठवत नाहीं. शाळेची इमारत एकमजली असून लाल विटांची चुन्यामध्यें बांधलेली आहे. शाळेच्या भोवतीं मोकळी जागा भरपूर असून वाऱ्याची धावपळ सारखी चाललेली असते. ह्या उंचवट्यावरून पायथ्याशीं पसरलेल्या मैदानाचा आणि गांवाचा फारच सुंदर देखावा दिसतो. उतारावर अनेक उंच उंच झाडें असून त्यांमधून अनेक पायवाटा वळणावळणानें गेलेल्या आहेत. याच वाटेनें लहानपणीं गुरुजी वर येत असतील हा विचार मनांत आल्यावांचून राहिला नाहीं. शाळेच्या समोरच्या बाजूला उतारावर कलमी आंब्यांची मोठी राई आहे. भर दुपारीं देखील ह्या राईत सावली असते. ह्याच झाडांवर मधल्या सुटींत सूरपारंब्याचा खेळ आपण खेळत असल्याचें गुरुजींनीं नमूद करून ठेवलें आहे. एके दिवशीं गुरुजींचे वडील खरवसाची बोगणी घेऊन पालगडहून चालत आले. गुरुजींनीं आणि त्यांच्या बालमित्रांनीं ह्याच राईमधल्या कोणत्या तरी झाडाखालीं बसून तो खरवस खाल्ला. ती आठवण त्या

आंबराईकडे पाहतांना मला झाली. आज ह्या शाळेचें नांव 'ऑल्फ्रेड गॅडनी हायस्कूल' असून ती दापोली एज्युकेशन सोसायटीच्या ताब्यांत आहे. बारा साली गुरुजी जेव्हां दुसऱ्या इयत्तेमध्यें ह्या शाळेंत आले तेव्हां ही शाळा 'सोसायटी फॉर द प्रोपेगेशन ऑफ गॉस्पेल' (एस. पी. जी.) ह्या मिशनची होती. आणि शाळेचे प्रिन्सिपॉल गॅडनी साहेब हे होते. इंग्रजी पांचवी झाल्यानंतर सोळा सालीं गुरुजींनीं ही शाळा सोडली. गुरुजींचे शाळेमधील एक वर्गबंधु बाबा मुरुडकर हे आम्हांला त्या ठिकाणीं भेटावयास आले. ते म्हणाले, "शाळेंत आल्यापासून गुरुजी कविता करावयाचे. आम्ही त्यांना त्यावेळीं बालकवि म्हणत असू. गुरुजी त्यावेळीं फार वात्रट अन् खोडकर असत. कित्येक वेळीं ते चावटपणा करीत. पण पुढें त्यांना कशी विरक्ति प्राप्त झाली कोणास ठाऊक?" शाळेची पाहणी करून पुढें आम्ही दापोली गांवांत आलों. गुरुजींचे दुसरे बालमित्र श्री. मंडपे हे आज वकील म्हणून तेथें प्रसिद्ध आहेत. त्यांना जाऊन आम्ही भेटलों. मंडपे वकील हे हिंदुमहासभावादी आहेत. तथापि, त्यामुळें उभयतांच्या मैत्री मध्यें शेवटपर्यंत कधीं खंड पडला नाहीं. गुरुजी दापोलीला आले म्हणजे मंडपे वकिलांच्याच घरीं उतरत. त्यांनींहि गुरुजींच्या बालपणासंबंधीं चित्रपटाच्या दृष्टीनें उपयुक्त होईल अशी माहिती आम्हांला सांगितली. त्यावेळीं शाळेंत मुलें पंचे नेसूनच जात. अर्ध्या विजारीची पद्धत तेव्हां नव्हती. मोठीं माणसेंहि पंचेच नेसत. गुरुजींचे दुसरे एक बालमित्र भेलोसे म्हणून पालगडला कंत्राटदार आहेत. तेहि आम्हांला भेटले. गुरुजींच्या ह्या सर्व बालमित्रांचा त्यांनीं आपल्या वाङ्मयांत निरनिराळ्या नांवांनीं उल्लेख केलेला आढळतो. गुरुजींचे एक चुलत बंधु दामोदर रामकृष्ण साने म्हणून दापोलीला शेतकी खात्यांत आहेत. त्यांनीं साने घराण्याची माहिती सांगितली व वंशावळ आणून दिली. दुसरे दिवशीं पालगडला आमच्याबरोबर यावयाचें त्यांनीं कबूल केलें.

दुसरे दिवशीं सकाळीं लाडघरला आम्ही जावयाला निघालों. डॉ. मंडलीकांचे बंधू बाबा मंडलीक वकील हे आमच्याबरोबर आले. दापोलीहून लाडघर सात-आठ मैल आहे. लाडघरच्या तामसतीर्थांत स्नान करून देवीचा नवस श्यामच्या आईला फेडावयाचा होता. म्हणून श्यामला घेऊन बैलगाडीमधून ती एका सकाळीं दापोलीहून निघाली. मायलेकरांच्या या प्रवासाचें वात्सल्यरसानें ओथंबलेलें अत्यंत हृदयस्पर्शी चित्र गुरुजींनीं एकतिसाव्या प्रकरणांत रंगविलेलें

आहे. आईच्या मांडींत डोकें खुपसून श्याम निजला होता. आई त्याच्या 'भरभरीत शेंडी' मधून प्रेमानें बोटें फिरवीत होती. बैलांच्या गळ्यांतल्या घंटा वाजत होत्या. श्यामला प्रेमानें थोपटतां थोपटतां आई ओवी म्हणूं लागली.

> घनदाट या रानांत। धो धो स्वच्छ वाहे पाणी।
> माझ्या श्यामच्या जीवनीं। देव राहो ॥

रस्त्याच्या भोवतीं दुतर्फा घनदाट जंगल आहे. काजू, आंबे, फणस, वड ह्या झाडांची गर्दी आहे. मधून मधून डोंगरांमधून धो धो पाणी रस्त्यावर पडत आहे. अन् एकमेकांच्या सहवासांत पराकाष्ठेचीं तन्मय होऊन बाहेरच्या जगाला विसरून गेलेलीं हीं दोघें मायलेकरें बैलगाडींतून चाललेलीं आहेत. वात्सल्य-रसाचें असें कोमल नि सुंदर चित्र मराठी वाङ्मयांत दुसरें नाहीं. लाडघरच्या रस्त्यावरून जातांना माझ्या डोळ्यांसमोर हें एकच दृश्य तरळत होतें. दापोलीच्या आजूबाजूचा प्रदेश म्हणजे सृष्टिसौंदर्याचें माहेरघरच आहे असें गुरुजींनीं म्हटलें आहे तें अगदीं खरें आहे. काजूचीं शेकडों झाडें रस्त्याच्या दोन्ही बाजूंला दिसलीं. त्यांवर असंख्य काजू लोंबत होते. आंब्यांच्या कित्येक डेरेदार झाडांवर तर अगणित आंबे लगडले होते. सपाट प्रदेश संपून घाटाचा उतार जेथून सुरू होतो तेथून लाडघरचा समुद्र दिसूं लागतो. घनदाट हिरव्या झाडीनें आच्छादलेल्या डोंगराच्या रांगा दोन्ही बाजूंला अन् समोर अर्धचंद्राकृति समुद्राचा किनारा बघून मला कारवारची आठवण झाली. रस्त्याच्या खालीं ठिकठिकाणीं पोफळीच्या बागा आहेत. त्यांचा शीतल हिरवा रंग बघून डोळ्यांना विसावल्या-सारखें वाटतें. उंडीच्या शुभ्र-पीत फुलांचे सुगंधित तुरे बघून मनाला फारच आल्हाद वाटला. जेथें रस्ता संपतो तेथें वळणेश्वराचें देऊळ आहे. मोटारींतून उतरून पायांनींच आम्हीं तामसतीर्थाकडे गेलों.

तामसतीर्थाचें वैशिष्ट्य हें आहे कीं त्या ठिकाणचें पाणी लालसर तांबूस दिसतें. आजूबाजूचें सर्व पाणी निळसर किंवा हिरवें दिसतें आणि एवढ्याच दोनतीनशें फूट रुंदीच्या पट्ट्यांतलें पाणी लाल दिसतें. अगदीं सकाळीं-संध्या-काळीं किंवा पावसाळ्यामध्यें पाण्याचा लालपणा विशेष जाणवतो असें म्हणतात. आम्ही गेलों तेव्हां सकाळचा दहा-साडेदहाचा सुमार असेल. तरी देखील हा चमत्कार आम्हांला पाहावयाला सांपडला! लांबून लाटा येत तेव्हां निळसर

हिरवेसर दिसत. पण किनाऱ्याजवळ येतांच मात्र त्या लालसर दिसतात. याबद्दल आम्हीं आमची खात्री करून घेतली. या ठिकाणीं देवानें राक्षसाला मारलें म्हणून तेथील पाणी लाल झालें असें कोणी म्हणतात. येथें समुद्रांत एक देवीचें देऊळ आहे अन् तें ओहोटीच्या वेळीं प्रकट होतें असेंहि पुष्कळ सांगतात. पण ह्या सर्व दंतकथा आहेत. या भागांतील समुद्राची वाळू लाल आहे म्हणूनच येथलें पाणी लाल दिसत असावें हें लक्षांत यावयाला आम्हांला कांहीं फार वेळ लागला नाहीं. या ठिकाणचा भाग विशेष खडकाळ आहे. तामसतीर्थांत श्याम आणि त्याच्या आईनें स्नान केल्याचें वर्णन 'श्यामच्या आई'त आलें आहे. आईनें समुद्रांत चार आणे टाकले. तेव्हां श्याम हसून म्हणाला, "आई, रत्नाकराला चार आणे काय देतेस?" आई म्हणाली, "सूर्याला आपण कडवातीनें कां ओवाळतों? हा भावनेचा प्रश्न आहे." तो हृदयंगम संवाद मला त्यावेळीं आठवला.

तामसतीर्थावरून दिसणारा आजूबाजूचा देखावाहि मोठा सुंदर आहे. डाव्या बाजूच्या एका टोकाला बुरोंडी अन् उजव्या बाजूच्या दुसऱ्या टोंकाला हर्णै एवढा सारा लांबलचक किनारा येथून दिसतो. नारळीच्या उंच उंच झाडांनीं बुरोंडीच्या नि लाडघरच्या किनाऱ्याचा भाग फारच शोभिवंत दिसतो. बाबा मंडलिकांचे मामेभाऊ बंडोपंत बाळ म्हणून एक अत्यंत सुबक नि उमदे तरुण आहेत. सुशिक्षित असूनहि ते लाडघरला शेती करतात. ते आम्हांला आपल्या आगरांत घेऊन गेले. समुद्रकिनाऱ्याला लागूनच त्यांचें विस्तीर्ण आगर आहे. आंत शिरतांच पोफळी, नारळी, फणस ह्या झाडांची उंच नि दाट गर्दी त्या ठिकाणीं लागून राहिलेली बघून मनाला नि शरीराला अगदीं विसावल्यासारखें वाटलें. जंगली पानांच्या नि फुलांच्या विशिष्ट वासानें सारें वातावरण दरवळून गेलें होतें. लांबून येणारा बैलरहाटांच्या चाकांचा मंद नि व्याकूळ सूर साऱ्या बागेमधें निनादून राहिला होता. प्रारंभीं तर नभोवाणीवरून कोणीतरी खर्जामध्यें तोडीचे स्वर आळवीत असल्याचा मला भास झाला. बागेच्या मध्यभागीं एका विहिरीवर चाकांचे तीन रहाट बसविलेले दिसले. त्यांतले दोन रहाट चालू होते. डाव्या बाजूला अन् उजव्या बाजूला खांबाभोवतीं डोळ्यांवर फडक्याचें ढापण बांधलेले दोन बैल सावकाश एकसारखे फिरत होते. रहाटावर बसविलेल्या मडक्यांच्या माळा मध्यें बसविलेल्या पन्हाळींत उपड्या होत होत्या, आणि त्यांतल्या पाण्याची धार बाहेर ठेवलेल्या दगडाच्या मोठ्या कुंडीमध्यें पडत होती. काठोकाठ भरल्यानंतर कुंडींतलें

सांडणारें पाणी बाहेर पाटांत पडून बागेंत जात होतें. बागेचें शिंपणें चालू होतें.. विहिरीला लागून ऐसपैस दुमजली घर होतें. घराच्या समोर अंगण साखून त्यावर मंडप घातलेला होता. कोंकणांत बसण्याउठण्याची सगळी वर्दळ याच छपराखालीं चालते. पलिकडे गुरांचा लांबलचक गोठा होता. पालापाचोळा जमा करण्यासाठीं फळकी पट्ट्यांच्या मोठमोठ्या करंड्या डोक्यावर घेऊन बायका इकडून तिकडे जात होत्या. शहाळ्यांतलें मधुर पाणी, खोबऱ्याची साय आणि साखर नि फणसाचे गरे हा कोंकणचा मेवा देऊन बंडोपंतांनीं आमचा सत्कार केला. बुगड्याच्या मिरच्या नि जायफळाचीं फळें पूर्वी आम्हीं कधीं पाहिलीं नव्हतीं तीं त्यांनीं दाखविलीं. लाडघरांतील आगरांचा तो आल्हाददायक नमुना बघून हीं आगरें म्हणजे सौंदर्य नि समृद्धि ह्यांचीं माहेरेंच होत असें वाटल्यावांचून राहिलें नाहीं. वळणेश्वराचें दर्शन घेऊन आम्हीं लाडघर सोडलें. दापोलीला पोहोंचलों तेव्हां बारा वाजून गेले होते.

दुपारीं तीनच्या सुमारास आम्ही पालगडला जाण्यास निघालों. बरोबर दामू-अण्णा साने आले. पालगड हें गुरुजींचें जन्मग्राम. 'श्यामची आई'मधील पुष्कळशा घटना पालगड येथेंच घडल्या. म्हणून पालगड पाहण्याची आम्हांला विशेष उत्सुकता वाटत होती. दापोलीपासून पालगड बारा-तेरा मैल आहे. बेळगांवहून खानापूरकडे जातां आहोंत असें वाटलें.. तशीच लाल माती अन् रस्त्याच्या दुतर्फा दाट झाडी. पण रस्ता अतिशयच वाईट आहे. मोटारमधून जातां जातां आदळआपटीनें आमचें अंग अगदीं खिळखिळें झालें. प्रा. बापट विनोदानें म्हणाले, "गुरुजी ह्या रस्त्यानें पायीं कां जात होते याचें कारण आतां कळलें!" अकरा-बारा वर्षांचा 'श्याम' शनिवारीं दुपारीं शाळा सुटली कीं दापोलीहून निघे अन् दिवेलागणीच्या सुमारास पालगडला पोहोंचे. आईला भेटावयाची त्याला इतकी तळमळ लागलेली असे कीं, एवढें अंतर आपणाला चालून जातां येईल कीं नाहीं ही भीति त्याच्या मनाला शिवतसुद्धां नसे. वाटेंत करजणी गांवाजवळ एक भुताटकीची विहीर आहे. तेथें लग्नाचें वऱ्हाडच्या वऱ्हाड अदृश्य झालें असें सांगतात. येथून जातांना श्याम 'राम राम' म्हणे अन् जोरानें पळत सुटे. ही विहीर आम्हीं पाहिली. ती आतां अर्धवट बुजून गेली आहे. ज्या घोड-विहिरीमध्यें उतरून श्याम पाणी पीत असे तीहि विहीर आम्हीं आंत जाऊन बघितली. पावसाळ्याच्या दिवसांत आपल्या धाकट्या भावाला कोट घेऊन श्याम

आहे. बंदरापासून अंतरावर समुद्रांत बोट उभी राहते. तेथून पडावांत बसून किनाऱ्यावर जावें लागते. आतां ह्या पडावासाठीं किनाऱ्यावर उताराचा दगडी धक्का बांधलेला आहे. पण गुरुजींच्या काळीं हा धक्का नव्हता. त्यामुळें कमरे-इतक्या पाण्यांत पडाव थांबत. नि तेथल्या तांडेलाच्या खांद्यावर बसून किनाऱ्या-वर जावें लागे. 'श्यामच्या आई' मधील शेवटच्या हृदयद्रावक प्रकरणाचा प्रारंभ हर्णैच्या बंदरावर होतो. अखेरच्या दुखण्यांत आई आजारी असते. श्याम विद्याभ्यासासाठीं दूर राहिलेला असतो. त्याच्या स्वप्नांत आई येते नि 'भेटायला ये' म्हणून सांगते. त्याबरोबर तो मुंबईहून बोटीनें आईला भेटायला निघतो. पण हर्णैला पोहोंचण्याच्या तीन दिवस आधीं आई मरण पावली असते. ही बातमी श्यामला हर्णैच्या बंदरावर त्याची मावशी सांगते. ती परत पुण्याला जावयाला निघालेली असते. श्यामच्या नि त्याच्या मावशीच्या भेटीचा हा हृदयद्रावक प्रसंग किनाऱ्यावर पाऊल ठेवतांना आम्हांला आठवला नि सुन्न अंतःकरणांनीं आणि शून्य दृष्टीनें समुद्राच्या आदळणाऱ्या लाटांकडे किती वेळ तरी आम्ही पाहात उभे राहिलों. समुद्राला देखील त्या प्रसंगाची आठवण होत असावी असा आम्हांला भास झाला. ज्या धर्मशाळेंत श्याम आणि त्याची मावशी शोक करीत बसली ती धर्मशाळा केविलवाणी मुद्रा करून अद्यापिहि तशीच त्या ठिकाणीं बसलेली आहे. हर्णैहून दापोली आठ मैल आहे. दापोलीची उंची समुद्रसपाटीपासून अकराशें फूट असल्यानें रस्ता घाटांतून वर चढत जातो. येथून तांबडी माती सुरू होते. आजूबाजूला हिरवीगार दाट झाडी आहे. उजव्या बाजूला समुद्राचा अर्धचंद्राकृति किनारा मधून मधून दिसतो. हर्णैहून दापोलीला जातांना डोळ्यांना नि मनाला फारच आल्हाद वाटतो. पांचगणी किंवा वेळगांव ह्यांसारख्या प्रदेशां-तून आपण चाललों आहोंत असा क्षणोक्षणीं भास होतो. पण सुपारीच्या उंच उंच नि नाजुक झाडांचे ठिकठिकाणचे घनदाट समूह आपण कोंकणांत असल्याची आपल्याला आठवण करून देतात. डोंगराच्या उतरणीवर शेतें करण्याची ह्या भागांतील पद्धत नवीन वाटली. पावणेसहाच्या सुमारास आम्ही दापोलीला पोहोंचलों.

दापोली हा एक मोठा सुंदर गांव आहे असें गुरुजींनीं 'श्यामच्या आई' त म्हटलें आहे. गांवांत प्रवेश करतांच डाव्या बाजूला मोठमोठीं ऐसपैस मैदानें दृष्टीस पडतात. त्यामुळें गांवाला एकप्रकारचा शोभिवंत रुबाब प्राप्त झाला आहे.

मैदानाच्या पलिकडे टेकड्या आहेत. ह्या टेकड्यांवर सुरूचीं आणि इतर उंच उंच झाडें आहेत. ह्या झाडांनून डोकावणारी उर्दू शाळेची शुभ्र इमारत प्रथम डोळ्यांत भरते. गुरुजी लहानपणीं दापोलीला ज्या शाळेंत जात होते ती हीच शाळा अशी आरंभीं आमची कल्पना झाली. लाल माती, उंचसखल जमीन, हिरवीगार वनश्री अन् थंड हवा यांचा मनोहर समन्वय मावळत्या सूर्याच्या सोनेरी किरणांत आम्हांला विशेषच रमणीय वाटला. टेकडीच्या पायथ्याशीं असलेल्या एका आंबराईमध्यें डॉ. मंडलीक ह्यांचा अत्यंत टुमदार बंगला आहे. दर्शनींच ऐसपैस ओट्यावरच्या फुलबागेंतील उंच दांड्यावरचीं पिवळीं धमक सूर्यफुलें खडी ताजीम देण्यास नेहमींच उभीं आहेत. सौ. मंडलीक ह्यांनीं सस्मित वदनानें आमचें स्वागत केलें. मंडलीक पतिपत्नी हें दापोलीमध्यें एक अत्यंत रसिक, हौशी आणि पुरोगामी विचारसरणीचें दांपत्य आहे. आतिथ्या-बद्दल त्यांची विशेष ख्याति आहे. त्यामुळें बाहेरून येणाऱ्या आमच्यासारख्या पाहुण्यांचा मारा त्यांना एकसारखा सहन करावा लागतो. थोडीशी विश्रांति घेतल्यानंतर आणि प्रवासाचे श्रम अल्पोपहारानें दूर केल्यानंतर डॉ. मंडलीक आपल्या मोटारीमधून आम्हांला घेऊन वर टेकडीवर गेले. ह्याच टेकडीवरच्या मिशनच्या शाळेंत चाळीस वर्षांपूर्वीं साने गुरुजींनीं प्रवेश केला. महाराष्ट्रांत अनेक ठिकाणच्या शाळा मीं पाहिल्या आहेत. पण असें निसर्गरम्य स्थळ कुठल्याहि शाळेला लाभलेलें मला आठवत नाहीं. शाळेची इमारत एकमजली असून लाल विटांची चुन्यामध्यें बांधलेली आहे. शाळेच्या भोवतीं मोकळीं जागा भरपूर असून वाऱ्याची धावपळ सारखी चाललेली असते. ह्या उंचवट्यावरून पायथ्याशीं पसरलेल्या मैदानाचा आणि गांवाचा फारच सुंदर देखावा दिसतो. उतारावर अनेक उंच उंच झाडें असून त्यांमधून अनेक पायवाटा वळणावळणानें गेलेल्या आहेत. याच वाटेनें लहानपणीं गुरुजी वर येत असतील हा विचार मनांत आल्यावांचून राहिला नाहीं. शाळेच्या समोरच्या बाजूला उतारावर कलमी आंब्यांची मोठी राई आहे. भर दुपारीं देखील ह्या राईत सावली असते. ह्याच झाडांवर मधल्या सुटींत सूरपारंब्याचा खेळ आपण खेळत असल्याचें गुरुजींनीं नमूद करून ठेवलें आहे. एके दिवशीं गुरुजींचे वडील खरवसाची बोगणी घेऊन पालगडहून चालत आले. गुरुजींनीं आणि त्यांच्या बालमित्रांनीं ह्याच राईमधल्या कोणत्या तरी झाडाखालीं बसून तो खरवस खाल्ला. ती आठवण त्या

आंबराईकडे पाहतांना मला झाली. आज ह्या शाळेचें नांव 'ऑल्फ्रेड गॅडनी हायस्कूल' असून ती दापोली एज्युकेशन सोसायटीच्या ताब्यांत आहे. बारा सालीं गुरुजी जेव्हां दुसऱ्या इयत्तेमध्यें ह्या शाळेंत आले तेव्हां ही शाळा 'सोसायटी फॉर द् प्रोपेगेशन ऑफ गॉस्पेल' (एस. पी. जी.) ह्या मिशनची होती. आणि शाळेचे प्रिन्सिपॉल गॅडनी साहेब हे होते. इंग्रजी पाचवी झाल्यानंतर सोळा सालीं गुरुजींनीं ही शाळा सोडली. गुरुजींचे शाळेमधील एक वर्गबंधु बाबा मुरुडकर हे आम्हांला त्या ठिकाणीं भेटावयास आले. ते म्हणाले, "शाळेंत आल्यापासून गुरुजी कविता करावयाचे. आम्ही त्यांना त्यावेळीं बालकवि म्हणत असूं. गुरुजी त्यावेळीं फार वात्रट अन् खोडकर असत. कित्येक वेळीं ते चावटपणा करीत. पण पुढें त्यांना कशी विरक्ति प्राप्त झाली कोणास ठाऊक?" शाळेची पाहणी करून पुढें आम्ही दापोली गांवांत आलों. गुरुजींचे दुसरे बालमित्र श्री. मंडपे हे आज वकील म्हणून तेथें प्रसिद्ध आहेत. त्यांना जाऊन आम्ही भेटलों. मंडपे वकील हे हिंदुमहासभावादी आहेत. तथापि, त्यामुळें उभयतांच्या मैत्री-मध्यें शेवटपर्यंत कधीं खंड पडला नाहीं. गुरुजी दापोलीला आले म्हणजे मंडपे वकिलांच्याच घरीं उतरत. त्यांनींहि गुरुजींच्या बालपणासंबंधीं चित्रपटाच्या दृष्टीनें उपयुक्त होईल अशी माहिती आम्हांला सांगितली. त्यावेळीं शाळेंत मुलें पंचे नेसूनच जात. अर्ध्या विजारीची पद्धत तेव्हां नव्हती. मोटीं माणसेंहि पंचेच नेसत. गुरुजींचे दुसरे एक बालमित्र भेलोसे म्हणून पालगडला कंत्राटदार आहेत. तेहि आम्हांला भेटले. गुरुजींच्या ह्या सर्व बालमित्रांचा त्यांनीं आपल्या वाङ्मयांत निरनिराळ्या नांवांनीं उल्लेख केलेला आढळतो. गुरुजींचे एक चुलत बंधु दामोदर रामकृष्ण साने म्हणून दापोलीला शेतकी खात्यांत आहेत. त्यांनीं साने घराण्याची माहिती सांगितली व वंशावळ आणून दिली. दुसरे दिवशीं पाल-गडला आमच्याबरोबर यावयाचें त्यांनीं कबूल केलें.

दुसरे दिवशीं सकाळीं लाडघरला आम्ही जावयाला निघालों. डॉ. मंडलीकांचे बंधू बाबा मंडलीक वकील हे आमच्याबरोबर आले. दापोलीहून लाडघर सात-आठ मैल आहे. लाडघरच्या तामसतीर्थांत स्नान करून देवीचा नवस श्यामच्या आईला फेडावयाचा होता. म्हणून श्यामला घेऊन बैलगाडीमधून ती एका सकाळीं दापोलीहून निघाली. मायलेकरांच्या या प्रवासाचें वात्सल्यरसानें ओथंबलेलें अत्यंत हृदयस्पर्शी चित्र गुरुजींनीं एकतिसाव्या प्रकरणांत रंगविलेलें

आहे. आईच्या मांडींत डोकें खुपसून श्याम निजला होता. आई त्याच्या 'भरभरीत शेंडी' मधून प्रेमानें बोटें फिरवीत होती. बैलांच्या गळ्यांतल्या घंटा वाजत होत्या. श्यामला प्रेमानें थोपटतां थोपटतां आई ओवी म्हणूं लागली.

घनदाट या रानांत। धो धो स्वच्छ वाहे पाणी।
माझ्या श्यामच्या जीवनीं। देव राहो॥

रस्त्याच्या भोवतीं दुतर्फा घनदाट जंगल आहे. काजू, आंबे, फणस, वड ह्या झाडांची गर्दी आहे. मधून मधून डोंगरांमधून धो धो पाणी रस्त्यावर पडत आहे. अन् एकमेकांच्या सहवासांत पराकाष्ठेचीं तन्मय होऊन बाहेरच्या जगाला विसरून गेलेलीं हीं दोघें मायलेकरें बैलगाडींतून चाललेलीं आहेत. वात्सल्य-रसाचें असें कोमल नि सुंदर चित्र मराठी वाङ्मयांत दुसरें नाहीं. लाडघरच्या रस्त्यावरून जातांना माझ्या डोळ्यांसमोर हें एकच दृश्य तरळत होतें. दापोलीच्या आजूबाजूचा प्रदेश म्हणजे सृष्टिसौंदर्याचें माहेरघरच आहे असें गुरुजींनीं म्हटलें आहे तें अगदीं खरें आहे. काजूचीं शेकडों झाडें रस्त्याच्या दोन्ही बाजूंला दिसलीं. त्यांवर असंख्य काजू लोंबत होते. आंब्यांच्या कित्येक डेरेदार झाडांवर तर अगणित आंबे लगडले होते. सपाट प्रदेश संपून घाटाचा उतार जेथून सुरू होतो तेथून लाडघरचा समुद्र दिसूं लागतो. घनदाट हिरव्या झाडींनें आच्छादलेल्या डोंगराच्या रांगा दोन्ही बाजूंला अन् समोर अर्धचंद्राकृति समुद्राचा किनारा बघून मला कारवारची आठवण झाली. रस्त्याच्या खालीं ठिकठिकाणीं पोफळीच्या बागा आहेत. त्यांचा शीतल हिरवा रंग बघून डोळ्यांना विसावल्या-सारखें वाटतें. उंडीच्या शुभ्र-पीत फुलांचे सुगंधित तुरे बघून मनाला फारच आल्हाद वाटला. जेथें रस्ता संपतो तेथें वळणेश्वराचें देऊळ आहे. मोटारींतून उतरून पायांनींच आम्हीं तामसतीर्थाकडे गेलों.

तामसतीर्थाचें वैशिष्ट्य हें आहे कीं त्या ठिकाणचें पाणी लालसर तांबूस दिसतें. आजूबाजूचें सर्व पाणी निळसर किंवा हिरवें दिसतें आणि एवढ्याच दोनतीनशें फूट रुंदीच्या पट्ट्यांतलें पाणी लाल दिसतें. अगदीं सकाळीं-संध्या-काळीं किंवा पावसाळ्यामध्यें पाण्याचा लालपणा विशेष जाणवतो असें म्हणतात. आम्ही गेलों तेव्हां सकाळचा दहा-साडेदहाचा सुमार असेल. तरी देखील हा चमत्कार आम्हांला पाहावयाला सांपडला! लांबून लाटा येत तेव्हां निळसर

हिरवेसर दिसत. पण किनाऱ्याजवळ येतांच मात्र त्या लालसर दिसतात. याबद्दल आम्हीं आमची खात्री करून घेतली. या ठिकाणीं देवानें राक्षसाला मारलें म्हणून तेथील पाणी लाल झालें असें कोणी म्हणतात. येथें समुद्रांत एक देवीचें देऊळ आहे अन् तें ओहोटीच्या वेळीं प्रकट होतें असेंहि पुष्कळ सांगतात. पण ह्या सर्व दंतकथा आहेत. या भागांतील समुद्राची वाळू लाल आहे म्हणूनच येथलें पाणी लाल दिसत असावें हें लक्षांत यावयाला आम्हांला कांहीं फार वेळ लागला नाहीं. या ठिकाणचा भाग विशेष खडकाळ आहे. तामसतीर्थांत श्याम आणि त्याच्या आईनें स्नान केल्याचें वर्णन 'श्यामच्या आई'त आलें आहे. आईनें समुद्रांत चार आणे टाकले. तेव्हां श्याम हसून म्हणाला, "आई, रत्नाकराला चार आणे काय देतेस?" आई म्हणाली, "सूर्याला आपण कडवातीनें कां ओवाळतों? हा भावनेचा प्रश्न आहे." तो हृदयंगम संवाद मला त्यावेळीं आठवला.

तामसतीर्थावरून दिसणारा आजूबाजूचा देखावाहि मोठा सुंदर आहे. डाव्या बाजूच्या एका टोकाला बुरोंडी अन् उजव्या बाजूच्या दुसऱ्या टोकाला हर्णै एवढा सारा लांबलचक किनारा येथून दिसतो. नारळीच्या उंच उंच झाडांनीं बुरोंडीच्या नि लाडघरच्या किनाऱ्याचा भाग फारच शोभिवंत दिसतो. बाबा मंडलिकांचे मामेभाऊ बंडोपंत बाळ म्हणून एक अत्यंत सुबक नि उमदे तरुण आहेत. सुशिक्षित असूनहि ते लाडघरला शेती करतात. ते आम्हांला आपल्या आगरांत घेऊन गेले. समुद्रकिनाऱ्याला लागूनच त्यांचें विस्तीर्ण आगर आहे. आंत शिरतांच पोफळी, नारळी, फणस ह्या झाडांची उंच नि दाट गर्दी त्या ठिकाणीं लागून राहिलेली बघून मनाला नि शरीराला अगदीं विसावल्यासारखें वाटलें. जंगली पानांच्या नि फुलांच्या विशिष्ट वासानें सारें वातावरण दरवळून गेलें होतें. लांबून येणारा बैलरहाटांच्या चाकांचा मंद नि व्याकूळ सूर साऱ्या बागेमधें निनादून राहिला होता. प्रारंभीं तर नभोवाणीवरून कोणीतरी खर्जामध्यें तोडीचे स्वर आळवीत असल्याचा मला भास झाला. बागेच्या मध्यभागीं एका विहिरीवर चाकांचे तीन रहाट बसविलेले दिसले. त्यांतले दोन रहाट चालू होते. डाव्या बाजूला अन् उजव्या बाजूला खांबाभोवतीं डोळ्यांवर फडक्याचें ढापण बांधलेले दोन बैल सावकाश एकसारखे फिरत होते. रहाटावर बसविलेल्या मडक्यांच्या माळा मध्यें बसविलेल्या पन्हाळींत उपड्या होत होत्या, आणि त्यांतल्या पाण्याची धार बाहेर ठेवलेल्या दगडाच्या मोठ्या कुंडीमध्यें पडत होती. काठोकाठ भरल्यानंतर कुंडींतलें

सांडणारें पाणी बाहेर पाटांत पडून बागेंत जात होतें. बागेचें शिंपणें चालू होतें. विहिरीला लागून ऐसपैस दुमजली घर होतें. घराच्या समोर अंगण सारवून त्यावर मंडप घातलेला होता. कोंकणांत बसण्याउठण्याची सगळी वर्दळ याच छपराखालीं चालते. पलिकडे गुरांचा लांबलचक गोठा होता. पालापाचोळा जमा करण्यासाठीं फळकी पट्ट्यांच्या मोठमोठ्या करंड्या डोक्यावर घेऊन बायका इकडून तिकडे जात होत्या. शहाळ्यांतलें मधुर पाणी, खोबऱ्याची साय आणि साखर नि फणसाचे गरे हा कोंकणचा मेवा देऊन बंडोपंतांनीं आमचा सत्कार केला. बुगड्याच्या मिरच्या नि जायफळाचीं फळें पूर्वी आम्हीं कधीं पाहिलीं नव्हतीं तीं त्यांनीं दाखविलीं. लाडघरांतील आगरांचा तो आल्हाददायक नमुना बघून हीं आगरें म्हणजे सौंदर्य नि समृद्धि ह्यांचीं माहेरेंच होत असें वाटल्यावांचून राहिलें नाहीं. वळणेश्वराचें दर्शन घेऊन आम्हीं लाडघर सोडलें. दापोलीला पोहोंचलों तेव्हां बारा वाजून गेले होते.

दुपारीं तीनच्या सुमारास आम्ही पालगडला जाण्यास निघालों. बरोबर दामूअण्णा साने आले. पालगड हें गुरुजींचें जन्मग्राम. ‘श्यामची आई’मधील पुष्कळशा घटना पालगड येथेंच घडल्या. म्हणून पालगड पाहण्याची आम्हांला विशेष उत्सुकता वाटत होती. दापोलीपासून पालगड बारा-तेरा मैल आहे. बेळगांवहून खानापूरकडे जातां आहोंत असें वाटलें. तशीच लाल माती अन् रस्त्याच्या दुतर्फा दाट झाडी. पण रस्ता अतिशयच वाईट आहे. मोटारमधून जातां जातां आदळआपटीनें आमचें अंग अगदीं खिळखिळें झालें. प्रा. बापट विनोदानें म्हणाले, “गुरुजी ह्या रस्त्यानें पायीं कां जात होते याचें कारण आतां कळलें!” अकरा-बारा वर्षांचा ‘श्याम’ शनिवारीं दुपारीं शाळा सुटली कीं दापोलीहून निघे अन् दिवेलागणीच्या सुमारास पालगडला पोहोंचे. आईला भेटावयाची त्याला इतकी तळमळ लागलेली असे कीं, एवढें अंतर आपणाला चालून जातां येईल कीं नाहीं ही भीति त्याच्या मनाला शिवतसुद्धां नसे. वाटेंत करजणी गांवाजवळ एक भुताटकीची विहीर आहे. तेथें लग्नाचें वऱ्हाडच्या वऱ्हाड अदृश्य झालें असें सांगतात. येथून जातांना श्याम ‘राम राम’ म्हणे अन् जोरानें पळत सुटे. ही विहीर आम्हीं पाहिली. ती आतां अर्धवट बुजून गेली आहे. ज्या घोडविहिरीमध्यें उतरून श्याम पाणी पीत असे तीहि विहीर आम्हीं आंत जाऊन बघितली. पावसाळ्याच्या दिवसांत आपल्या धाकट्या भावाला कोट घेऊन श्याम

पालगडला जात असतां वाटेंत पिसईचा पऱ्ह्या नि सोंडघरचा पऱ्ह्या दुथडी भरून चालले होते. पण श्याम न घाबरतां त्या पाण्यांतून धैर्यानें पलीकडे गेला. ते पऱ्ह्ये आम्हीं समक्ष पाहिले. उन्हाळ्याच्या दिवसांत पाणी नसल्यानें ते अतिशय क्षुद्र आणि उपेक्षणीय दिसत होते. पण पावसाळ्यांत त्यांना खूपच पाणी येतें, आणि त्याला ओढहि विलक्षण असते असें म्हणतात.

पालगडच्या गांवाकडे जाणारा रस्ता डाव्या बाजूनें वळतो त्याच्या उजव्या बाजूला उंच डोंगराच्या माथ्यावर पालगड किल्ला दिसतो. त्या किल्ल्याची भव्य पार्श्वभूमि चिमुकल्या पालगडला मिळालेली आहे. गांवांत प्रवेश करतांना विशेष उल्हास वाटत नाहीं. घरें, माणसें नि सारें वातावरण जुनें आणि मलिन वाटतें. नावीन्याचा किंवा आधुनिकत्वाचा लवलेशहि तेथें आढळत नाहीं. गांवाच्या मधून जो एक अरुंद रस्ता जातो तोच गांवांतला मुख्य रस्ता. त्याच्या दोहों बाजूंलाच गांव वसलेला आहे. बहुतेक वस्ती चित्पावन ब्राह्मणांची आहे. ‘श्यामच्या आई’मध्यें ज्या ज्या स्थळांचा उल्लेख आलेला आहे तीं तीं सर्व स्थळें ह्या रस्त्यावर एका फर्लांगाच्या आंतबाहेर आढळतात. गुरुजी ज्या शाळेंत शिकत होते ती पालगडची प्राथमिक शाळा प्रथमच उजव्या बाजूला लागते. ही शाळा १ मे १८६६ सालीं स्थापन झालेली आहे. त्या शाळेच्या समोर गंगूअप्पा ओकांचें प्रशस्त घर आहे. गुरुजींचे वडील गप्पा मारण्यासाठीं तेथेंच नेहमीं येऊन बसत. आणखी पुढें गेलें कीं डाव्या बाजूला शंकर, मारुति, गणपति आणि दत्त ह्यांचीं ओळीनें देवळें आहेत. एकदां अवर्षण झालें असतां गाभाऱ्यांत पाणी भरून शंकराची पिंडी गांवकऱ्यांनीं बुडविली. ‘सांब सदाशिव पाऊस दे, शेतें भातें पिकूं दे’ असें गात गात गांवांतील मुलें तांब्ये भरभरून देवळांत पाणी नेत होतीं. त्यांत गुरुजींनीं भाग घेतला होता तें शंकराचें देऊळ यांपैकींच. या देवळासमोर गुरुजींच्या आईचे वडील नाना ह्यांचें घर होतें. तिकडे आम्ही गेलों नाहीं. देवळावरून उजव्या बाजूनें पुढें गेलें म्हणजे देवघराची विहीर लागते. याच विहिरींत गुरुजी पोहावयाला शिकले. त्यांना आरंभीं पोहण्याचें भय वाटत होतें. पण मुलांनीं त्यांना पाण्यांत ढकलून दिलें तेव्हां त्यांचें भय नाहींसें झालें. तो प्रसंग ही विहीर पाहात असतांना मला आठवला अन् मनांतल्या मनांत हसूं आलें.

साने मंडळींचीं घरें एका ओळीनेंच डाव्या बाजूला लागलेलीं आहेत. आरंभीं आम्ही दामूअण्णा सान्यांच्या घरीं गेलों. रस्त्यावरून घरांत शिरतांना

तोंडाला आडवें लाकूड लावलेलें असतें. ह्याला वेडें म्हणतात. ह्या वेड्यावरून पाय टाकून आंत जावें लागतें. दामूअण्णांच्या घराला लागूनच गुरुजींच्या कुटुंबाचें घर आहे. गुरुजींचे थोरले बंधु गजाननदादा ह्यांनीं हें बांधलें. गजाननदादा वारले. तेव्हां बोर्डीला असणारे त्यांचे धाकटे बंधु पुरुषोत्तम हे ह्या घराचे आतां मालक आहेत. गजाननदादांची मुलगी सुधा ही बोर्डीला आपल्या चुलत्याकडे असते. गुरुजींनीं आपलीं 'सुंदर पत्रें' ह्या सुधेला उद्देशून लिहिलीं. सुधेचे मामा रामकृष्ण जोशी हे ह्या घरात सध्यां राहतात. ते शिंपीकाम करतात. गुरुजींच्या चरित्राशीं तसा ह्या घराचा संबंध नाहीं. गुरुजींच्या वडिलांनीं जें लहानसें गवतारू घर बांधलें अन् त्यावर सावकारांनीं पुढें जप्ती आणली, तें घर आतां नष्ट झालें आहे. गुरुजींच्या बालपणांतील गोष्टी त्याच घरांत घडल्या. गुरुजींचे वडील सदाशिवरावभाऊ नि चुलते विष्णुपंत अन् रामकृष्ण ह्यांचें संयुक्त कुटुंब ज्या मोठ्या घरांत राहात होतें, त्या घराचा पुढचा भाग आतां नाहींसा झालेला आहे. मागचा भाग जो शिल्लक आहे, त्यांतल्याच एका लहानशा खोलींत गुरुजींचा जन्म झाला. ही खोली आंत जाऊन आम्हीं पाहिली. तेथें सध्यां एक लांबलचक हडपा म्हणजे पेटारा ठेवलेला आहे. 'लोट्याचा कोनाडा' म्हणजे मडकें भिंतींत पुरून त्याचा केलेला कोनाडा ह्याच खोलींत मला प्रथम पाहावयास मिळाला. गुरुजी ज्या दगडीवर आंघोळ करीत ती बाहेरच्या बाजूस आहे. मागल्या बाजूस खोल विहीर आहे. तिला आंत उतरावयाला पायऱ्या आहेत. 'दुर्वांची आजी' ह्या पायऱ्यांवरून खालीं उतरत असे हें जेव्हां आठवलें तेव्हां त्या बाईच्या धाडसाचें नवलच वाटलें. घराच्या मागल्या बाजूला पुष्कळशी जंगली झाडी आहे. गुरुजींचे एक चुलते रामकृष्णपंत ह्यांचें घर शेजारीं आहे. दुसरे चुलते विष्णुपंत आपल्या चुलत्याला दत्तक गेले. त्यांनीं आफ्रिकेला जाऊन पुष्कळ पैसा मिळविला. त्यांचें रस्त्यालगत बांधलेलें दुमजली घर मोठें रुबाबदार आहे. गांवामध्यें हेंच एक घर नवीन वाटलें. ह्याच घरांत बाहेरच्या बाजूस अमृतशेट मारवाड्याचें कापडाचें दुकान होतें. 'श्यामच्या आई'मध्यें त्याचे दोन मुलगे मोहन्या आणि बद्री ह्यांचा उल्लेख आला आहे. ह्यांपैकीं आतां कोणीच शिल्लक नाहीं. त्याच्या दुकानाचेहि कधींच तीनतेरा वाजून गेले. गांवांत कोणीहि मारवाडी आला कीं तो पैसे कमावल्याखेरीज राहात नाहीं. पण पैसे गमावून गांवांतून परागंदा झालेला हा एकटाच मारवाडी असें आम्हांला येथें कोणींतरी सांगितलें. त्या उद्गारांनीं खूपच हशा पिकला.

गुरुजींचे धाकटे चुलते रामकृष्णपंत ह्यांच्या घरीं नंतर गेलों. सदुसष्ट वर्षांचें त्यांचें वय आहे. त्यांचे दाढीमिशांचे केस पिकले असले तरी डोक्याचे केस काळेच आहेत. आवाज नि प्रकृति खणखणीत आहे. अंगकाठी मात्र लहानशी आहे. 'श्यामच्या आई'त दहाव्या प्रकरणामध्यें गुरुजींच्या वडिलांना त्यांच्या धाकट्या दोघा भावांनीं घराबाहेर काढलें नि पुढें त्यांना 'पर्णकुटी'त जाऊन राहावें लागलें असा उल्लेख आहे. हा मजकूर रामकृष्णपंतांच्या वर्मी लागलेला आहे. अन् त्यामुळें ते अतिशय बेचैन झालेले आम्हांला दिसले. ते आवेशानें म्हणाले, "ही गोष्ट असत्य आहे. आम्हीं आमच्या थोरल्या बंधूंना घरांतून बाहेर काढलें नाहीं. त्यांनींच आपण होऊन घरांतला आपला हिस्सा सोडला नि त्याच्याबदली शेताचा अधिक वाटा घेतला. आम्हां तिघांचा फारकतनामा झालेला आहे. आणि तो तिघांच्या संमतीनें आणि खुशीनें झाला आहे." असें म्हणून रामकृष्णपंतांनीं घरांतून त्या फारकतनाम्याची एक मोडी प्रत आम्हांला आणून दाखवली. ह्या प्रकरणीं 'श्यामच्या आई'मध्यें गुरुजींनीं जो मजकूर लिहिला आहे त्यानें पालगडची सर्वच साने मंडळी गुरुजींवर एकंदरींत रुष्ट झालेली दिसली. गुरुजींच्या वडिलांना कर्ज कां झालें? अन् त्यांच्या गवतारू घरावर सावकारांनीं जप्ती कां आणली? ह्यासंबंधीं चौकशी करतां ह्या मंडळींनीं असें सांगितलें कीं, गुरुजींच्या वडिलांना कोर्टबाजीचा विशेष नाद होता अन् त्यांतच त्यांचे बरेचसे पैसे गेले. सर्व हकीकत ऐकून आम्ही आमच्या मनाशीं जो निष्कर्ष काढला तो असा. गुरुजींचे वडील हे घरांत स्वस्थ बसणारे गृहस्थ नव्हते. गांवकीच्या कारभारांत ते प्रामुख्यानें पडत असत. टिळकांना शिक्षा झाली तेव्हां विलायती साखरेवर बहिष्कार पुकारण्याची शपथ त्यांनींच गांवच्या दुकानदारांना घ्यावयाला लागली. त्यांत त्यांना सहा महिन्यांची शिक्षा झाली. भावाबहिणींचीं लग्नकार्यें, त्यांच्या मुलांचीं शिक्षणें ह्यांत त्यांचा पैसा गेला. फारकतनामा करून त्यांनीं घर सोडलें असेल. पण त्याचें मुख्य कारण म्हणजे घरामध्यें कुटुंबांतल्या मंडळींचा पूर्वीचा एकोपा नि प्रेम राहिलेलें नसावें म्हणून आपण होऊनच त्यांनीं घरांतून बाहेर जावयाचें ठरविलें. गुरुजींना ह्या गोष्टी त्यांच्या आईकडून नि वडिलांकडून समजल्या असाव्यात. आम्हीं त्यांना हाकून दिलें नाहीं हें रामकृष्णपंतांचें म्हणणें व्यवहारदृष्ट्या बरोबरच ठरतें. खुद्द गुरुजींचे नि पालगडांतील ह्या साने मंडळींचे संबंधसुद्धा फारसे जिव्हाळ्याचे नव्हते.

क्वचित् त्यांचा पत्रव्यवहार होई. पण तो औपचारिक. अलिकडच्या काळांत गुरुजी एकदांच पालगडला आले होते. पण ते आपल्या ह्या आतांच्या घरीं गेले नाहींत. गुरुजी हे बाहेरच्या जगाला फार मोठे वाटत असतील. पण पालगड-मधल्या त्यांच्या आतांना त्यांच्याबद्दल कांहीं विशेष महत्त्व वाटत असावें असें दिसत नाहीं. कोणाच्याहि घरांत गुरुजींची तसबीर टांगलेली आम्हांला दिसली नाहीं. जेथें पिकतं तेथें विकत नाहीं हेंच खरें.

गुरुजींच्या वडिलांसंबंधीं इतर पुष्कळ उपयुक्त माहिती रामकृष्णपंतांनीं आम्हांला सांगितली. गुरुजींचे वडील हे अंगानें असेच लहानखुरे होते. रंगानें उजळ होते. मिशा बारीक दाभणकाठी असत. देवीच्या आजारांत त्यांच्या डाव्या हाताला 'गुरु' झाला होता. म्हणजे तो अधू नि वाकडा झाला होता. 'दुर्वाची आजी' ही बालविधवा असून विकेशा होती. "'श्यामच्या आई'च्या चित्र-पटांत मी देखील काम करावयास तयार आहें!" असें रामकृष्णपंतांनीं मोठ्या गंमतीनें आम्हांला सांगितलें. एकंदरींत, रामकृष्णपंतांचें व्यक्तिमत्त्व मोठें मनोरंजक वाटलें. साने घराण्याचा कांहींतरी वेगळेपणा त्यांच्यामध्यें निःसंशय आहे. आपल्या बागेंतील गोड पपनसें तोडून त्यांनीं मोठ्या प्रेमानें आम्हांला नि जनलेल्या इतर मंडळींना खावयास दिलीं. पालगड येथील गुरुजींच्या प्राथमिक शाळेंतील मुलांमुलींमध्यें थोडेंसें भाषण करून आम्ही लागलेच दापोलीला परतलों.

दुसरे दिवशीं सकाळीं आठ वाजतां दापोलीच्या इंग्रजी शाळेच्या त्या सुंदर आंबराईत विद्यार्थ्यांपुढें 'गुरुजींचें जीवन नि वाङ्मय' ह्या विषयावर माझें व्याख्यान झालें. प्रा. वसंत बापट ह्यांनीं आपली प्रभावी 'झेलम' कविता गाऊन दाखविली. ह्याच आंबराईत पूर्वीं गुरुजींचीं दोन वेळां व्याख्यानें झालीं होतीं. गुरुजींच्या गोड आठवणीनें पुन्हा सर्वांचीं अंतःकरणें कांहीं वेळ भारावून गेलीं. पुष्कळांच्या स्मरणांत राहील असाच एकंदरींत तो सकाळचा कार्यक्रम झाला. नंतर संस्थेचे चालक, शाळेचे प्रमुख आणि शिक्षक ह्यांच्या समवेत आम्ही शाळेमधून हिंडलों. शाळेच्या जुन्या रजिस्टर पुस्तकांतील चाळीस वर्षांपूर्वीं केलेली गुरुजींच्या नांवाची नोंद आम्हीं बघितली. शाळेमध्यें महर्षि अण्णासाहेब कर्वे, डॉ. रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे आणि साने गुरुजी ह्यांच्यासारखे विद्यार्थी होऊन गेले तरी त्यांच्या तसविरी तेथें कां नाहींत असा मीं प्रश्न केला. शाळेच्या सुवर्णमहोत्सवाच्या

वेळीं ती व्यवस्था होईल असें मला सांगण्यांत आलें. संस्थेच्या चालकांनीं आमचा जो सत्कार केला नि आमच्या कार्याविषयीं जें अगत्य दाखविलें त्याबद्दल त्यांचे आभार मानून आम्हीं त्यांची रजा घेतली. त्याच शाळेंतील जोशी नांवाचे एक शिक्षक पूर्वीं अमळनेरला गुरुजींच्या सान्निध्यांत पुष्कळ वर्षें राहात होते. त्यांनीं गुरुजींचीं कांहीं महत्त्वाचीं पत्रें नि त्यांच्या 'छात्रालय' हस्तलिखित दैनिकाचा एक अंक आमच्या हवालीं केला.

ह्या अंकांत गुरुजींनीं आपल्या शाळेंतील जीवनासंबंधी जी हकीकत सांगितलेली आहे ती मला माझ्या दृष्टीनें फार उपयुक्त वाटली. गुरुजींनीं असें लिहिलें आहे कीं, "दापोलीच्या शाळेंत मी जरी हुषार समजला जात असें तरी मारामाऱ्या, खोडया करण्यांत मी मोठा प्रवीण होतों. मधल्या सुट्टींत वर्गांतील टेबलावर उडया मारणें, मुलांच्या धोगट्यांस गांठी बांधून ठेवणें, ह्याचीं पुस्तकें त्याच्या पिशवींत ठेवणें वगैरे गोष्टी मी करावयाचा. कधीं कधीं शासनहि मोठें व्हावयाचें. पण मार खाण्यासाठीं सारखा हात पुढें ठेवीत असें. अभ्यासाचे बाबतींत मात्र मीं कधीं मार खाल्ला नाहीं. संस्कृतमध्यें देसाई नांवाच्या शिक्षकांची आम्हीं खूप हबेलंडी उडवायचे. दापोलीच्या शाळेंत त्यावेळेस मला 'wisest boy' असें मानीत."

हवेच्या नि सृष्टिसौंदर्याच्या बाबतींत हें गांव जरी आदर्श असलें, तरी पुरोगामी विचारांच्या दृष्टीनें हें गांव कमालीचें मागासलेलें आहे. सार्वजनिक जीवन येथें जवळ जवळ गोठून गेलें आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. वर्षानुवर्षें येथें कांहींच घडत नाहीं. गुरुजींनीं ह्या गांवाला आपल्या वाङ्मयांत अमर केलें असलें तरी गुरुजींबद्दल मात्र येथल्या गांवकऱ्यांना विशेष प्रेम वाटत नाहीं ही आश्चर्याची गोष्ट नव्हे काय? किंबहुना गुरुजींबद्दल पुष्कळांचें मत प्रतिकूलच आहे. 'श्यामची आई' हें हेन्री वुडच्या 'Mrs. Haliburton's Troubles' चें रूपांतर आहे असें एका गृहस्थांना वाटतें आहे. याला काय म्हणावें? गुरुजींची 'श्यामची आई' मी रुपेरी पडद्यावर आणणार आहें ह्या गोष्टीमुळें मात्र गांवांत पुष्कळ खळबळ झालेली दिसली. अर्थात् गांवांत सिनेमागृह नाहीं. तें ह्या निमित्तानें तरी सुरू होईल असें वाटतें. ज्या निसर्गसुंदर परिसरांत 'श्यामची आई'ची हृदयंगम कथा जन्म पावली त्या परिसराच्या प्रत्यक्ष अवलोकनानें त्या कथेकडे बघण्याची आम्हांला निःसंशय एक निराळी दृष्टि प्राप्त झाली. किंबहुना

दापोलीची पंचक्रोशी समक्ष पाहिल्याखेरीज गुरुजींच्या ह्या अमर कलाकृतीचा संपूर्ण आस्वाद घेतां येणें अशक्य आहे अशी आमची खात्री पटली. चित्रासाठीं किंवा चरित्रासाठीं साधनें गोळा करण्याच्या हेतूनें आलों म्हणून कां होईना पण गुरुजींच्या जन्मभूमीचें पावनदर्शन आम्हांला घडलें ह्या जाणिवेनें कृतार्थ होऊनच आम्हीं त्या सायंकाळीं दापोली सोडली.

हर्णैच्या बंदरांतल्या दगडी भिंतीवर बोटीची वाट पाहात रात्रीच्या अंधारांत आम्ही कितीवेळ तरी निस्तब्ध बसलों होतों. काळोखांत सुवर्णदुर्ग शांतपणें उभा होता. मागल्या बाजूस भरतीच्या लाटा खडकांवर आदळून उंच उसळत होत्या. डाव्या बाजूकडून दीपस्तंभाच्या लाल उजेडाचा झोत मधून मधून लांबवर पडत होता. आकाशांत अनंत तारका चमकत होत्या. तर खालीं समुद्राच्या सरसरत्या लाटांवर असंख्य तेजोगोल नाचत होते. वसंत बापटांच्या मुखामधून 'गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार' हें कुसुमाग्रजांचें क्रांतिगीत एकदम उचंबळून बाहेर पडलें. त्याबरोबर क्रांतीच्या अग्रभागीं तळपून गेलेल्या गुरुजींची तपस्वी मूर्ति डोळ्यांपुढें उभी राहिली. स्वातंत्र्ययुद्धांत मातृमोहानें मी पडणार नाहीं म्हणूनच माझ्या जीवनांतून माझी आई निघून गेली असेल हे त्यांचे दिव्य उद्गार मला आठवले आणि माझें सर्वांग महिरून आलें. जगन्मातेच्या नि भारतमातेच्या सेवेसाठीं आपलें सर्वस्व अर्पण करा हाच 'श्यामची आई' नें साऱ्या तरुणांना संदेश दिला आहे ना? तोच संदेश बापटांच्या मुखांतून 'श्याम' पुन्हा गात आहे असा त्या क्षणीं मला साक्षात्कार झाला.

# महाराष्ट्राची सौंदर्यनगरी : महाबळेश्वर

गेल्या आठवड्यांत मी दोन दिवसांसाठीं महाबळेश्वरला गेलों होतों. महाबळेश्वरला जाण्याची ही कांहीं माझी पहिलीच खेप नव्हती. मागें मी चार-पांच वेळां जाऊन आलेलों आहें. पण मध्यंतरीं सात-आठ वर्षांत मी तिकडे फिरकलोंच नव्हतों. म्हणून मी महाबळेश्वर जवळ जवळ विसरल्यासारखाच झालों होतों. यंदा सहज मनांत विचार आला. आणि तो आंतल्या आंत विरून जाण्यापूर्वींच मीं त्याची अंमलबजावणीहि करून टाकली. सकाळीं सहा वाजतां पुण्याहून आम्ही मोटारनें निघालों.

आठाचे सुमारास वाई ओलांडून पसरणीचा घाट चढूं लागलों. पूर्वीं मला हा घाट विशेष अवघड वाटत होता. पण ह्या वेळीं मी स्वतःच मोटार हाकत असल्यानें मला तो कांहीं इतका कठिण वाटला नाहीं. पुण्यापासून तों जवळ जवळ पांचगणी येईपर्यंत भोंवतालच्या वातावरणांत कांहीं विशेष फरक वाटत नाहीं. पण पांचगणी आली म्हणजे एकदम नाटकांतल्याप्रमाणें देखावा बदलतो आणि आपण एका निराळ्या मनोहर सृष्टींत प्रवेश करीत आहोंत असें वाटूं लागतें. तांबड्या मातीला तेथूनच सुरवात होते. 'सिल्व्हर ओक्स'चीं सरळ आणि उंचच्या उंच झाडें हें पांचगणीचें वैशिष्ट्य आहे. दोन्ही बाजूंला या वृक्षांच्या दाट आणि

उत्तुंग रांगा पाहून मनाला अतिशय आल्हाद होतो. हीं झाडें या ठिकाणीं किती वर्षांपूर्वी आणि कोणीं प्रथम लावलीं असावींत हें कांहीं माहीत नाहीं. डोंगराळ आणि पावसाळ्या प्रदेशांत ह्या झाडांची लागवड उत्तम होते. महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं या सुंदर झाडांची लागवड व्हावयास पाहिजे होती. पण असल्या क्षुद्र गोष्टीकडे कोण लक्ष देणार ? पांचगणीचें पठार सखल प्रदेशापासून दोन हजार फूट तरी उंच असावें. वरून देखावा इतका कांहीं रम्य दिसतो म्हणतां! डोंगराच्या पुष्कळशा उतारांवर शेतकऱ्यांनीं आपलीं शेतें पेरलेलीं असल्यानें सर्वांगावर भस्माचे पट्टे लावून ध्यानस्थ बसलेल्या मुनींप्रमाणें आजूबाजूचे डोंगर दिसतात. पांचगणीला वाऱ्याचा झपाटा फार. आणि महाबळेश्वरापेक्षां झाडीहि कमी. त्यामुळें आजारी माणसांचें आरोग्य सुधारण्याच्या दृष्टीनें महाबळेश्वरापेक्षां पांचगणीच जास्त उत्तम समजली जाते. पांचगणीपासून महाबळेश्वर पंधरा मैल दूर असलें तरी महाबळेश्वराचें विशिष्ट वातावरण पांचगणीपासूनच सुरू होतें. किंबहुना, पांचगणी हें महाबळेश्वराचें प्रवेशद्वारच आहे असें म्हणावयाला हरकत नाहीं. पांचगणीच्या मध्यरस्त्यावर लोकांची विशेष गर्दी आढळली. एखादा बाजार भरावा तसें तें दृश्य वाटलें. पूर्वीं त्या ठिकाणीं इतकी गैरशिस्त गर्दी पाहिल्याचें मला कांहीं आठवत नाहीं.

पांचगणीहून महाबळेश्वरचा रस्ता इतका हळूहळू चढत जातो कीं जवळ जवळ एकाच सपाट पातळींवरून आपण जात आहोंत असा भास होतो. इतक्या उंच डोंगरावर एवढें भव्य व विस्तीर्ण पठार कसें ह्याचें राहून राहून आश्चर्य वाटतें. डाव्या बाजूला डोंगराच्या झाडींतून अधूनमधून बंगले डोकावतांना दिसतात. एवढ्या अवघड जागीं लोकांनीं कसे आणि केव्हां बंगले बांधले ह्याचा अचंबा वाटूं लागतो. महाबळेश्वरच्या कमीजास्त उंचवट्याच्या पठारावरील हिरवी घनदाट झाडी जसजसे आपण जवळ जाऊं लागतों तसतशी दिसूं लागते. जिकडे पाहावें तिकडे हिरवीगार झाडीच झाडी. त्याशिवाय दुसरें कांहींच दिसत नाहीं. त्यामुळें महाबळेश्वर कुठें आहे ह्याचा अगदीं शेवटपर्यंत बोध होत नाहीं. आणि माणूस भांबावून जातो. पांचगणीपासून तों महाबळेश्वरपर्यंतच्या तांबड्या लाल मातीचा रस्ता भरपूर रुंद आणि चांगल्या स्थितींत आहे. त्यामुळें त्याच्या वरून मोटार हाकतांना मौज वाटते. महाबळेश्वरच्या अगदीं निकटच्या परिसरांत डाव्या बाजूला कोबीच्या आणि स्ट्रॉबेरीच्या लागवडीचीं लांबलचक शेतें पसरलेलीं

आहेत. ह्या शेतांमध्यें पाणी अगदीं दोन-चार हाताच्या खोलीवर लागतें. त्यामुळें विहिरी डबक्यांप्रमाणें अगदीं उथळ आहेत. आणि इजिप्तमध्यें नाइल नदीच्या कांठच्या विहिरींतून पाणी जसें बाहेर काढतात तसें खालींवर हलणाऱ्या लाकडी दांड्याच्या टोकाला बादली बांधून शेतकऱ्यांच्या बायका पाणी वर काढून शेतांला देत असतात. विहिरींतून पाणी बाहेर काढण्याची ही ह्या मुलखाला अपरिचित असलेली पद्धत पाहून क्षणभर मौज वाटते.

महाबळेश्वराची प्रत्यक्ष हद्द तळ्यापासून सुरू होते. उजव्या बाजूला हें तळें लांबलचक पसरलें आहे. महाबळेश्वराच्या वैशिष्ट्यपूर्ण सौंदर्यांत ह्या तळ्यानें फारच मोठी भर घातलेली आहे. सकाळ-संध्याकाळ ह्या तळ्यावर हौशी लोकांची गर्दी असते. तळ्याच्या उजव्या कांठावर झाडींत एक उपाहारगृह आहे. झाडाखालीं खुर्च्या आणि टेबलें ठेवण्यांत आलीं आहेत. येथें पुष्कळसे स्त्री-पुरुष चहा पीत गप्पा मारीत बसलेले असतात. तळ्यांत जलविहार करण्यासाठीं सहासात छोट्या होड्या ठेवण्यांत आल्या आहेत. त्या भाड्यानें मिळूं शकतात. ज्यांना होड्या वल्हवितां येतात त्यांना तो आनंदहि उपभोगतां येतो. तळ्यापासून महाबळेश्वरच्या बाजारपेठेंत जाईपर्यंत एकसारखा चढ लागतो. पोलीस ठिकठिकाणीं चौकांत उभे राहून मोटारींच्या रहदारीचें नियंत्रण करीत असतात. मोटारीच्या एका तळावर गाडी उभी करून बाजारपेठेंत चक्कर मारून यावी म्हणून आम्ही निघालों, तों भिकाऱ्यांच्या एका तांड्यानें आम्हांला वेढा घातला. त्यांतले कांहीं महारोगी होते. ब्रिटिशांच्या कारकीर्दीत असले रोगी महाबळेश्वरांत पाऊलहि टाकूं शकले नसते. स्वराज्यानें महाबळेश्वराला दिलेली ही नवी देणगी आहे हें कोणाच्याहि सहज लक्षांत येण्यासारखें आहे. बाजारपेठ तीन फर्लांग लांब असेल. महाबळेश्वरला येणारे बहुतेक लोक या बाजारपेठेंत दिवसांतून केव्हां ना केव्हां तरी दृष्टीस पडतातच.

ह्या बाजारपेठेची पूर्वीची माझी जी आठवण होती तिच्याशीं ह्या वेळचें तिचें स्वरुप ताडून पाहतां ती मला विशेषच गचाळ आणि गलिच्छ वाटली. पूर्वी ती एखाद्या लष्करी हद्दीमधल्या बाजारपेठेप्रमाणें स्वच्छ दिसत असे. एक ओळखीचे दुकानदार मला भेटले. त्यांच्या निदर्शनाला मीं ही गोष्ट आणली तेव्हां ते लांबलचक श्वास टाकून मोठ्या दुःखानें म्हणाले, "काय सांगावें तुम्हांला, इंग्रजांबरोबर तें महाबळेश्वराचें वैभव गेलें सारें निघून! पूर्वीच्या स्वच्छतेंतली चार

आणे स्वच्छता आतां तुम्हांला आढळणार नाहीं!" जवळ जवळ पंचवीस वर्षांपूर्वी मी महाबळेश्वरला प्रथम आलों होतों, त्यावेळीं मला एक मंत्र्याला भेटावयाचें होतें. त्या वेळचा तो महाबळेश्वरचा रुबाब मला अद्यापहि आठवतो आहे. खरोखरच, राज्य कसें करावें ही कला इंग्रजांनाच ठाऊक आहे यांत मुळींच शंका नाहीं. दरिद्री आणि नतद्रष्ट कॉंग्रेसवाल्यांच्या हातीं राज्यसत्ता आल्यापासून इंग्रजांचा अभाव विशेष तीव्रतेनें जाणवूं लागला आहे.

हॉटेलाच्या शोधासाठीं जेव्हां आम्ही निघालों तेव्हां तर महाबळेश्वराचें हें दैन्य आमच्या विशेष लक्षांत आलें. महाबळेश्वराचीं पूर्वीचीं उत्तमोत्तम हॉटेलें आतां पार नष्ट झालेलीं आहेत असें म्हणावयाला हरकत नाहीं. इंग्रजी पद्धतीचीं हॉटेलें हें महाबळेश्वरासारख्या सृष्टिसौंदर्याच्या ठिकाणाचें फार मोठें आकर्षण होय. उत्तम खाद्यें आणि मद्यें ह्या ठिकाणीं मिळत असत. म्हणून लांबलांबचे प्रवासी मोठ्या हौसेनें आणि मुद्दाम इथें येत असत. आणि महाबळेश्वरच्या 'मोसमा'ला त्यामुळें असा कांहीं विलक्षण रंग चढे कीं कांहीं विचारूं नका. मनाप्रमाणें उत्तम खायला आणि प्यायला मिळण्याची व्यवस्था असली तरच असल्या काव्यमय ठिकाणीं विश्रांतीसाठीं किंवा चैनीसाठीं प्रवासी येणार. भात अन् आमटी ओरपायला किंवा ताक प्यायला महाबळेश्वरच्या पठारावर चढायची कोण यातायात करतो? महाबळेश्वरसारखीं हवा खाण्याचीं जीं उत्तमोत्तम निसर्गरम्य स्थळें आहेत त्यांना तरी प्रांतिक सरकारनें मद्यबंदीचा कायदा लागू करावयाचा नव्हता. हें केवळ मद्यपान करणारांच्या कैवारानें मी म्हणत नाहीं पण मद्याला स्पर्श न करणाऱ्या प्रवाशाच्या हितदृष्टीनेंच मी म्हणतों आहें. कारण पाश्चात्य पद्धतीचीं उत्तम हॉटेलें हीं सर्वस्वीं मद्याच्या विक्रीवर चालत असतात. आणि मद्यपान न करणाऱ्यांनाहि ह्या हॉटेलांतील इतर सोयींचा अनायासेंच फायदा मिळूं शकतो. मद्यपानबंदीच्या कायद्यामुळें ह्या इलाख्यांतील इंग्रजी पद्धतीच्या हॉटेलांचा धंदा सपशेलच बसला असें म्हणावयाला हरकत नाहीं. महाबळेश्वराच्या मोसमावर तर ह्या गोष्टीचा फारच मोठा परिणाम झालेला दिसून येतो. पैशाची बचत करण्याच्या सबबीखालीं उन्हाळ्यांत महाबळेश्वराला कचेऱ्या नेण्याचा शिरस्ता कॉंग्रेस सरकारनें बंद केल्यापासूनच वस्तुतः महाबळेश्वराच्या अधःपाताला प्रारंभ झाला. तरी देखील इतकीं वर्षें महाबळेश्वर कसेंतरी तग धरून होतें. पण यंदाच्या वर्षापासून सुरू झालेल्या मद्यबंदीनें महाबळेश्वरचा जवळजवळ कपाळ-

मोसमच करून टाकला असें म्हणावयाला नाहीं. पूर्वींच्या मानानें महाबळेश्वरचा यंदाचा मोसम दोन आणे देखील भरला नव्हता असें माहीतगार म्हणतात. थोड्याशा मिशनरी म्हाताऱ्या बायकांखेरीज एकहि गोरा माणूस आमच्या दृष्टीस पडला नाहीं. पार्शी आणि ख्रिस्ती माणूसदेखील क्वचित्च एखादा नजरेस पडे. महाबळेश्वरांतील मोठमोठीं हॉटेलें बंद झाल्यामुळें ह्या हॉटेलांवर अवलंबून असलेल्या गरीब लोकांचें अतोनात नुकसान झालेलें आहे एवढेंच नव्हे तर महाबळेश्वरच्या मोसमावर सर्वस्वीं आपली उपजीविका करणाऱ्या आजूबाजूच्या परिसरांतील खेडुतांचें तर किती नुकसान झालें आहे त्याचें वर्णनहि करतां येत नाहीं. एका हॉटेलांतील एक वृद्ध वेटर मला म्हणाला, "दारूबंदीमुळें श्रीमंतांपेक्षां गरिबांचेंच नुकसान जास्त झालें आहे. श्रीमतांची चैन पूर्वींप्रमाणेंच चालू आहे. फक्त पूर्वीं उघडपणें चालत होती ती आतां गुप्तपणें चालते एवढेंच काय तें. पण ह्या त्यांच्या चैनीवर ज्या शेकडों गरिबांचीं पोटें भरत होतीं त्यांची मात्र आज अन्नान्नदशा झाली आहे."

इंग्रजी पद्धतीचीं जीं दोनचार हॉटेलें मला दिसलीं त्यांचा सध्यांचा एकंदर अवतार पाहून तेथें उतरावयाला मन कांहीं घेईना. शिवाय रोजचा दर बारा रुपयांपासून सोळा रुपयेपर्यंत. एवढा जबरदस्त आकार देऊन त्या ठिकाणीं चार माणसांच्या कुटुंबाला किती दिवस राहतां येणार? दोनतीन गुजराती पद्धतीचीं हॉटेलें दिसलीं. तेथें खूपच गर्दी होती. कांहीं कांहीं खोल्यांत मोठमोठीं कुटुंबेंचीं कुटुंबें उतरलीं होतीं. ह्या हॉटेलाचा रोजचा दर दहा रुपये होता. चोहोंकडून तपास करून आल्यानंतर शेवटीं 'आराम' ह्या महाराष्ट्रीय शाकाहारी हॉटेलांतच उतरावयाचें आम्हीं ठरविलें. तेथें रोजचा दर सात रुपये आहे. मला वाटतें, ह्यापेक्षां कमी दराचें हॉटेल महाबळेश्वरामध्यें दुसरें नसेलच. ह्या हॉटेलांतील जेवण्याची व राहण्याची व्यवस्था दराच्या मानानें खरोखरच उत्तम आहे. भोजनोत्तर आम्ही फारशी विश्रांति न घेतां तडक महाबळेश्वराच्या पर्यटनाला पायींच निघालों.

प्रथम 'बॉंबे पॉइंट' पाहावयाचें ठरविलें. बाजारपेठेपासून हा पॉइंट अडीच मैल लांब आहे. स्ट्रॉबेरी आणि रासबेरीच्या टोपल्या कावडीप्रमाणें खांद्यांवर घेऊन विकणारे लोक अधूनमधून उगाच हटकतात आणि त्रास देतात. त्यांच्या दरांत केव्हांहि एकवाक्यता नसते. आणि चांगला माल बहुधा त्यांच्याजवळ

नसतोच. मैल दीड मैल अंतरावर गव्हर्नरांच्या प्रासादाचें आवार लागतें. जुन्या काळीं कारकून मंडळींच्या राहण्याच्या ज्या चाळी या आवाराच्या बाहेर बांधून ठेवल्या आहेत तेथेंच मध्यमवर्गीय लोकांना सवलतीनें राहण्याची व्यवस्था ह्या वर्षापासून मुंबई सरकारनें केलेली आहे. ह्या सवलतीचा फायदा बऱ्याच जणांनीं घेतला असें म्हणतात. आम्ही गेलों त्यावेळीं त्या ठिकाणीं विशेष वसति आम्हांला कांहीं आढळली नाहीं. मुंबई पॉइंटपर्यंतचें अडीच मैलांचें अंतर तोडतां तोडतां आम्हांला अगदीं कंटाळा आला. शेवटचा मैलभर रस्ता तर अगदीं गर्द अरण्यामधून गेलेला आहे. कित्येक ठिकाणीं पाट्या नसल्यामुळें आपण चुकीच्या रस्त्यानें तर जात नाहीं अशा संशयानें माणूस गोंधळून जातो. दोनतीन माकडांखेरीज सबंध रस्त्यांत आम्हांला कोणीच भेटलें नाहीं. बॉंबे पॉइंटचें विस्तीर्ण वर्तुळ दिसलें तेव्हां आम्हांला हायसें वाटलें. येथून दिसणाऱ्या पर्वतांच्या उत्तुंग रांगांचा विस्तीर्ण देखावा बघून मात्र चालण्याचा शीण आम्ही विसरून गेलों.- दुपारचा तीनचा सुमार होता. आकाशांत थोडेसे ढग होते. त्यामुळें सूर्यप्रकाश सौम्यच होता. उजेड आणि सावल्या ह्यांनीं पर्वतांच्या उन्नसखल शरीरावर जें काळें-पांढरें नक्षीकाम केलें होतें त्याजवरून दृष्टि हलवूंच नये, तासन्तास तें निसर्गाचें विराट् चित्र पाहतच उभें रहावें असें वाटतें. येथून सूर्यास्ताचें दृश्य तर फारच अद्‌भुत दिसतें. पण इतका वेळ तेथें थांबावयास आम्हांस सवड नव्हती. म्हणून थोड्या वेळानें आम्ही तेथून परत फिरलों.

शेजारीं अर्ध्या मैलाच्या आत दुसरे दोन पॉइंट्स आहेत, ते बघून आम्ही 'टायगर्स पाथ' नें माघारीं येऊं लागलों. या रस्त्यानें पूर्वीपेक्षांहि अधिक निबिड आणि गहन अरण्य लागतें. सूर्याच्या किरणांना प्रवेश करावयालाहि त्या ठिकाणीं जागा नाहीं. झाडांच्या कुजलेल्या पानांचा चोंहीकडे कुबट वास सुटलेला आहे. पांखरांच्या किलबिलीखेरीज दुसरा आवाज ऐकूं येत असेल तर शपथ. पावलो-पावलीं आपल्या मनांत भय वाटत असतें, कीं एखादा वाघ एकदम कुठूनतरी आपल्या अंगावर चालून तर येणार नाहीं? जवळ जवळ पाऊण-एक तास तरी आम्ही जीव मुठींत धरूनच चालत होतों. शेवटीं मुख्य रस्त्याला येऊन आम्ही जेव्हां लागलों तेव्हां जीव कुठें भांड्यांत पडला. सहा-साडेसहा मैलांच्या रपेटीनें पाय चांगलेच ठणकूं लागले होते.

परत हॉटेलांत आलों. चहा आणि थोडीशी विश्रांति घेऊन पुन्हा मोटारींतून

बाहेर पडलों. कारण आतां पायीं जाण्याची ताकदच नव्हती. 'लाडविक पॉइंट' हाहि अडीच मैल दूर आहे. शेवटीं शेवटीं रस्ता फारच वाईट आहे. गाडी दूर ठेवून आम्ही 'पॉइंट' पर्यंत चालतच गेलों. हा पॉइंट सामान्य आहे. येथून पुढें 'लाडविक मॉन्युमेन्ट' कडे गर्द झाडींतून वर रस्ता चढत जातो. पण मोटारनें जाण्याची बंदी असल्यानें आम्ही पुढें गेलोंच नाहीं. संध्याकाळची वेळ झाली आणि पावसाची एक सरहि पडून गेली, म्हणून आम्ही तसेच परत वळलों आणि तळ्याकांठीं येऊन बसलों. तीनचार तासांच्या आमच्या सर्व फेरफटक्यांत एक गोष्ट आमच्या विशेष लक्षांत आली. आणि ती ही कीं महाबळेश्वरला विश्रांतीसाठीं किंवा चैनीसाठीं आलेल्या लोकांमध्यें शंभरापैकीं पंचाण्णव लोक गुजराती होते. त्या सबंध दिवसांत आम्हांला फक्त एक महाराष्ट्रीय कुटुंब भेटलें होतें. बाकी जेथें जावें तेथें गुजराती माणसेंच दृष्टीस पडत.

हीं गुजराती माणसें त्यांच्या पोषाकावरून धनाढ्य किंवा श्रीमंत व्यापारी वर्गांतलीं असावींत असेंच दिसत होतें. आठ-आठ दहा-दहा माणसांचीं कुटुंबें घेऊन गुजराती व्यापारी महिना महिना येऊन महाबळेश्वरला मुक्काम करतात म्हणजे एकंदर पैसा तरी किती खर्च करीत असावेत असा एका मित्रांना मीं सहज प्रश्न केला. तेव्हां ते हसून म्हणाले, "अहो, हे कांहीं सामान्य व्यापारी नाहींत. हे काळाबाजारवाले आहेत. म्हणून तर ते एवढा पाण्यासारखा पैसा खर्च करूं शकतात." महाराष्ट्राच्या अगदीं मध्यभागीं असलेल्या महाबळेश्वरा-सारख्या स्वर्गीय स्थळाच्या सौंदर्याचा आस्वाद मोठमोठ्या भांडवलवाल्या आणि काळाबाजारवाल्यांनाच फक्त घेतां यावा आणि महाराष्ट्रांतल्या मध्यमवर्गीय आणि गरीब माणसांना त्याचें दर्शन देखील दुर्लभ व्हावें ह्यापेक्षां दुःखाची गोष्ट ती कोणती ? सामान्य मराठी माणसाला आपलें कुटुंब घेऊन महाबळेश्वरीं एक दिवसदेखील राहणें अशक्य आहे. ब्रिटिशांच्या काळीं सरकारी कचेऱ्या महाबळेश्वराला येत असल्यानें ह्या कचेऱ्यांत काम करणाऱ्या मराठी कारकुनांना किंवा पट्टेवाल्यांना महाबळेश्वर पाहण्याची तेवढी तरी संधि मिळत होती. पण स्वराज्यानें त्या गरीब बिचाऱ्यांची तेवढी संधिदेखील हिरावून घेतली. महाबळेश्वर हें महाराष्ट्राचें असून तें महाराष्ट्राला पारखें व्हावें यापेक्षां दुर्दैवाचा विपरीत दुर्विलास तो कोणता ? काँग्रेस मंत्र्यांनीं किंवा सरकारी अधिकाऱ्यांनीं महाबळेश्वरावर अजिबात बहिष्कार घातला आहे अशी कोणाची कल्पना असेल तर ती बरोबर नाहीं.

मुंबईचे गव्हर्नर तर सहकुटुंब महाबळेश्वरलाच मुक्काम करून आहेत. त्याखेरीज काँग्रेस मंत्रिमंडळांतील दोन मंत्रीहि वर्षभर केलेल्या समारंभबाजीच्या किंवा व्याख्यानबाजीच्या श्रमांचा परिहार गेला महिनाभर त्या ठिकाणीं करीत बसले आहेत. त्यांच्या निशाणांकित मोटारी दिवसांतून दोनचार वेळां तरी आम्हांला आडव्या जात असत. त्या मोटारी पाहून माझ्या मनांत विचार येत असे कीं खरोखरच हे जर मंत्री नसते तर महाबळेश्वरावर महिना महिना मुक्काम करून राहण्याची या लोकाची कांहीं लायकी होती का? आचार्य कृपलानी म्हणतात तेंच खरें. देशाला स्वातंत्र्य मिळाल्याचा खरा फायदा जर कोणाला मिळाला असेल तर तो काँग्रेसच्या पुढाऱ्यांना आणि मंत्र्यांना.

संध्याकाळ होऊं लागली तसे आम्ही तळ्यावरून उठलों आणि परत हॉटेलांत आलों. अंधार पडल्यावर महाबळेश्वरमध्यें पायीं हिंडणें अतिशय धोक्याचें असतें. कारण सापाचें येथें फार भय असतें. एक मित्र म्हणाले, "महाबळेश्वराचे साप इतके विषारी असतात कीं, त्यांपैकीं एखादा जर कुणाला डसला तर औषधोपचार करण्याची खटपट न करतां सरळ तिरडी बांधायच्या कामाला लागावें."

हॉटेलांत येऊन आम्ही जरा कोठें बसतों आहोंत तों उष्णतामान एकदम इतकें खालीं गेलें कीं, अंगांत अगदीं हुडहुडी भरावी तसे आम्ही थंडीनें थरथर कांपूं लागलों. खोलींत जळत्या निखाऱ्यांनीं फुललेली शेगडी आणून ठेवली तेव्हां आम्ही कोठें ठिकाणावर आलों. एकंदरींत रात्र पडण्याच्या सुमाराची महाबळेश्वरांतील वेळ अगदींच कंटाळवाणी वाटते. बाहेर कुठें पडतां येत नाहीं आणि घरांत तर करमत नाहीं. असें चमत्कारिक आणि उदासवाणें वाटतें कीं कांहीं विचारूं नका. रात्र केव्हां संपते आणि सकाळ केव्हां उजाडते असें होऊन जातें.

धुक्याच्या कापसाची पांढरी स्वच्छ आणि मऊ मऊ चौघडी अंगावर पांघरून एखाद्या म्हाताऱ्या आजीबाईप्रमाणें दुसऱ्या दिवसाची सकाळ हळूहळू पावलें टाकीत आणि मान लटलट हलवीत उगवली एकदांची. आंघोळी होईपर्यंत धुकें विरघळलें आणि चांगलें स्वच्छ ऊन पडलें. पहिल्यान्दां आम्ही 'विल्सन पॉइंट' ला पायीं जावयाचें ठरविलें. हा पॉइंट आम्ही राहतों तेथून मैलाच्या अंतरावर आहे. कदाचित् थोडासा कमीच असेल. महाबळेश्वरामध्यें सर्वांत

उंच टोक हेंच आहे. वाटेंत जातांना दक्षिणेकडच्या संस्थानिकांच्या दोनतीन मोटारगाड्या भेटल्या. त्यांजवर संस्थानच्या नांवाच्या आणि नंबराच्या लाल पाट्या अद्यापहि असलेल्या पाहून आश्चर्य वाटलें. विलीन झालेल्या संस्थानिकांना आतां हा पोकळ डामडौल कशाला पाहिजे? काप गेले तरी भोकें राहतात असें जें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं.

महाबळेश्वराच्या ह्या भागांत उत्तमोत्तम बंगले आहेत. 'माल्कम बंगला' हा तर एखाद्या सम्राटाच्या प्रासादासारखा सर्वांत उत्तुंग भागावर झळकतांना पाहून डोळे दिपतात आणि त्याचबरोबर त्याची मालकी एका गुजराती किंवा मारवाडी सटोडियाकडे गेलेली बघून छातीमधून कळ निघावी तशा यातना होतात. पूर्वी इंग्रजांच्या मालकीचे असलेले बहुतेक सर्व बंगले आतां भांडवलवाल्यांच्या किंवा काळाबाजारवाल्यांच्या ताब्यांत गेलेले आहेत, ह्या विचारानें मन अतिशय विषण्ण होतें. शिवरायाच्या पराक्रमांनीं ज्याचा परिसर पवित्र झालेला आहे, मराठ्यांच्या इतिहासाचीं तेजस्वी चिन्हें ज्याच्या कड्याकड्यांवर उमटलेलीं आहेत, धाडसी आणि विलासी इंग्रजी वीरांनीं ज्याच्या सौंदर्याचें दीडशें वर्षे संवर्धन केलें आहे, त्या महन्मंगल आणि परमसुंदर महाबळेश्वराचा कबजा स्वतंत्र भारतांत आणि कॉंग्रेसच्या राज्यांत आयत्या बिळांत नागोबा शिरावा ह्या न्यायानें आज भांडवलवाल्यांनीं आणि काळाबाजारवाल्यांनीं घेऊन बसावें यापेक्षां महाराष्ट्राची बदनामी ती कोणती? कोणीं पराक्रम केला आणि शेवटीं मालक कोण होऊन बसला? एकानें ताक घुसळायचें आणि दुसऱ्यानें लोण्याचा गोळा गट्ट करून टाकायचा हाच ह्या भांडवलशाही राज्यव्यवस्थेंतला न्याय आहे. महाराष्ट्राच्या इतिहासाचा आणि परंपरेचा अभिमान ज्याच्या अंतःकरणांत रात्रंदिवस जळतो आहे, त्याला तर उघड्या डोळ्यांनीं महाबळेश्वरमधून हिंडणें आज असह्य झाल्यावांचून राहणार नाहीं. जड आणि व्यथित अंतःकरणानें मी 'विल्सन पॉइंट'चा चढ चढून गेलों. वर फारच मोठें सपाट पण खडकाळ मैदान आहे. या मैदानाच्या तीन कोपऱ्यांला तीन छोटेसे बुरूज आहेत. या बुरुजांवर उभें राहिलें म्हणजे महाबळेश्वराभोवतालच्या दहापंधरा मैलांचा रमणीय मुलुख दिसतो. अर्थात् हिरव्यागार गर्द झाडीच्या अथांग सागराखेरीज दुसरें कांहींच दृष्टीस पडत नाहीं. विल्सन पॉइंटच्या पठारावर महायुद्धकाळांत लष्करी उपयोगासाठीं सिमिटाच्या लहान लहान इमारती बऱ्याच बांधल्या असाव्यात असें

दिसतें. ह्या इमारती कोणीं पाडून टाकल्या असाव्यात बरें? त्यांचे नुसते चौथरे शिल्लक उरले आहेत. ह्या इमारती आज जर तेथें असत्या तर सामान्य जनतेला त्यांचा पुष्कळ उपयोग करून घेतां आला असता. पण इतक्या चारकाईनें या राज्यांत लोकांच्या सुखसोयीकडे कोण पाहतो?

एका प्रसिद्ध संस्थानिकाचा पांचसहा वर्षांचा नातू आणि नात एक रुपया तास भाड्याच्या तट्टावर बसून सकाळचा फेरफटका करीत होतीं. मुलानें आपलें नांव ठसकेदार स्वरांत मला सांगितलें तेव्हां आमच्यापैकीं एकानें विचारलें, "अरे बाळ, तुमचीं स्वतःचीं घोडीं कुठें गेलीं रे? भाड्याच्या तट्टावर बसण्याची कां पाळी आली तुम्हांला?" तेव्हां मी हळूच म्हणालों, "संस्थानें विलीन झाल्यानंतर संस्थानिकांचीं घोडीं कॉंग्रेस मंत्र्यांच्या तबेल्यांत गेलीं असतील, दुसरें काय?" बिचारें लहान मूल, त्याला माझ्या भाषणांतलें रहस्य काय कळणार? तें माझ्याकडे पाहातच राहिलें!

'विल्सन पॉइंट' पाहून परत आल्यानंतर आम्ही हॉटेलांतून आपला मुक्काम हलवला आणि एका मित्राच्या घरीं फराळ करून मोटारीनें 'आर्थर सीट' पाहावयास निघालों. हा प्रवास साडेसात मैलांचा आहे. रस्ता जुन्या महाबळेश्वरापासून जातो. या ठिकाणीं पांच नद्यांच्या उगमाचें एक आणि शंकराचें एक अशीं दोन देवळें आहेत. कृष्णा, कोयना, वेण्या, सावित्री आणि गायत्री अशा पांच नद्यांचे प्रवाह एकत्र बांधून आणून गायमुखांतून एका कुंडांत सोडलेले आहेत. हें पंचनद्यांचें तीर्थ इतकें थंडगार आणि मधुर लागतें कीं सांगतां सोय नाहीं. मी तर तांब्याभर तीर्थ प्यालों. आणि माझा अंतरात्मा अगदीं संतुष्ट झाला. पांच नद्यांचे उगमप्रवाह एकत्रित करण्याची ही काव्यमय कल्पना सत्यसृष्टींत खरी करून ज्यानें दाखविली आहे त्याच्या प्रतिभेचें जेवढें कौतुक करावें तेवढें थोडेंच आहे. जुन्या महाबळेश्वराहून पुढें जाणारा रस्ता सध्यां इतकासा चांगला नाहीं. ठिकठिकाणीं खड्डे पडले असून रस्त्यावर असंख्य लहानलहान दगडगोटे पसरलेले आहेत. इंग्रजांच्या राज्यांत हा रस्ता तर अतिशय उत्तम असे.

'आर्थर सीट' च्या आगोदर 'मार्जरी पॉइंट' लागतो. माझ्या स्वतःच्या मतें हें टोक सर्वोत्कृष्ट आहे. येथून सह्याद्रि पर्वताच्या वैभवाचें जें विलक्षण दृश्य दिसतें तें पाहून मनुष्याची बुद्धि अगदीं गुंग होऊन जाते. येथून खालीं चार-

साडेचार हजार फूट खोल पहाडाचें खोरें आणि त्यांतून वाहणाऱ्या सावित्री नदीचें पात्र दिसतें. मागल्या बाजूला डावीकडे प्रतापगड दिसतो. तेथून पाऊण मैल पुढें गेल्यावर 'माल्कम पॉइंट' आणि 'आर्थर सीट' हीं दोन टोकें आहेत. येथें जाण्याची वाट बरीच अरुंद आणि अवघड आहे. शेवटीं शेवटीं तर पायऱ्या उतरून अगदीं कड्याच्या टोकावर जावें लागतें. 'मार्जरी पॉइंट'वरून जें चित्र दिसतें याचाच अत्यंत रौद्र आणि भीषण विस्तार ह्या दोन टोकांवरून दिसतो आणि डोळे फिरतात. ह्या टोकावर पूर्वी ऑर्थर सीटवरून एक वीसबावीस वर्षांचा सिंधी तरुण तोल जाऊन खालीं कोसळला आणि त्याच्या ठिकऱ्या ठिकऱ्या झाल्या तेव्हांपासून लाकडाचे कठडे काढून त्याऐवजीं लोखंडाचे कठडे बांधण्यांत आले आहेत. तथापि या लोखंडी कठड्याचे गज करंगळीएवढे बारीक असल्यानें ते मला तरी कांहीं एवढे मजबूत वाटले नाहींत. शहाण्या माणसांनीं या कठड्यापासून दोन हात दूरच राहावें हें चांगलें.

माल्कम पॉइंट आणि ऑर्थर सीट ह्या टोकांवरून सह्याद्रि पर्वताच्या प्रचंड कड्यांचें, सुळक्यांचें आणि रांगांचें जें भयानक दृश्य दिसतें तें कसें दिसतें असें जर मला कोणी विचारील तर मी असें उत्तर देईन कीं, लाखों हत्ती, गेंडे, मगरी आणि सुसरी ह्यांच्या प्रचंड राशीच्या राशी रचून ठेवल्या तर तो देखावा जसा दिसेल तसें तें दृश्य दिसतें. ज्याला आयुष्यांत कांहीं पराक्रम करावयाचा आहे अशा लढाऊ वृत्तीच्या प्रत्येक मराठी माणसानें हें दृश्य आपल्या हृदयांत नीट सांठवून ठेवावें आणि शक्य असल्यास दर वर्षी येथें येऊन त्याची उजळणी करावी. शिवरायाच्या सैनिकांना अशा रौद्र दृश्यांचा रोज खुराक मिळत होता म्हणून त्यांच्या हातून डोंगराएवढे पराक्रम झाले. 'महाबळेश्वरा'ची ही बाजू पाहिली म्हणजे मग त्याचें नांव सार्थ वाटूं लागतें. ह्यानंतर मग महाबळेश्वरामध्यें विशेष पाहण्यासारखें असें कांहींहि शिल्लक उरत नसलें, तरी एवढ्या घाईघाईनें घेतलेल्या त्याच्या दर्शनामुळें अंतःकरणाची तृप्ति मात्र मुळींच होत नाहीं. उलट तींच तींच सौंदर्यस्थळें तासन्तास आणि दिवसेंच दिवस न्याहाळीत बसावें अशी उत्कंठा अंतःकरणांत अनावर होते. महाबळेश्वराचा निरोप घेतांना आनंदापेक्षां दुःखाचीच भावना माझ्या मनामध्यें विशेष प्रबळ होती; भांडवलवाल्यांनीं आणि काळाबाजारवाल्यांनीं बळकावलेल्या ह्या महाराष्ट्राच्या सौंदर्यनगरींत गरीब आणि श्रमजीवी जनतेला वर्षांतून एकदा तरी सुखानें आणि आनंदानें राहतां यावें

हें एकच स्वप्न उतारावरून गाडी हाकतांना माझ्या डोळ्यांपुढें तरळत होतें. संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वांत आल्याखेरीज हें स्वप्न सत्यसृष्टींत अवतरणें अशक्य आहे ह्याहि गोष्टीची त्याच वेळीं खात्री पटून चुकली. कॉंग्रेसचें राज्य आणखी वीस वर्षें निर्वेधपणें कसें चालवितां येईल ह्याचीं स्वप्नें मुरारजीभाई सध्यां रचित बसले आहेत. दुर्दैवानें त्यांचें स्वप्न खरें ठरलें आणि कॉंग्रेसचा अंमल मुंबई राज्यांत वीस वर्षें असाच आणखी टिकून राहिला तर मुंबई-अहमदाबादचे सटोडिये आणि बनिये ह्यांना आंबरसपुरी ओरपण्याची एक प्रचंड खाणावळ असें ह्या महाबळेश्वरला स्वरूप आल्याखेरीज कधींहि राहणार नाहीं. भांडवलशाहीला विकण गेलेल्या कॉंग्रेस पक्षाचें राज्य नष्ट होऊन संयुक्त महाराष्ट्राचें जनताराज्य प्रस्थापित झालें तरच काळाबाजारवाल्यांच्या कचाट्यांतून महाबळेश्वराची सुटका होईल आणि महाबळेश्वर ही आनंदवनभुवनाची खरीखुरी राजधानी होईल हा एकच निर्णय पसरणीचा घाट संपावयाच्या आधीं माझ्या मनामध्यें तयार होऊन बसला होता.

## आळंदीच्या कीर्तनगंगेंत : १ :

कार्तिक वद्य त्रयोदशीला ज्ञानेश्वर महाराजांनीं आळंदी येथें समाधि घेतली. तथापि त्याच्या दोन दिवस आधीं म्हणजे एकादशीला आळंदीची यात्रा भरते. पंढरपूरच्या आषाढी-कार्तिकीसारखा या यात्रेचा सोहाळा आहे. ह्या यात्रेला प्रथमच जाण्याचा योग गाडगेबाबांच्या कृपेनें आला. दशमीच्या दिवशीं मुंबईहून दुपारीं तीन वाजतां बाबांच्या मोटारीमधून आम्ही निघालों. बाबांच्या बरोबर त्यांचे सातआठ भजनकरी होते. मुंबई सरकारच्या दारूबंदी खात्याकडून बाबांना ही मोटार मिळालेली आहे. कर्जतच्या एका घाटांत ही मोटार त्या खात्यांतल्या एका अधिकाऱ्यानें दरीमध्यें पाडून तिचा चांगला कानवला केला होता. सरकारला त्या मोटारीचा कांहींच उपयोग नव्हता. तेव्हां मोठ्या उदार अंतःकरणानें त्यांनीं ती 'कै. मोटार' गाडगेबाबांना बक्षीस देऊन मोठें पुण्य मिळवलें. बाबांनीं तीनचार हजार रुपये तिच्यावर खर्च करून तिला पुन्हा जिवंत केलें. असा हा मुंबई सरकारनें बाबांना नजर केलेल्या त्या गाडीचा थोडक्यांत इतिहास आहे. दान करण्याची ह्या देशांतल्या सर्वच लोकांची ही पद्धति आहे. सरकारलाच कशाला नांवें ठेवायचीं?

ह्या गाडीमध्यें ध्वनिक्षेपक आणि कर्णे बसविले असल्यामुळें बाबा कोठेंहि

गेले, तरी हजारों लोकांना त्यांचें भजन ऐकण्याची तावडतोब सोय करतां येते. शिवाय गाडी चालतां चालतां आंतील भजन रस्त्यांतील लोकांनाहि ऐकूं येतें. भगव्या रंगामुळें गाडी सर्व मराठी माणसांना परिचयाची झालेली आहे. लांबून गाडी येतांना दिसली म्हणजे गरीब लोक एकदम थबकतात आणि गाडींत बाबा बसले आहेत ह्या भावनेनें नमस्कार करतात. कित्येक लोक तर वाटेंत गाडी अडवतात. ठाण्याला असेंच झालें. पोलिसांनींच गाडी अडवली. मी पुढें बसलों होतों. मी त्यांना विचारलें, 'कां?'

ते म्हणाले, "बाबांचें दर्शन घ्यावयाचें आहे."

बाबा आपल्या पायांना कुणालाहि स्पर्श करूं देत नाहींत. किंबहुना कोणी आपल्याला वंदन करण्याच्या आधींच दोन्ही हात मस्तकावर जोडून ते त्याला वंदन करतात. पोलिसांनीं आपलीं शिरस्त्राणें आणि पादत्राणें काढून बाबांना अभिवादन केलें. आणि मग गाडी पुढें सोडली. असा चारदोन वेळां रस्त्यांत प्रकार झाला. गाडींत बाबा विशेष बोलत नव्हते. आधीं कित्येक रात्रीं दोनदोन तीनतीन वाजेपर्यंत कीर्तन झाल्यामुळें ते दमले होते, म्हणून डोळे मिटून स्वस्थ बसले होते. खोपोलीच्या अलीकडे पनवेलला जागाऱ्या रस्त्याच्या तोंडाला मोटारींचा तळ आहे. ह्याला शीळफाट्याचा तळ म्हणतात. तेथून आंतमध्यें एक मैलावर विठोबाची यात्रा भरते. तिकडे बाबांना बोलावणें होतें. म्हणून मोटार तिकडे वळली.

दहा मिनिटांच्या आंतच आम्ही यात्रेच्या ठिकाणीं आलों. उजव्या बाजूला एका उंच टेकडीवर विठोबाचें देऊळ आहे. त्या टेकडीच्या आजूबाजूच्या मैदानांत यात्रेच्या निमित्तानें तात्पुरतें एक गांवच वसलेलें होतें. जिकडे पाहावें तिकडे मांडव, पालें आणि दुकानें. करमणुकीचे सर्व प्रकार तेथें जमा झालेले होते. एक नाटक मंडळीहि तेथें मुक्काम करून होती. त्यांतले पुष्कळसे नट माझ्या ओळखीचे निघाले. रोज नाटकाला तिथें अडीचशें रुपये उत्पन्न होतें असें त्यांनीं सांगितलें. करमणुकीचा कर नाहीं असें त्यांनीं सांगितलें. करमणुकीचा कर नाहीं अन् नाटककाराला कांहीं द्यायचें नाहीं. मांडवाचा काय खर्च झाला असेल तेवढाच. कार्तिक महिन्यांत पंधरा दिवस यात्रा भरते. ह्या पंधरा दिवसांत लाख दीडलाख रुपयांची उलाढाल होते. यात्रेचें सर्व वातावरण 'मासळी'च्या वासानें दरवळून गेलें होतें. मी चकितच झालों. कोणाला तरी विचारलें:

"विठोबाची यात्रा ही. अन् इथं हे बोंबील न् मासळी कशाला?"

तेव्हां त्यानें मलाच उलट विचारलें, "या विठोबाला काय म्हणतात तें ठाऊक आहे ना तुम्हांला?"

मी म्हणालों, "नाहीं. मी प्रथमच येतोंय आज इथें."

तेव्हां तो हसून म्हणाला, "ह्याला 'बोंबल्या विटोबा' म्हणतात! ही बोंबल्या विठोबाची यात्रा. ह्या यात्रेला सर्व तऱ्हेची मासळी मिळते म्हणून इथें ही एवढी गर्दी जमते!"

बोंबल्या विठोबा हें नांव ऐकून मी सर्दच झालों! विठोबाच्या नांवामागें त्याच्या भक्तांनीं अनेक विशेपणें चिकटवलीं आहेत. पण एवढी भयंकर उपाधि त्याच्यामागें आजपर्यंत कोणीं लावून दिली नसेल! पुण्याच्या 'छिनाल बालाजी'ला आणि 'भांग्या मारुती'ला हा 'बोंबल्या विठोबा' चांगला जोडीदार शोभेल असा मनांत एक विचार आल्यावांचून राहिला नाहीं.

मोटारींतून बाबा खाली उतरण्याच्या आधींच आंतून कडें वाजायला सुरवात झाली होती. बाबांनीं भजनकऱ्यांना ओळीनें उभें केलें. आणि हातांतल्या काठीनें इशारा केला. त्याबरोबर कड्याच्या तालावर 'गोपाला गोपाला। देवकीनंदन गोपाला' ह्या त्यांच्या आवडत्या भजनाचा गजर वातावरणांत उठला. सभोवार यात्रेचा एवढा गोंगाट चालू होता. पण त्या गोंगाटामधून एखाद्या कारंज्याच्या धारेप्रमाणें बाबांचें भजन वर उन्बळलें. आणि क्षणांत त्यांच्या-भोवतीं गरीब स्त्री-पुरुषांचें आणि मुलांचें कडें जमा झालें. आणि बाबांच्या टाळीच्या तालावर सारेजण टाळ्या वाजवून मुक्तकंठानें 'गोपाला गोपाला। देवकीनंदन गोपाला' भजन म्हणूं लागले.

सुशिक्षित पांढरपेशा वर्गात आणि खालच्या वर्गात हाच मोठा फरक आहे. रस्त्यावर टाळ्या वाजवून भजन करण्याची शिकलेल्या माणसाला लाज वाटते. तो ओशाळा होतो. पण समाजांतील अज्ञ आणि गरीब लोक इतके साधे आणि भाविक असतात कीं परमेश्वराचें नांव कानावर पडतांच ते देहभान विसरून त्या भजनांत तल्लीन होऊन जातात. गाडगेबाबा कुठेंहि रस्त्यावर उभे राहून भजन करूं लागले कीं पांच मिनिटांच्या आंत प्रचंड जनसमुदाय त्यांच्याभोवतीं जमून त्यांच्याबरोबर भजन करूं लागतो. बाबा पुढें आणि शेकडों स्त्रीपुरुप मागें. टाळ्या वाजवताहेत अन् भजन करताहेत. असा तो मेळावा टेकडीच्या पायथ्यापासून

तों माथ्यावरील 'बांबल्या विठोबा'च्या देवळापर्यंत गर्जत गर्जत गेला. टेकडीला वरपर्यंत रुंद पायऱ्यांचा रस्ता आहे. त्यावर अनेक भिकारी आपापल्या वाद्यांवर निरनिराळीं गाणीं गात होते. पण 'गोपाला गोपाला। देवकीनंदन गोपाला' हा भजनाचा लोंढा जेव्हां खालून वर चढूं लागला तेव्हां सारे भिकारी आपापलीं गाणीं सोडून उच्चस्वरानें त्या भजनाची साथ करूं लागले. तें बघून मला मोठी गंमत वाटली. देवळाला एक प्रदक्षिणा मारून बाबा भजन करीत करीत जसे वर गेले तसेच पुन्हा खालीं उतरले, आणि मोटारींत येऊन बसले. कांहीं लोकांनीं त्यांना कीर्तनाचा आग्रह केला. पण त्यांना अधिक वेळ थांबायला सवड नव्हती.

परत येतांना शीळफाट्यावर थोडा वेळ आम्ही थांबलों. खंडाळ्याचा घाट चढतांना पोलिसांनीं अडवलें. कारण रात्र झाली होती. मोठ्या गाड्या घाटांतून वर चढायला रात्रीची परवानगी नसते. पण गाडगेबाबांची गाडी आहे असें मीं त्यांना सांगतांच त्यांनीं गाडी सोडली. एवढेंच नव्हे तर हात जोडून त्यांनीं बाबांचें दर्शन घेतलें. घाट चढून वर खंडाळ्याला यावयाला नऊ वाजले. मी बाबांना म्हणालों, "वर माझ्या बंगल्यावर चला. मी सर्वांना भाकरी न् पिठलें खायला घालतों." पण बाबा कसले माझें ऐकायला. खंडाळ्याच्या भर बाजार-रस्त्यावर त्यांनीं गाडी थांबवली. आणि खालीं उतरून भजनाला सुरवात केली. लोक भराभरा चहूंकडून जमले. कांहीं बायका बाबांच्या पायां पडावयाला धावल्या तसे बाबाहि रस्त्याच्या एका बाजूकडून दुसरीकडे पळाले. बायकांना ते म्हणाले, "जी बाई माझ्या पायां पडेल तिची सासू दिवाळीच्या आंत मरणार नाहीं!"

नेहमींप्रमाणें भजन केल्यावर बाबांनीं उपदेशाचे दोन शब्द सांगितले, "बाबांनो, दया हा जगांतला सर्वांत मोठा धर्म आहे. मी कबीराचा पुरावा सांगतों.

**तीरथ जावो, काशी जावो, चाहे जावो गया।**
**कबीर कहे कमालकू, सबसे बडी दया॥**

गरीब प्राण्यांचे प्राण घेणें ह्यासारखें पाप नाहीं. देव ह्या पापाला कधीं क्षमा करणार नाहीं. गरीब प्राण्यांना मारणारांचें वाटोळें होईल. दुसऱ्याचे प्राण वांचवणें हें सर्वांत मोठं पुण्य!"

त्यानंतर प्रत्येक स्त्रीनें आपापल्या घरांतून एकेक भाकर न् तिखट घेऊन यावें

असा बाबांनीं आदेश दिला. दहा मिनिटांच्या आंत भाकरीची चवड जमा झाली. एका मारवाड्यानें एक लहानशी चपाती आणून दिली. तेव्हां बाबांनीं ती त्याला तशीच परत केली. ते म्हणाले, "गरिबाचें अन्न द्या. हें नको." एकानें पेढ्यांचा पुडा दिला. तो बाबा तसाच्या तसा त्याला परत करणार इतक्यांत एक आंधळा भिकारी बाबांच्या रोखानें चाचपडत चाचपडत येत असलेला त्यांना दिसला. तेव्हां त्या पेढ्यांच्या पुड्यांतले दोन पेढे त्यांनीं त्या भिकाऱ्याच्या तोंडांत मोठ्या प्रेमानें घातले. गटाराच्या कडेला एक मोकळी जागा होती. तेथें बाबांची पंगत बसली. वर्तमानपत्राच्या कागदाच्या तुकड्यावर भाकरी वाढण्यांत आल्या. कोणीं घरांतून लोणचें आणलें, कोणीं मिरच्या आणल्या, कोणीं कांदे आणले. गरीब लोकांनीं बाबांना दिलेली ती 'मेजवानी' बघून माझें हृदय भरून आलें. बाबा अलिकडे भाकर खात नाहींत. पण त्या रात्रीं त्यांनीं अर्धी भाकर लोणच्या-बरोबर खाल्ली. इतक्यांत सगुणाबाई नांवाच्या एका वृद्ध स्त्रीनें ताज्या भाकरी अन् पिठल्याचें पातेलें आणलें. बाबांची न् त्या बाईची पूर्वीची ओळख असलेली दिसली. बाबांनीं तिच्या घरच्या सर्व मंडळींची अत्यंत आस्थेनें विचारपूस केली. जेवण झालें. जागा साफ झाली. डोक्यावरच्या खापरांतून पाणी पिऊन बाबांनीं ढेकर दिला. मग मी म्हणालों, "बाबा, आज रात्रींचा मुक्काम आतां आमच्या बंगल्यावरच होऊं द्या. सर्व मंडळी दमली आहेत."

बाबांनीं तें मान्य केलें. मोटार स्टेशनासमोर ठेवून आम्ही डोंगरावर चालत चालतच गेलों. बंगल्यावर पोहोंचतांच मधल्या दालनांत बाबांच्या भोवतालीं त्यांचे भजनकरी आपापल्या पथाऱ्या टाकून झोपीं गेले. बाबा कशावर झोपणार? धड वस्त्रावर बाबा झोपतच नाहींत. अन् माझ्या बंगल्यांत तर एकहि फाटकें वस्त्र मला सांपडेना. शेवटीं मोठ्या कष्टानें एका फाटक्या जीर्ण सतरंजीचा तुकडा मला सांपडला. त्याबरोबर बाबांना हर्ष झाला. तो त्यांनीं खालीं अंथरला. माळ्याच्या बायकोकडून तिचें एक फाटकें लुगडें अन् गोधडी त्यांनीं मागून घेतली तेव्हां त्यांचा बिछाना सजला. अंगावरच्या चिंध्या बाबांनीं उतरल्या. आणि सुईदोरा मागून घेऊन त्या चिंध्या शिवण्याचें त्यांचें काम बरेंच रात्रभर चाललें होतें. ऐशीं वर्षांच्या वर बाबांचें वय होऊन गेलें तरी त्यांची दृष्टि उत्तम आहे. सुईत दोरा त्यांनीं स्वतःच्या हातांनीं ओवला हें बघून मी तर चकितच झालों. बाहेर बंगल्याच्या व्हरांड्यांत मीं माझें अंथरूण पसरलें.

२००८० ग्रं. ५५१३ .३३ २९३ २०१७२५

बिछान्यावर पडल्या पडल्या किती वेळ तरी बाबांच्या त्यागमय जीवनावर मी विचार करीत होतों.

पहाटे साडेचारला बाबा उठले. त्याबरोबर त्यांची मंडळीहि पटापट उठली. प्रातर्विधी सर्वांनीं आटोपले. बाबा मला म्हणाले, "तुमच्याकडे खराटे जेवढे असतील तेवढे लौकर आणा!" माळ्याकडे चारपांच खराटे होते. ते बाबांनीं आपल्या सर्व मंडळीमध्यें वाटले. एक स्वतः हातांत घेतला. आणि बंगल्या-भोवतालचें आवार झाडण्याचें काम त्यांनीं सुरू केलें. मी लाजेनें अर्धामेला झालों. ऐशीं वर्षांच्या बाबांनीं माझ्या बंगल्याचें आवर झाडावें. अन् मी काय करावें? नुसतें त्यांच्याकडे बघत उभें राहावें? बरें, मीं हातांत खराटा घेऊन झाडायला सुरुवात करावी तर तें नुसतें सोंग झालें असतें. कारण तोंपर्यंत एकदांहि झाडण्याचें काम मीं केलें नव्हतें आणि बाबा गेल्यानंतर मी तें कधीं करणारहि नव्हतों. मग उगीच बाबांच्या पुढें हातांत खराटा धरून त्यांची आणि आपली स्वतःची वंचना कां करा? मी चमत्कारिक मनःस्थितींत तसाच बाबांच्या मागेंमागें हिंडत राहिलों. बाबांचें झाडण्याचें तंत्र मात्र 'रामबाण' आहे. त्यांनीं आमच्या दोन्ही गड्यांना जवळ बोलावून कसें झाडावें याचें प्रात्यक्षिक दिलें.

ते म्हणाले, "बसून झाडावें. ओणव्यानें कधीं झाडूं नये. घाईचें झाडणें हें झाडणें नव्हे. झाडलेल्या जागेवर धूळ आणि खडा कधीं राहतां कामा नये. अगदीं बारीक सारीक खडा वेचून दूर टाकावा." अर्ध्या तासांत बंगल्याभोवतालचें सारें आवार बाबांनीं आणि त्यांच्या मंडळींनीं झाडून झाडून आरशासारखें स्वच्छ केलें. एक नवीनच शोभा त्यांतून प्रकट झाल्याचा मला प्रत्यय आला.

बाबा मला म्हणाले, "रोज सकाळीं ह्या बंगल्याचें आवार असें दिसावयाला पाहिजे."

मी म्हणालों, "ह्या माझ्या दोन गड्यांनाच तुम्ही तें सांगा. माझी पाठ वळली कीं ते येथें स्वस्थ झोपा काढतात."

तेव्हां बाबा कळवळून नोकरांना म्हणाले, "अरे, तुम्ही ह्या बंगल्याचे नोकर नाहींत, मालक आहांत. तुम्हीं येथें रोज राहतां. तुमचे मालक हे काय चार दोन दिवसांचे मुशाफर म्हणून इथें येतात. हें तुमचें घर आहे. तें तुम्ही स्वच्छ ठेवणार नाहीं, तर दुसरें कोण ठेवणार!"

नोकर लाजले, ओशाळले. बाबा त्यांना म्हणाले, "मी इथें आतां वाटेल

तेव्हां येईन. जर मला ह्या आवारांत खडा आढळला तर बघा."

ह्या वेळ होईपर्यंत चांगलेंच उजाडलें होतें. समोरच्या उंच उंच डोंगरांच्या रांगा, निळेंभोर आभाळ आणि भोवतालची हिरवीगार झाडी पाहून बाबा त्या सृष्टिसौंदर्यांत एकदम तल्लीन झाले. डोळे भरून ते सारखे बघूं लागले. मला म्हणाले, "काल रात्रीं अंधारांत कांहीं मला दिसलें नाहीं. फारच अजब जागा तुम्हीं शोधून काढलीत. मजा आहे. आतां इकडून जातां येतां मी इथेंच येऊन मुक्काम करणार."

मला आनंद झाला. मी म्हणालों, "बाबा, बंगला तुमचाच आहे. केव्हांही येऊन आपण येथें राहा!"

बाबा म्हणाले, "मला काय करायचाय् तुमचा बंगला? मी इथेंच कुठें तरी झाडाखालीं पडून राहीन. आणि तुमचा बंगला झाडून काढीन. ह्या बंगल्याचा झाडूवाला म्हणून तरी तुम्ही मला ठेवाल ना?"

बाबांना काय उत्तर द्यावें हेंच मला कळेना. ह्याच वृत्तीनें बाबा दुसऱ्यांचीं मनें जिंकतात. 'नम्र झाला भूतां। तेणें कोंडिलें अनंता.' बाबांची निघण्याची वेळ झाली. कडेंवाला कडें वाजवूं लागला. भजनकऱ्यांनीं आपापल्या पथाऱ्या पाठीवर बांधून ते बाबांच्या मागें ओळीनें उभे राहिले. बाबांनीं सूर लावून काठीचा इशारा दिला. त्याबरोबर 'गोपाला गोपाला। देवकीनंदन गोपाला' ह्या भजनाचा गजर उसळला. आजूबाजूच्या झाडांच्या अंगावरही रोमांच उसळला. आपल्या पानांच्या टाळ्या वाजवीत तींहि त्या भजनांत जणुं सामील झालेलीं दिसलीं.

माझ्या बंगल्यापासून खालीं स्टेशनाच्या आवारापर्यंत बाबांनीं भजनाचा तडाखा उडवून दिला. सकाळच्या शांत वातावरणांत त्या डोंगरभागांत कडें असें कांहीं घुमत होतें म्हणतां! खंडाळें गांव अगदींच लहान, दहा वीस घरांचें; पण घराघरांतून मुलें, बायका, म्हातारे-कोतारे पटापटा धावत रस्त्यावर आले. मोठ-मोठ्या बंगल्यांचे पारशी, गुजराती मालक आपापल्या व्हरांड्यांतून जांभया अन् आळोखेपिळोखे देत बाबांकडे जिज्ञासेनें बघूं लागले. त्यांना कळेना ही काय भानगड आहे! डोक्यावर खापर ठेवलेल्या अन् अंगांत रंगीत चिंध्या घातलेल्या ह्या चमत्कारिक म्हाताऱ्याभोवतीं खेडवळ माणसें टाळ्या वाजवीत एवढ्या सकाळीं कां जमा झालीं आहेत हें त्यांना उमगेना. त्यांना बघून बाबा दोन्ही हात डोक्यावर जोडून जेव्हां अत्यंत नम्रतेनें नमस्कार करीत, तेव्हां त्यांची फार

पंचाईत व्हायची. ते त्यांच्या नमस्काराचा स्वीकार न करतां तसेंच त्यांच्याकडे मख्खासारखे पाहात उभे राहावयाचे. बाबा हळूच विषादानें मला म्हणाले, "गरिबाचा नमस्कार श्रीमंत लोक कशाला घेतील बिचारे? तेवढेच त्यांच्या हाताला कष्ट पडतील!"

डोंगर उतरून आम्ही खंडाळा स्टेशनाच्या फलाटावर आलों. तेथें तांबडे डगले घातलेले सर्व हमाल बाबांच्या भजनांत भराभर सामील झाले. तसे डोक्याला गरम कानटोपी घातलेले स्टेशनमास्तरहि बाहेर आले. आणि सगळेच टाळ्या वाजवून भजन करीत आहेत हें बघून तेहि हलके हलके टाळ्या वाजवूं लागले. सगळ्यांत मला मौज वाटली एका पोलिसाची. अंगावर पोलिशी गणवेष घातलेला तो माणूस जेव्हां टाळ्या वाजवून भजन करूं लागला तेव्हां तें दृश्य पाहण्यासारखें होतें.

भजन करीत रस्त्यानें जातां जातां बाबा समोरून येणाऱ्याजाणाऱ्यांची मोठ्या आस्थेनें चौकशी करीत. लहान मुलें भेटलीं कीं ते विचारीत, "शाळेंत जातां ना रे?"

कोणीं नाहीं म्हटलें कीं ते हळहळून म्हणत, "अरे, अरे शिकत नाहीं तुम्ही? तुम्हांला बैल का रे व्हायचंय्?"

एक म्हातारा भिकारी बाजूला उभा होता. त्याच्या अंगावरून प्रेमानें हात फिरवून बाबांनीं विचारलें, "कसं चाललंय तुझं?" तो बाबांचा प्रश्न ऐकून मला मनांत हसूं आलें. भिकाऱ्याचें काय चालायचें?

भिकारी म्हणाला, "कालपासून जेवलों नाहीं."

बाबा हळहळले. मला म्हणाले, "त्याला दोन आणे द्या." मी चटकन् त्याच्या हातावर दोन आणे ठेवले.

पुण्याला जाणारा आडवा रस्ता लागेपर्यंत बाबांचें हें भजन चाललें होतें. मोटार रस्त्यावर उभी होती. खंडाळ्याहून आम्ही लोणावळ्याला आलों. तेथें मोटार थांबली. पुन्हा बाबांची भजनपार्टी जी निघाली ती सर्व लोणावळें गांवामधून हिंडून आली. चांगला तास दीडतास लागला. कोणीं केळीं दिलीं, कोणीं चिक्की दिली. एका गुजराती व्यापाऱ्याकडून आपल्या भजनकरी मंडळीसाठीं बाबांनीं चारपांच गरम ब्लँकेटें घेतलीं. लोणावळ्याहून वडगांवला आलों. तेथें रस्त्यावरच पोटोबाचें देऊळ आहे. त्याच्या शेजारच्या मैदानांत बाबांनीं आपलें

भजन सुरू केलें. पांच मिनिटांत शेदोनशे स्त्रीपुरुष त्यांच्याभोवतीं जमले. भजनाचा सर्वत्र गजर उठला.

कांहीं मराठ्यांच्या बायका तोंडाला आडवा पदर लावून उभ्या होत्या. त्यांना उद्देशून बाबा आपल्या तऱ्हेवाईक विनोदानें म्हणाले, "का ग बायांनो, तोंडाला पदर लावून का ग उभ्या? भजनाचें वारें तोंडांत शिरेल म्हणून भ्या वाटतंय् व्हय?" त्याबरोबर त्या लाजल्या, अन् टाळ्या वाजवूं लागल्या. भजन झाल्यावर बाबांनीं कीर्तनास सुरवात केली. ते म्हणाले, "ज्याच्या अंतःकरणांत दया नाहीं त्याचें कधींच चांगलें होणार नाहीं. गुजराती, मारवाडी, ब्राह्मण हे घरांत कोंबड्या ठेवतात का? नाहीं. मग त्या तुमच्या घरांत कशा घुसल्या हो? सकाळीं त्या कोंबड्यांना दाणे घालायचे. अन् संध्याकाळीं त्यांच्या मुंड्यां-वरून सुरी फिरवायची. तुमचें कसें कल्याण होणार? मराठे, माळी, तेली, न्हावी, परीट, सुतार, लोहार, कैकाडी, बेलदार, महार, मांग ह्यांची वाईट स्थिति ह्यामुळें झाली. मुक्या जनावरांचे शाप त्यांना भोवताहेत. तुम्ही लोक दिवसभर कामें करतां, काबाडकष्ट करतां. तुमच्या बायका रानांत जातात, शेण्या वेचतात, काटक्या वेचतात. पण त्यांच्या अंगावर धड वस्त्र नाहीं कीं फुटका मणि नाहीं. हीं, हीं तुमचीं घरें बघा! त्यांना भिंती नाहींत कीं छप्पर नाहीं! नाहीं तर ती मारवाड्याची तीनमजली हवेली बघा! त्या मारवाड्याच्या शेजारीं जेव्हां महाराची माडी बांधलेली मला दिसेल तेव्हां माझा जीव शांत होईल. मारवाड्याच्या बाईच्या नाकाला नुसता बोंबलाचा वास आला, तर ती परातभर ओकेल. अन् तुम्ही मडकींच्या मडकीं घरांत बोंबलानें भरून ठेवतां काय? उगाच दरिद्री राहिलांत होय? इथें जी तरुण मंडळी मला दिसताहेत त्यांना मी सांगतों—जत्रेच्या ठिकाणीं शेकडों बकरीं मारलीं जातात. तेथें शंभर तरुणांनीं जाऊन देवळाच्या पुढें उभें राहावें. अन् दोनशें हातांनीं नमस्कार करून लोकांना सांगावें, 'बाबांनो, ह्या मुक्या जना-वरांची हत्या करूं नका!' दुसऱ्याचे प्राण वाचवण्यासारखें जगांत पुण्य नाहीं!"

वडगांवहून निघावयाला पावणेअकरा वाजले. उन्हें चांगलींच तापलीं होतीं. पुण्याला पोहोंचायला बारा वाजले. आळंदीच्या हद्दींत यात्रेच्या वेळीं मोटारींना जावयाला परवानगी नसते. ती परवानगी घ्यावयाला आम्ही कलेक्टरच्या कचेरींत गेलों. तेथें बाबांच्या दर्शनाला लोकांची प्रचंड गर्दी हां हां म्हणतां जमली. मॅजिस्ट्रेट आणि मामलेदारहि आंतून बाबांना भेटावयाला बाहेर आले.

# आळंदीच्या कीर्तनगंगेंत : २ :

मोटारची परवानगी घेऊन आम्ही आळंदीच्या परिसरांत पोहोंचावयाला एक वाजला. उन्ह असें तापलें होतें म्हणतां! अन् यात्रेकरूंचा महापूर रस्ता भरून आळंदीकडे वाहात होता. वातावरणांत टाळदिंड्यांचा ध्वनि निनादत होता. यात्रेकरूंच्या खांद्यावरच्या पताका वाऱ्यावर फडफडत होत्या. भाविकतेचा उन्मादक सुगंध सर्वत्र दरवळत होता. बाबा मोटारींतून खालीं उतरले, आणि त्यांनीं 'देवकीनंदन गोपाला'चा गदारोळ ठोकला. त्याबरोबर शेकडों यात्रेकरू त्यांच्या रोखानें धावले. झालें, टाळ्यांचा न् भजनाचा घोशा पुन्हा जोरांत सुरू झाला. मी मात्र मोटारींत बसून राहिलों. माझें सारें अंग आंबून गेलें होतें. मी शेलारमामांना म्हणालों, "हा ऐशीं वर्षांचा म्हातारा जबरदस्त आहे. ह्याच्या-बरोबर आपण कांहीं पुरे पडणार नाहीं."

शेलारमामा म्हणाले, "गेलीं पन्नास वर्षें बाबांचा अहोरात्र हाच क्चक चालला आहे. कोणताहि एक माणूस आठवडाभर कांहीं त्यांच्याबरोबर टिकत नाहीं!"

गाडगेबाबा कोणत्याहि तीर्थांत स्नान करीत नाहींत किंवा कोठल्याहि देवळांत प्रवेश करीत नाहींत. तेव्हां त्यांचा निरोप घेऊन मी श्री ज्ञानेश्वरमहाराजांच्या समाधीचें दर्शन घ्यावयास एकटाच पुढें गेलों. गर्दीला कांहीं सुमारच नव्हता.

यात्रेकरूंपेक्षां विक्रेत्यांचीच संख्या मला जास्त वाटली. भिकारी आणि दुकानदार ह्यांनीं या यात्रेचें धार्मिक स्वरूप नष्ट करून त्याला कोठल्यातरी शहरांतील बाजाराचें गलिच्छ स्वरूप मिळवून दिलें होतें. बाकी सर्व जत्रांची हीच परिस्थिति असते म्हणा! लोक धर्माचा व्यापार करतात. खाण्याच्या जिनसांचे इतके प्रकार सर्वत्र विकले जात होते कीं लोक पोट भरण्यासाठीं तेथें आले आहेत कीं पुण्य संपादन करण्यासाठीं आले आहेत हेंच कळत नव्हतें. कपाळाला लावावयाचे अभ्रकमिश्रित गोपीचंदनाचें रंगीबेरंगी गंध खेडवळ लोक दोन दोन पैसे देऊन कपाळावर रंगवून घेत होते. त्यामुळें त्यांचे चेहरे मोहरमच्या वाघासारखे दिसत होते. ह्या देशांतील अडाणी लोकांच्या सौंदर्यदृष्टीचें वर्णन करावें तेवढें थोडेंच आहे. इंद्रायणीच्या पात्रांत पाण्यापेक्षां माणसेंच अधिक दिसलीं. पूल ओलांडतांच पलिकडे दोन्ही बाजूंला भिकाऱ्यांच्या भयंकर पलटणी दुतर्फा लागून राहिलेल्या होत्या. सर्व तऱ्हेच्या हिडिस रोगांनीं पछाडलेले आणि कोणतींहि इंद्रियें धड स्थितींत अंगावर नसलेले हे एकापेक्षांहि एक भेसूर प्राणी अशा यात्रेच्या वेळीं एवढ्या संख्येनें एकदम कसे आणि कोठून जमा होतात हा एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे. कोणाच्या मदतीवांचून दहा पावलें नीट चालूं शकेल असा एकहि भिकारी त्यांत मला आढळला नाहीं. ह्याचा अर्थच हा आहे कीं यात्रेच्या वेळीं ह्या सर्व भिकाऱ्यांना क्षेत्राच्या ठिकाणीं आणून त्यांचें सार्वजनिक प्रदर्शन करणाऱ्या कांहीं व्यापारी संघटना असल्या पाहिजेत. भिकाऱ्यांच्या रोगी आणि हिडिस शरीरांच्या भांडवलावर स्वतःचीं पोटें जाळणारीं कांहीं माणसें ह्या जगांत असूं शकतात हा विचार देखील करवत नाहीं. भिकारी संपले, तेथून हलवायांचीं दुकानें सुरू झालीं. प्रत्येकाच्या दुकानांतून फोनोग्राफ तारस्वरानें चित्रपटांमधलीं निरनिराळीं गाणीं किंचाळत होते. एका दुकानांतला ग्रामोफोन दुसऱ्या दुकानांतल्या ग्रामोफोनपेक्षां जास्त जोरानें ओरडण्याचा प्रयत्न करीत होता. डोक्यावर कडक उन्ह, नाकातोंडांत धूळ नि घाण, कानांत असंख्य आवाजांचा असह्य गोंगाट नि गर्दीतून वाट काढतांना सर्वांगाला बसणारे धक्के अशा 'थाटांत' यात्रेकरू देवळांच्या अरुंद बोळांमधून जेव्हां जाऊं लागतो तेव्हां त्याच्या अंतःकरणांत भक्ति आणि श्रद्धा ह्या भावना किती अंशांनीं शिल्लक राहात असतील तें परमेश्वराला माहीत! देवळाच्या महाद्वारासमोर तर बारीमध्यें शेळ्यामेंढ्यांप्रमाणें हजारों लोक खेचाखेच करून असहायपणें बसले होते. आणि दरवाजाच्या लहान

दिंडीमधून त्यांपैकीं दहा माणसें हत्याहत्यानें पोलीस सोडीत होते. बारीमध्यें जाऊन बसलें तर देवळांत प्रवेश मिळवयाला संध्याकाळ तरी झाल्यावांचून राहणार नाहीं ही गोष्ट सूर्यप्रकाशाप्रमाणें स्वच्छ होती. तेव्हां आतां श्री. ज्ञानेश्वरांच्या समाधीचें दर्शन व्हावयाचें कसें ह्या विवंचनेंत मी तसाच थोडा वेळ उभा राहिलों.

इतक्यांत कोणींतरी सांगितलें कीं, देवळाच्या डाव्या बाजूला 'वशिल्याचें दार' आहे, तेथून अधिक लौकर प्रवेश मिळेल. तेव्हां तिकडे गेलों. अन् खरेंच! 'खासप्रवेश पत्रिका' हातांत घेऊन पांढरपेशीं माणसें तिकडून आंत आरामशीरपणें अन् व्यवस्थितपणें जात होतीं. मी चकितच झालों. काय चमत्कारिक देश आहे हा हिंदुस्थान तरी. वशिल्यावांचून इथें कामेंच होत नाहींत. मग तो राजाचा दरबार असो, नाहींतर देवाचा किंवा साधुसंतांचा दरबार असो. थोड्या वेळांत मीं चार माणसांची वशिल्याची पत्रिका मिळवली. अन् मोठ्या रुबाबामध्यें आंत शिरलों. सहस्रावधि गरीब यात्रेकरू महाद्वारासमोर प्रवेशासाठीं तासन् तास ताटकळत अन् तळमळत बसले असतां, आपण 'वाम मार्गा'नें म्हणजे डाव्या बाजूच्या दरवाजानें आणि वशिल्यानें देवालयांत प्रवेश मिळवावा ही अपराधी जाणीव मनांत डाचत होती. पण गेलों तसाच आंत कोंडग्यासारखा न् काय! आंतहि काय कमी गर्दी होती म्हणतां कीं काय? तिथेंहि दर्शनोत्सुक भक्तांच्या प्रचंड रांगा लागून राहिल्या होत्या. ओळीनें गेलों असतों तर एकदोन तास तरी सहज मोडले असते. तेव्हां लवकर दर्शन घडावें म्हणून पुन्हा दुसरा वशिला लावला. तोहि चटकन् लागला. समाधिगृहाच्या उजव्या बाजूला एक लहानसें चौकोनी दगडी द्वार आहे. माझ्या शरीराच्या माणसाला त्या दारांतून आंत शिरणें म्हणजे एक अग्निदिव्यच होतें. पण शिरलों कसा तरी आंत. अन् बघतों तों अगदीं ज्ञानेश्वरमहाराजांच्या समाधीच्या समोरच उभा होतों मी. समाधीवर फुलांच्या राशी पडलेल्या होत्या. समाधीचें अन् तिच्या मागें असलेल्या श्रीविठ्ठलरखुमाईच्या मूर्तीचें मनसोक्त दर्शन घेतलें. मागें वळून पाहिलें तों एक अत्यंत केविलवाणें दृश्य दृष्टीस पडलें. समाधीचें दाराबाहेरून दर्शन घेणाऱ्या भक्तांच्या अवस्थेचें काय वर्णन करावें? दाराच्या दोन्ही बाजूंला दोन पोलिस उभे होते. रांगेंतून अनुक्रमानें येणाऱ्या माणसाला डाव्या बाजूचा पोलिस दोन्ही दंडांला धरून दारापुढें उभा करीत, अन् त्यानें दर्शनासाठीं

हात जोडले कीं त्याला तो उजव्या बाजूच्या पोलिसाच्या अंगावर ढकलून देई. म्हणजे कोणाही माणसाला समाधीचें दर्शन दोन सेकंदांपेक्षां कांहीं अधिक वेळ घडत नसे. आंतून बघणाऱ्याला हें दृश्य फारच हास्यास्पद दिसे. आला माणूस कीं चालला. आला माणूस कीं चालला. हें का दर्शन म्हणायचें? कीं दर्शनाची विटंबना? गरीब माणसांनीं लांबलांबून उन्हांतून आणि धुळींतून रखडत यायचें, तासाचे तास बारींत तडफडत बसायचें. अन् एवढी तपश्चर्या करून शेवटीं समाधीचें दर्शन जें घ्यायचें तें असें पापण्यांच्या एका उघडझापीचें! गाडगेबाबा म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. "मरण बरें, पण शहाण्या माणसानें यात्रेला जाऊं नये!"

देवळांतून बाहेर पडलों तेव्हां तीन वाजून गेले होते. इंद्रायणीच्या पुलाच्या एका कमानीजवळ गाडगेबाबांच्या 'गोपाला'चा प्रचंड दणका चालूच होता. दोनतीन हजार तरी माणसें त्यांच्या भजनांत उभीं होतीं. त्यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम रात्रीं नऊ वाजतां सुरू होणार होता. तेव्हां पांचसहा तास मी तेथें बसून काय करूं? असा विचार करून मी पुण्याला गेलों. आणि आठ साडेआठच्या सुमारास पुन्हा आळंदीला परत आलों. इंद्रायणीच्या तीरावर गाडगेबाबांनीं एक लाख रुपये खर्च करून पस्तीस सालीं एक प्रशस्त आणि सुंदर धर्मशाळा बांधून ठेवली आहे. ह्या धर्मशाळेच्या आवारापासून नदीच्या पात्रापर्यंत पायऱ्यापायऱ्यासारखे जमिनीचे लांबलचक टप्पे तयार केलेले आहेत आणि त्यावर कलमी आंब्याचीं झाडें लावलीं आहेत. गाडगेबाबा डोक्यावर खापर आणि अंगावर चिंध्या घालीत असतील. पण कलात्मक सौंदर्यदृष्टि त्यांच्या अंगीं उपजत आहे, हें त्यांनीं बांधलेल्या कोणत्याहि इमारतीकडे आणि त्या इमारतीभोवतालच्या शोभिवंत आवारांकडे सहज दृष्टि टाकली असतां लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं.

धर्मशाळेकडच्या नदीच्या उतरत्या पात्रांत कीर्तनाची व्यवस्था केली होती. हा सर्व भाग नळीच्या विद्युद्दीपांनीं सुप्रकाशित करण्यांत आलेला होता. अन् रंगीबेरंगी कागदाच्या पताकांच्या माळांनीं सुशोभित केलेला होता. साडेनवाच्या सुमारास कमींत कमी पन्नास हजार श्रोते तरी नदीच्या वाळवंटांत जमलेले होते. उजव्या बाजूला इंद्रायणीच्या पुलावरहि हजारों श्रोते कीर्तनश्रवण करण्यासाठीं उभे होते. आळंदीची निम्मी यात्रा तें कीर्तन ऐकण्यासाठीं जमली होती असें म्हटलें तरी हरकत नाहीं. आतांपर्यंत कोणत्याहि कीर्तनासाठीं एवढी मोठी गर्दी

जमलेली निदान मीं तरी पाहिलेली नाहीं. गाडगेबाबांनीं आरंभीं उठून सर्व जनतेला नमस्कार केला. आणि कैकाडीबाबांना कीर्तन करण्याची आज्ञा केली.

गाडगेबाबांच्या निष्ठावंत शिष्यांत कैकाडीबाबा हे अग्रगण्य होत. गाडगेबाबांच्या पोषाखाची एक 'फॅशन' तर कैकाडीबाबांची दुसरीच 'फॅशन'. डोक्याला कानावरून बांधलेलें पांढरें फडकें मागें पाठीवर रुळत आहे. गळ्यापासून खालीं पायघोळ पांढरें रकटें अंगावर दुमडून पांघरलेलें आहे. अन् त्यांतून त्यांच्या लांबलचक करड्या दाढीचा श्यामल चेहरा अन् तेजस्वी डोळे चमकत आहेत. 'रामकृष्ण हरि । जयजय । रामकृष्ण हरि' अशी कैकाडीबाबांनीं आपल्या सुरेल स्वरांत नामसंकीर्तनाला सुरुवात करून नंतर 'रूप पाहतां लोचनीं । सुख झाले वो साजणीं' असें स्तवन केलें आणि 'संतांच्या पायीं हा माझा विश्वास । सर्वभावें दास झालों त्यांचा' हा अभंग निरूपणाला घेतला. ते म्हणाले, "हा संसार कष्टाचा आहे. एखाद्या राक्षसासारखा किंवा भुतासारखा तो तुमच्या मागें लागला आहे. संसाराचा गाडा ओढतां ओढतां कोण कष्ट होतात जीवाला! नाकीं नव येतात. आतांच बघा. तुम्ही आज ह्या यात्रेला आलांत. घरांत स्वस्थ बसलां असतां तर तुम्हांला विश्रांति मिळाली असती. पण त्या विश्रांतिसुखाची तुम्हीं परवा केली नाहीं. जवळ तुमच्या पैसा नाहीं. यात्रा काय फुकटची होते? शेजाऱ्यापाजाऱ्याकडून दहा पंधरा रुपये तुम्हीं उसनवार काढले. उन्हातान्हांतून येथपर्यंत चालत आलांत. आळंदीच्या हद्दींत पाय टाकण्यापूर्वी डॉक्टराकडून कचाकचा टोचून घेतलेंत. थंडीचे हे दिवस. इंद्रायणीच्या पाण्यांत पाय टाकला कीं अंगात भडभडून हिंव भरतंय्. पण तुम्ही जे इथें आलांत ते काय इंद्रायणीच्या पाण्यांत आंघोळ करायला? तीर्थांत स्नान करून काय कुठें पापें जातात? नाहीं. तुमचें पाप नष्ट करण्याचें सामर्थ्य जर कुठें असेल तर तें संतांच्या वचनांत. लोखंडाचें सोनें केवळ परीसच करूं शकतो. सासू चांगली असली तर सून चांगली होते. गांवचा पाटील चांगला तर लोक चांगले. पाटील गुंड असला कीं गांव नासलाच म्हणून समजा. मास्तर चांगला असेल तर मुलगा चांगला निपजेल. मोटारीचा ड्रायव्हर कुशल असेल तर मोटारींतल्या उतारूंचे प्राण सुरक्षित राहतील. त्याच्या जर का उलट्या बाहुल्या असल्या तर आंतल्या पंचवीसतीस उतारूंचा निकाल लागला म्हणून समजा. त्याप्रमाणें जगांत साधुसंत असतील तरच हें जग सुधारेल.

**तुका म्हणे पापें। जाती संतांचिया कृपें**

आम्हीं दाढ्या वाढवणारे अन् अंगावर चिंध्या घालणारे कांहीं साधु नव्हत.

**चंदन थे तो घस गये रहे नीमके खोड**
**साधु थे तो चल गये रहे चपाती चोर!**

साधुसंत हे चंदन. आम्ही कडुनिंबाचीं खोडें. आम्ही स्वतःच अजून सुधारलों नाहीं तर आम्ही तुम्हांला काय सुधारणार? पण ज्ञानोबा, तुकोबा ह्यांची वाणी चंद्रसूर्य जोंपर्यंत आहेत तोंपर्यंत अमर राहणार. आणि तिच्याच सामर्थ्यानें सर्वांचा उद्धार होणार. बोला—

**गोपाला गोपाला। देवकीनंदन गोपाला**

"म्हणून संतांच्या पायीं आपण विश्वास ठेवला पाहिजे. तेच माझें हित करतील अशी गाढ श्रद्धा मीं बाळगली पाहिजे. वैकुंठाचा रस्ता केवळ संतच दाखवूं शकतात. तें इतरांचें काम नव्हे. संतांच्या वाणीचा उच्चार करणें हाच तो वैकुंठाचा मार्ग. हा वैकुंठाचा मार्ग तुमचे कोणीहि सगेसोयरे दाखवूं शकणार नाहींत. उलट तुमची बायको, तुमचे आईबाप तुमच्या मार्गांत अडथळेच उत्पन्न करतील. लोक तुम्हांला त्या कामीं नांवें ठेवतील. पण लक्षांत ठेवा. संत तुमचें कधीं अकल्याण करणार नाहींत. संसार कसा करावा, पाप कां करूं नये, कोणत्या गोष्टी करण्यांत खरें पुण्य आहे हें संतच तुम्हांला सांगतात. मग संसारी लोक संतांना कां विनाकारण नांवें ठेवतात? संतांनीं कोणाचें घोडें मारलें आहे?

"जगांत पैशाला सारा मान आहे. हातांत 'रुपया' असेल तर 'जोरू कहे प्राणपतया!' नवरा जोंपर्यंत पैसा मिळवतो तोंपर्यंत तो बायकोला आवडतो. बायको डोळ्यांत अश्रु आणून नवऱ्याला वारंवार सांगते, 'तुमच्यासाठीं मीं माझे आईबाप सोडले बरें नाथ!' पण उपनिषदांत सांगितलें आहे कीं ह्या जगांत कोणीं कोणासाठीं कांहीं सोडलें नाहीं. आपलें जोंपर्यंत बरें आहे तोंपर्यंत सगळे आपले आहेत.

**बरें झालें तरी अवघेची म्हणती। गरीबाचा अंतीं कोणी नाहीं!**

नवरा जोंपर्यंत धड आहे तोंपर्यंत बायको त्याला विचारते. त्याला महारोग होऊं द्या, अर्धांगवायु होऊन त्याचें तोंड वांकडें होऊं द्या, मग पाहा. किंवा

बायको आंधळी किंवा क्षयरोगी झाली नाहीं तोंपर्यंत नवरा तिला विचारील. पण संतांचें तसें नाहीं.

**संत दयाळ दयाळ । करि सर्वांचा सांभाळ !**

सर्वांगाला रक्तपिती झाली असली तर त्याच्या अंगावरून केवळ संतच ममतेचा हात फिरवतील. संतांसारखी दया कोणाच्याहि अंतःकरणांत नाहीं. म्हणूनच म्हटलें आहे कीं,

**देव दयाळ दयाळ करी भक्ताचा सांभाळ !**

देव केवळ आपल्या भक्ताचा सांभाळ करतो. तो पंक्तिप्रपंच साधुसंतांजवळ नाहीं.

**दीपकाचे अंगीं नाहीं दुजाभाव । चोर आणि साव सारखाची !**

असे संत असतात. कोणी चोर असो, कोणी साव असो, त्याच्या उद्धाराची संतांना सारखीच काळजी. आजची ज्ञानोबारायांच्या समाधीच्या दर्शनाला जमणारी ही प्रचंड यात्रा बघा. करोडोपति मेला तरी त्याच्या दर्शनाला एवढीं माणसें कांहीं जमणार नाहींत. आजच्या ह्या यात्रेवर किती लोक पैसे कमवताहेत तें पाहा. सरकारपासून तों म्युनिसिपालटीपर्यंत सर्वांचा 'कर' आपला ह्या बिचाऱ्या यात्रेकरूंवर. दुकानदारांना तर पैसे कमावण्याची पर्वणीच आली आहे. चिमूटभर अबीर न् बुका नि एका एका माळेला आठ आठ आणे. अनेक बुवा-बैरागी ह्या वाहत्या गंगेंत हात धुवून घेण्यासाठीं आज इथें जमले आहेत. ज्ञानेश्वरमहाराजांच्या जिवावर आज इतके लोक येथें एवढा पैसा कमावतात. हा देखील संतांचा एक महिमाच म्हणायला हवा! असत्यानें वागणाऱ्या माणसांचा सुद्धां संतांच्यामुळें केवढा फायदा होईल बरें, ह्याचा तुम्ही विचार करा.

"देव आहे कीं नाहीं ह्याबद्दल एका वकिलाचा अन् त्याच्या मुलाचा मोठा वाद होता. वकील म्हणे ही सृष्टि आपोआप उत्पन्न झाली. तिचा कोणी उत्पत्तिकर्ता नाहीं. मुलगा म्हणे ही सृष्टि ईश्वरानें उत्पन्न केली. पण बापाला तें कबूल नसे. एकदां वडील बाहेर गेले असतां मुलानें वाघाचें एक सुंदर चित्र काढून त्यांच्या टेबलावर ठेवलें. वडील परत आले तेव्हां त्यांना तें चित्र दिसलें. ते त्या चित्रावर फार खूष झाले. चित्रांतला वाघ अगदीं हुबेहूब वाघासारखा दिसत होता. वडिलांनीं मुलाला विचारलें, 'बाळ, हें चित्र कुणी काढलें?'

मुलगा म्हणाला, 'मला नाहीं माहीत.' 'मग हें येथें कसें आलें?' वडिलांनीं पुन्हा प्रश्न केला. मुलगा म्हणाला, 'तें तेथें आपोआप आलें!' वकील गंभीर मुद्रा करून म्हणाला, 'हें चित्र आपोआप कसें इथें येईल?' तेव्हां मुलगा हंसून म्हणाला, 'जशी ही सृष्टि आपोआप निर्माण झाली, तसें!'

"ह्या सृष्टीचा उत्पन्नकर्ता कोणीतरी आहे हें लहान मुलाला देखील जर कळतें तर त्याची जाणीव कृतज्ञतेनें आपण ठेवणें हें आपलें कर्तव्य नाहीं काय? म्हणूनच त्याचें नामस्मरण करण्याचा मार्ग संतांनीं सांगितला.

**नाम घेतां वाया गेला । ऐसा कोणीं ऐकला नाहीं!**

"साधुसंत ह्या पृथ्वीवर जे अवतरले, त्यांना काय कोणीं बोलावणें पाठविलें होतें? ते आपण होऊन आले! जगाच्या उद्धाराची त्यांना तळमळ होती म्हणून ते अवतीर्ण झाले. ज्ञानोबा, तुकोबा आणि आतां आमचे गाडगेबाबा! तुकोबाच्या वाणीसारखीच बाबांची वाणी अगदीं साधी आणि सोपी आहे. परंतु

**एक एक बोल । वेदशास्त्रापरिस खोल**

अशी मौज आहे, गाडगेबाबा आहेत म्हणून आज गरीबांच्या दुःखाला वाचा फुटते आहे. गाडगेबाबांवाचून 'गरिबांचा वालि कुणी न्हाई रे!' संस्कृत भाषेच्या कपाटांत कड्याकुलुपांत ठेवलेलें तत्त्वज्ञान ज्ञानोबांनीं तुकोबांनीं फोडून बाहेर आणलें.

**फोडिलें भांडार धन्याचा हा माल । मी तव हमाल भारवाही**

"तुकोबांनीं बाहेर काढलेला हा माल आज गाडगेबाबा सर्व जनतेला मुक्त हस्तांनीं वांटीत आहेत. त्यांचें कार्य अमर आहे. हिंसा करूं नका, मुलांमुलींना शिक्षण द्या, असें गाडगेबाबा तळमळून सांगताहेत इतकीं वर्षें. आपल्या मुलाची हजामत न्हावी करायला लागला तर त्याचा वस्तरा मुलाच्या डोक्याला एवढासा सुद्धां लागूं नये म्हणून आपण किती जपतों. अन् बकऱ्याचें मुंडकें कापत असतांना आपल्याला यत्किंचित्सुद्धां यातना होत नाहींत. ह्याला काय म्हणावें? जवळ पैसा असो नसो, घरांत जागा असो नसो, एकामागून एक मुलें आईबापांना होतच असतात. घरांत पोरवडा झाला म्हणजे कोणालाच धड खायला मिळत नाहीं किंवा अंगावर कपडा घालायला मिळत नाहीं.

**पुत्र व्हावा ऐसा गुंडा । ज्याचा तीन्ही लोकीं झेंडा!**

पण असा पुत्र कसा होणार? शिक्षणावांचून पुत्र 'गुंडा' होणें अशक्यच आहे. राजकारणाकडे आपण लोक जास्त लक्ष देतों. आपण शिक्षणाकडे अधिक लक्ष द्यावयास हवें. तुम्ही म्हणाल, शिक्षणाला पैसा लागतो. पैसा कोठून आणावयाचा? मी त्याला उपाय सांगतों. तुम्ही दहा वर्षेपर्यंत आपलीं व्यसनें सोडा. चहा पिऊं नका. बिडी, तंबाखू, पानपट्टी, दारू, सर्व सोडून द्या. मग बघा तुमच्याजवळ पैसा जमतो कीं नाहीं तें. हा सर्व पैसा तुम्ही आपल्या मुलांच्या शिक्षणासाठीं खर्च करा. गाडगेबाबा गेलीं पन्नास वर्षे गरिबांना घसा खरडून हेंच सांगताहेत. म्हणूनच मी म्हणतों कीं बाबांखेरीज

**गरिबाचा वालि कुणी न्हाई रे!**

अशा तऱ्हेनें आपल्या अत्यंत गोड आणि रसाळ वाणीनें एक तासपर्यंत तो प्रचंड श्रोतृसमुदाय कैकाडीबाबांनीं मंत्रमुग्ध ठेवला होता. गाडगेबाबांच्या खालोखाल जनतेमध्यें कैकाडीबाबांना कां मान आहे त्याचें प्रत्यंतर त्या कीर्तनामध्यें मला पाहावयाला आणि ऐकावयाला मिळालें!

## आळंदीच्या कीर्तनगंगेंत : ३ :

कैकाडी महाराजांचे शिष्य श्री नामानंद महाराज ह्यांचें त्यानंतर सुबोध कीर्तन झाल्यावर गाडगेबाबांनीं मला 'दोन हिताच्या गोष्टी' बोलावयास सांगितलें. मी म्हणालों,

"महाराष्ट्र हा संतांचा देश आहे. तेथें दुसरें कांहीं पिकत नसेल पण संतांची वाणी मात्र अमाप पिकते. संतांची परंपरा महाराष्ट्रांत अखंडित चालू आहे. त्यांनीं महाराष्ट्रांत भक्तीचें महान् मंदिर उघडलें.

**संत कृपा झाली । इमारत फळा आली**
**ज्ञानदेवें रचिला पाया । रचियलें देवालया**
**नामा तयाचा किंकर । त्यानें केला हा विस्तार**
**जनार्दन एकनाथ । ध्वज उभारिला भागवत**
**तुका झालासे कळस । भजन करा सावकाश**

"ह्या भागवतधर्माचा पाया ज्ञानोबांनीं घातला आणि तुकोबा त्याचे कळस झाले. आमचे गाडगेबाबा त्या कळसाची पताका आहेत. लोकोद्धाराचा जो मार्ग ज्ञानोबा आणि तुकोबांनीं सांगितला त्याच मार्गानें आज विनोबा आणि गाडगे-

बाबा जनतेला नेत आहेत. ज्या इंद्रायणी नदीच्या कांठावर आज बाबांचें कीर्तन येथें होत आहे ती इंद्रायणी नदी धन्य आहे. कारण त्या इंद्रायणी नदीनें आपल्या डोळ्यांनीं ज्ञानोबाहि पाहिले आणि आज ती गाडगेबाबाहि पाहात आहे. ज्ञानोबांना जाऊन सातशें वर्षें होत आलीं, पण अजून त्यांची वाणी आपल्या कानांत घुमते आहे. एवढेंच नव्हे तर ती समाजाच्या सर्वांत खालच्या थरापर्यंत जाऊन पोहोंचली आहे. ज्ञानेश्वरमहाराजांच्या समाधीच्या दर्शनासाठीं आज महाराष्ट्रांतले लक्षावधि शेतकरी येथें आलेले आहेत. ज्यांना लिहितां येत नाहीं, ज्यांना वाचतां येत नाहीं, त्यांनीं ज्ञानोबाच्या नांवाचा गजर महाराष्ट्रांत जिवंत ठेवलेला आहे. विद्वानांची ती पेठ आहे. विद्येचें तें पीठ आहे. पण त्यांपैकीं एखादा दुसऱ्या 'विद्वानाला' तरी ज्ञानोबाची आज आठवण असेल कीं नाहीं ह्याची शंका आहे. उलट ते तिकडे वाद घालीत असतील—ज्ञानेश्वर एक आहेत कीं दोन आहेत. गाडगेबाबा आज मला येथें घेऊन आले. म्हणून हा सोहळा पाहण्याचें भाग्य मला लाभलें. ज्ञानोबापासून तो गाडगेबाबांपर्यंत सर्व संतांचें म्हणणें एक आहे. देव हा देवळांत नाहीं, दगडांत नाहीं, माणसांत आहे. ज्ञानोबांनीं सांगितलें.

**जें जें भेटे भूत । तें तें मानिजे भगवंत**

पण दुर्दैवाची गोष्ट ही आहे कीं माणसांतला परमेश्वर लोकांना दिसत नाहीं. त्यांना दगडांतला परमेश्वर दिसतो. त्यामुळें ह्या जगाचा अधःपात झालेला आहे. माणसांची उपेक्षा आणि दगडाधोंड्यांची पूजा हा ह्या जगाचा धर्म होऊन बसलेला आहे. दगडधोंड्यांत आणि तीर्थांत काय आहे ?

**तीर्थीं धोंडा पाणी । देव रोकडा सज्जनीं**

लोकांना खायला नाहीं; आणि दगडाधोंड्याच्या देवापुढें अन्नाच्या राशी ओतल्या जात आहेत. लोकांजवळ पैसा नाहीं; पण देवाच्या समोर मात्र दक्षिणेचे ढीग पडत आहेत. ही देवाची आणि धर्माची विटंबना होय.

**भूतांची दया हें भांडवल संतां । आपुली ममता नाहीं देहीं**

प्राणिमात्रावर दया करणें हाच खरा धर्म !

**तुका म्हणे सुख पराचिया सुखें**

"दुसऱ्याच्या दुःखानें ज्यांच्या हृदयाला यातना होतात, ज्यांच्या डोळ्यांना अश्रूंचे पाझर वाहतात, आणि दुसऱ्यांना सुखी करण्यांतच ज्यांना परमसुखाची प्राप्ति होते ते खरे संत, ते खरे साधु आणि तेच 'भगवंताची मूर्ति'. संतांनीं लोकांचीं दुःखें दूर करावीं आणि त्यांना सुखी करावें, आणि इतरांनीं मात्र स्वस्थ बसावें, असें थोडेंच आहे? संतांचा मार्ग हा सर्वांचाच मार्ग आहे. आज जे राज्य करताहेत त्यांचा सुद्धां तोच मार्ग आहे. स्वातंत्र्य मिळून आज सहासात वर्षें झालीं. पण लोक सुखी नाहींत. उलट लोकांचें दुःख दिवसेंदिवस वाढतच आहे. अज्ञान, दारिद्र्य आणि दुष्काळ ह्यांनीं स्वातंत्र्याचें वाटोळें केलें आहे. देशांतील लक्षावधि अडाणी आणि गरीब जनतेबद्दल आजच्या राज्यकर्त्यांना यत्किंचित्‌हि 'दया' वाटत नाहीं. संतांनीं समतेचा आणि ममतेचा मार्ग सांगितला. पण त्या मार्गावर आजच्या राज्यकर्त्यांचा विश्वास नाहीं. सर्व तऱ्हेच्या विषमतेनें आजचा समाज हैराण होऊन गेला आहे. कोणालाहि कोणाबद्दल प्रेम वाटेनासें झालें आहे. अशा परिस्थितींत संतांनीं सांगितलेल्या मार्गानें जाण्याखेरीज दुसरा काय उपाय आहे? आजच सकाळीं गाडगेबाबा मला म्हणाले, 'हा हिंदुस्थान देश फक्त साधूंच्या पुढें वाकतो, इतरांच्या पुढें नाहीं.' बाबांचें म्हणणें खरें आहे. वीरांना, विद्वानांना आणि मुत्सद्द्यांना हा देश मान देत असेल. पण तो आपलें डोकें ठेवतो फक्त साधूंच्या आणि संतांच्याच पायावर. ह्याचा अर्थच हा कीं ह्या देशांत क्रांति घडवून आणण्याचें जर कोणांत खरोखर सामर्थ्य असेल तर तें साधूंत आणि संतांमध्यें. ह्या देशांतील एक प्रचंड क्रांति महात्मा गांधींनीं घडवून आणली. आतां उरलेली क्रांति घडवून आणण्याचें कार्यसुद्धां तशाच योग्यतेचा कोणीतरी साधुपुरुष करूं शकेल! विनोबा आणि गाडगेबाबा तेंच समतेचें क्रांतिकार्य ममतेच्या मार्गानें घडवून आणण्याचा आज प्रयत्न करीत आहेत. त्यांच्याच मागून जाण्यांत आपणा सर्वांचें कल्याण आहे!"

त्यानंतर गाडगेबाबा कीर्तनाला उभे राहिले. ते म्हणाले, "परदेशांतून ह्या देशांत मारवाडी आले, गुजराती आले. कोंकणांतून ब्राह्मण घाटावर आले. त्यांनीं बरोबर कांहीं आणलें नाहीं—फक्त बुद्धि आणि वक्तृत्व. पण त्या दोन गोष्टींच्या जोरावर त्यांनीं लाखों रुपये मिळविले. पैशाचा चिखल केला. ब्राह्मणांनीं विद्या मिळविली, अधिकार मिळवले. अन् तुम्ही आहांत तेथेंच आहांत! एखाद्या शेटजीकडे रुपयाची मोड मागायला जा. तो म्हणेल, 'मजजवळ मोड

नाहीं. शंभर शंभर रुपयाच्या नोटा आहेत. सो सो रुपयेकी एकेक नोट!' त्यानंतर तुम्ही एखाद्या पवाराकडे किंवा जाधवाकडे जा अन् विचारा, 'पावलीची मोड देतोस का?' तो म्हणेल, 'आतां नाहीं. उद्यां या!' अरे अरे, काय ही तुमची स्थिति! असा तुमचा खाणाखराब कां झाला? असे तुम्ही दरिद्रीनारायण कां झालेत? ह्याचें कारण एकहि विद्या तुमच्याजवळ नाहीं. विद्या नाहीं तो खटाऱ्याचा बैल. तुम्हांला विद्या माहीत नाहीं. देव माल्रुम नाहीं. तुम्ही बनलांत कसाबाचे गुरु. तुम्ही बैल कसाबांना विकतां ना? गाया कसाबांना विकतां ना?

**गाय कसाबासी देती । त्यांच्या संसाराची माती!**

तुमचें शेत पेरणारा तो बैल! त्याचा तुम्ही किती छळ करतां रे! त्याला वेसण काय घालतां, बडवून नपुंसक काय करतां, अर्ध्यापोटीं ठेवून त्याला उन्हांत अन् थंडींत काय कामें करायला लावतां, त्याच्या पाठीवर अन् डोक्यावर आसुडाचे सपाटे काय मारतां! अन् शेवटीं तो म्हातारा झाला म्हणजे त्याला कसाबाला विकून टाकतां! अरे, अरे, अरे, केवढी मोठी पापाची पाटी शेतकऱ्याच्या डोक्यावर आहे! बैल नसला तर शेतकऱ्याला अठरा धान्यें कशीं पिकवतां येणार? जो शेतकरी दयाळू असेल त्यानें आपल्या बैलाला शिरापुरी खायला द्यावयाला पाहिजे. लग्नाच्या समारंभांत पाहुण्यांना तुपांत पक्वान्नें तळून वाढतां ना? आग्रह करकरून करकरून त्याला पोटभर खाऊं घालतां ना? अन् मग बैलाचा कां असा छळ करतां बरें! त्यामुळें तुम्हां मराठ्यांचें कधीं कल्याण होणार नाहीं.

**गोपाला गोपाला । देवकीनंदन गोपाला**

"लोक म्हणतात, चला काशीला, चला जगन्नाथाला, चला रामेश्वराला. तीर्थाच्या ठिकाणीं पुण्य भेटतें, गंगेंत स्नान केल्यानें पाप जातें, अशी सर्वांची समजूत आहे. काय सांगावें अशा लोकांना? गंगेंत स्नान केलें तर माणूस फार झालें तर स्वच्छ होईल. पण त्याचें पाप कसें जाईल? शिक्षा भोगली तरच पाप जातें. गंगेंत सारख्या बुड्या मारीत बसाल, तर आजारी पडाल, हिंवताप येईल, अन् शेवटीं तुमचा जीव जाईल. पण तुमचें पाप मात्र कदापि जाणार नाहीं. कुठेंहि मग जा— काशीला जा, गयेला जा, नाहींतर प्रयागाला जा. तीर्थ म्हणजे नदीचें पाणी आणि दगडाचा देव.

तीर्थक्षेत्रा गेले । दाढीमिशी बोडुनि आले
पाप तसेंच राहिलें । दाढीमिशीनें काय केलें ?

तीर्थाला जाऊन दाढीमिशी तेवढी बोडून याल! पण तुमचें पाप मात्र आहे तसेंच शिल्लक राहील. तीर्थक्षेत्राला जाणें हा धर्म नव्हे. कबीरानें म्हटलें आहे, 'सबसे बडी दया!' दया हा सर्वांत मोठा धर्म आहे. बैलाच्या श्रमावर अन गाईच्या दुधावर शेतकरी जगतो. त्या बैलाला अन् गाईला कसाबाला विकणाऱ्या शेतकऱ्यांच्या तोंडांत तापलेलें डांबर पडेल.

"मघाशीं अत्रेसाहेब म्हणाले कीं, मी गरीबाचा वाली आहें. मला हसूं येतें. तुम्ही गरीब! अरे तुम्ही कसले गरीब? कोंबड्या, बकरीं, पक्षी, मासे हे खरे गरीब! त्या गरीबांचा कोण वाली आहे? तुमच्या पोटात दया नाहीं, पाप आहे. तुम्ही रे कसले गरीब? घरांत बकरें पाळतां. त्याला चारा देतां कीं नाहीं? पाणी पाजतां कीं नाहीं? हरवलें तर त्याला शोधून आणतां कीं नाहीं? पावसानें भिजत असलें तर त्याला पांघरूण घालतां कीं नाहीं? अगदीं स्वतःच्या मुलासारखें त्या बकऱ्याला संभाळतां? अन् एक दिवस मात्र त्याचा गळा चरचर कापून टाकतां! तुमच्या पिढ्यान्‌पिढ्या मरतील. तुमचें कधीं कल्याण होणार नाहीं पक्के समजून असा!

गोपाला गोपाला । देवकीनंदन गोपाला

"भांडवलवाले सावकार माणसाला लुटतात खरे, पण तुम्ही डोळे मिटून त्यांच्या कचाट्यांत जातां तेव्हां. तुम्ही सावध राहिलांत तर तुम्हांला कोण लुटील? तुम्ही सावकारावर फिर्याद करूं शकतां. पण जनावरांचें तसें नाहीं. तुम्हीं बकऱ्याचा पाय तोडलात तर त्यानें कोणाकडे फिर्याद करावी? त्याला बोलतांहि येत नाहीं. त्याची फिर्याद कोण ऐकणार? तुम्ही हरिण खातां, सशाला मारतां, घोरपडीचा निकाल लावतां, कोंबड्या कापतां, मासे तळतां, झिंगे खातां, खातां कीं नाहीं? (सारे 'हो' म्हणतात.) हो म्हणायला तुम्हांला लाजहि वाटत नाहीं? दुसऱ्याला कापून खाण्यापेक्षां जगांत अधिक कोणतें पाप आहे? आळंदी, पंढरपूर, काशी, बद्रीनाथ ह्या क्षेत्राला जाण्यामध्यें पुण्य नाहीं. दुसऱ्याच्या जीवनाचें रक्षण करणें हें सर्वांत मोठें पुण्य! तुम्ही म्हणाल, कसाब जनावरें कापतो, अन् आम्ही तीं खातां. पण कापतो तोहि कसाब अन् खातो तोहि कसाबच. इथें आळंदीला

येऊन तुम्ही 'ग्यानबातुकारामा'च्या नांवाचा गजर करतां अन् घरीं जाऊन कोंबड्या खातां. तुम्हांला लाज कशी वाटत नाहीं! दगडाला देव समजून तुम्ही त्याची पूजा करतां. तुमचें कसें कल्याण होईल?

"त्या मारवाड्याच्या घरांत जा. त्याच्या बायकोच्या लहंग्यानीं पेट्या भरलेल्या आहेत. तिच्या अंगावर पायापासून डोक्यापर्यंत हिऱ्याचे अन् सोन्याचे दागिने लादले आहेत. रोज तुपांतल्या पुऱ्या करून ते खातात. आतां तुमच्या बायका बघा. अंगावर ना धड वस्त्र ना धड फुटका मणि. अन् दिसतात कशा? तर जशा मातीमधून उकरून काढल्या आहेत. बकऱ्यांच्या पोरांना कापून जे खातात, त्यांची अशी दशा होते. मारवाड्याचें तोंड कसें असतें? लालभडक! नाहीं तर तुमचीं तोंडें बघा. कशीं दिसतात? तर भाजलेल्या मिरच्यांसारखीं. मारवाडी प्राण गेला तरी मांस किंवा हाड तोंडांत टाकणार नाहीं. अन् तुमच्यापुढं बासुंदी, श्रीखंड आणून ठेवलें तरी तुमचें लक्ष बोंबलावर!

**श्वानासि दिलें पक्वान्न भोजन । परी त्याचें मन हाडावरी!**

तशी तुमची स्थिति आहे. तुमच्या घरीं तुमचा बाप मेला. त्याला तुम्हीं नदीवर जाळून आलांत. त्याचीं हाडें नि राख नदीच्या पाण्यांत टाकलीत. अन् मग बापाच्या नांवानें त्या भटजीला हो पलंग कशाला देतां? त्या पलंगावर काय तुमचा बाप येऊन निजणार आहे? तुमच्या बापाची राख जाऊन पडली नदींत. अन् तुम्हीं दिलेल्या पलंगावर पाय ताणून डाराडूर झोपतो आहे तो भटजी अन् त्याची बायको.

"एक गोष्ट सांगतों. एकदां एक बोका होता. तो उंदीर खाऊन माजला होता. पुढें आला दुष्काळ. शेतांत धान्य दिसेना. मग उंदीर कोठून सांपडणार? तेव्हां उंदीर पकडण्याची बोक्यानें युक्ति काढली. त्यानें साधूची दीक्षा घेतली. तो डोळे अन् तोंड मिटून रस्त्याच्या कडेला अगदीं गपचिप बसे. त्यामुळें उंदरांत जिकडे तिकडे कुजबूज उठली कीं बोका साधु झाला. रोज निरनिराळ्या बातम्या उठूं लागल्या. बोका आज पंढरपूरला गेला. बोक्यानें आज तमक्या ठिकाणीं धर्मावर लेक्चर दिलें. एक दिवस बोक्याचें कीर्तन आहे असें जाहीर झालें. सारे उंदीर म्हणाले, 'आपण कीर्तनाला जाऊं!' एक म्हातारा उंदीर होता. तो म्हणाला, 'तुम्ही कोणी नका येऊं. मी आज बघून येतो.'

बोक्याला वाटलें कीं कीर्तनाला सारे उंदीर येतील. पग कोणी आले नाहींत. फक्त हा म्हातारा उंदीर आला. पग तो लांब अंतरावर एका बिळाच्या तोंडांत बसला. बोका म्हणाला, 'अरे तिकडे काय बसलाहेस? इकडे ये.' उंदीर म्हणाला, 'नको. मी इथूनच कीर्तन ऐकतों.' अशी त्या म्हाताऱ्या उंदरानें त्या बोक्याची फजीति केली. समाजांत असे अनेक बोके आहेत. त्यांच्यापासून आपग आपलें शहाणपणानें रक्षग केलें पाहिजे.

"घरट्यांत पाखरांचीं पिलें असतात. त्यांना दगड मारला तर पाखरूं का तुमच्यावर फिर्याद् करणार आहे? पाळण्यांतल्या तुमच्या पोराचा मीं पाय कापला तर! तर सारें गांव माझ्या अंगावर धावेल अन् धोपटून धोपटून मला ठार मारील! लहानपणीं आम्हांला आमच्या वडिलांनीं शिकवलें नाहीं. त्यामुळें आमची ही दशा झाली. तुकोबांच्यामुळें आम्हांला तोंड उघडतां आलें. अन् कीर्तन करण्याची अक्कल आली. तुम्ही आपल्या पोरांना शिकवा बरें! नाहीं तर बूटपालिश करीत रस्तोरस्तीं हिंडावें लागेल. डॉक्टर आंबेडकर यांच्याकडे पाहा. म्हणजे विद्येचें फळ काय मिळतें हें तुम्हांला कळेल. त्यांच्या पूर्वजांच्या हातांत झाडू न् खराटा होता. आंबेडकर शिकले. सर्व डिगऱ्या त्यांनीं मिळविल्या. अन् झाडूवाल्याच्या कुळांतला मुलगा देशाचा कायदेमंत्री झाला. शेतकरी हा शेताचा मालक. सर्व धान्याचा तो धनी. पण विद्या नसल्यामुळें त्याची आज काय स्थिति झाली आहे!

**अठरा धान्यें ज्याच्या घरीं। कळण्या कोंड्यानें पोट भरी!**

माळी, मराठे, कुणबी ह्यांच्या घरांत पिठल्याला तेल मिळायचें नाहीं. नुसतें पांढरेंफटक. मारवाडी, ब्राह्मण, गुजराती रात्रीचें अन्न दिवसा खात नाहींत. अन् तुम्ही तीन-तीन चार-चार दिवसांचें शिळें अन्न खातां. ह्याचें कारण तुम्ही सगासमारंभाला वाटेल तसा पैसा खर्च करतां. अन् त्यासाठीं सावकाराचें कर्ज काढतां. म्हणून मी सांगतों कीं, भरल्या दिवाळीच्या दिवशीं फाटकें नेसा पण कर्ज काढून कोरे कपडे अंगावर घालूं नका. चटणीभाकर खा, पण कर्ज काढून लाडू-करंज्या खाऊं नका. कर्ज काढून लग्न करूं नका. कर्ज काढून घर बांधूं नका. कर्ज काढून जमीन घेऊं नका. कर्ज काढून तीर्थाला जाऊं नका. सग्यासोयऱ्यांना काहीं देऊं नका. कर्जापेक्षां मरण बरें. कर्ज आहे त्याचा संसार नकटा. ज्याला

कर्ज नाहीं तो पडक्या घरांत राहात असला तरी सर्व हिंदुस्थानचा बादशहा आहे !

**तुका म्हणे झालें कोंबड्याचे परी । पुढेंच उकरी लाभ नाहीं**

"म्हसोबाची अन् मरीआईची पूजा करतां. मारवाडी लोक तुमच्या देवाला धुल्या हातांनीं सुद्धां नमस्कार करीत नाहींत. गांवांतलीं कुत्रीं तुमच्या देवावर रोजरोस तंगड्या वर करून मुततात. अशा दगडाधोंड्याच्या नादीं लागूं नका. त्याला बळी देऊं नका. त्याला नवस करूं नका. बोला,—

**गोपाला गोपाला । देवकीनंदन गोपाला "**

बाबांचें कीर्तन केव्हां संपलें तें कळलेंच नाहीं. श्रोते डोक्यावर हात उभारून टाळ्या वाजवण्यांत अन् भजन करण्यांत तल्लीन झाले होते. इतक्यांत पटकन् बाबा खालीं बसले. अन् कुठें बेपत्ता झाले. बाबांच्या कांहीं शिष्यांनीं त्यानंतर 'पुराव' दिलें. अर्धा तासानंतर तोहि कार्यक्रम संपला. रात्रींचा एकचा सुमार होता. इंद्रायणीच्या काठावर थंडीचा कोण कडाका पडला होता ! हजारों शेतकरी स्त्रीपुरुष श्रोते अंधारांत बसल्याच जागीं कलंडले अन् झोपीं गेले. त्यामध्येंच कुठेंतरी बाबा गुपचुप जाऊन झोपले. त्यांना कुठें शोधीत बसायचें? म्हणून अंधारांत झोपीं गेलेल्या प्रचंड जनसमुदायास नमस्कार करून मी पुण्याकडे परतलों.

# वारली मुलुखामधली मुशाफरी : १ :

वारल्यांचा प्रश्न महाराष्ट्राच्या वेशीवर टांगण्यासाठीं 'वारली विशेषांक' प्रसिद्ध केल्यानंतर मग वारल्यांच्या मुलुखांत फेरफटका मारून येण्याची 'नवयुग'च्या संपादकाला इच्छा व्हावी ही एक विनोदीच घटना म्हटली पाहिजे. पण झालें खरं तसें! वारली अंक प्रसिद्ध केल्यापासून कित्येक दिवस डोक्यांत वारल्यांखेरीज दुसरा विषयच नव्हता. वारली अंक वाचून आमच्या 'नवयुग'च्या वाचकांना काय बोध झाला असेल तो असो, पण व्यक्तिशः मला मात्र तो अंक प्रसिद्ध करून अतिशयच बोध झाला. बुद्धीला आणि भावनांना नवीनच जागृति मिळाली. आणि वारल्यांच्या जीवनाची आणि प्रश्नाची अधिक जवळून ओळख करून घ्यावी अशी मनामध्यें तहान उत्पन्न झाली. ज्या वातावरणांत आणि परिस्थितींत लक्षावधि वारली लोक आपलें जनावराचें जिणें पिढ्यान्‌पिढ्या कंठीत आहेत, तें वातावरण आणि ती परिस्थिति समक्ष पाहून आल्यावांचून त्यांच्या प्रश्नाकडे बघण्याचा अचूक दृष्टिकोन आपल्याला यावयाचा नाहीं, ही मला विचार करतां करतां जाणीव झाली, आणि सवड मिळतांच वारली प्रदेशामधून एक फेरफटका मारून आलें पाहिजे, असें मीं स्वतःशीं ठरविलें. 'नवयुग'च्या वारली अंकामध्यें वारली जीवनावरचा ज्यांचा प्रदीर्घ विवेचनात्मक लेख वाचकांना अतिशय आवडला, ते

 २०८०६ 293 ग्रं. ५५५५१ २०/७२५

आमचे प्रतिनिधि 'त्रिविक्रम' हे वारली मुलुखांत महिनेच्या महिने राहून आलेले होते. त्यांना तिकडच्या विभागाची अगदीं खडान् खडा माहिती होती. म्हणून एके दिवशीं माझ्या मनांतला हा हेतु मीं त्यांच्यापाशीं उघड केला. त्यांना ती कल्पना फारच आवडली. ते म्हणाले, "मी करतों तुमच्या ह्या मुशाफरीची सर्व व्यवस्था." दोन-चार दिवसांच्या आंत सर्व 'बंदोबस्त' करून ते माझ्याकडे आले. आणि विचारू लागले, "बोला! कधीं निघतां?" मी म्हणालों, "गुढीपाडवा होऊं द्या. मग निघूं!" त्याप्रमाणें पंचवीस मार्च या दिवशीं, मंगळवारीं सकाळीं निघण्याचें आम्हीं मुक्रर केलें. आमच्या त्रिविक्रमांना वारली मुलुखांत पुन्हां फेरफटका मारण्याबाबत इतका उत्साह कां वाटत होता त्याचें कारण आम्हांला पुढें कळलें. त्यांच्या पत्नी बोर्डी येथें राहात असतात. तेव्हां आमच्या कामांत त्यांचेंहि काम अनायासें होणार होतें.

चित्रपटाच्या कामासाठीं मीं मुद्दाम 'स्टेशन वॅगन' मोटार बांधवून घेतलेली आहे. तिच्यामधूनच सारा प्रवास करण्याचें मीं ठरविलें. ह्या मोटारींत ड्रायव्हर-खेरीज आठ-नऊ माणसें बसूं शकतात. तथापि इतका लांबचा प्रवास करायचा म्हणजे तो अगदीं आरामांत व्हावयाला पाहिजे, म्हणून मोटारींत विनाकारण गर्दी न होईल इतकींच माणसें घेण्याचें मीं ठरविलें. मुंबईचे सुप्रसिद्ध समाजवादी कार्यकर्ते श्री. भाऊसाहेब नेवाळकर आणि प्रा. अनंत काणेकर यांचीं नांवें तर पहिल्यापासून माझ्या यादींत होतींच. नेवाळकर म्हणाले, "आपल्याबरोबर त्या जिल्ह्यांतला एखादा जबाबदार आणि जाणता कार्यकर्ता आपण घ्यावयाला पाहिजे!" आणि आमचें नशीब असें कीं, आधल्या दिवशीं ठाणें जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री. शामराव पाटील हे मुंबईला आले होते त्यांनीं आमच्या या मुशाफरींत सामील होण्याचें मोठ्या आनंदानें कबूल केलें. शामराव पाटील हे एक हसतमुख, आनंदी आणि उत्साही कॉंग्रेस-कार्यकर्ते आहेत. नम्रता आणि सौजन्य हे गुण त्यांच्या नखशिखांत भरलेले आहेत. म्हणून कॉंग्रेसमधल्या सर्व मतांच्या माणसांना ते हवेसे वाटतात. महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस कमिटीनें वारली प्रश्नाचा विचार करण्यासाठीं जी समिति नेमली होती, त्या समितीचे ते एक सभासद होतेच. वारली प्रश्नांचा त्यांचा व्यासंग अनेक वर्षांचा आहे आणि वारली भाषा ते उत्तम तऱ्हेनें बोलूं शकतात. म्हणून आमच्या मुशाफरीचें अनौपचारिक नेतृत्व स्वीकारण्याचें जेव्हां त्यांनीं कबूल केलें तेव्हां आमच्या आनंदाला पारावारच उरला

नाहीं. कमींत कमी तीन पूर्ण दिवस तरी वारली विभागांत काढावयाचे, असें आम्हीं ठरविलें. म्हणून या तीन दिवसांत खाण्याची व्यवस्था काय करावयाची हा एक मोठा प्रश्न आमच्यापुढें उभा राहिला. ' त्रिविक्रम हे महायुद्धांत ब्रह्मदेशाच्या आघाडीवर चार-पांच वर्षें लढून आलेले होते. लष्करांतल्या सैनिकांना न्याहारीच्या आणि जेवणाच्या छोट्या छोट्या पेट्या पुरवितात. ह्या हल्लीं मुंबई मधल्या इराण्यांच्या दुकानांत विकत मिळतात. प्रत्येक पेटीची किंमत बारा ते चौदा आणे असते. ह्या पेट्या म्हणजे प्रवासी लोकांना महायुद्धानें मिळवून दिलेल्या अद्भुत देणग्याच होत! ह्या पेटींत काय असतें हें विचारण्यापेक्षां, काय नसतें हेंच विचारण्यासारखें आहे! साखर, मीठ, चॉकोलेट, कॉफी, सूप, अंडीं, मांस, सिगरेट, टॉयलेट पेपर, जेवढें म्हणून कांहीं आपल्याला पाहिजे असेल तेवढें ह्या पेट्यांत मोठ्या आटोपशीर बंदोबस्तानें भरलेलें असतें. त्रिविक्रमांच्या मागण्यावरून आम्हीं अशा बारा-पंधरा पेट्या खरेदी केल्या. त्याखेरीज फळांचा एक मोठा करंडा, चीज, लोणी, बिस्किटें, साखर इत्यादि गोष्टींचाहि भरपूर सांठा गाडींत भरून घेतला.

अशा तऱ्हेनें सायसंगीन तयारी करून मंगळवारीं सकाळीं सात-साडेसातच्या सुमारास आम्हीं मुंबईहून आमची मोटार काढली. पहाटेस लौकर उठून, थंड पाण्यानें आंघोळी करून आणि व्यवस्थित कपडे घालून सकाळीं उजाडतां उजाडतां उत्तमशा मोटारींमधून प्रवासाला निघण्यासारखा आनंद नसेल. तशा आल्हाद-दायक मनःस्थितींत आमच्या प्रवासाला सुरुवात झाली. त्या दिवशींचीं सर्व वर्तमानपत्रें आम्हीं बरोबर घेतलीं होतीं, पण आमच्या राजकीय गप्पांना एवढा रंग चढला कीं त्या नादांत वर्तमानपत्रांमधले ठोकळ मथळे वरवर चाळण्यापलीकडे त्यामधला इतर मजकूर वाचण्याची कोणालाहि आठवण राहिली नाहीं. काणेकर म्हणाले, "ध्येयवादापासून समाजवाद पारखा होत चालला आहे, हें कांहीं मला बरें लक्षण दिसत नाहीं. जो तो आपला पगार वाढवून घेण्यासाठीं संपावर जातो आहे. सबंध समाजाच्या मानानें कामगार वर्ग कितीतरी अल्प आहे. पण कामगार वर्गाचें हित म्हणजेच समाजाचें हित अशी कम्युनिस्टांनीं समाजाची समजूत करून दिली आहे. समाजाच्या हिताकडे अजिबात दुर्लक्ष करून केवळ स्वार्थी दृष्टीनें कामगार लोक आपल्या प्रश्नाचा विचार करीत गेल्यास त्यांत समाजाला फार धोका आहे!" काणेकरांचा मुद्दा अतिशय महत्त्वाचा आणि विचार करण्यासारखा होता.

त्यावर चर्चा सुरू झाली. मैलमागून मैल जात होते. झाडें आणि डोंगर भरभर मागें पळत होतीं. ठाणें ओलांडून आम्ही भिवंडीपर्यंत येऊन पोहोंचलों होतों. भिवंडीमधून जात असतांना नेवाळकर म्हणाले, "ह्या भिवंडीमध्यें मी दोन वर्षे राहत होतों. पुष्कळ लोक मला भिवंडीचाच रहिवासी समजतात."

मुंबईपासून भिवंडीपर्यंतचा रस्ता डांबरी आहे. पण तो रस्ता संपतांच साधा खडीचा रस्ता सुरू होतो. ह्या रस्त्यावर इतकी धूळ उडत असते कीं कांहीं विचारूं नका. वाड्याला येईपर्यंत आमच्या अंगावर धुळीचीं इतकीं पुटें चढलीं कीं एकमेकांना बघून आम्हांला हसूं येऊं लागलें. मी म्हणालों, "वारली मुलखांत प्रवेश करावयाला आतां आपण अगदीं लायक झालों आहोंत! आपल्याला बघून निदान वारली आतां बुजणार नाहींत. त्यांना आपल्याविषयीं कांहीं तरी आपलेपणा वाटेल!" सगळ्यांपेक्षां काणेकरांच्या डोक्यांत खूपच धूळ शिरली. त्यांच्या पापण्यादेखील धुळीनें माखून गेल्या. त्यामुळें ते फारच अस्वस्थ झाल्यासारखे दिसले. वाडें ओलांडल्यानंतर भोवतालच्या वनप्रदेशांत एकदम बदल होत असल्याची आम्हांला जाणीव झाली. सागाचें जंगल आतां सुरू झालें होतें. रस्त्याच्या दोन्ही बाजूंला सागाचे उंचच्या उंच सोट दिसूं लागले. मैलच्या मैल हीं झाडें एकसारखीं उगवलेलीं दिसत होतीं. सागाच्या जंगलांत आणि इतर जंगलांत एक मोठा फरक आम्हांला आढळून आला. तो हा कीं इतर जंगलांमधल्या झाडांचा, झुडपांचा आणि वेलींचा दाट गुंतवळा ह्या सागाच्या जंगलांत नसतो. त्यामुळें इतर जंगलें जशीं निबिड, घनदाट आणि भयाण दिसतात तशीं सागाचीं जंगलें दिसत नाहींत. तीं जवळ जवळ पारदर्शकच असतात, असें म्हणावयास हरकत नाहीं. परस्परांशीं आपला कांहींएक संबंध नाहीं अशा अलग-पणानें प्रत्येक झाड एकमेकापासून बऱ्याच अंतराअंतरावर उभें असतें. त्यामुळें सागाचें जंगल स्वच्छ आणि मोकळें मोकळें दिसतें. मात्र त्याबरोबर हेंहि कबूल करायला हवें कीं इतर जंगलांप्रमाणें सागाचें जंगल हें हिरवें आणि ताजेंतवानें भासत नाहीं. ज्या जंगलामधून आम्ही जात होतों त्याच्यावर औदासीन्याची मलिन कळा पसरलेली मला दिसत होती. झाडांचीं पानें धुळकट, पिवळीं आणि जून झालेलीं होतीं. जणुं कांहीं आज ना उद्यां आपण कापले जाणार ह्याची त्या झाडांना जाणीव झालेली असल्यामुळें 'त्या क्षणा'ला तोंड देण्यासाठीं एव्हांपासूनच तीं झाडें आपल्या मनाची तयारी करून बसलेलीं होतीं.

धुळीच्या त्रासामध्यें हळूहळू उन्हाची भर पडूं लागली. रस्ते लांबच लांब, ओसाड आणि भकास होते. मैलच्या मैल वाटेंत चिटपाखरूं दिसत नव्हतं. तारेचे नवीन खांब रस्त्याच्या कडेनें रोवण्याचें काम ठिकठिकाणीं चालू होतें. तेवढीं माणसें अधूनमधून दिसत होतीं इतकेंच काय तें. मोटारीमधली आमची चर्चा थांबली होती. बेचाळीसच्या आंदोलनांतल्या भूमिगत चळवळीमधले आपले रोमांचकारक अनुभव सांगावयाला नेवाळकरांनीं सुरुवात केली. त्यामुळें कांहीं काळ तरी आम्ही बाहेरचें कंटाळवाणें वातावरण अजिबात विसरून गेलों. पोलिसांना चकविण्यासाठीं आपल्याला काय काय युक्त्याप्रयुक्त्या कराव्या लागल्या ह्याची त्यांनीं जी रसभरित हकीकत सांगितली ती जितकी मनोरंजक तितकीच भावनाप्रक्षोभक होती! ह्या त्यांच्या निवेदनाच्या ओघांत आम्ही मनोरच्या हद्दींत केव्हां येऊन पोहोंचलों तें आम्हांला कळलेंच नाहीं.

मनोर हें मुंबईहून सुमारें ऐशीं मैल अंतरावर असून वैतरणा नदीवर वसलेलें आहे. जंगलामधून तोडलेलें लाकूड येथून बाहेर रवाना होतें. म्हणून व्यापारी दृष्ट्या हें छोटें बंदर महत्त्वाचें आहे. ह्या गांवांत 'आदिवासी सेवा मंडळा'नें एक वसतिगृह चालविलेलें आहे. म्हणून तें वसतिगृह पाहण्यासाठीं आम्ही गांवांत शिरलों. 'वसतिगृह' ऐन रस्त्यावर एका माडीवर आहे. आमची मोटार थांबली तेव्हां पुष्कळशीं मुलें माडीच्या ग्यालरींतच उभीं होतीं. आम्ही वर जातांच वसतिगृहामधल्या एका कार्यकर्त्यानें आमचें स्वागत केलें. बाकीचे दोन प्रमुख कार्यकर्ते त्यावेळीं बाहेरगांवीं गेले होते. प्रथम आम्ही ज्या खोलींत शिरलों त्या खोलीच्या भिंतीवर अनेक तक्ते आणि सुभाषितें लावलेलीं आम्हांला दिसलीं. 'जंगल जागें झालें आहे!'; 'सावकारी पिळवणुकीविरुद्ध एकजूट करा'; 'बांधलेले गडी राहूं नका'; 'ताडीदारूपासून दूर राहा' अशीं वचनें लावलेलीं बघून वर्गविग्रहाचा दृष्टिकोन 'आदिवासी मंडळा'च्याहि मनामध्यें असावा असें वाटलें.

थोड्या वेळानें पंचवीस-तीस मुलें शिक्षकांनीं त्या खोलींत जमविलीं आणि आम्हीं त्यांची चांचणी घेतली. त्या मुलांमध्यें जशीं कांहीं वारली मुलें होतीं, तशीं महादेव कोळी, मल्हार कोळी, कोकणे आणि कातकरी ह्या जातींचींहि मुलें होतीं. ह्या सर्वच जाती आदिवासी गणल्या जातात. सर्व मुलांचे पोषाख स्वच्छ खादीचे असून शरीरप्रकृतीनें तीं चांगलीं दिसलीं. तथापि त्यांचे चेहरे मात्र भावशून्य वाटले. कितीहि सोपे प्रश्न विचारले तरी त्याला उत्तर देण्याची त्यांना

उत्सुकता वाटलेली दिसली नाहीं. लहान मुलांत जो एक प्रकारचा चलाखपणा आणि चुणचुणीतपणा आढळून येतो तो त्यांच्यामध्यें आम्हांला कुठेंच दिसून आला नाहीं. 'तुमच्या भाषेमधलें एखादें गाणें म्हणून दाखवा बरें!' असें परोपरीनें त्यांना विनविलें, पण कोणीहि उठून उभें राहिलें नाहीं. शेवटीं जरा चिडून मी म्हणालों, "कांहीं गाणेंबिणें येतें कीं नाहीं तुम्हांला?" तेव्हां शिक्षकांनीं गाण्याची वही आणून माझ्या हातांत दिली. ह्यांत सेवादलाचीं अनेक राष्ट्रीय गाणीं लिहिलेलीं होतीं. त्यांपैकीं 'या गरिबांनो या, झेंडा हातीं घ्या, कॉंग्रेसची हाक तुम्हा हाय हो!' हें गाणें मीं त्यांना म्हणावयाला सांगतांच सगळ्या मुलांनीं एका सुरानें गावयाला प्रारंभ केला. अशा तऱ्हेनें दोन-तीन राष्ट्रीय गाणीं त्यांनीं म्हटलीं. सामान्य माहितीच्या दृष्टीनें आदिवासी मुलांची तयारी एकंदर कमीच वाटली. प्रचारकी दृष्टीनें त्यांना शिक्षण देण्यांत येत असावें असा निदान माझा तरी समज झाला.

मनोरहून आम्ही निघालों ते कासे ह्या गांवीं गेलों. बारा-साडेबारा वाजून गेले होते. पोटांत भूकहि चांगली लागली होती. म्हणून कासाला थोडासा मुक्काम करावयाचें ठरविलें. रस्त्यावर एका गुजराथ्याचें धान्याचें दुकान होतें. तेथें 'आदि-वासी सेवा मंडळा'चे श्री. वैद्य ह्या नांवाचे एक कार्यकर्ते भेटले. तेव्हां आम्हीं त्याच ठिकाणीं तळ दिला. बटाट्याची भाजी, पुऱ्या आणि फळें ह्यांचा फन्ना उडविल्यानंतर पोटभर गार पाणी प्यालों. त्यामुळें पुष्कळच हुशारी वाटली. मग वैद्यांना बरोबर घेऊन पुन्हा मागें फिरलों. वरोती येथें जंगलांचा कूप आणि कोळशाच्या भट्ट्या पाहावयाला मिळतील असें त्यांनीं सांगितलें. मुख्य रस्ता सोडून जंगलांत शिरलों. मोटार जाण्याएवढा रुंद आणि सपाट रस्ता 'कूपा'-पर्यंत गेला होता. 'कूप' म्हणजे काय हें आधीं समजून घेतलें पाहिजे. सागाच्या जंगलाचे तोडण्याचे दृष्टीनें जंगलखात्यानें विभाग केलेले आहेत. ह्या एका विभागाला 'कूप' असें म्हणतात. कूपाचें क्षेत्रफळ साधारणपणें चाळीस एकरांचें असतें. एका कूपांतल्या झाडांची चाळीस वर्षांमधून एकदांच तोड होत असते. कारण सागाचें झाड पूर्णपणें वाढावयाला चाळीस वर्षें लागतात. आम्ही ज्या कूपांत गेलों त्यामधलीं झाडें तोडण्याचें काम आधींच पुरें झालें होतें. त्यामुळें प्रत्यक्ष तोडीचें काम आम्हांला पाहावयाला सांपडलें नाहीं. कूपाचा सारा विस्तार दुपारच्या रखरखत्या उन्हांत विशेष भकास दिसत होता. लाकडांच्या वाहतुकीचें काम नुकतेंच सुरू झालें होतें.

कूपाच्या मध्यभागीं एक गवताची झोपडी होती. तिच्यांत एक मुसलमान पोट-कंत्राटदार राहात होता. त्याच्या टांग्याचीं दोन घोडीं झोपडीच्या दारापुढें एका मांडवाखालीं बांधलेलीं होतीं. त्या कंत्राटदारानें आमचें हसून स्वागत केलें आणि आम्हांला बसावयाला लाकडाचे कापलेले वाटोळे ओंडके दिले. त्यानें आम्हांला थंडगार पाणी आणि पानसुपारी दिली. "हं, काय इकडची दंगल बिंगल थांबली कीं नाहीं?" शामरावांनीं विचारलें.

"हो, जवळजवळ थांबल्यासारखीच आहे!" कंत्राटदार म्हणाला, "गेल्या आठवड्यापासून आतां कामें पूर्वीप्रमाणें सुरु झालीं आहेत."

कम्युनिस्टांच्या प्रेरणेनें अत्याचाराची मोहीम जेव्हां वारली मुलुखांत चालू होती, तेव्हां कूपाचीं सर्व कामें, भट्ट्या, लाकडाची वाहतूक ह्या सर्व गोष्टी कांहीं काळ तरी अजिबात थांबल्यासारख्या झाल्या होत्या. मीं विचारलें, "काय हो, या तुमच्या कूपावर हल्ला झाला होता का?"

कंत्राटदार किंचित् हसून म्हणाला, "हो! झाला होता तर! माझ्यावर नाहीं. माझ्या आधीं येथें एक पाटील नांवाचा कंत्राटदार होता. त्याच्यावर पांचपन्नास गुंडांनीं भर दुपारीं हल्ला केला. आणि त्याला बेहोष होईपर्यंत मारलें. परवांपरवां-पर्यंत तो माणूस इस्पितळांत पडून होता!"

"या दंगलीमुळें वारल्यांचें फारच नुकसान झालें असेल!" नेवाळकर उद्गारले.

"झालें तर!" कंत्राटदारानें उत्तर दिलें, "इतर नुकसान तर खूप झालें. पण वारली लोकांचा गाड्यांचा धंदा अजिबात बसला! एकंदर वारल्यांच्या सहा हजार गाड्या कामाला असतात. प्रत्येक गाडीला त्यांना दोन रुपये रोज ह्या हिशोबानें मजुरी मिळते. म्हणजे रोज अजमासें बारा हजार रुपयांचें त्यांचें नुकसान झालें!"

"पण आतां दंगा थांबला. आतां तर त्यांच्या गाड्यांना काम मिळूं लागेल ना!" मी म्हणालों.

"नाहीं ना! तेंच तर सांगतों आहें!" कंत्राटदार म्हणाला, "वारल्यांच्या गाड्या मिळेनात म्हणून आम्ही मोटारी वापरूं लागलों आणि तें आम्हांला जास्त सोयीचें पडूं लागलें. मोटारीनें लाकडाची वाहतूक अधिक जलद होते. आणि गाड्या-प्रमाणें मोटारी वाटेंत अडविल्या जाण्याचें भय मुळींच नसतें. सध्यां तर ह्या भागांत सारी वाहतूक मोटारीच करीत आहेत! एकतीस मार्चच्या आंत

तोडीचें आणि सफाईचें काम आम्हांला पुरें करावयाचें होतें. पण ह्या दंग्यामुळें ही तारीख एकतीस मे पर्यंत पुढें ढकलावी लागली."

"मग गाडीवाले वारली लोक ह्या कम्युनिस्टांच्या नांवानें आतां खूपच ठणाणा करीत असतील!" काणेकर म्हणाले.

"तर काय!" कंत्राटदाराचा एक माणूस म्हणाला, "गोदाराणीच्या नांवानें ते आतां अगदीं शंख करताहेत दोन्ही हातांनीं! आपल्या वारली भाषेंत म्हणतात, 'आथा कोठ गोदाराणी भुसळली?' (म्हणजे, आतां कुठें ही गोदाराणी मेली?)" तें वाक्य ऐकून आमची खूपच करमणूक झाली. आमच्या मुशाफरींत या वाक्यानें वारली भाषेशीं आमचा पहिला परिचय करून दिला. तें वाक्य पुन्हा पुन्हा उच्चारून अगदीं पोट दुखेपर्यंत आम्हीं हसून घेतलें?

नेवाळकरांनीं कंत्राटदाराला हळूंच विचारलें, "तुम्ही मजुरी काय देतां?"

कंत्राटदार थोडासा चपापल्यासारखा झाला. तो म्हणाला, "मजुरीचा दर ठरला आहे एक रुपया. पण आम्हांला प्रत्यक्ष द्यावा लागतो सव्वा रुपया!"

आम्ही बसलों होतों त्या झोपडीपासून तीन फर्लांगाचे अंतरावर कोळशाच्या भट्टीचें काम चालू होतें. तें पाहण्यासाठीं मग आम्ही उठलों. हें भट्टीचें काम कातकरी कुटुंबें करीत होतीं. हे कातकरी लोक तेथेंच लहान लहान खोपटीं बांधून राहात होते. हीं खोपटीं इतकीं लहान होतीं कीं, त्यांत दोन किंवा तीन माणसांना अगदीं दाटीवाटीनें फक्त बसतांच येईल! एका खोपटींत एक म्हातारी बाई स्वयंपाक करीत बसली होती. तिच्या शेजारीं दुसरी तरुण स्त्री तिला मदत करीत होती. आम्हांला पाहतांच ती म्हातारी स्त्री आमच्याकडे पाठ फिरवून बसली. म्हाताऱ्या बाईनें कमरेला एक पटकूर बांधलें होतें. तिच्या शरीराचा वरचा भाग उघडाच होता. दगडांच्या एका चुलीवर मडक्यामध्यें ती कालवण शिजवीत होती. त्या कालवणावर हळदीचा पिवळा तवंग खदखदत होता. "म्हातारे, काय शिजवते आहेस?" आम्हीं विचारलें. तेव्हां तिनें तें कालवण काडीनें ढवळून आम्हांला दाखविलें. त्यांत माशांचीं दहापांच डोकीं आणि रानांतून वेंचून आणलेलीं करवंदें आम्हांला दिसलीं. म्हातारीचें तें दारिद्र्य आम्हांला बघवेना. "हें कालवण खाणार कशाबरोबर ग?" असें आम्हीं विचारतांच तिनें तांबड्या लाल भाताच्या पेजेचें एक भांडें उघडें करून दाखविलें. तिथें एक मध्यम वयाचा कातकरी उभा होता. त्यानें रेशनिंगचें अन्न

त्या भागांत मिळण्याची आपल्याला कशी पंचाईत पडते ह्याचें हृदयद्रावक वर्णन करून सांगितलें. वास्तविक कूपामध्यें काम करणाऱ्या सर्व मजुरांची रेशनिंगची व्यवस्था तेथल्या कंत्राटदारानें करायला हवी. पण कंत्राटदार मजुरांच्या सुखसोयींकडे आपण होऊन कशाला लक्ष देईल ?

त्या कातकऱ्यांच्या पोटावर मोटमोठे काळे डाग दिसले. मीं विचारलें, "हें काय रे ?" तेव्हां तो म्हणाला, "गेल्या वर्षी पोटदुखी झाली म्हणून लोखंडाचा खिळा तापवून त्यानें पोटावर हे डाग दिले, तेव्हां पोट थांबलें !"

मी म्हणालों, "छान केलेंस, दुखणाऱ्या पोटाची चांगलीच खोडकी मोडलीस ! काय बिशाद् आहे आतां पोट दुखेल फिरून !"

शेजारीं एक दहाबारा वर्षांचा पोरगा उभा होता. त्याच्या सर्वांगाला खरूज झाली होती, त्यामुळें त्याचा चेहरा अतिशयच केविलवाणा दिसत होता. मोटा कातकरी म्हणाला, "पूर्वी इकडे अशी खरूज कोणालाच नव्हती. हल्लीं ही खरजेची साथ चहुंकडेच पसरलेली आहे !"

वाटेमधलीं हीं निरनिराळीं दृश्यें पाहात पाहात आम्ही कोळशाच्या भट्टीकडे गेलों. ही कोळशाची भट्टी आठ-दहा फूट उंच असून ती कोणाच्या आकाराची होती. तिचा आंस पंधरा फुटांचा असेल. कूपामधल्या ज्या झाडांचें लाकूड इमारतीच्या कामाचें नसेल तीं झाडें तोडून त्यांचे चार चार फुटाचे लहान लहान तुकडे करतात. आणि ह्या तुकड्यांची एक कोणाच्या आकाराची मोठी रास रचतात, त्यावर गवत पसरतात आणि वर मातीनें नीट लिंपून घेतलें जातें. अशा तऱ्हेनें ही कोळशाची भट्टी तयार होते. ह्या भट्टीच्या तळाशीं दोन तीन लहान तोंडें मोकळीं ठेवण्यांत येतात. त्यांमधून भट्टी पेटवली जाते.

आम्ही भट्टीच्या जवळ गेलों तेव्हां एक कातकरी तरुण हातांत लांब काठीचें फावडें धरून भट्टीमधून निघणारा धूर त्यावर माती घालून बुजवीत होता. भट्टीमधून कुठेंहि धूर बाहेर पडतां कामा नये, नाहींतर आंतील लाकडांना पुरेशी आंच मिळणार नाहीं; म्हणून भट्टी चालू असतां तिच्याभोवतीं रात्रंदिवस अशी देखरेख ठेवावी लागते. "आंतल्या लाकडाचा कोळसा तयार झाला हें तुम्हांला कसें समजतें ?" असें मीं त्या तरुण कातकऱ्याला विचारलें. तेव्हां त्यानें त्या भट्टीचा एक खचलेला भाग आम्हांला दाखविला. "भट्टी खालीं खचूं लागली कीं तिकडचा माल तयार झाला असें आम्हांला कळतें !" तो म्हणाला. एक भट्टी

पुरी व्हायला कमींत कमी पंधरा दिवस लागतात. कोळसा तयार झाल्यावर भट्टी उघडी करतात, आतील धुमसणारे कोळसे जमिनीवर ओढून पसरतात, आणि त्यांवर पाणी टाकून ते विझवून टाकतात. मग कोळशाचीं उंच उंच पोतीं भरून तीं गाड्यांमधून रवाना करण्यांत येतात. भट्टी बघून परत फिरतां फिरतां नेवाळकरांनीं कातकऱ्यापाशीं मजुरीच्या दराची हळूच चौकशी केली, तेव्हां आपल्याला आठ दिवसांचे सहा किंवा बारा दिवसांचे नऊ रुपये मिळतात असें त्यानें सांगितलें. म्हणजे त्या हिशेबानें त्यांना बारा आणेच रोज पडतो ! मग थोड्या वेळापूर्वी आपणाला सव्वा रुपया मजुरी द्यावी लागते हें जें त्या मुसलमान पोट-कंत्राटदारानें आम्हांला सांगितलें तीं निव्वळ थापच होती म्हणावयाची !

कूपामधून बाहेर पडतां पडतां दोन वाजावयाचा सुमार येऊन ठेपला होता. ह्या वेळीं उन्हाची रखरख अतिशयच वाढली होती. आम्ही बरोतीहून पुन्हा काशाला आलों आणि काशापासून पुढें दोन मैलांच्या अंतरावर असलेल्या चारोटी गांवापाशीं एका पाड्यासमोर येऊन थांबलों. वारली मुलुखांमध्यें अनेक पाडें मिळून एक गांव होतें. तुम्ही म्हणाल पाडा म्हणजे काय ? दोन-चार झोपड्यांच्या समूहाला पाडा म्हणतात. एका लहानशा गांवांत बऱ्याचशा अंतरा-अंतरावर पांच-दहा तरी पाडे आढळून येतात. ह्या पाड्यांमध्यें वारली लोक राहात असतात. आपल्याकडचें गांव जसें एकजिनसी आणि सलग असतें आणि घराला घरें लागलेलीं असतात तसें वारली गांवांचें नसतें. प्रत्येक गांवामधले पाडे एकमेकापासून पुष्कळच लांब लांब असतात आणि एखादा चारदोन झोपड्यांचा पाडा घेतला तरी पाड्यामधली प्रत्येक झोपडी एकमेकीपासून अलग असते.

वारल्यांच्या झोपड्यांची रचना ही विशिष्ट प्रकारची असते. साधारण प्रत्येक झोपडी पंधरा ते वीस फूट लांब आणि तितकीच रुंद असते. प्रत्येक झोपडीला दोन-तीन फुटांचा दगडी चौथरा असतो. झोपडीच्या सर्व भिंती बांबूच्या कामट्यांच्या असून त्या कामट्या सुतळीनें एकमेकांना दाट गुंफलेल्या असतात. आणि बाहेरून त्या घट्ट शेणानें आणि मातीनें सुरेखशा सारविलेल्या असतात. त्यामुळें भिंतीमधून एवढासुद्धां उजेड आंत झोपडीमध्यें शिरूं शकत नाहीं. झोपडीचें छप्पर दाट गवताचें केलेलें असतें. त्यामधून पावसाचा एक थेंब-देखील आंत जाऊं शकत नाहीं. एवढेंच नव्हे तर झोपडींत बसलें तर अगदीं उकडल्यासारखें होतें. झोपडीमध्यें दिवसाहि जवळ जवळ अंधारच असतो

असें म्हणावयाला हरकत नाहीं. कांहीं कांहीं झोपड्यांच्या तळाशीं बाहेरून वारा येण्यासाठीं दोन-तीन चौकोनी जाळ्या राखलेल्या आम्हांला आढळल्या. झोपडी-मधली जमीन अतिशय घट्ट आणि स्वच्छ असून ती शेणानें सारविलेली असते. झोपडीची आंतमधली उंची जास्तींत जास्त आठ तें नऊ फूट असते. आंत जावयाला फक्त एकच दरवाजा असतो. आणि त्या दरवाजाकडे दोन्ही बाजूंला कावेच्या पार्श्वभूमीवर हाताच्या मुठीचे शिक्के चुन्यामध्यें उठविलेले असतात.

आम्ही चारोटी गांवाच्या एका पाड्यासमोर मोटार उभी केली आणि खालीं उतरून पायांनींच त्या गांवांत जावयाचें ठरविलें. एका फर्लांगाचे अंतरावर चार-पांच झोपड्यांचा एक सुंदरसा पाडा आम्हांला दिसला. तेव्हां त्या पाड्यामध्यें आम्ही शिरलों. खरोखर आमच्या मुशाफरीचे एकंदर योगच चांगले होते असें म्हणायला हवें. म्हणून त्या पाड्यांत शिरण्याची आम्हांला सुबुद्धि झाली. कारण त्या पाड्यांत आम्हांला जो शेतकरी प्रथमच भेटला तितका सुबुद्ध आणि सुसंस्कृत वारली पुन्हा आम्हांला पाहावयाला मिळाला नाहीं! त्यावरून आमची अशी समजूत झाली कीं वारली ही कांहीं एक जमात नाहीं. वारल्यांमध्येंहि सुसंस्कृतीचे अनेक थर आहेत. एका भागांतल्या वारल्यांवरून दुसऱ्या भागांतल्या वारल्यांसंबंधीं कल्पना बांधणें चुकीचें ठरेल! त्या पाड्यांतल्या मध्यवर्ती झोपडीसमोर एक ऐसपैस मंडपी होती. त्या मंडपीची जमीन स्वच्छ सारवलेली होती. आणि एक वारली स्त्री त्या मंडपींत झाडलोट करीत होती. तिचा नवरा आंत झोपडीमध्यें झोपला होता. आम्हीं जातांच तिनें आपल्या नवऱ्याला आंत जाऊन उठवलें. डोळे चोळीत चोळीत नुसती लंगोटी लावलेला चाळीस-बेचाळीस वर्षांचा गव्हाच्या रंगाचा एक उघडावाघडा वारली हातांत बिनबाह्यांची काळी बंडी घेऊन बाहेर आला आणि गंभीर चेहऱ्यानें त्यानें आमचें निरीक्षण केलें. आमच्या अचानक येण्यामुळें त्याला काय वाटलें असावें तें एकदम त्याच्या चेहऱ्यावरून आम्हांला कळण्यासारखें नव्हतें. आंतून दोन अंथऱ्या आणावयाला त्यानें आपल्या बायकोला सांगितलें. त्या अंथऱ्या तिनें पडवीमध्यें आणून पसरल्यानंतर त्यांवर आम्ही बसलों. झोपडीच्या दारासमोरच्या ओट्यावर त्या वारल्यानें आपला मुक्काम ठेवला व तो विडी वळूं लागला. तेवढ्या वेळांत आम्ही आजूबाजूचें वातावरण बारकाईनें न्याहाळूं लागलों. ओट्याच्या दुसऱ्या बाजूला तांब्याचा एक बंब ठेवलेला होता. तो बघून तर आम्ही चकितच झालों. आमच्याप्रमाणें हा वारली देखील गरम पाण्यानें आंघोळ करतो तर!

मंडपीमध्यें उखळ होतें, मुसळ होतें, दोनतीन सुपें पडलेलीं होतीं. एका बाजूला दोनतीन बकरीं बांधलेलीं होतीं, बाहेरच्या बाजूला कोंबडीं दाणे टिपीत फिरत होतीं. त्यांमध्यें एक गिनीफाउल देखील होतें! आम्ही बसलों होतों ती जागा उंचवट्यावर होती. तेथून त्या वारल्याचें खालीं खोलगटांत असलेलें शेत आणि त्या शेतामधली हिरवीगार बागाईत स्पष्टपणें दिसत होती.

ह्या कांहीं आपली कल्पना होती तसला जंगली किंवा अडाणी वारली माणूस नाहीं अशी आमची ताबडतोब खात्री झाली. इतक्यांत त्या वारल्याची विडी तयार झाली ती तोंडांत धरून तो चकमकीनें पेटवूं लागला. विडी पेटवण्याचें हें वारल्याचें यंत्र मोठें गमतीदार असतें. दोन-अडीच इंच लांबीचें एक वाटोळें लाकडी नळकांडें असतें. त्याला दोन्ही बाजूंला दोन लाकडी झाकणें असतात. ह्या नळकांड्यांत सावरीचा कापूस भरलेला असतो. चकमकीनें ठिणगी पाडायची ती नेमकी या नळकांड्यांत त्या कापसावर! मग त्या पेटलेल्या नळकांड्यांत विडी घालून ती शिलगवायची! या नळकांड्याला कारग असें म्हणतात.

"तुमच्या लोकांच्या बरोबर सहज गोठी (गोष्टी) करायला हे मुंबईचे लोक आले आहेत!" शामरावांनीं वारली भाषेंत बोलायला सुरुवात केली. "नांव काय तुमचें!"

धुराचा एक भपकारा सोडीत वारली म्हणाला, "रामजी देवजी घोशा."

"कोणाची भोय (जमीन) करतां तुम्ही?"

"बामन सावकाराची!" रामजी उत्तरला.

"पहिली इथें तुमची जमीनबिमीन होती कीं नाहीं?" काणेकरांनीं विचारलें.

"होती तर काय झालं!" रामजी म्हणाला, "आमच्या आजाच्या वेळीं सगळी जमीन सावकाराच्या घरांत गेली!"

मंडपीच्या एका खांबाला पाटी आणि पेन्सिल टांगलेली बघून मीं विचारलें, "तुम्हांला लिहितां बिहितां येतं कीं काय!" तेव्हां रामजी म्हणाला, "हो, चारपांच इयत्तांपर्यंत मी घरींच शिकलेला आहें. आमच्या घरीं एक कारकून होता त्यानें मला शिकवलें!"

"जरा पाणी आणा पाहूं!" आमच्यापैकीं कोणीतरी म्हणाले. त्याबरोबर रामजीच्या बायकोनें आंतून पितळेचे चकचक करणारे दोन तांब्ये थंडगार पाण्यानें भरून बाहेर आणले. त्या तांब्यांना शोभणारींच फुलपात्रें होतीं. घासून पुसून

स्वच्छ ठेविलेले ते तांब्ये आणि फुलपात्रें बघून पाणी पिण्याच्या आधींच आम्ही मनांतल्या मनांत थंडगार झालों. इतक्यांत रामजीनें आपल्या बायकोला पोहे आणायला सांगितलें. एका पाटावर पांढऱ्या स्वच्छ पोह्यांची रास घालून तिनें आमच्यापुढें ठेविली. पोहे थोडेसे कडक होते पण अतिशय स्वादिष्ट होते. आपल्या घरांत आलेल्या पाहुण्यांना पाण्याबरोबर कांहीं तरी खायला देण्याइतकी संस्कृति त्या वारली शेतकऱ्याच्या अंगीं असलेली बघून आम्हांला आनंद झाला. रामजीची बायकोहि अतिशय समंजस दिसली. तिचा चेहरा आणि वर्ण चांगल्या पांढरपेशा स्त्रीसारखा आम्हांला दिसला. तिनें गुडघ्यापर्यंत लुगडें नेसलेलें होतें. ही लुगड्याची पद्धत अशी आहे कीं त्यानें मांड्यांचा बाहेरचा भाग झाकला जातो पण आंतला भाग मागें दाबून घेतलेल्या लंगोटीच्या पट्ट्यापर्यंत उघडाच असतो. कमरेभोवतीं मात्र लुगड्याचा दुहेरी पट्टा असतो. सर्व वारली स्त्रियांची नेसण्याची पद्धत अशीच असते. चोळ्यांची पद्धत आपल्याच बायकांसारखी असते. मात्र लग्न झालेल्या बायका अंगावर थाडवा पदर घेतात आणि अविवाहित मुली पदर न घेतां चोळ्यांनीं झाकलेला आपला उरोभाग तसाच अनाच्छादित ठेवतात. रामजीचें आणि आमचें संभाषण इकडे चाललेलें असतांना त्याची बायको शिवणकाम घेऊन एखाद्या आर्य गृहिणीप्रमाणें मोठ्या आदबशीर आणि विनयशील पद्धतीनें आमच्या भाषणाकडे जणुं कांहीं लक्ष नाहीं अशा आविर्भावानें आपल्या कामांत गढून गेली. तिचें हसणें अतिशय मोहक होतें. आणि सर्वांत तिचा आवाज मला अतिशयच मधुर वाटला. बहुतेक सर्व वारली स्त्रियांचा बोलण्याचा आवाज मंजुळ असतो असें मला पुढें आढळून आलें. रामजीच्या एकंदर बोलण्यावरून तो खाऊन पिऊन सुखी दिसला.

मीं विचारलें, "तुमचा सावकार तुम्हांला छळीत नाहीं का?"

हा प्रश्न ऐकून रामजी किंचित् विचारांत पडला. प्रत्येक प्रश्नाचें उत्तर अतिशय तोलून आणि मापून तो देत होता. ही संवय केवळ रामजीचीच होती असें नव्हे. सगळ्या वारल्यांची बोलण्याची पद्धत ही अशीच असते असें आम्हांला मागाहून आढळून आलें. कोणतेंहि विधान करतांना वारली हा आपल्या स्वतःला कधीं गुंतवून घ्यावयाचा नाहीं. थोड्या वेळानें रामजी म्हणाला, "माझा सावकार फार चांगला आहे. मला त्रास देत नाहीं आणि शिव्याहि पण देत नाहीं!"

रामजीच्या ह्या उत्तरावरून शिव्यांच्या बाबतींत वारली लोक फारच हळवे

आहेत असा आमचा समज झाला. ते वाटेल तें सहन करतील पण कोणाच्या वाईटसाईट शिव्या मात्र कधींहि सहन करणार नाहींत! रामजीचें उत्तर ऐकून नेवाळकर म्हणाले, "म्हणजे यावरून सावकार वर्ग वारली लोकांना छळीत नाहीं असेंच आम्हीं समजावयाचें काय?"

रामजी मोठ्या धिमेपणानें म्हणाला, "बीजे (दुसरे) सावकार छळतात अशा गोष्टी ऐकल्या आहेत. आणि त्या खऱ्याहि पण आहेत! पण बीजांच्या गोष्टी आपण कशाला बोलाव्यात?"

रामजीचें तें थंडगार तत्त्वज्ञान ऐकून आम्ही अगदीं सर्दच झालों! मुंबईहून निघतांना आमची अपेक्षा अशी होती कीं प्रत्येक वारली सावकाराच्या छळाच्या भयानक हकीकती ओक्साबोक्शीं रडत रडत आणि हुंदके देत आम्हांला सांगेल! पण तसा तर इथें कांहींच प्रकार आम्हांला दिसला नाहीं. त्यामुळें आमची थोडीशी निराशाच झाल्यासारखें झालें. "सावकार लोक वारल्यांच्या बायकांवर जुलूम करतात ही गोष्ट खरी आहे काय?" मीं मागचा पुढचा विचार न करतां ठगकावून विचारलें.

रामजीनें कानावर हात ठेवून सांगितलें, "आपल्याला कांहीं माहीत नाहीं बाबा!"

शामराव म्हणाले, "अरे आम्ही सरकारचीं माणसें नाहींत. आम्हांला मोकळ्या मनानें सांगावयाला तुला हरकत नाहीं."

त्यावर रामजीला काय वाटलें कोणास ठाऊक! तो किंचित् हसून म्हणाला, "म्हणजे अशा गोठी होतात. नाहीं असें नाहीं. सावकारांचीं आवारें मोठीं असतात. कांहीं तरी काम सांगून सावकार नवऱ्याला लांब कुठेंतरी पाठवून देतो. आणि मग—"

रामजी येथेंच थांबला. त्याला काय सांगावयाचें होतें तें आमच्या उत्तम लक्षांत आलें. अरेच्या, अशा या सावकाराच्या युक्त्या असतात काय? आम्ही एकमेकां-कडे पाहात मनांत पुटपुटलों!

वारल्यांच्या हिताचे अनेक कायदे कॉंग्रेस सरकार करतें आहे. त्याबद्दल आम्ही रामजीचें मन विचारतांच तो मोठ्या अभिमानानें म्हणाला, "आमच्या हिताचे हे बंधारे (कायदे) होताहेत हें फार चांगलें आहे. हे बंधारे जर सावकारांनीं पाळले तर आम्ही जंगलाचे राजे होऊं राजे!"

"वर्षाकांठीं तुम्ही जे चार पैसे मिळवितां ते कुठें ठेवतां?" नेवाळकरांनीं विचारलें.

"ते आम्ही असेच कोणाजवळ तरी ठेवून देतों! बँकेंत कसे पैसे ठेवायचे आणि तेथून ते कसे बाहेर काढायचे हें कांहीं आम्हांला कळत नाहीं!" रामजी म्हणाला.

"आणि तुम्हीं ज्याच्याजवळ पैसे ठेवतां त्यानें तुमचे पैसे बुडविले तर?" काणेकरांनीं विचारलें.

"त्याची काय माय व्याली आहे आमचे पैसे बुडवायची?" रामजी ऐटीनें म्हणाला. इतक्यांत त्याला तत्त्वज्ञानाची लहर आली. तो हलक्या आवाजांत म्हणाला, "बाकी एखाद्यानें बुडविलेच पैसे तर आमचें काय जाणार आहे? तो फार झालें तर आमचे हातचे घेऊन जाईल! कर्मांतले थोडेच घेऊन जाणार!"

रामजीच्या तोंडचें हें सुभाषित ऐकून आम्ही चांगलेच हादरून गेलों! इतक्यांत शामराव म्हणाले, "कॉंग्रेस सरकार ताडीबंदीचा कायदा करणार आहे. त्याबद्दल तुझें काय मत आहे!"

त्यावर रामजी मनापासून बोलला, "ताडी बंद झाली तर आमच्या वारल्यांवर फार उपकार होतील! अगदीं खरें सांगतों!"

त्यानंतर आम्ही वारल्यांच्या लग्नपद्धतीविषयीं आणि त्यांच्या देवभोळेपणाबद्दल बोलूं लागलों. मीं विचारलें, "तुमचे लोक भगताच्या फार मागें असतात हें खरें आहे काय?"

"खरें आहे तें!" रामजी जड आवाजांत बोलूं लागला, "पण खरें सांगूं? माझा स्वतःचा भगतावर विश्वास नाहीं आणि देवावरहि पण विश्वास नाहीं! अहो, हे देव आणि भगत आपण माणसांनींच नाहीं का निर्माण केले?"

पुन्हा आम्हीं सर्वांनीं आश्चर्यचकित चेहऱ्यांनीं एकमेकांकडे पाहिलें. जणुं कांहीं आम्ही परस्परांना शब्दावांचून म्हणालों कीं मुंबईहून इतक्या दूर आपण येथें आलों ते कांहीं असला सुसंस्कृत आणि विचारवंत वारली पाहाण्यासाठीं नाहीं! छे, छे, हा वारली कांहीं आपल्याला पचण्यासारखा नाहीं!

"रामजी, आम्हांला तुमचा भगत पाहायचा आहे रे!" शामराव म्हणाले. तेव्हां रामजीनें आपल्या पुतण्याला "जा, 'बाळ्या' ला बोलावून आण रे!" म्हणून फर्माविलें. 'बाळ्या' हा रामजीचाच आप्त असून भगत होता. थोड्या

वेळांत बाब्या आला. त्याचा चेहरा आणि शरीर अगदींच सुक्या बोंबलासारखें वाळकें होतें. रामजीच्या आणि त्याच्या संस्कृतीमध्यें जमीनअस्मानाचें अंतर होतें हें आम्हीं तावडतोब ओळखलें.

"काय भगत," आम्हीं विचारलें, "तूं काय भूत पिशाच्च वगैरे काढतोस का अंगांतलें?"

बाब्या ठराविक वारली पद्धतीनें म्हणाला, "छे बा, छे बा, मी भूतबीत कांहीं काढीत नाहीं. बीजे भगत तें काम करीत असतील!"

"मग तूं काय तांदूळ बिंदूळ हेरतोस काय?" शामरावांनीं विचारलें.

सुपांत तांदूळ टाकून त्यामधून भूतभविष्य वारली भगत वाचीत असतात. त्या प्रश्नाला बाब्यानें होकार दिला. तो म्हणाला,

"कोणी आजारी बिजारी पडलें तर आपण तांदूळ हेरून सांगेतो."

"साप चावलेला तूं बरा करतोस का रे?" काणेकरांनीं विचारलें.

"छे बुवा, तें आपल्याला येत नाहीं. खोटं कशाला सांगूं?" बाब्या म्हणाला. "त्याला पुष्कळ पाळणूक (व्रत) करावी लागते. पडवळाची, दोडक्याची भाजी खायची नाहीं. पडवळ कापलेलें दिसलें तर तिकडे बघायचें नाहीं. वर्ष न् वर्ष आम्हांला लग्न देखील करतां येत नाहीं!"

मीं मनांत म्हटलें, "बाब्याला ही पाळणूक करतां आली नसावी बहुतेक!"

आतां आम्हांला विचारायचें कांहीं फारसें राहिलें नव्हतें. फक्त वारली लोक जो कडू कंद खातात तो आम्हांला पाहायचा होता. रामजीच्या बायकोनें चटकन् अंगणांतून एक मोठा कंद उकरून आणला. मीं चाकूनें त्याच्या दोनतीन बारीक चकत्या काढून तोंडांत टाकल्या. सुरवातीलाच मला त्या इतक्या कडू वाटल्या नाहींत म्हणून धीर येऊन मी त्या जोरजोरानें चावूं लागलों. आणि मग तोंडांमध्यें असा काय कडवट गिळवा उत्पन्न झाला कीं, मला तो चोथा थुंकतां थुंकतां अगदीं पुरेवाट झाली. तास दीडतास तरी तो कडवटपणा माझ्या घशांत रेंगाळत होता. हा कडू कंद कापून त्या तुकड्यांना दोन्ही बाजूंनीं राख लावतात. आणि मग विस्तवामध्यें ते तुकडे नीट भाजून काढल्यावर खातात. रामजीचा निरोप घेण्यापूर्वी त्याचें घर आंतून पाहण्याची साहजिकच आम्हांला इच्छा झाली. खरो-खर, रामजीचें स्वयंपाकघर बघून आम्हीं तोंडांत बोट घालायचेंच काय तें बाकी ठेवलें. एखाद्या ब्राह्मणाच्या घरांत देखील तांब्यापितळेचीं इतकीं स्वच्छ आणि

चकचकीत भांडीं आपल्याला आढळून येणार नाहींत ! झोंपडीच्या दुसऱ्या भागांत निरनिराळ्या सुक्या भाज्या, वी-बियाणें ह्यांच्या पुरचुंड्या वर छपराला टांगून ठेवल्या होत्या. त्यांत कुठें तरी सुकी मासळीहि होती. तिचा उग्र वास मधून मधून येत होता. अगदीं खूष होऊन रामजीच्या झोपडींतून आम्ही बाहेर पडलों.

"बरें आहे रामजी, येतों आम्ही!" शामराव म्हणाले. तेव्हां रामजी म्हणाला, "पुन्हा तुम्ही इकडे आलांत तर असे उभ्या उभ्या येऊं नका ! माझ्या-कडे भातभाकर खाऊन जा !" एका वारल्याच्या तोंडून बाहेर पडणारें तें नागर संस्कृतीचें तत्त्वज्ञान ऐकावयाची आमची मुळींच तयारी नव्हती !

रामजीच्या बायकोला मीं नमस्कार केला तेव्हां हंसून अतिशय गोड स्वरांत ती म्हणाली, "मी तुम्हांला पाहिलंय् ! तुम्ही इथें मागें आलां होतां."

मी चकित होऊन म्हणालों, "नाहीं ग बाई ! मी इथें आजच येतों आहें ! तूं मला कोण समजलीस ?"

"तुम्ही पोलीस अधिकारी नव्हेत का ?" ती पुन्हा हसून म्हणाली. माझा अर्ध्या दंडाचा शर्ट आणि लांडी विजार बघून तिचा तसा समज झाला असावा, हें ताबडतोब माझ्या लक्षांत आलें. मी पोलीस अधिकारी नाहीं हें जेव्हां मी पुन्हा पुन्हा तिला सांगूं लागलों तेव्हां मात्र ती एकदम गंभीर झाली.

# वारली मुलुखामधली मुशाफरी : २ :

रामजीच्या वाड्यांतून बाहेर पडून आमच्या मोटारीकडे आम्ही आलों. तेव्हां तीन-साडेतीनचा सुमार झाला होता. रामजीची आमची मुलाखत चांगली दीड तास तरी झाली. तो आमच्याशीं वारली भाषेंत बोलत होता. आम्हीं त्याच्याशीं शुद्ध भाषेंत बोलत होतों. त्याचें बोलणें आम्हांला कळत होतें. आमचें बोलणें त्याला कळत होतें. वारली भाषा ही कळावयाला अतिशय सोपी भाषा आहे. कोकणांतल्या इतर सर्व बोलीभाषांपेक्षां ती मराठीला फारच जवळची आहे. 'आहे' आणि 'नाहीं' या शब्दांचा उच्चार वारली लोक अगदीं शुद्ध ब्राह्मणी ठसक्यानें करतात. 'हाय' किंवा 'न्हाय' चुकून देखील त्यांच्या तोंडांत येणार नाहीं. 'अजग्या' म्हणजे 'सगळ्या' आणि 'नांगिले' म्हणजे 'पाहिलें' एवढे दोनच शब्द एवढ्या वेळांत मला नवीन वाटले. वारली भाषेंत गुजराती शब्दहि बरेच घुसले आहेत. 'ओसामां ओसा' (कमींत कमी) 'लगभग' (अजमासें), 'गांडा'(वेडा), 'बीजे' (दुसरे) हे शब्द त्यांच्या बोलण्यांत वारंवार येतात.

रस्त्यावर ज्या झाडाखालीं आमची मोटार उभी होती त्याच्यासमोर आठ हातांवर एक ताडीचा मांडव होता. वारली मुलुखांत ताडीच्या दुकानाला मांडव

म्हणतात. चार खांबावर वाळलेल्या पानांच्या फांद्यांचें छप्पर घालून हा लहानसा मांडव बनवितात. त्याच्या भिंतीहि वाळलेल्या पानांच्या असतात. ताडीचीं झाडें ज्या भागांत विशेष जास्त असतात त्याला ताडीचा पट्टा म्हणतात. प्रत्येक पट्ट्या-मध्यें एकेक ताडीचा मांडव असतो. दर मैल दोन मैलाला एकेक ताडीचा मांडव हा दृष्टीस पडतोच पडतो. ह्या ताडीच्या मांडवावर एक स्वच्छ पांढरें निशाण फडकत असतें. जणुं कांहीं निर्मळ भ्रातृभावाची ती पवित्र निशाणीच होय! ज्या वेळीं मांडवांत ताडी असते त्यावेळीं हें निशाण वर ताठ फडकत असतें. ताडी नसते तेव्हां हें निशाण अर्धवट लोंबकळत असतें. अर्थात् हें सारें शास्त्र कळायला आम्हांला बराच वेळ लागला. एकदम कांहीं तें आमच्या लक्षांत आलें नाहीं. ताडीचा मांडव बघून आम्ही सारे त्या रोखानें चालून गेलों. मांडवांत दोनतीन तारवटलेल्या चेहऱ्याचे वारली कपाळाला हात लावून बसले होते. त्यांची ताडी 'उतरून' बराच वेळ झालेला दिसत होता. त्यांना वाटलें कीं आम्ही ताडी प्यायलाच आलों आहोंत.

"साहेब, ताडी मघाशींच संपून गेली!" एक वारली खिन्नपणें म्हणाला.

"वेळ असेल तर थोडेंसें थांबा. आतां ताडीची गाडी येईलच!" दुकानदार पोऱ्यानें आम्हांला आश्वासन दिलें. ताडीच्या मोकळ्या पिंपाची भयंकर कुजट घाण दुकानांत पसरली होती. म्हणून तेथें अधिक संशोधन करण्याच्या भरीस न पडतां आम्ही पलीकडे दोन हातांवर असलेल्या चहाच्या दुकानांत गेलों. नेवाळकरांनीं आपला स्टोव्ह पेटवून चहा करायला सुरवात केली. त्रिविक्रम फराळाच्या 'तयार पेट्या' फोडूं लागले आणि मी शेजारीं असलेल्या एका बाजेवर पाय तणावून आरामशीर पडलों.

एवढ्या वेळेपर्यंत कापलेल्या लाकडांचे लांब सोट नेणाऱ्या बैलगाड्यांची रहदारी रस्त्यावर जोरानें सुरू झाली होती. प्रत्येक गाडींत वीसपंचवीस फूट लांबीचा आणि तीन फूट रुंदीचा भला मोठा सोट ठेवलेला असे. त्याची साल बाहेरून काढली असल्यानें तो पांढरा स्वच्छ दिसे. कांहीं कांहीं गाड्यांत दोन-दोन तीन-तीन सोट असत. आम्ही चहा पीत असतांना एकामागून एक अशा रांगेनें शेकडों गाड्या त्या रस्त्यानें सातवटें बंदराकडे चाललेल्या होत्या. म्हणून चहापान झाल्यानंतर आम्हीं आपली मोटार सरळ सातवट्याकडेच वळवली. वाटेमधल्या लाकडाच्या गाड्या चुकवीत चुकवीत तासाभराच्या आंतच आम्ही सातवटें बंदरावर येऊन

पोहोंचलों. बंदरावर येण्यापूर्वीं एक मैलभर रस्त्याच्या दोन्ही बाजूंना लाकडांचीं जीं प्रचंड गुदामें आम्हांला दिसलीं, तीं बघून आम्ही थक्क झालों. जंगलांत कापलेले सोट गाड्यांमधून या गुदामांत आणण्यांत येतात. त्या ठिकाणीं त्यांची अधिक साफसफाई करण्यांत येते. आणि मग सारख्या लांबीचे सोट शेजारीं शेजारीं अंथरण्यांत येतात. त्यांच्यावर त्या त्या व्यापाऱ्याचें नांव आणि निशाणी करण्यांत येते. सारख्या लांबीरुंदीचे हजारों सोट प्रत्येक गुदामांत मांडलेले बघून आमचे डोळे अक्षरशः दिपले! हें 'सौंदर्य' आम्हीं पूर्वीं कधीं पाहिलें नव्हतें. लक्षावधी रुपयांचा माल रचून ठेवलेला त्या ठिकाणीं आम्हांला दिसत होता. मी काणेकरांना म्हटलें, "बघा हे मुसलमान आणि गुजराती व्यापारी हीं लाकडें विकून कोट्यवधि रुपये कमवतात. आणि आपण दरिद्री साहित्यिक पेन्सिलीचीं लाकडें तासून लघुकथांचा न् कवितेचा कचरा निर्माण करतों!"

सावट्याचें बंदर फार मोठं नाहीं. लहानशीच खाडी आहे तिथें. ह्या खाडीच्या पाण्यांत लाकडें टकलून त्यांचे तराफे बांधतात आणि त्या तराफ्यांना मचवे ओढीत गलबतापर्यंत नेतात. या बंदरांतून फक्त पंचवीस टक्के माल मुंबईकडे जातो, व बाकीचा सारा माल काठेवाडांत जातो असें कळलें. सावट्याच्या बंदरावर लाकडाच्या व्यापाराचें जें प्रचंड दृश्य मीं पाहिलें त्याचा माझ्या मनावर विलक्षण परिणाम झाला. शक्य झालें तर एखाद्या चित्रपटांत ह्या पार्श्वभूमीचा अवश्य उपयोग करावयाचा, असा मीं त्याच वेळीं माझ्या मनाशीं निश्चय करून ठेवला.

सावटें सोडून आम्हीं सरळ डहाणूच्या रोखानें आमची मोटार वळविली. डहाणूकडे जाताना वाटेमध्यें अनेक वारली पुरुष आणि स्त्रिया आम्हांला दिसल्या. चेहऱ्यावरून हा माणूस वारली आहे, कातकरी आहे कीं दुसरा कोणी आहे, हें ओळखून काढण्याचें जणु कांहीं आम्हांला वेडच लागलें. शेंडी ही वारल्याची एक हमखास निशाणी आहे. मुंबईमध्यें पूर्वीं बाल्र् लोकांच्या डोक्यावर भली मोठी शेंडी ठेवलेली दिसे. अलीकडे त्या लोकांची शेंडी फारशी दिसत नाहीं. तशाच प्रकारच्या शेंडीचा झुपका वारल्यांच्या डोक्यावर असतो. ज्याच्या डोक्यावर शेंडी नाहीं असा एकहि वारली तुम्हांला दिसायचा नाहीं. जुन्या पिढींतले वारली कपाळामागें तीन-तीन चार-चार बोटें हजामत करतात. पण तरुण वारली मुलें शेंडी ठेवून पुन्हा डोक्यावर केसाचें छप्पर राखतात. ह्याला ते बाबरी म्हणतात. हल्लींचीं तरुण पोरें डोक्यावर बाबरी राखतात हें जुन्या वारल्यांना फारसें आवडत

नाहीं. वारल्यांच्या शेंड्या बघून मी मनांत म्हणालों, "स्वतःला हिंदु म्हणवून घेणाऱ्या आम्हीं सुसंस्कृत लोकांनीं आपल्या डोक्यावरच्या शेंड्या काढून टाकल्या. पण ती हिंदुधर्माची निशाणी ह्या जंगली आणि बिनधर्मी म्हणून समजल्या जाणाऱ्या आदिवासींनीं मात्र अद्यापपर्यंत संभाळून ठेवलेली आहे, हें अद्‍भुत नव्हे काय?" वारली लोक कमरेला एक लंगोटी घालतात. त्यामुळें त्यांचे 'नितंब' नेहमीं उघडेच असतात; मात्र धोतर ते कमरेभोवतीं गुंडाळण्याऐवजीं डोक्याला गुंडाळतात. अंगांत ते बिनबाह्यांची आखूड बंडी घालतात. ह्या बंडीवर थोडेंसें नकशीकाम केलेलें असतें. वारली पायांमध्यें कांहींच घालत नाहींत.

कांहीं वेळानें आम्हांला रस्त्यांत निराळ्याच तऱ्हेच्या बाया दिसूं लागल्या. त्यांनीं आडव्या पट्ट्या पट्ट्याच्या पुढच्या बाजूस बंद असलेल्या गंजिफ्राकासारख्या काचोळ्या घातलेल्या होत्या. ह्या काचोळ्या मागच्या बाजूला बंदांनीं बांधलेल्या असल्यामुळें ह्या बायकांच्या पाठी जवळजवळ उघड्याच दिसत होत्या. दिसण्यांत ह्या बायका अधिक आकर्षक होत्या. शामरावांना आम्हीं विचारलें, "ह्या कोणत्या जातीच्या बायका?"

ते म्हणाले, "माची मितणें जातीच्या त्या स्त्रिया आहेत!"

धोडी जातीच्या बायाहि पुढें आम्हांला दिसल्या; त्या हातांपायांत पितळेच्या पुष्कळशा पाटल्या घालतात. त्यांचा रंगहि वारल्यांपेक्षां उजळ आहे. तथापि, डहाणूच्या हद्दींत शिरल्यावर ज्या दुबळ्या जातीच्या बायका आम्हांला पहायला मिळाल्या, त्या खरोखरच सुंदर होत्या. त्यांचा वर्ण आणि नाकडोळे तेजस्वी होते. त्यांची वेषभूषा गुजराती पद्धतीची होती. माची मितणें, धोडी आणि दुबळे या वारल्यांप्रमाणेंच आदिवासी जाती होत.

साडेपांचच्या सुमारास आम्ही डहाणूला पोहोंचलों. समुद्राच्या किनाऱ्यावर 'पोंदा हायस्कूल' ची सुंदर इमारत आहे. त्या इमारतीसमोर सुरूच्या झाडाचें हिरवेंगार जंगल वाढलेलें आहे. शाळा सुटायला आणि मोटार शाळेसमोर येऊन उभी राहायला एकच गांठ पडली. शाळेचे हेडमास्तर श्री. कर्णिक ह्यांना आम्ही आल्याचें कळतांच लगबगीनें ते आम्हांला भेटायला आले. आपल्या बंगल्यांत ते आम्हांला घेऊन गेले. धुळीनें आम्ही सर्व अगदीं आपाद भरून गेलों होतों. शाळेचीं कांहीं मुलें आम्हांला पहायला जमलीं. खरोखरच त्यावेळीं आम्ही अतिशय 'प्रेक्षणीय' दिसत होतों. आम्हांला बघून मुलांची खूपच करमणूक झाली

असली पाहिजे. "चहा द्यावयाच्या आधीं आम्हांला आंघोळीला गार पाणी द्या!" अशी आम्हीं कर्णिकांच्या जवळ मागणी केली. एका तासाभराच्या आंत आंघोळी करून, कपडे बदलून आणि चमचमीत फराळ करून आम्ही पुढच्या कार्यक्रमाला तयार झालों. डहाणूपासून पांच मैलांच्या अंतरावर नरपड नांवाचें गांव आहे. तेथें वारल्यांचे कांहीं पाडे आहेत. तिकडून एक फेरफटका मारून येण्याचें आम्हीं ठरविलें. श्री. कर्णिकहि आमच्या बरोबर येण्यास निघाले. त्यांचा वारली प्रश्नाचा अभ्यास अनेक वर्षांचा आहे. आणि वारली भाषा ते उत्तम तऱ्हेनें बोलूं शकतात. वाटेनें जातां जातां त्यांनीं कम्युनिस्टांच्या दंगलीची पुष्कळ हकीकत आम्हांला सांगितली.

डहाणूचा समुद्रकिनारा अत्यंत विस्तीर्ण आणि सुंदर आहे. किनाऱ्यावर दोन चार मोठीं मोठीं हॉटेलें आहेत. ह्या हॉटेलांत सुट्टीच्या दिवशीं मुंबईचे पार्शी 'सोजी आणि मिठ्ठी' ताडी प्यायला झुंडीनें येतात, असें कर्णिकांनीं आम्हांला सांगितलें. ताडाच्या आणि शिंदीच्या वनामधून लांब आणि कंटाळवाणा पायरस्ता तुडवीत आम्ही हळूहळू चाललों होतों. सूर्य कधींच मावळला होता. अंधारहि हळूहळू पडूं लागला होता. तास दीडतास आम्ही एकसारखा रस्ता तुडवीत होतों. नंतर बी. बी. सी. आय्. रेल्वेचा रूळरस्ता ओलांडून आम्ही पलिकडे गेलों आणि पुढें चालूं लागलों. रुळाच्या दोन्ही बाजूंना मैल मैल लांबीच्या चिकूच्या बागा होत्या. ह्या बागा मुंबईमधल्या हॉटेलवाल्या इराण्यांच्या मालकांच्या आहेत असें आम्हांला कळलें. अंधार चांगलाच पडला होता. डाव्या बाजूला ठिकठिकाणीं आम्हांला लहान शेकोट्या पेटलेल्या दिसल्या. "ह्या कसल्या शेकोट्या?" आम्हीं विचारलें.

कर्णिक म्हणाले, "ताडी पिण्यापूर्वीं हे लोक गरम करतात. त्याच्या शेकोट्या आहेत या!"

आम्ही म्हणालों, "चला, एखादी शेकोटी बघून तर येऊं!"

मूळ वाट सोडून आम्ही आडरस्त्याला एका शेकोटीच्या रोखानें वळलों. ती शेकोटी एका ताडीच्या मांडवासमोर होती. आम्ही लांबून येत आहोंत असें दिसतांच शेकोटी एकदम विझली गेली आणि दोनतीन लोक ताडीच्या मांडवांत जाऊन गुपचुप बसले. कर्णिकांनीं जेव्हां त्यांची खात्री केली कीं आम्ही कांहीं कोणी भलतेसलते लोक नाहींत, तेव्हां मांडवाचा दुकानदार गुजरातीमध्यें आमच्याशीं बोलूं लागला. त्याला ताडी चांगलीच चढल्यासारखी दिसत होती. तो म्हणाला,

"दुकानांत ताडी शिल्लक नाहीं. थोडीशी उरली होती ती आतांच आम्हीं पिऊन टाकली!" "अरे, आम्हांला ताडी नको आहे! त्या लाल बावटेवाल्यांनीं इथें काय दंगल केली ती डोळ्यांनीं पाहायला हे मुंबईचे छापेवाले इथें आले आहेत!" असें कर्णिकांनीं सांगतांच, गुजराती तरातरा बाहेर आला. आणि आपल्या ताडीच्या मांडवाला आणि ताडीच्या झाडांना लाल बावटेवाल्यांनीं कुठें कुठें आगी लावल्या हें आजूबाजूला हिंडून आम्हांला समक्ष दाखवूं लागला. "लाल बावटेवाले तुझ्या दुकानांतली ताडी पिऊन गेले काय रे?" काणेकरांनीं विचारलें. तेव्हां दुकानांतली ताडी दंगेखोर लोकांनीं ओतून फेकून दिल्याचें त्यानें सांगितलें. केवळ नुकसान करून जरब बसविण्याचा लाल बावटेवाल्या गुंडांचा हेतु असावा, असें आम्हांला दिसलें. दुकानदाराला 'साहेबजी' करून आम्ही नरपडच्या रस्त्याला चालूं लागलों.

अर्ध्या तासानें एका ताडाच्या दाट बनांत वारल्यांचा एक पाडा असलेला आम्हांला दिसला. पाड्यांतल्या एका झोंपडींत आम्हांला दिवा दिसला. म्हणून त्या झोपडीकडे आम्ही वळलों. झोपडीच्या चोथऱ्यावर एक साठबासष्ट वर्षांचा पांढऱ्या शुभ्र केसांचा वारली बिडी पीत असलेला आम्हांला दिसला. "काय वाडघो (महताऱ्या), काय चाललंय्?" कर्णिक अगदीं ओळखीच्या स्वरांत बोलत बोलत पुढें झाले आणि म्हाताऱ्याच्या अगदीं शेजारीं जाऊन बसले. म्हाताऱ्याची बायको त्याच्या मानानें पुष्कळच तरुण होती. ती त्याच्यामागें बिडी ओढीत उभी होती. तिनें लगलेच दोन अंथऱ्या आणून जमिनीवर टाकल्या. त्यांवर आम्ही मांड्या टोकून अघळपघळ बसलों देखील!

"वाडघो," कर्णिकांनीं बोलायला सुरवात केली, "हे सिनेमावाले लोक आहेत बरें का? तूं सिनेमा नांगलास (पाहिलास) काय रे? हां! तसा सिनेमा तुमच्या अजग्या (साऱ्या) वारल्यांचा तयार करून तो इथेंच तुम्हांला नागवायचा बरें का? म्हणून हे लोक इथें तुमच्याबरोबर गोठी करायला आलेत!"

कर्णिकांचें तें बोलणें ऐकून वाडघो खूपच खूप झाला. तो चांगला ताडी प्यालेला होता. कर्णिकांनीं तें ओळखलें. ते म्हणाले, "काय रे, सूर (ताडी) प्यालास होय रे?"

त्यावर म्हातारा थोडासा ओशाळला. "हो बाबा, मी सूर पिऊन आलों आहें." तो म्हणाला, "खोटं कशाला बोला? आतां भगताच्या कामाला गेलों होतों एके

20000 293 क्र. ५४१२ ७७ २०/९२

ठिकाणीं. तिथें मला सूर मिळाली. खुपीनें त्या लोकांनीं दिली. ती मी प्यालों."

म्हातारा हा 'भगत' आहे असें कळतांच आम्हांला त्याच्याबद्दल जास्त उत्सुकता निर्माण झाली. एवढ्या वेळांत आजूबाजूच्या झोपड्यांतल्या दोन वारली स्त्रिया आणि दोन पुरुष बिचकत बिचकत तेथें आले आणि मुकाट्यानें अंधारांत बसले. वाडघ्याला आम्हीं विचारलें, "वाडघो, तुझें वय काय रे?"

पण त्याला आपलें वय कांहीं सांगतां येईना. कर्णिक म्हणाले, "अरे, दोन विसा का तीन विसा?"

तरी त्याला कांहीं बोध होईना. कोणत्याहि वारल्याला आपलें वय काय आहे हें सांगतां येत नाहीं असें आम्हांला पुढें आढळून आलें.

"कोणाची भोय करतोस वाडघो तूं!" कर्णिकांनीं विचारलें.

त्यानें एका ब्राह्मण सावकाराचें नांव सांगितलें. पुढचा आमचा प्रश्न ठरलेला होता. "मग, तुझा सावकार तुला त्रास देतो कीं नाहीं?" नेवाळकरांनीं विचारलें.

त्याबरोबर "छे बाबा, माझा सावकार फार चांगला आहे. तो कधीं इथें येतच नाहीं!" असा वाडघोनें ठराविक जबाब दिला.

"तुझा सावकार चांगला असेल रे, पण बाकीचे सारे सावकार तसेच चांगले असतात का?" शामरावांनीं विचारलें,

"बीजांच्या गोठी आपण कशाला करा?" वाडघो एखाद्या तत्त्वज्ञाप्रमाणें म्हणाला, "पण तुम्ही विचारतां म्हणून सांगतों. अजग्या सावकारांत महारवाडी सावकार वाईट!"

महारवाडी? महारवाडी सावकार कोण? 'महारवाडी' हा शब्दहि आम्हीं पूर्वीं कधीं ऐकला नव्हता. तेव्हां 'महारवाडी' म्हणजे 'मारवाडी' असा वाडघोनें खुलासा केला. वारली लोक मारवाड्याला 'महारवाडी' म्हणतात हें ऐकून आम्ही पोट धरधरून हसलों. "महारवाडीच्या हातचें आम्ही पाणी सुद्धां घेत नाहीं!" वाडघो हातवारे करीत जोरजोरानें म्हणाला. पुढें मग त्याच्या मुलाविषयीं आम्ही बोलूं लागलों. तेव्हां शिणवार (शनिवार) नांवाच्या त्याच्या एका मुलाचें नुकतेंच लग्न झाल्याचें त्यानें आम्हांला सांगितलें. ह्या लग्नाचीं वर्हाचीं बाशिंगें त्यानें घरांत जपून ठेवलीं होतीं. तीं त्याच्या बायकोनें आणून आम्हांला दाखविलीं.

"मग ह्या लग्नाला खर्च किती केलास रे?" शामरावांनीं विचारलें.

"खर्च तीनशें रुपये आला." वाडघो म्हणाला. "त्यांतले शंभर रुपये अजून

द्यायचे आहेत. दोनशें रुपये सावकाराकडून काढले. त्या सावकाराच्या घरीं शिणवार नोकरीला राहिला आहे. त्याला जेवून खाऊन वर्षाचे वीस रुपये मिळतात!"

"म्हणजे, तुझ्या शिणवाराला सावकाराच्या घरीं दहा वर्षे तरी नोकरी करावी लागेल!" नेवाळकर म्हणाले.

"तें काय ठाऊक नाहीं मला? पैसे फिटेपर्यंत त्याला सावकाराकडे काम करायलाच लागेल!"

"काय रे वाडवो, तूं गोदाराणी पाहिलीस काय? तिच्या एकीच्या सुभेला (सभेला) तूं गेला होतास काय?" कर्णिकांनीं विचारलें. त्याबरोबर म्हाताऱ्यानें आपल्या कानावर सपशेल हात ठेवले. ह्यापैकीं कांहींएक आपल्याला माहीत नसल्याचें त्यानें सांगितलें.

"पण काय रे, सावकार लोक तुम्हांला मारीत होते ही गोष्ट खरी का?" कुणींतरी विचारलें.

म्हातारा हलक्या आवाजांत म्हणाला, "पूर्वीं मारीत होते हें खरें. पण हल्लीं हें फार कमी झालें आहे!" मजुरीचा दर पूर्वीं एक आणा होता असें म्हाताऱ्याच्या तोंडून आम्हांला कळलें तेव्हां आम्हीं अगदीं चकितच झालों.

कांहीं वेळानें ही चर्चा थांबवून आम्ही त्याच्या भगतगिरीबद्दल बोलूं लागलों. तथापि अंगांतून भूत काढणें किंवा सापाचें विष उतरविणें ह्या गोष्टी आपण मुळींच करीत नाहीं असें स्पष्टपणें त्यानें आम्हांला सांगितलें.

"बीजे भगत करीत असतील!" एखाद्या सत्यप्रिय न्यायाधिशाच्या कठोर स्वरांत तो म्हणाला. "आपण फक्त कोणाला ताप आला, माता (देवी) आल्या तर त्या काढतों. जें आपल्याला येत नाहीं तें आपण करीत नाहीं. उगाच खोटें काम कशाला करा?"

म्हाताऱ्याच्या त्या 'सत्यप्रियते'पुढें क्षणभर आम्हांला देखील लाजल्यासारखें झालें. "हा ताप तूं कसा काढतोस रे?" मीं विचारलें. तेव्हां म्हाताऱ्यानें आंतून एक वेताची तीन फूट लांबीची छडी आणून दाखविली. ह्या छडीवर चांदीच्या पत्र्याचीं लहान लहान चार वेढीं मारलेलीं होतीं. आणि प्रत्येक पत्र्यावर चतुर्भुजा देवीचे लहानसे ठसे उमटवलेले होते. 'ही काठी रोग्याच्या अंगाला लावली कीं रोग बरा होतो!" असा म्हाताऱ्यानें आपला अनुभव

सांगितला. त्यावरून त्याच्या भगतगिरीचें स्वरूप काय आहे हें आम्हांला नीटपणें कळून आलें. वाडघोच्या हातावर थोडीशी बक्षिसी ठेवून आम्हीं त्याचा निरोप घेतला. नवाचा सुमार असेल त्यावेळीं. परत पांच-साडेपांच मैल अंधारांत रस्ता तुडवीत जाणें आमच्या अगदीं जिवावर आलें होतें. पण करणार काय? शेवटीं, रुळाच्या कडेनेंच सरळ डहाणू स्टेशनावर जावयाचें आम्हीं ठरविलें.

नेवाळकर म्हणाले, " सकाळपासून आपण पाहतों आहोंत, आपल्याला तरुण वारली कांहीं भेटत नाहींत. ज्या झोपडींत जावें तिथें नुसते वाडघो, बायका आणि मुलें दिसतात! हें कांहीं बरें नाहीं. उद्यां काय वाटेल तें करून आपण वारली तरुण गांठले पाहिजेत!"

"तरुण वारली गाड्यांच्या किंवा तोडीच्या कामावर बाहेर असणार. ते तुम्हांला कसे भेटणार!" कर्णिकांनीं उत्तर दिलें.

"तरुण वारली भेटल्यावांचून कम्युनिस्टांनीं या मुलुखांत काय काय भानगडी केल्या त्या आपल्याला कळावयाच्या नाहींत!" नेवाळकर म्हणाले.

"पण ज्या वारल्याला विचारावें तो आपला म्हणतो कीं माझा सावकार तेवढा चांगला, इतरांचे सावकार त्यांना छळीत असल्यास आपल्याला कांहीं माहीत नाहीं. ही काय भानगड आहे?" मी म्हणालों.

"आणि कम्युनिस्टांच्या सभेला आपण गेलों असल्याचें किंवा गोदाराणीला पाहिल्याचेंहि हे लोक नाकबूल करतात, ही तरी काय भानगड आहे?" काणेकर उद्गारले.

"त्यांच्या या वर्तनावरून ते सावकाराला आणि कम्युनिस्टांना अतिशय भीत असले पाहिजेत हें उघड आहे! त्यांच्याविरुद्ध कांहींहि बोलण्याची त्यांची तयारी नाहीं!" नेवाळकर म्हणाले.

"कम्युनिस्टांबद्दल त्यांना आंतून सहानुभूति वाटत असली पाहिजे असा तर ह्याचा अर्थ नसेल ना?" काणेकरांनीं शंका काढली.

तेव्हां कर्णिक म्हणाले, "अशा कांहीं समजुती तुम्ही करून घेऊं नका. खरें, सांगायचें म्हणजे वारली लोक हे सध्यां भेदरून गेले आहेत. सरकारच्या, सावकाराच्या किंवा कम्युनिस्टांच्या विरुद्ध ते कांहींहि बोलायला तयार नाहींत. याचा असा अर्थ नव्हे कीं, त्यांपैकीं कोणाबद्दल त्यांना विशेष सहानुभूति वाटते! ते आपले गप्प बसून लांबून सारें पाहताहेत! त्यांच्या हिताचें जो करील तो शेवटीं त्यांचा, हेंच खरें!"

डहाणू स्टेशनवर पोहोंचेपर्यंत चांगले दहा वाजून गेले होते. अंग अगदीं मोडून आल्यामुळें आम्ही स्टेशनाच्या 'वेटिंग रूम' मध्यें गेलों आणि खुर्च्यांवर शरीरें अक्षरशः फेकून दिलीं. डहाणूची प्रख्यात 'तिखट डाळ' खाऊन आणि सोडा पिऊन आम्ही चालत चालत निघालों. वाटेंत सिनेमागृह लागलें. तेथें माझा 'वसंतसेना' बोलपट चालू असल्याचें बघून मौज वाटली. सिनेमागृहांतून परिचित शब्दांचे आघात बाहेर कानावर येत होते. पांदा हायस्कूलच्या व्हरांड्यांत समुद्राचा थंडगार वारा अंगावर घेत आम्ही जे एकदम झोपीं गेलों ते दुसरे दिवशीं सकाळीं साडेसात वाजतां उठलों.

साडेआठ-नऊ वाजेपर्यंत आम्ही आंघोळी फराळ करून पुढच्या प्रवासाला सिद्ध झालों. निघायच्या सुमारास त्या भागांतील एका पोलीस अधिकाऱ्याची आणि आमची गांठ पडली. त्याच्याशीं आम्हीं थोडेंसें बोललों. बहुतेक दंगेखोरांना अटक झाली असल्याचें त्यांनीं सांगितलें. "ह्या भागांत कोणी कम्युनिस्ट कार्यकर्ता आतां उरला आहे कीं नाहीं?" असें मीं विचारलें.

ते म्हणाले, "कॉ. वीरकरांना परवांच अटक झाली. आतां एखादादुसरा अज्ञात कम्युनिस्ट कार्यकर्ता जंगलामधून फिरत असल्यास आम्हांला तें कळणें कठीण आहे. तथापि, ह्या भागांतली दंगल मात्र पूर्णपणें थांबलेली आहे."

नेवाळकरांनीं विचारलें, "सावकार लोक वारल्यांवर अत्याचार करतात ह्याविषयीं तुमचें काय म्हणणें आहे?"

तेव्हां ते अधिकारी म्हणाले, "मी देखील तुमच्याप्रमाणें ह्या सर्व गोष्टी नुसत्या ऐकतों आहें. सावकारानें एखाद्या वारल्याला प्रत्यक्ष मारझोड केल्याची किंवा त्याच्या बायकोवर बळजबरी केल्याची तक्रार मी स्वतः कांहीं अद्यापपर्यंत नोंदलेली नाहीं. पूर्वीं अशा गोष्टी होत असत असें म्हणतात!"

त्यानंतर डहाणूहून समुद्राच्या किनाऱ्यावरून आम्ही बोर्डीला जावयाला निघालों. सातआठ मैलांचा तो रस्ता असेल. डाव्या बाजूला समुद्राचा अफाट विस्तार पसरलेला. त्याच्या लाटांवरून वाहात येणाऱ्या वाऱ्याच्या झुळका धावत्या मोटारींमध्यें आम्हांला अधिकच आल्हादकारक वाटत होत्या. डहाणूपासून थेट उंबरगांवपर्यंत चौदापंधरा मैल समुद्राचा किनारा आहे. ह्या किनाऱ्यावरचा आमचा मोटारीमधला त्या दिवशींचा प्रवास ही सबंध आयुष्यभर टिकण्यासारखी एक आनंददायक गोष्ट आहे. वाळूवरून मोटार पूर्ण वेगानें आणि अतिशय

झपाट्यानें चालली होती. वाऱ्यामधून येणारे समुद्राचे गार तुषार अंगावर सुखाचा गोड शहारा उठवीत होते. आदल्या दिवशींच्या प्रवासांतली 'धुळवड' आम्ही त्या किनाऱ्यावरच्या प्रवासांत पार विसरून गेलों. दहा साडेदहाचे सुमारास आम्ही बोर्डीला पोहोचलों. आमचे सहकारी शामराव पाटील हे बोर्डीचेच. त्यांना अगदीं 'माहेरीं' आल्यासारखा आनंद झाला. आणि आमच्या 'त्रिविक्रमां'ची पत्नी बोर्डीला राहात होती. त्यांना तर सासुरवाडीला आल्याच्या गुदगुल्या होत होत्या.

आम्ही गेलों ते सरळ आचार्य भिसे ह्यांच्या शाळेंत. ह्या शाळेबद्दल मीं पूर्वी पुष्कळ ऐकलें होतें. पण ऐकण्यांत आणि पाहण्यांत केवळ चार बोटांचें अंतर नसून, चांगलें चाळीस-पन्नास बोटांचें अंतर आहे, अशी माझी त्या दिवशीं खात्री पटली. 'गोखले एज्युकेशन सोसायटी'ची ही बोर्डीची शाळा म्हणजे पृथ्वीवर उतरलेला 'मुलांचा स्वर्ग' आहे! इतक्या मनोहर, रमणीय आणि आल्हाददायक वातावरणांत असलेली एकहि मुलांची शाळा मीं महाराष्ट्रांत अद्यापपर्यंत पाहिली नाहीं. समोर समुद्राचा प्रचंड किनारा! त्यावरून थंडगार वाऱ्याच्या येणाऱ्या एकसारख्या झुळका! त्या झुळकांमुळें संतोषानें डोलणाऱ्या उंच उंच नारळाच्या वनांत लांब लांब अंतरावर बांधलेल्या शाळेच्या अनेक निरनिराळ्या छोट्यामोठ्या इमारती! आपण जुन्या काळचें एखादें गुरुकुलच पाहतां आहोंत कीं काय असा मला कांहीं काळ तरी साक्षात्कार झाला! साने गुरुजी ह्या वातावरणांत येऊन नेहमीं कां मुक्काम करीत असतात, ह्याचें रहस्य मला त्या दिवशीं उमगलें. महाराष्ट्रांतल्या प्रत्येक शिक्षणप्रेमी माणसानें ही शाळा एकदां तरी पाहून जावी असें एकदम मीं माझें मत बनविलें. ह्या शाळेंत शिकणारीं मुलें आणि शिकविणारे शिक्षक खरोखर भाग्यशाली होत, असे उद्गार माझ्या तोंडून आपोआप निघाले. बोर्डीहून बरोबर एक वाजतां उंबरगांवला जाण्यासाठीं आम्हांला निघावयाचें होतें. कारण, दोनच्या सुमारास समुद्राला भरती सुरू होणार होती. आणि भरती आल्यावर आम्हांला उंबरगांवला जातां आलें नसतें. म्हणून घाईघाईनें पुन्हा आम्हीं आंघोळी केल्या आणि मुलांच्या वसतिगृहांत जाऊन जेवलों. मुलांच्यासाठीं तयार केलेलें तें अन्न अमृतापेक्षांहि आम्हांला रुचकर आणि गोड वाटलें. जेवण झाल्यानंतर आचार्य चित्रे ह्यांनीं शाळेच्या परिसरांतून आम्हांला फिरविलें. मुलांसाठीं एक प्रचंड

सभागृह बांधलें जात आहे तें बघून आम्ही अतिशय खूष झालों. त्या सभागृहांत चित्रपट दाखविण्याची आणि नाटकें करण्याचीही सोय केलेली आहे. बरोबर सव्वाबारा वाजतां प्रशस्त व्यायाममंदिरांत शाळेच्या सर्व मुलांमुलींना उद्देशून मीं चाळीस-पंचेचाळीस मिनिटें भाषण केलें. हास्यानें आणि टाळ्यांनीं व्यायाममंदिर कांहीं काळ तरी दणाणून गेलें. मनमोकळेपणानें हसणाऱ्या आनंदी मुलांच्या त्या दाटीवाटीनें बसलेल्या ओळी बघून मी देहभान विसरून गेलों! उद्यांच्या भाग्यशाली भविष्याचें चित्र मीं त्यांच्या डोळ्यांसमोर उभें केलें तेव्हां हर्षभरित होऊन त्यांनीं टाळ्यांचा गजर केला! माझ्यानंतर प्रा. काणेकर ह्यांनींहि समयोचित आणि मार्मिक भाषण केलें. हा कार्यक्रम मुलांप्रमाणें आम्हांलाहि अनपेक्षितच होता. म्हणूनच त्याची गोडी निराळीच वाटली.

'जयहिंद' च्या आरोळ्यांत आम्हीं मुलांचा निरोप घेऊन किनाऱ्यावर गाडी काढली. उंबरगांवच्या जवळ आल्यावर गाडी कोणत्या ठिकाणीं वर काढावी हें आम्हांला कळेना. किनाऱ्यावरच्या एका कोळ्याच्या मुलानें भलताच रस्ता आम्हांला दाखविला. त्या रस्त्यानें आम्ही जाऊं लागलों. तोंच मोटारीचीं चाकें वाळूमध्यें एकदम रुतून बसलीं आणि आमचें सारेंच गाडें एकदम अडलें! क्षणभर माझ्या डोळ्यांसमोर तर काजवेच चमकले. कारण वाळूंत मोटार रुतून बसली म्हणजे ती बाहेर काढणें किती कठीण असतें याची मला कल्पना होती. मोटार चालू केली कीं चाकें जागच्या जागींच फिरूं लागतात आणि वाळूमध्यें तीं आणखी खोल रुतून बसतात. डाव्या बाजूनें समुद्राचें भरतीचें पाणी हळू हळू वर चढत आहे हें बघून तर आमच्या तोंडाचें पाणीच पळूं लागलें. आम्ही सारे खालीं उतरलों. आणि चाकाजवळची वाळू बाजूला काढून होतें नव्हतें तेवढें बळ एकवटून गाडी मागें ढकलली! त्याबरोबर फटकन् ती बाहेर आली. समाधानाचे केवढे सुस्कारे सोडले असतील आम्ही त्यावेळीं म्हणतां! गाडी तशीच मागें वळवून शामरावांनीं सांगितलेल्या मार्गानेंच आम्हीं ती नीटपणें वर आणली. आणि तेथून अवघ्या पांच मिनिटांत उंबरगांवचे एक प्रसिद्ध खातेदार श्री. केशवराव ऊर्फ काकासाहेब कारूळकर ह्यांच्या बंगल्यांत येऊन आम्ही दाखल झालों.

# वारली मुलुखामधली मुशाफरी : ३ :

कारूळकरांच्या बंगल्याचें आवार फारच मोठें आहे. आजूबाजूला नारळीच्चीं झाडें आहेत. बंगल्याच्या व्हरांड्यांत काकासाहेबांचे चिरंजीव भालचंद्रपंत उभे होते. त्यांनीं आमचें स्वागत केलें. भालचंद्रपंत हे काँग्रेसमन आहेत. त्यांचे एक बंधु हिंदुसभावादी आहेत. ते तेथें नव्हते. पडवींत भिंतीला अनेक फोटो लावले होते. त्यांत सुभाषचंद्र बोस, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे आद्य संस्थापक डॉ. हेडगेवार, सध्याचे सरसंघचालक गोळवलकर गुरुजी, त्याचप्रमाणें ख्रिस्ती झालेल्या वारल्यांच्या शुद्धीकरणाच्चीं अशीं अनेक चित्रें होतीं. एकंदर वातावरण हिंदुमहासभावादी घराचेंच वाटलें.

थोड्या वेळानें वृद्ध काकासाहेब बाहेर आले. त्यांची उमर सत्तरच्या आसपास असावी. दुसरे एक काँग्रेसवादी आणि खादीवेषधारी खातेदार श्री. सखारामपंत कारूळकर हे पाऊणशें वर्षांपूर्वी कोकणामधून उंबरगांवला आले होते. आज चांगल्या सधन सावकारांमध्यें त्यांची गणना होत असते. परवांच्या वारली दंगलींत त्यांचें पुष्कळच नुकसान झालें. वडवली गांवांत सखारामपंतांचें घर होतें. तें पार जळालें. त्यांच्या गवतांच्या गंजीहि जळून भस्मसात् झाल्या.

"तुम्ही वर्तमानपत्रांचे लोक फार भयंकर असतां! तुमच्याशीं बोलणें म्हणजे

प्राणसंकटच्च होय!" सखारामपंतांनीं माझ्याकडे पाहून पहिली फैर झाडली.

मी म्हणालों, "तुम्हांला आमच्या 'नवयुग'बद्दल असें बोलतां यावयाचें नाहीं. तुम्हां सावकारांना आपला दृष्टिकोन लोकांपुढें मांडावयाची 'नवयुग' नें तरी पूर्ण संधि दिली आहे!"

"तें खरें" भालचंद्रपंत म्हणाले, "पण आम्हीं पाठविलेला मजकूर तुमचीं वर्तमानपत्रें प्रसिद्ध करीत नाहींत. हा खरोखर आमच्यावर अन्याय आहे. आम्हां सावकार मंडळीवर आज अगदीं आभाळ कोसळलें आहे! सारें जग तेवढें चांगलें आणि आम्हा सावकार तेवढे पाजी, हलकट, दुष्ट अशा चोहींकडे हाकाट्या उठन आहेत."

"पण 'केसरी' देखील तुमची कड कशी घेत नाहीं?" मी मध्येंच म्हणालों.

"'केसरी' चें नांव काढू नका!" सखारामपंत दांत ओठ खाऊन गरजले. "'केसरी' बद्दल आम्हांला कांहीं एक बोलायचें नाहीं!"

एवढ्यांत वृद्ध काकासाहेबांनीं उंच स्वरांत बोलावयाला सुरवात केली, "आम्हीं सावकारांनीं ह्या वारली लोकांच्या जमिनी कर्जाच्या पोटीं घशांत घातल्या ही समजूत पार खोटी आहे. मूळ रेकॉर्ड सरकारनें जाळून टाकलें आहे. नाहीं तर तुम्हांला पाहायला मिळालें असतें. बऱ्याच जमिनी आम्हीं लिलावांत खरेदी केल्या. वारल्यांकडून सारा मिळाला नाहीं म्हणून सरकारनें त्यांच्या जमिनींचा लिलांव केला, त्याला आम्ही काय करणार? वारली लोक हे अतिशय अडाणी, भटके आणि व्यसनी आहेत. त्यांना शिकवण्यासाठीं आम्हीं शाळा काढल्या. त्यांनीं दारू पिऊं नये म्हणून तीस सालमध्यें आम्हीं पिकेटिंगची इथें मोहीम देखील काढली. हा माझा मुलगा आणि सखारामपंत पिकेटिंग करून त्यावेळीं तुरुंगांत देखील गेले. विचारा त्यांना. मी माझ्यापुरतें सांगतों. वीस सालापासून आतांपर्यंत गेलीं सत्तावीस वर्षें माझ्या जमिनीवरचीं ताडीचीं अन् शिंदीचीं झाडें मीं ताडीसाठीं दिलेलीं नाहींत. त्यामुळें माझें तीसपसतीस हजार रुपयांचें मीं नुकसान करून घेतलें आहे. तरी आम्ही सावकार वाईटच्च! दुष्काळ असतांना हजारों रुपयांचें धान्य आम्हीं या वारल्यांना वांटलेलें आहे. वाटेल त्याला जाऊन विचारा. ह्या वारल्यांना दहा रुपयांचें धोतर घेऊन दिलें तर तें कमरेला गुंडाळायच्या ऐवजीं ते डोक्याला गुंडाळतील! बेचाळीस सालीं उंबरगांव तालुका परिषद भरली. बाळासाहेब खेर अध्यक्ष होते. सभेंत जमलेल्या वारल्यांचा फोटो काढण्यासाठीं

कॅमेरा त्यांच्यासमोर धरल्यावर सारे वारली भयभीत होऊन पळून गेले. त्यांना कॅमेरा म्हणजे मशीनगनच वाटली. ही तर त्यांची अक्कल !"

"वारली लोकांनीं ही दंगल केली त्याला जबाबदार कोण असावें असें तुम्हांला वाटतें?" नेवाळकरानीं विचारलें.

"ही दंगल कम्युनिस्टांनीं घडवून आणली हें खरें. तथापि कम्युनिस्टां-मध्यें आणि आदिवासी मंडळाच्या कॉंग्रेसवाल्यांमध्यें आम्हांला तरी फारसा फरक दिसत नाहीं !" काकासाहेब म्हणाले, "कॉंग्रेसची पद्धति सन्मार्गाची आहे आणि कम्युनिस्टांची पद्धति असन्मार्गाची आहे. कम्युनिस्ट अत्याचार करावयाला सांगतात; कॉंग्रेसवाले सांगत नाहींत. परंतु आमच्यावर अत्याचार झाले तर कॉंग्रेसवाल्यांना त्याची फारशी क्षितीहि वाटत नाहीं. जमिनीवरचा आमचा मालकी हक्क नष्ट करून टाकण्याच्या बाबतींत मात्र हे कम्युनिस्ट आणि कॉंग्रेसवाले अगदीं एक आहेत हें मी तुम्हांला सांगतों ! अत्याचार होऊं लागले आणि जमिनीवरचीं कामें जेव्हां आमचीं थांबलीं तेव्हां आम्हीं मोरारजीभाईंना अनेक पत्रें लिहिलीं कीं, 'आमच्या जीविताचें आणि मालमत्तेचें तरी तुम्ही संरक्षण कराल कीं नाहीं ? बाकीचें राहूं द्या.' पण कोणी आमची दाद घेतली नाहीं. पुढें एके दिवशीं त्यांनींच आपण होऊन गोळीबार केला. आम्हीं त्यांना थोडेंच गोळीबार करायला सांगितलें ? आमच्या म्हणण्याप्रमाणें आधींपासून ह्यांनीं काळजी घेतली असती तर गोळीबाराच्या थरापर्यंत गोष्टी मुळींच गेल्या नसत्या !"

त्यानंतर सखारामपंतांनीं बोलायला सुरुवात केली, "आम्हीं ह्या वारल्यांना गुलामगिरींत ठेवतों आणि त्यांना छळतों असें सांगण्यांत येतें. पण खरी परिस्थिति फार निराळी आहे. खावटीसाठीं आम्ही त्यांना धान्य देतों. आणि त्याची दिढी त्यांच्याकडून आम्ही वसूल करतों. त्याखेरीज त्यांच्याकडून चवळी, मूग, भोपळा, काकडी आम्ही मागतों—"

"एक भोपळा त्यांनीं तुम्हांला दिला नाहीं तर तुम्ही एक फरा भात जास्त वसूल करतां !" मी मध्येंच म्हणालों.

"अहो, तो आम्ही त्यांना नुसता धाक दाखवितों !" सखारामपंत म्हणाले; "हिशेबामध्यें त्याच्या नांवावर नुसते फरे वाढवून काय उपयोग ? प्रत्यक्ष वसुलीची वेळ आली म्हणजे हें धान्य देतोय् कोण आणि घेतोय् कोण ? शेतांत

वीस भोपळे पिकवले आणि त्या वीस भोपळ्यांपैकीं एका भोपळ्याची आम्हीं आशा धरली तर एकदम आम्ही वाईट कसे ठरतों? सरकार ह्यांना जेव्हां खावटी देतें, तेव्हां दोन साक्षीदार आणि एक पाटील इतक्यांच्या सह्या लागतात. तसें तर आम्हीं करीत नाहीं! आमचा सारा तोंडी कारभार. आतां लग्नाला आम्ही ह्यांना पैसे देतों आणि त्याच्या बदली आम्ही ह्यांना सालीना वीस रुपये नी तीस रुपये पगार देऊन दहापंधरा वर्षें गुलामगिरींत ठेवतों, असें तुम्ही म्हणतां! तुम्हांला या लग्नगड्यांचे वर्षाचे वीस रुपये तेवढे दिसतात. पण त्यांना पोटाला भरपूर आम्ही खायला देतों, कपडे देतों, तें मात्र तुम्हांला दिसत नाहीं! आमच्या घरांत ह्यांना कोणत्याहि गोष्टीची कमतरता नसते. बरें, हे आजारी पडले तर बाप भाऊ कोणी बदलीहि देत नाहींत. महिनेंचे महिने ही न विचारतां घरीं बसतात. बरें, लग्नाचें कर्ज बुडवून मध्येंच पळून जाणाऱ्या लग्नगड्यांचीं उदाहरणें मी तुम्हांला किती देऊं? म्हणून कांहीं आम्हीं त्यांच्यावर कोर्टांत कधीं फिर्यादी केल्या आहेत म्हणतां काय? मुळींच नाहीं. पुढच्या गवतकापणीबद्दल हजारों रुपयांच्या रकमा आम्हीं ह्यांना अंगावर दिलेल्या आहेत. इतकेंहि असून आम्ही सावकार तेवढे वाईट! ‘अजापुत्रं बलिं दद्यात्!’’ बोलतां बोलतां सखारामपंत चांगलेच गरम झाले होते. ते चढ्या आवाजांत पुढें म्हणाले, “मागें गव्हर्नरसाहेब इथें आले होते तेव्हां या तुमच्या साव्यांनीं ह्या वारल्यांकडून छापील अर्ज करून घेतले, आणि सावकार आमच्याकडून जास्त खंड घेतात तो कमी करण्यांत यावा, अशी गव्हर्नरांना मागणी केली. माझ्याहि दोनचार कुळांनीं त्या अर्जावर सह्या केल्या होत्या. गव्हर्नरसाहेबांनीं जेव्हां त्यांच्या झोपड्या तपासल्या, तेव्हां खंड वजा करून प्रत्येकाजवळ चार-चार पांच-पांच हारे धान्य शिल्लक असल्याचें आढळून आलें! सांगायची गोष्ट ही कीं आमचा वांटा देऊनहि ह्यांच्याजवळ धान्य पुष्कळ उरतें! आतां ताडी-दारूमध्यें त्यांची ही बचत फस्त होते त्याला आम्हीं काय करावयाचें?”

“ह्या वारल्यांना पैसे कमी मिळतात अशी तुमची समजूत आहे काय?” काकासाहेब मध्येंच म्हणाले, “गेल्या दहा वर्षांत हा लाकूडतोडीचा, कोळशाचा आणि गवतकापणीचा धंदा अतोनात वाढलेला आहे. महिना पंचवीस लाख रुपये उत्पन्न वाढलेलें आहे. त्यांपैकीं मजुरीच्या आणि वाहतुकीच्या निमित्तानें कमींत कमी दहा लाख रुपये तरी ह्या वारल्यांच्या घरांत जातात! मग हे

पैसे कुठें फस्त होतात ?" त्यानंतर आम्हीं कुळकायद्याबद्दल जेव्हां बोलायला सुरवात केली, तेव्हां काकासाहेब आणि सखारामपंत खूपच उसळले.

काकासाहेब म्हणाले, "'मेजर क्रॉप'पैकीं एक-तृतीयांश हिस्सा खंड म्हणून कुळानें आम्हांला द्यावा, असें हा तुमचा कुळकायदा सांगतो. प्रत्यक्ष पीक कमी झालें, तर whichever is less ची सोडवणूक तुम्हीं ठेवलीच आहे. 'मेजर क्रॉप' म्हणजे काय ह्याबद्दल तुमचें मत नक्की ठरलेलें नाहीं. कमिशनरचा हुकूम एक, मामलेदार म्हणतो दुसरें; वांद्रेकर म्हणतात तिसरें आणि ते पार्लमेंटरी सेक्रेटरी कुठं आले होते त्यांचें म्हणणें चवथें! अशा परिस्थितींत आम्हीं करायचें काय ?"

"मजुरीबाबत तुमचें म्हणणें काय आहे ?" नेवाळकरांनीं तो विषय बदलून विचारलें.

"त्याबद्दल आमचें म्हणणें एवढेंच—" सखारामपंत म्हणाले, "कीं तुम्ही मजुरीचे काय दर ठरवणार असाल ते ठरवा. आम्ही तीन रुपये काय, पण चार रुपये देखील मजुरी द्यावयाला तयार आहोंत. पण मजुरीचे दर एकदां तुम्हीं ठरविले कीं, ह्या वारल्यांकडून तुम्हीं सक्तीनें काम करून घ्यावयाला पाहिजे. पण त्याला हे 'आदिवासी कार्यकर्ते' तयार नाहींत! त्यांना सक्ती नको! कांहीं तरी सक्ती केल्यावांचून हे वारली शेतावर कामं करणार नाहींत, आणि त्याखेरीज जमिनीचें उत्पादन तुम्हांला वाढवून दाखवितां यावयाचें नाहीं. स्वभावतः हे वारली अत्यंत आळशी आहेत. उपलाट येथें ह्यांना सरकारनें प्लॉट दिले आहेत. ते तुम्ही जाऊन बघा. म्हणजे त्यांनीं तिथें जमिनीचा मगदूर कसा कमी करून ठेवला आहे तें तुम्हांला कळून येईल!"

हा वादविवाद चालू असतां काकासाहेबांच्या नातवानें अंगणांतल्या नारळीचीं मोठमोठीं शहाळीं काढून तीं आम्हांला प्यावयास दिलीं. दोन शहाळ्यांनीं माझें पोट तर अगदीं गळ्यापर्यंत भरून गेलें. वादविवादाला निराळीच कलाटणी देण्याच्या हेतूनें मीं मध्येंच एक बॉंबगोळा टाकला. मी हळूच म्हणालों, "पण काय हो, ह्या वारल्यांच्या बायांवर तुम्ही सावकार लोक बळजबरी किंवा अत्याचार करतां हें खरें आहे काय ?"

माझी कल्पना बरोबर ठरली. बॉंबगोळ्याचा भला मोठा स्फोट व्हावा तसे तीन्ही कारूळकर एकदम आमच्यावर उसळून उठले. "साफ खोटं आहे तें!

आमचें आव्हान आहे तुम्हांला, एक अत्याचार तुम्ही आमच्याविरुद्ध सिद्ध करून दाखवा !" काकासाहेब तारस्वरांत ओरडले, "तुम्हांला कल्पना नाहीं, बायकांच्या बाबतींत हे वारली लोक भयंकर आहेत! त्यांच्या बायकांशीं कुणीं फाजीलपणा केला तर ते त्याचा खून करतात खून! काय चेष्टा आहे? आतांपर्यंत एका सावकाराचा तरी असा खून झाला आहे? उलट बायकांच्या प्रकरणांवरून ह्यांच्यामध्यें अनेक खून होत असलेले मी तुम्हांला दाखवून देतों. परवांच इथें एक प्रकार घडला. एका वारल्याचा त्याच्या बहिणीशीं संबंध होता. ती गोष्ट उघडकीस आल्याबरोबर दोघांनींहि गळफांस लावून घेऊन आत्महत्या केली. आपल्या बायकांच्या अब्रूच्या बाबतींत हे लोक फार हळवे आणि मानी आहेत!"

बराच वेळ कोणी कांहीं बोललें नाहीं. वातावरणांतला गरमपणा थोडा कमी झाल्यावर सखारामपंतांनीं बोलावयास सुरुवात केली, "आणि समजा, पूर्वी आमच्या आजोबांच्या-पणजोबांच्या हातून कांहीं कमीजास्त झालं असेल तर त्यांच्या पापाबद्दल तुम्ही आम्हांला कां शिक्षा देतां? 'अजापुत्रं बलिं दद्यात्' असें कां? आम्हीहि माणसें आहोंत. आम्हाला बायका आहेत, मुलें आहेत. आमचे हक्क बुडवायला आम्ही कां म्हणून तयार होऊं? वारल्यांच्या प्रगतीच्या आड आम्ही मुळींच येत नाहीं. त्यांच्या प्रगतीला आमच्याकडून शक्य तितकी मदत करायला आम्ही तयार आहोंत. पण आमच्या न्याय्य हक्कांवर तुम्ही पाणी ओतूं नका! प्रांतिक निवडणुकींत तुम्ही आमचीं मतं मागायला जेव्हां आलांत तेव्हां, आमचीं वतनें खालसा करणार आहांत असें आम्हांला सांगितलें असतं, तर आम्हीं कॉंग्रेसला मतं दिलीं असतीं होय!"

बोलतां बोलतां सखारामपंतांचा सूर खूपच वाढला. वादाला आतां निराळाच रंग लागतो आहे असें पाहतांच आम्ही चर्चा थांबविली आणि उठलों. "तुम्हां सावकारांच्या विरुद्ध एकतर्फी आणि अतिशयोक्त असें जें चित्र बाहेर रेखाटलें जातें, त्याला दुसरी चित्य बाजू आहे हें तुमच्याशीं चर्चा केल्यानें मला पटलें. 'नवयुग'च्या वाचकांपुढें तुमची ही बाजू मी अवश्य ठेवीन!" असें त्यांचा निरोप घेतां घेतां मीं त्यांना आश्वासन दिलें. त्यानंतर सावकाराचें 'आवार' काय असतें तें आम्हांला प्रत्यक्ष पाहण्याची इच्छा झाली होती. म्हणून कारूळकरांकडून एक वारली गडी बरोबर घेऊन आम्ही पेठे सावकारांच्या आवाराकडे जायला निघालों.

यावेळीं चार-साडेचारचा सुमार झाला असेल. कारूळकरांच्याहीपेक्षां पेठे हे

मोठे सावकार आहेत. कारूळकरांच्याविरुद्ध आम्हांला कुळांच्या तक्रारी मुळींच आल्या नव्हत्या. तथापि पेठ्यांच्या बद्दल बरीचशी कागकूग ऐकूं येत होती. आणि त्यांच्या आवारावर गुंडांचा मोठ्या प्रमाणावर हल्ला झाला होता. म्हणून त्यांचें आवार डोळ्यांखालीं घालून येण्याची आम्हांला उत्सुकता वाटत होती. पेठ्यांचें आवार वासें येथें आहे. आम्ही उंबरगांवाहून गिरिगांव, वासें, झरी ह्या गांवांच्या रोखानें निघालों. बोर्डीहून निघतांना आमच्या 'त्रिविक्रम'च्या पत्नीनें गरम गरम, खमंग बटाटेपोह्यांचा एक डबा भरून दिलेला होता. गिरिगांवला आम्ही आलों तोंच त्यांनीं त्या पोह्यांची आम्हांला आठवण करून दिली. त्याबरोबर आमच्या तोंडांना अगदीं पाणी सुटल्यासारखें झालें. म्हटलें, वाटेंत कुठं तरी थांबून पोह्यांचे दोन दोन बकाणे मारावेत आणि थंडगार पाणी पिऊन मग पुढें मार्गक्रमण करावें. असा विचार मनांत यायला आणि उजव्या बाजूला एका शेतामध्यें झोपडीच्या वऱ्हांड्यांत एक तरुण वारली स्त्री उभी असलेली दिसायला एकच गांठ पडली. त्याबरोबर एकदम आम्ही गाडी थांबविली.

मीं म्हटलें, "अहो, ही वारली 'शकुंतला' घरांत एकटीच दिसते आहे. तिचा 'कण्वबाबा' आसपास कोणी दिसत नाहीं. चला तर तिच्या झोपडींत. बघूं द्या ती आपलें आदरातिथ्य कसें करते आहे तें!" काणेकर म्हणाले, "आतांपर्यंत एकस्या वारली स्त्रीची आपण कधींच मुलाखत घेतलेली नाहीं. मला बघायचंय् ह्या स्त्रिया आपल्याशीं बोलतांना लाजतात कीं काय तें!"

आम्ही झोपडीजवळ जातांच ती वारली तरुणी चटकन् दाराच्या आड होऊन एखाद्या 'आर्यकन्यके' प्रमाणें विनम्रवदन झाली.

"कोणाचा पाडा ग हा?" शामरावांनीं विचारलें.

"शिपू कारूळकराचा!" ती आंतून मधुर आवाजांत म्हणाली.

"गोहो (पुरुष) कुणी नांगत नाहींत ते?"

"कामावर गेलेत!" तिनें सांगितलें.

एवढ्या वेळांत आम्हीं स्वच्छ सारवलेल्या पडवींत तळ ठोकला आणि समोर पोह्यांचा डबा उघडून ठेविला.

"पाणि पियाचं (प्यायचं) आहे ग!" आम्ही म्हणालों. त्याबरोबर स्वच्छ पितळेच्या भांड्यांत तिनें पाणी आणून दिलें. आम्ही एकमेकांकडे आश्चर्यानें पाहिलें! म्हणजे काल भेटलेल्या रावजी देवजी धोद्यासारख्या 'आदर्श वारल्या'-

आमचें आव्हान आहे तुम्हांला, एक अत्याचार तुम्ही आमच्याविरुद्ध सिद्ध करून दाखवा !" काकासाहेब तारस्वरांत ओरडले, "तुम्हांला कल्पना नाहीं, बायकांच्या बाबतींत हे वारली लोक भयंकर आहेत! त्यांच्या बायकांशीं कुणीं फाजीलपणा केला तर ते त्याचा खून करतात खून ! काय चेष्टा आहे ? आतांपर्यंत एका सावकाराचा तरी असा खून झाला आहे ? उलट बायकांच्या प्रकरणांवरून ह्यांच्यामध्यें अनेक खून होत असलेले मी तुम्हांला दाखवून देतों. परवांच इथें एक प्रकार घडला. एका वारल्याचा त्याच्या बहिणीशीं संबंध होता. ती गोष्ट उघडकीस आल्याबरोबर दोघांनींहि गळफांस लावून घेऊन आत्महत्या केली. आपल्या बायकांच्या अब्रूच्या बाबतींत हे लोक फार हळवे आणि मानी आहेत !"

बराच वेळ कोणी कांहीं बोललें नाहीं. वातावरणांतला गरमपणा थोडा कमी झाल्यावर सखारामपंतांनीं बोलावयास सुरुवात केली, "आणि समजा, पूर्वी आमच्या आजोबांच्या-पणजोबांच्या हातून कांहीं कमीजास्त झालं असेल तर त्यांच्या पापाबद्दल तुम्ही आम्हांला कां शिक्षा देतां ? 'अजापुत्रं बलिं दद्यात्' असें कां ? आम्हीहि माणसें आहोंत. आम्हाला बायका आहेत, मुलें आहेत. आमचे हक्क बुडवायला आम्ही कां म्हणून तयार होऊं ? वारल्यांच्या प्रगतीच्या आड आम्ही मुळींच येत नाहीं. त्यांच्या प्रगतीला आमच्याकडून शक्य तितकी मदत करायला आम्ही तयार आहोंत. पण आमच्या न्याय्य हक्कांवर तुम्ही पाणी ओतूं नका ! प्रांतिक निवडणुकींत तुम्ही आमचीं मतें मागायला जेव्हां आलांत तेव्हा, आमचीं वतनें खालसा करणार आहांत असें आम्हांला सांगितलें असतें, तर आम्हीं कॉंग्रेसला मतें दिलीं असतीं होय !"

बोलतां बोलतां सखारामपंतांचा सूर खूपच वाढला. वादाला आतां निराळाच रंग लागतो आहे असें पाहतांच आम्ही चर्चा थांबविली आणि उठलों. "तुम्हां सावकारांच्या विरुद्ध एकतर्फी आणि अतिशयोक्त असें जें चित्र बाहेर रेखाटलें जातें, त्याला दुसरी चिंत्य बाजू आहे हें तुमच्याशीं चर्चा केल्यानें मला पटलें. 'नवयुग'च्या वाचकांपुढें तुमची ही बाजू मी अवश्य ठेवीन !" असें त्यांचा निरोप घेतां घेतां मीं त्यांना आश्वासन दिलें. त्यानंतर सावकाराचें 'आवार' काय असतें तें आम्हांला प्रत्यक्ष पाहण्याची इच्छा झाली होती. म्हणून कारूळकरांकडून एक वारली गडी बरोबर घेऊन आम्ही पेठे सावकारांच्या आवाराकडे जायला निघालों.

यावेळीं चार-साडेचारचा सुमार झाला असेल. कारूळकरांच्याहीपेक्षां पेठे हे

मोठे सावकार आहेत. काल्ळकरांच्याविरुद्ध आम्हांला कुळांच्या तक्रारी मुळींच आल्या नव्हत्या. तथापि पेळ्यांच्या बद्दल बरीचशी काणकूण ऐकूं येत होती. आणि त्यांच्या आवारावर गुंडांचा मोठ्या प्रमाणावर हल्ला झाला होता. म्हणून त्यांचें आवार डोळ्यांखालीं घालून येण्याची आम्हांला उत्सुकता वाटत होती. पेळ्यांचें आवार वासें येथें आहे. आम्ही उंबरगांवाहून गिरिगांव, वासें, झरी ह्या गांवांच्या रोखानें निघालों. बोर्डीहून निघतांना आमच्या 'त्रिविक्रम'च्या पत्नीनें गरम गरम, खमंग बटाटेपोह्यांचा एक डबा भरून दिलेला होता. गिरिगांवला आम्ही आलों तोंच त्यांनीं त्या पोह्यांची आम्हांला आठवण करून दिली. त्याबरोबर आमच्या तोंडांना अगदीं पाणी सुटल्यासारखें झालें. म्हटलें, वाटेंत कुठें तरी थांबून पोह्यांचे दोन दोन बकाणे मारावेत आणि थंडगार पाणी पिऊन मग पुढें मार्गक्रमण करावें. असा विचार मनांत यायला आणि उजव्या बाजूला एका शेतामध्यें झोपडीच्या वऱ्हांड्यांत एक तरुण वारली स्त्री उभी असलेली दिसायला एकच गांठ पडली. त्याबरोबर एकदम आम्ही गाडी थांबविली.

मीं म्हटलें, "अहो, ही वारली 'शकुंतला' घरांत एकटीच दिसते आहे. तिचा 'कण्वबाबा' आसपास कोणी दिसत नाहीं. चला तर तिच्या झोपडींत. बघूं या ती आपलें आदरातिथ्य कसें करते आहे तें!" काणेकर म्हणाले, "आतांपर्यंत एकाद्या वारली स्त्रीची आपण कधींच मुलाखत घेतलेली नाहीं. मला बघायचंय् ह्या स्त्रिया आपल्याशीं बोलतांना लाजतात कीं काय तें!"

आम्ही झोपडीजवळ जातांच ती वारली तरुणी चटकन् दाराच्या आड होऊन एखाद्या 'आर्यकन्यके' प्रमाणें विनम्रवदन झाली.

"कोणाचा पाडा ग हा?" शामरावांनीं विचारलें.

"शिपू काल्ळकराचा!" ती आंतून मधुर आवाजांत म्हणाली.

"गोहो (पुरुष) कुणी नांगत नाहींत ते?"

"कामावर गेलेत!" तिनें सांगितलें.

एवढ्या वेळांत आम्हीं स्वच्छ सारवलेल्या पडवींत तळ ठोकला आणि समोर पोह्याचा डबा उघडून ठेविला.

"पाणि पियाचें (प्यायचं) आहे ग!" आम्ही म्हणालों. त्याबरोबर स्वच्छ पितळेच्या भांड्यांत तिनें पाणी आणून दिलें. आम्ही एकमेकांकडे आश्चर्यानें पाहिलें! म्हणजे काल भेटलेल्या रावजी देवजी घोशासारख्या 'आदर्श वारल्या'-

त्याच घरांत स्वच्छ भांडीं आढळतात असें नाहीं तर! दुसऱ्याहि सामान्य वारल्यांच्या घरांत अशींच भांडीं आढळतात! पोह्याच्या दोन मोठ्या मुठी भरून मीं त्या बाईला दिल्या. अन् म्हणालों, "खा बाई, चांगले पोहे आहेत हे!" माझी कल्पना अशी कीं ती बाई आमच्या देखत ते पोहे बकाबका खाऊन टाकील. पण नाहीं. चटकन् घरांत जाऊन ती ते पोहे ठेवून आली.

इतक्यांत आजूबाजूच्या झोपड्यांतलीं बरींचशीं लहान लहान मुलें अंतरावर जमा झालीं. वारल्यांचा कितीहि लहान मुलगा किंवा मुलगी असो, तीं अगदीं नागवीं अशीं कधीं फिरत नाहींत. चिंधीच्या लहानशा तरी लंगोट्या आवळून करकचून तीं बांधतातच. सर्व मुलांच्या अंगाला खरूज झालेली होती. आणि पोटें नगाऱ्यासारखीं बाहेर आलेलीं होतीं. पंचवीस वर्षांपुढच्या वारल्यांच्या बायकांचींहि पोटें सामान्यपणें फुगलेलीं असतात आणि त्यांच्या बेंब्या उघड्या पडलेल्या असतात. ताडी प्याल्यामुळें, कीं वातुळ वाल खाल्ल्यामुळें, कीं पानथऱ्यामुळें त्यांचीं पोटें अशीं फुगलेलीं असतात हें कळत नाहीं. वारली मुलांना शामराव जवळ बोलावूं लागले. "ये दादू (बाळ), ये, ये, तुला खायला देतों!" मीं पोह्यांच्या मुठी जेव्हां त्यांना दाखविल्या, तेव्हां एकेक 'दादू' हळू हळू जवळ येऊं लागला. प्रत्येकजण पोह्याची एकेक मूठ घेऊन गेला. खायला मिळाल्यामुळें त्यांना आनंद झाला होता किंवा कसें हें कळायला मार्ग नव्हता. कारण वारली मुलें मोठमोठ्यानें हसत नाहींत किंवा जोरजोरानें उड्या मारीत नाहींत. वयातीत माणसाप्रमाणें त्यांचेहि चेहरे गंभीर आणि अबोल असतात. पोहे खाल्ल्यानंतर आम्ही पाणी प्यालों आणि त्या वारली स्त्रीच्या झोपडीचें आंत जाऊन निरीक्षण केलें. रामजीच्या झोपडीइतकी ती कांहीं चांगली नव्हती. तथापि, अगदीं वाईट म्हणण्याइतकी ती अव्यवस्थित पण नव्हती. वारल्यांच्या झोपडीमधलें वातावरण थोड्याफार फरकानें तेंच असतें. आपल्याकडे खेडेगांवांत गरीब कुणबी शेतकऱ्यांच्या घरांत जें दृश्य दृष्टीस पडतें, तसाच साधारणपणें ह्या वारल्यांच्या झोपड्यांमधला देखावा असतो. वारली स्त्रीचा निरोप घेऊन आम्ही मोटारींत येऊन बसलों. व पुढें निघालों.

"तुम्हीं कांहीं म्हणा काणेकर," मी म्हणालों, "हे वारली लोक कातकरी, ठाकूर किंवा कातवडी लोकांइतके जीवनाच्या प्राथमिक अवस्थेंत आहेत असें मला वाटत नाहीं!"

"त्यांची कांहीं तरी एक निश्चित संस्कृति आहे हें अगदीं उघड आहे!" काणेकर उद्गारले.

"निकृष्ट अवस्थेंतले कातकरी अजूनहि कदाचित् आपण पाहिले नसतील!" नेवाळकरांनीं शंका काढली.

दहापंधरा मिनिटांच्या आंतच आम्ही डोलार पाड्याला आलों. तेथें रस्त्यावर एका मोठ्या वडाच्या झाडाखालीं ताडीचा मांडव होता. आजूबाजूलाहि पुष्कळशी झाडी होती. रस्त्यावर दोन तीन मोटार लॉऱ्या उभ्या होत्या. आणि माणसांची थोडीशी गर्दीहि दिसत होती. रस्त्याच्या डाव्या बाजूला अंतराअंतरावर निरनिराळ्या झाडाखालीं ताडीचीं मडकीं मध्यें ठेवून वारली स्त्रीपुरुषांचीं लहानलहान वर्तुळें ताडीपान करण्यांत गुंग होऊन गेलीं होतीं. तें सगळेंच दृश्य आम्हांला मोठें आकर्षक वाटलें. मोटार थांबवून आम्ही ताबडतोब बाहेर आलों आणि सरळ एका वारल्यांच्या टोळक्याजवळ जाऊन ती गंमत पाहात उभे राहिलों. आम्हांला आलेले बघून त्यांना मुळींच संकोच वाटला नाहीं. उलट तारवटलेल्या डोळ्यांनीं आणि जडावलेल्या ओठांनीं हसून त्यांनीं आमचें स्वागत केलें. वारल्याची ताडी पिण्याची एक विशिष्ट पद्धत असते. एक माणूस ताडीचें मडकें हातांत घेऊन भोवतालच्या लोकांना ताडी 'वाढीत' असतो. पिणारा माणूस हातांत वडाचें लहानसें पान घेऊन तें दोन्ही बाजूंनीं दुमडून त्याचा एक लहानसा द्रोण बनवितो. सुरवातीला ओतलेली थोडीशी ताडी तो जमिनीवर सांडून देतो. 'धरित्री माते'ला जणुं कांहीं तो नैवेद्यच म्हणावयाचा. पण त्यानंतर त्यानें घटाघटा ताडी प्यायला एकदां का सुरवात केली म्हणजे ताडीचा एक थेंबदेखील तो खालीं सांडायचा नाहीं. चांगलें दोनतीन मिनिटें अखंड त्याचें ताडीपान चालतें. मग तो आपलें पान फेकून देतो, आणि ताडी वाढणारा इसम दुसऱ्या माणसाकडे वळतो. ताडी पिणाऱ्या वारल्यांचीं जीं निरनिराळीं वर्तुळें बसलीं होतीं त्यांमध्यें पुरुष होते, स्त्रिया होत्या, पांच-पांच वर्षांचीं मुलें देखील होतीं. सर्वांचें सरास ताडी पिणें चाललें होतें. ताडीच्या एका मडक्याला आठ आणे पडतात. त्यामध्यें निदान चार बाटल्या तरी ताडी असेल. एका वर्तुळांत शेकोटी पेटवून ताडी गरम करण्याचें काम चाललेलें होतें. मीं तिथें जाऊन विचारलें, "काय रे, तुम्ही ताडी गरम करून कां पितां? गरम केलेली ताडी डोक्यांत जास्त चढते कीं काय?" माझा प्रश्न ऐकून दोन वारली मजेदार रीतीनें हसले. जणुं कांहीं माझी शंका त्यांना पटली होती. तथापि

त्यांतला एक वृद्ध वारली गंभीर चेहरा करून म्हणाला, "गरम केलेली ताडी पोटाला चांगली असते. पोटांत गुबारा धरत नाहीं!" दुसऱ्या एका वर्तुळामध्यें विस्तव धुमसत होता. पण त्या विस्तवाच्या पोटांत एक लांबलचक मासा घालून, तो कधीं भाजून तयार होतो आहे ह्याची ते वारली लोक जिभल्या चाटीत वाट पाहात होते.

इतक्यांत तीन झिंगलेल्या तरुण मुली एकमेकींच्या गळ्यांत हात घालून डोलत येत असलेल्या आम्हांला दिसल्या. त्यांचीं वयें सोळासतराच्या आसपास असतील. उरोभागावर पदर घेतला नव्हता, त्यामुळें त्या अविवाहित होत्या हें उघडच होतें. त्यांनीं लालभडक आंखूड लुगडीं नेसलेलीं होतीं आणि गुलाबी चोळ्या अंगांत घातल्या होत्या. त्यांच्या गळ्यांत मण्यांच्या पुष्कळशा माळा होत्या. आणि गळसरीचे लांबलचक लोकरी आणि हेमरंगी गोंडे त्यांच्या पाठीवर लोंबत होते. त्यांनीं केसांमध्यें 'पिना' खोचल्या असून व्यवस्थितपणें बांधलेल्या बुचड्यांवर झेंडूच्या फुलांच्या वेण्या घातलेल्या होत्या. वर्णानें त्या सावळ्याच होत्या, पण त्यांचे नाकडोळे ठसठशीत आणि रेखीव होते. पांढरपेशा पुरुषांचींहि मनें आकर्षित करण्याइतकी सौंदर्याची भरपूर सामग्री त्यांच्याजवळ होती. अविवाहित मुलीला वारली भाषेंत 'लोठी' म्हणतात. त्या तीन लोठ्यांकडे आम्हीच बघूं लागलों असें नाहीं. बरेचसे लोक ताडीपान थांबवून त्यांना न्याहाळूं लागले. चार-पांच वारली तरुण तर त्यांच्या आजूबाजूला अधाशी चेहऱ्यांनीं एकसारखे घोटाळत होते. मीं नेवाळकरांना हळूच म्हटलें, "सुंदर वारली मुली पाहिल्यावर सावकार लोकांच्या उडाणटप्पू पोरांच्या तोंडाला पाणी सुटत असावें यांत मला तर कांहीं आश्चर्य वाटत नाहीं!" कांहीं वेळानें त्या मुली रमत गमत शेजारच्या एका पाड्याकडे निघून गेल्या. तेथें त्या दिवशीं एक लग्न होतें म्हणून बरेंचसें वऱ्हाड तेथें जमलें असल्याचें आम्हांला पुढें कळलें.

त्यानंतर ताडीनें झिंगलेल्या वारल्यांकडून आम्हांला हवी असलेली माहिती मिळते आहे कीं नाहीं तें पाहायला आम्ही लागलों. एका वृद्ध वारल्याच्या हातावर मीं एक रुपया ठेवला, आणि त्याला आमच्या नांवानें मजा करावयास सांगितलें. त्याच्याभोवतीं पांच-सहा वारली जमा झाले. मीं तो रुपया त्याला कां दिला, ह्याचा त्यांपैकीं एकालाहि बोध होईना. त्यांना त्या रुपयाची ताडी प्यायला आम्ही सांगतों आहोंत, कीं आमच्यासाठीं त्या रुपयाची ताडी घेऊन यावयाला आम्ही

त्यांना सांगतों आहांत, याचा कांहीं त्यांना उलगडा होईना! चांगला दहा-पंधरा मिनिटें ते घोळ घालून बसले. दोन-चार वेळां तर त्या म्हाताऱ्यानें तो रुपया मला परतच करून टाकला. पण पुन्हा मी त्याला तो रुपया परत द्यायचा आणि त्याची ताडी प्यायला मी त्याला सांगायचें. ताडी पिण्यासाठीं फुकटचा रुपया कोणीतरी आपल्याला देऊं शकतें, ह्या गोष्टीचा त्याला मुळीं अनुभवच नव्हता. म्हणून त्यांचा असा घोटाळा उडाला. शेवटीं त्या म्हाताऱ्याच्या डोळ्यांत प्रकाश पडला. देवाचें नांव घेऊन तो माझ्या पायां पडूं लागला. कृतज्ञतेच्या जाणिवेनें त्याचा चेहरा एकदम उजळल्यासारखा मला दिसला. त्या 'सत्कृत्या'मुळें आमची आणि त्या वारल्यांची एकदम दोस्ती जडली आणि मग जमिनीवर बसून आम्हीं त्यांच्याशीं मन मोकळें करून गप्पा मारूं लागलों.

एका वृद्ध वारल्यानें, आपल्याला सावकारानें एकदां काठीनें कसें बेदम चोपून काढलें, याचें वर्णन डोळ्यांत पाणी आणून सांगितलें. मजुरीबद्दल बोलतांना तो म्हणाला, "अहो, सध्यांचें काय घेऊन बसलां आहांत? पूर्वीं आम्हांला आठ दिवसांच्या कामाबद्दल एक आणा मजुरी मिळत असे! आहांत कुठं?"

"गोदाराणी पाहिली काय रे तुम्हीं?" ह्या आमच्या प्रश्नाला कोणींच उत्तर दिलें नाहीं. एकानें कम्युनिस्टांच्या सभेला गेल्याचें कबूल केलें, पण तिथें त्यांनीं काय सांगितलें तें आपल्याला मुळींच आठवत नाहीं असें तो म्हणाला. दुसऱ्या एका टोळक्यांत एक वीसबावीस वर्षांचा चुणचुणीत वारली तरुण बसला होता. त्यानें डोक्यावर केस राखले होते. आणि त्याची शेंडी इतर वारल्यांच्या मानानें पातळ होती. आमचें इकडे बोलणें चाललें असतांना तो हळूच आमच्यामध्यें येऊन मिसळला. मीं विचारलें,

"काय रे, सावकाराच्या हातून जमिनी काढून त्या तुम्हांला देऊन टाकल्या तर तुम्हांला आनंद होईल कीं नाहीं?"

त्याबरोबर तो चलाख वारली तरुण मध्येंच म्हणाला,

"साहेब, आम्ही गांडे (मूर्ख) लोक. आम्हांला काय त्यांतलं कळतंय्? इंग्रज सरकार येवो, कॉंग्रेस सरकार येवो, नाहींतर 'कम्युनिस्ट पार्टी' येवो! आम्ही आपले हे असेच अडाणी राहणार!"

'कम्युनिस्ट पार्टी' असा शुद्ध आणि स्वच्छ उच्चार त्याच्या तोंडून बाहेर पडलेला ऐकून आम्ही अगदीं चाट झालों आणि आश्चर्यानें त्याच्या तोंडाकडे

टकाटका पाहूं लागलों. पण पुढें आम्ही त्याच्याशीं कांहीं बोलणार तोंच आम्हांला गुंगारा देऊन तो तरातरा चालता झाला. 'कम्युनिस्ट वारल्यांपैकीं तर हा नसेल ना!' काणेकरांच्या डोक्यांत एकदम शंका आली.

त्रिविक्रम म्हणाले, "आपल्या एका महाराष्ट्रीय कॉंग्रेस पुढाऱ्याचा पुतण्या 'लालभाई' आहे. तो वारल्यासारखा पोषाख करून ह्या भागांत हिंडत असतो असें म्हणतात. तो तर नसेल ना हा?"

मी म्हणालों, "त्याची शेंडी ओढून बघितली पाहिजे. म्हणजे कळून येईल कीं ती खरी आहे का चिकटवलेली आहे!" अशा तऱ्हेनें त्या तरुण वारल्यानें आपल्या एका उत्तरानें आमच्या अंतःकरणांत खूपच खळबळ उडवून टाकली.

वेळ बराच झाला होता. झिंगलेल्या वारल्यांची कचकच जास्तच वाढूं लागली होती. त्यांच्यापासून अधिक माहिती मिळण्याची आतां आशा दिसत नव्हती. म्हणून तिथला गाशा एकदम आम्हीं गुंडाळून टाकला आणि पुढच्या मार्गाला लागलों. वासें गांव येथून फार अंतरावर कांहीं नव्हतें. मुख्य रस्त्यापासून पेठ्यांचें आवार बरेंच आंत आहे. म्हणजे चांगलें मैल दीड मैल असेल. रस्ता शेतामधून, खाचरामधून, अनेक कठीण चढउतारांवरून आणि ओढ्यामधून जातो. त्या रस्त्यानें मोटार आंत कशी जाऊं शकेल, ह्याची मला धाकधूकच वाटत होती. पण मोटार अगदीं बिनधोकपणें आंत जाऊं शकली. पेठ्यांच्या ह्या आवाराचें एकंदर क्षेत्रफळ नऊशें एकरांचें आहे. दहा वर्षांपूर्वीं पन्नास हजार रुपयांला त्यांनीं तें घेतलें असें कळलें. हें आवार बघून आमचे डोळेच दिपले. वारली मुलुखांत सावकार लोक केवढ्या प्रचंड इस्टेटी थाटून बसले आहेत, ह्याची तें आवार बघून आम्हांला पुरेपूर कल्पना आली. पेठ्यांचें तें आवार म्हणजे एक विश्व आहे. ह्या आवारांत आंब्याचीं आणि ताडीचीं हजारों झाडें आहेत. भाताचीं खंडोगणती खाचरें आहेत. हजारों गंजी गवत त्यामध्यें उगवतें. ह्या आवारांत एखादी गोष्ट घडली तर त्याचा बाहेरच्या जगाला कधीं पत्ताहि लागायचा नाहीं. म्हणूनच कम्युनिस्ट गुंडांनीं हल्ला करण्यासाठीं हें आवार नेमकें निवडून काढलें.

वाटेनें जातां जातां अनेक गवताच्या गंजी विसकटून पडलेल्या आम्हांला दिसल्या. मोटारीमधील आमच्या वारली वाटाड्याला मीं विचारलें, "कुणीं ह्या गंजी विसकटून टाकल्या?"

वाटाड्या म्हणाला, "जनावरांनीं!"

काणेकरांकडे बघून मी पुटपुटलों, "म्हणजेच कम्युनिस्टांनीं!"

बऱ्याच वेळानें आम्ही आंतल्या मुख्य पडळीवर येऊन पोहोंचलों. पडळ पक्क्या विटांची बांधलेली असून चांगली मजबूत आणि ऐसपैस आहे. शेजारीं मोठे गोठे असून त्यांच्यांत पांचपन्नास जनावरें बांधलेलीं होतीं. पडळीवर 'आवारी' होता. त्याला आम्हीं कम्युनिस्ट गुंडांनीं केलेल्या हल्ल्याची माहिती विचारली. एका रात्रीं साडेनऊ वाजतां साडेचारशें लोकांनीं त्या आवारावर कसा अचानक हल्ला केला, त्याचें त्यानें इत्थंभूत वर्णन करून सांगितलें. गुंडांनीं पडळींतल्या खोल्यांचीं दारें तोडलीं, तीं आम्हीं समक्ष पाहिलीं. त्याखेरीज पलंग, खुर्चीं, बांक ह्यांचीहि त्यांनीं वेडीवाकडी मोडतोड केलेली होती ती आम्हांला दिसली. कलमी आंब्याचीं आणि ताडीचीं कांहीं झाडें तोडून गवताच्या गंजीला त्यांनीं आगीहि लावून दिलेल्या होत्या!

"आम्हांला हा हल्ला होणार हें आधींपासून माहीत होतें!" आवारी सांगूं लागला, "कारण आधल्या दिवशीं आमच्या शेजारच्या नटवरशेटच्या आवारांत त्यांनीं फार मोठा हल्ला केलेला होता. तेथें त्यांनीं गवताच्या गंजी खूप जाळल्या. गमतीची गोष्ट ही कीं गवताच्या गंजीची राखण करायला पोलीसची पार्टी बोलावलेली होती. पण प्रत्यक्ष हल्ला जेव्हां झाला तेव्हां हे पोलीस ताडी पिऊन अगदीं बेहोप झाले होते!"

"तुमच्या आवारावर जेव्हां हल्ला झाला तेव्हां पोलीस कुठें होते?" नेवाळकरांनीं विचारलें.

"हल्ल्याची बातमी मला रात्रीं दीड वाजतां कळली!" आवारी म्हणाला, "तेव्हां मी धावत धावत जाऊन पोलीसची पार्टी बोलावून आणली. इतक्यांत समोरून दुसरी पोलीसची पार्टी आली. तिला वाटलें कीं आमची पार्टी म्हणजे गुंडांचीच टोळी असावी. अंधारांत त्यांना दिसलेंच नाहीं आणि त्यामुळें त्यांत दोन पोलीसच्या पार्ट्यांमध्यें गोळीबार होण्याचा भयंकर प्रसंग निर्माण झाला! पण सुदैवानें तो टळला! इथें हल्ला झाल्यापासून दोन हत्यारबंद पोलीस सतत पहारा करावयाला आम्ही बोलावलेले आहेत!" हे पोलीस साध्या पोषाखांत शेजारीच उभे होते. त्यांनीं आम्हांला ऐटीनें 'सलाम' दिला.

दिवस मावळून गेला होता. संध्याकाळच्या सावल्या आभाळांतून उतरूं लागल्या होत्या. आवाराच्या पार्श्वभूमीला उभा असलेला डोंगर फारच मोहक दिसत होता.

रात्रीं तेथेंच मुक्काम करावा आणि बाहेरच्या जगाला विसरून जावें अशी मनामध्यें इच्छा उत्पन्न झाली होती. पण निरनिराळ्या वारल्यांच्या मुलाखती घेण्याचा आमचा मूळचा कार्यक्रम त्या ठिकाणीं फलद्रूप होण्याचा आम्हांला मुळींच संभव दिसेना. कारण आवारांत दोन पोलीस आहेत, हें आजूबाजूच्या वारल्यांना माहीत होतें. म्हणून कोणत्याहि विषयावर मनमोकळेपणानें ते आमच्याशीं बोलणें शक्य नव्हतें. मोठ्या कष्टानें पण नाइलाजानें आम्ही त्या रमणीय वातावरणांतून बाहेर पडलों आणि मुख्य रस्त्याला लागलों.

आमचें पुढचें मुक्कामाचें ठिकाण तलासरी हें होतें. तेथें 'आदिवासी सेवा मंडळा'चा एक सेवकाश्रम आहे. मुख्य रस्त्याच्या लगतच तो आहे. आश्रमाच्या आवारांत आम्हीं आमची गाडी उभी केली, आणि खालीं उतरलों. आश्रमांत कोणीच नव्हतें. फक्त दोन तरुण वारली मुलें होतीं. सेवक कार्यकर्ते 'आदिवासी सेवा मंडळा'तर्फे दिलेली खावटी वसूल करण्यासाठीं बाहेरगांवीं गेले होते. दोन्ही वारली मुलें मोठीं आनंदी होतीं. आमच्याशीं बोलतांना तीं अगदीं मनापासून हसत होतीं. म्हणून त्यांची थट्टामस्करी करावयाला आम्हांला उत्तेजनच मिळालें. तेथून मैलभर अंतरावरच्या एका पाड्यावर वारल्याचें लग्न असल्याची बातमी त्यांनींच आम्हांला सांगितली. त्याबरोबर आम्हांला इतका हर्ष झाला म्हणतां ! काय वाटेल तें करून हा लग्नसमारंभ आपण आज पाहावयाचाच असा आम्हीं निर्धार केला ! मीं विचारलें, "काय रे दादू, आम्हांला हें लग्न पाहावयाला मिळेल काय रे ?" दादू हसून म्हणाला, "कां नाहीं मिळणार ? तुम्ही आमच्याबरोबर चला कीं ! आम्हांला त्या लग्नाला जायचेंच आहे !" अशा तऱ्हेनें त्या रात्रीच्या पूर्वार्धाचा आमचा कार्यक्रम तर उत्तम तऱ्हेनें जमला. पण परत आल्यावर रात्रीं झोपायचें कोठें ? आश्रमाच्या 'वारली' छाप झोपडींत आपल्याला झोप येईल असें कांहीं आम्हांला वाटेना. म्हणून तेथून थोड्या अंतरावर असलेल्या सरकारी 'तपासणी बंगल्यां'त तळ द्यावयाचें आम्हीं ठरविलें.

तपासणी बंगल्याच्या एका खोलींत एक तरुण पोलीस अधिकारी उतरले होते. ते हिवतापानें आजारी असल्यानें पलंगावर झोपूनच होते. मला त्यांनीं ओळखलें. मीं विचारलें, "कशानें आजारी आहांत ?" ते पडल्या पडल्या म्हणाले, "मलेरियानें. ह्या मुलखांत कांहीं भाग असे आहेत कीं तिथलें पाणी पोटांत गेलें कीं हटकून मलेरिया हा झालाच म्हणून समजा. रोज एक दिवसाआड मला

सध्या ताप येत असतो दुपारच्या वेळेला !"

"पण इकडे तुम्ही काय करतां आहांत ? " मीं विचारलें.

"ह्याच दंगलीच्या बंदोबस्तासाठीं सध्यां माझी नेमणूक इथें झालेली आहे !" ते म्हणाले.

"आम्ही ही एकंदर परिस्थिति काय आहे तें डोळ्यांनीं पाहण्यासाठीं हा फेरफटका मारीत आहोंत," मी म्हणालों. "हल्लीं तर या भागांत गडबड कांहीं नाहीं ना ?"

"नाहीं. गेल्या एक महिन्यांत तरी इथें मुळींच गडबड नाहीं !" ते म्हणाले. "पण हा पावसाळा संपल्यावर ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यांत पुन्हा गडबड होईल असा माझा अंदाज आहे !"

"वारली बायकांवर सावकार लोक अत्याचार करतात ह्याची तुम्हांला काय माहिती आहे ?" नेवाळकरांनीं विचारलें.

"प्रत्यक्ष माहिती अशी मला कांहीं नाहीं," पोलिस अधिकारी म्हणाले. "बलात्काराची केस अजून तरी माझ्याकडे कधीं नोंदलेली नाहीं."

"आज दुपारीं उंबरगांवच्या एका सावकारांनीं आम्हांला सांगितलें कीं वारली लोक आपल्या बायकांच्या अब्रूच्या बाबतींत फार जागरूक असतात. तुमचें त्याबद्दलचें काय मत आहे ?" शामरावांनीं विचारलें.

"बरोबर आहे तें," ते उत्तरले. "तसे ते लोक फार स्वाभिमानी आहेत. चोरीचा खोटा आळ आपल्यावर आला म्हणून एका वारल्यानें गळफांस लावून आत्महत्या केल्याचें उदाहरण मला माहीत आहे!"

त्या पोलीस अधिकाऱ्यांना आतां जास्त त्रास देण्यांत अर्थ नाहीं अशा विचारानें त्यांचा निरोप घेऊन आम्ही बाहेर आलों. बंगल्याच्या मागच्या बाजूस रोमन कॅथॉलिक ख्रिस्ती मिशननें वारली मुलांसाठीं चालविलेलें वसतिगृह आणि शाळा असल्याचें आम्हांला कळलें. म्हणून तेवढ्यांतल्या तेवढ्यांत तें बघून येण्याची आम्हांला इच्छा झाली. मिशनच्या पाद्रीसाहेबांना आम्ही तिकडे येत असल्याचा निरोप पाठवला. त्याबरोबर उलट तेच तातडीनें आम्हांला भेटायला 'तपासणी बंगल्या'वर आले. ते पन्नास वर्षें वयाचे स्पॅनिश गृहस्थ होते. त्यांनीं पायघोळ पांढरा झगा घातलेला होता. त्यांच्याबरोबर एक तरुण हिंदी पाद्रीहि होते. ते आल्यानंतर तेथेंच बंगल्याच्या आवारांत खुर्च्या टाकून आम्ही अंधारांत गप्पा

मारीत बसलों. घटना समितीची 'आदिवासी समिति' आपल्याला नुकतीच भेटून गेल्याचें त्यांनीं सांगितलें. त्या भागांत एकंदर सहाशें ख्रिस्ती वारली आहेत असें ते म्हणाले. कम्युनिस्टांच्या दंगलीचा निदान ह्या ख्रिस्ती वारल्यांना तरी मुळींच उपसर्ग पोहोंचला नाहीं असें त्यांनीं सांगितलें. कम्युनिस्ट पक्षाच्या प्रचारावर मात्र पाद्रीसाहेब खूपच भडकलेले दिसले. ते म्हणाले, "हे वारली लोक जंगलांतल्या मुलांसारखे आहेत. त्यांच्या डोक्यांत कम्युनिस्ट लोकांनीं विष ओतून त्यांचा अगदीं सत्यनाश करून टाकला आहे!"

"वारली लोक मला तर कांहीं इतके मागासलेले दिसत नाहींत!" मी म्हणालों.

"चेहऱ्यावरून ते भिल्ल, गोंड किंवा कातकरी ह्यांच्यासारखे एकदम क्रूर किंवा रानटी दिसत नाहींत हें खरें!" पाद्रीसाहेब म्हणाले. "ते भटके नाहींत. एका ठिकाणीं स्थिर राहण्याची प्रवृत्ति त्यांच्यामध्यें उत्पन्न झालेली आहे. त्यांच्यांत कांहीं गुणहि आहेत. ते गुन्हेगार नाहींत. खोटें सहसा बोलत नाहींत. माझ्या शाळेंत एखाद्या मुलानें कांहीं वस्तू फोडली असेल तर मी विचारावयाच्या आधीं आपण होऊन तो तें कबूल करतो. हें सर्व खरें. पण त्यांची बुद्धि प्राथमिक अवस्थेंतल्या माणसासारखी आहे हें मात्र खरें. मी तर त्यांना 'लहान मुलें' समजतों. एकदां काय झालें कीं, मी एका वारल्याच्या बैलगाडींतून प्रवास करीत होतों. वाटेंत त्याला ससा दिसला. त्याबरोबर गाडी थांबवून तो खालीं उतरला आणि गलोल घेऊन त्या सशाच्या मागें धावत सुटला. मी इकडे गाडींत बसलों आहें ही गोष्ट तो अजिबात विसरून गेला. त्याची शिकार जेव्हां झाली तेव्हां हसत हसत तो परत गाडीकडे आला. तोंपर्यंत मी कपाळाला हात लावून स्वस्थपणें इकडे गाडींत बसलों होतों!" पाद्रीसाहेबांनीं सांगितलेली ती गोष्ट ऐकून आमची खूपच करमणूक झाली.

"तुमच्या शाळेंत मुलें शिक्षण पुरें झाल्यावर पुढें काय करतात?" नेवाळकरांनीं विचारलें. तेव्हां ते म्हणाले, "पुढें काय करणार? शिकलेलें सारें विसरून जातात. दुसरें काय? इथून शिकून घरीं गेल्यावर त्यांना पुस्तकें वाचायला मिळत नाहींत ही त्यांची सर्वांत मोठी अडचण आहे. परवां जयपालसिंग इथें आले होते, त्यांना मीं हें सांगितलें. खरें सांगूं, या वारली मुलांना आपलें हें पुस्तकी शिक्षण मुळींच उपयोगी नाहीं. त्यांना त्यांच्या शेतकीचें आणि जंगलामधल्या

व्यवसायाचें शिक्षण द्यावयाला हवें. सरकारनें ह्या भागांत बंधारे बांधून कालवे काढले पाहिजेत, आणि शेती सुधारली पाहिजे."

"वारली समाजाची सुधारणा घडवून आणण्यासाठीं कोणती गोष्ट प्रथम केली पाहिजे?" मीं विचारलें.

"भगताच्या कचाट्यांतून आधीं त्यांची मुक्तता केली पाहिजे!" पाद्रीसाहेब तारस्वरांत ओरडले. 'भगतां'च्या आठवणीनें त्यांचा चेहरा क्षणमात्र प्रक्षुब्ध झाल्यासारखा दिसला. "पण हें कसें होणार? भगतांच्या मगरमिठीमधून ते सुटणें अशक्य आहे. भगतांच्या तंत्रमंत्रानें रोग बरे होतात अशी त्यांची समजूत आहे असें म्हणावें, तर तसेंहि नाहीं. रोग शेवटच्या स्थितींत गेला म्हणजे मग नाइलाजानें ते आमच्याकडे धावत येतात! ताडीप्रमाणेंच 'भगत' हें त्यांना लागलेलें एक असाध्य व्यसन आहे!"

पाद्रीसाहेबांचें म्हणणें आम्हांला पटलें. पण भगतावरील त्यांच्या रागाचें मुख्य कारण म्हणजे वारली लोकांत ख्रिस्ती धर्माचा प्रसार होण्याच्या कामांत 'भगत' हा एक दुर्लंघ्य अडथळा आहे हें आहे, ही गोष्ट आमच्या लक्षांत यायला फार वेळ लागला नाहीं. इतकें आमचें बोलणें होत आहे तोंच आश्रमांतले ते दोन 'दादू' कंदील घेऊन आम्हांला लग्नाला बोलवायला आले होते. तेव्हां पाद्रीसाहेबांना आम्हीं तत्काळ निरोप दिला.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 20005 वि: [illegible]
क्रमांक 293 नों: [illegible]

# वारली मुलुखामधली मुशाफरी : ४ :

त्या रात्रीं आम्हांला कांहीं जेवावयाचें नव्हतें. तेव्हां आम्ही प्रत्येकजण प्याले दोन प्याले चांगलें थंडगार पाणी प्यालों. आणि आमचे बिछाने बंगल्याच्या व्हरांड्यांत घालायला नोकराला सांगून, आम्ही 'दादू'च्या मागून निघालों. ज्या पाड्यावर आम्हांला जावयाचें होतें तो कांहीं फार दूर नव्हता. थोड्या वेळानें आम्हांला पिपाणीचे वेडेवाकडे तारस्वर आणि ढोलग्याची ढमढम ऐकूं येऊं लागली. लांब एका टेकाडावर एका कंदिलाचा अंधुक प्रकाश दिसत होता. भोवतालीं गडद अंधार पसरलेला होता. त्या प्रकाशाच्या दिशेकडून येणारे ते वेसूर किरकिरे स्वर भोवतालच्या भयाण अंधारामुळें जास्तच भेसूर वाटत होते. लांबून कोणीतरी गळा काढून रडतें आहे आणि छाती पिटून घेतें आहे असें आम्हांला वाटत होतें. हळू हळू आम्ही काळोखांतून पुढें मार्ग काढीत होतों. कांहीं वेळानें भेसूर संगीत आपणाला तिकडे असहाय्यपणें ओढीत आहे असें आम्हांला वाटूं लागलें. फार वेळ कांहीं आम्ही चाललों नसूं. पण आपण एखाद्या लांबलचक आणि कंटाळवाण्या बोगद्यांतून चाललों आहोंत किंवा काय असा आम्हांला भास झाला. शेवटीं पोहोंचलों एकदाचे आम्ही मुक्कामाला! पिपाणी आणि ढोल ह्यांचा कर्कशपणा आतां अगदीं असह्य होत होता. वाळलेल्या पाचोळ्यानें झाकलेल्या एका वेढब मांडवामध्यें

एकुलता एक कंदील टांगलेला होता. त्याच्या मिणमिणत्या प्रकाशांत भोवतालचा देखावा विलक्षण उदासवाणा दिसत होता. मांडवाच्या डाव्या बाजूला एक झोपडी होती. त्या झोपडीच्या अंधाऱ्या पडवींत पंचवीस-तीस बायका बसलेल्या होत्या. त्यांमध्यें दहा-बारा तरुण अविवाहित 'लोठ्या' होत्या हें तात्बडतोब आम्हीं ओळखलें. उजव्या बाजूला लंगोट्या नेसलेले, उघड्या नितंबाचे, डोक्याला धोतरें बांधलेले, आणि अंगांत मळकट बंड्या घातलेले पंचवीस-तीस वारली कांहीं इथें कांहीं तिथें असे पसरून पसरून बसले होते. आमच्या कंदिलामुळें थोडातरी अधिक प्रकाश आणि उल्हास त्या मांडवामध्यें निर्माण झाला. आमच्या येण्यानें तेथल्या कार्यक्रमांत मुळींच खंड पडला नाहीं. कारण आम्ही येणार हें त्यांना आधींपासून माहीत होतें.

मांडवाच्या एका बाजूला दोन अंथरुण्या टाकण्यांत आल्या. आम्ही मांड्या घालून बसलों आणि आजूबाजूच्या अंधारांत न्याहाळून बघूं लागलों. पिपाणी आणि ढोल वाजविणारेहि वारलीच होते. ते माझ्या डाव्या हाताला मांडवाबाहेर बसले होते. ते कोणते स्वर आणि कोणता ताल वाजवीत होते, हें एका परमेश्वराला माहीत! तरी तेवढ्यांतल्या तेवढ्यांत मीं त्याचें 'नोटेशन' करण्याचा प्रयत्न केला. त्यावरून 'म म म—प प नी' अशी कांहीं तरी सुरावट असावी असें मीं ठरविलें. पिपाणीचा आणि ढोलग्याचा तर काडीमात्र संबंध नव्हता. एकमेकापेक्षां कोण जास्त गल्गा करतो ह्याचीच त्यांच्यामध्यें कांहीं शर्यत लागून राहिली होती. इतक्यांत पडवींतल्या लोठ्यांनीं 'गाणें' म्हणावयाला सुरवात केली. त्या गाण्याला ताल नव्हता, चाल नव्हती, त्यामध्यें माधुर्य नव्हतें, कांहीं एक नव्हतें! इतकेंहि असून ते सूर आम्हांला अतिशयच परिचयाचे वाटत होते. ही काय भानगड आहे म्हणून मी डोकें खाजवून विचार करूं लागलों तों एकदम माझ्या डोक्यांत प्रकाश पडला. बरोबर, आपल्या वेदपठनाच्या सुरांशीं त्यांचें साम्य होतें. विलक्षण साम्य होतें! काणेकर, नेवाळकर आणि मी खालींवर माना हलवीत हलवीत एकदमच म्हणायला सुरवात केली, "ये ब्राह्मणाः त्रिसुपर्णम् पठन्ति, ते सोमम् आप्नुवंति!" अगदीं स्वर न् स्वर बरोबर! आमचें पठन त्या बायकांच्या गाण्यांत अगदीं बेमालूम मिसळून गेलें. कांहीं वेळानें त्या बायकांनीं आपला आजूबाजूच्या गांवांमधल्या 'पाटील तांडेलां'ना त्या समारंभासाठीं मोठ्यानें ओरडून आमंत्रण दिलें. आणि आंत येऊन सांगितलें कीं, "मीं आमंत्रण दिलें,

...ठी ... ...

पण कोणी आलें नाहीं!" त्यावेळीं मंडपांत बराच हशा पिकला. वारल्यांना थोडी तरी विनोदबुद्धि आहे हें आम्हांला तेव्हां दिसून आलें.

नंतर 'ताडीपानाच्या' कार्यक्रमाला सुरवात झाली. एका लहानशा मातीच्या लोट्यांत एकानें ताडी भरून आणली. आणि नवऱ्या मुलाच्या हातांतल्या सुरीनें त्या लोट्याला भोक पाडलें. त्या भोकांतून पांढरी ताडी वाहूं लागली, प्रथम नवऱ्या मुलानें त्या ताडीनें 'आचमनें' केलीं आणि त्यांतलीं कांहीं ताडी जमिनीवर टाकून दिली. मग नवरानवरी दोघेंहि वडाच्या पानामधून ताडी प्याल्यावर, इतरांना त्या भोक पाडलेल्या लोट्यानें ताडी वाढावयाला सुरवात झाली. प्रत्येकजण ताडी पिण्याच्या पूर्वी 'नवऱ्या, राम राम रे!' म्हणून ओरडत असे. त्याबरोबर नवरा मुलगाहि 'राम राम!' म्हणून मोठ्यानें किंचाळून त्याला उत्तर देत असे. मांडवाच्या मधोमध ताडीचीं चार मोठीं मडकीं ठेवलेलीं होतीं. प्रत्येक मडक्याला साडेचार रुपये पडतात. प्रत्येक लग्नसमारंभांत निदान सोळा मडकीं तरी ताडी लागते. ताडीबरोबर प्रत्येकाला उकडलेले थोडे थोडे वाल देण्यांत येत होते. हें ताडी पिणें चालू असतांनाच तीन म्हाताऱ्या वारली बायका प्रत्येक विवाहित वारल्याला पकडून त्याच्या तोंडाला आणि कपड्याला जोराजोरानें हळद फासीत होत्या. पानसुपारी वाटण्याचेंहि काम मधून मधून चालूच होतें. लग्न होण्यापूर्वी कोणताहि वारली पुरुष सुपारी खात नाहीं. माझ्या शेजारीं एक तरुण मुलगा बसला होता. त्याला मीं विचारलें, "कायरे दादू, तूं सुपारी खातोस का?" "नाहीं!" तो म्हणाला. "विडी ओढतोस का?" मी पुन्हा विचारलें, तरी तो 'नाहीं'च म्हणाला. पण "सूर पितोस का?" असें मीं त्याला विचारतांच हसून 'हो!' म्हणून त्यानें मोठ्यानें मान हलविली!

कांहीं वेळानें पडवींतल्या तरुण 'लोठ्यां'नीं पुन्हा 'वेदपठन' सुरू केलें. एका बाजूच्या चार लोठ्यांनीं एक ओळ म्हणावयाची आणि त्याला उत्तर म्हणून दुसरी ओळ दुसऱ्या बाजूच्या चार 'लोठ्यां'नीं म्हणावयाची असा तो प्रकार चालू झाला. ह्या गाण्यांतले शब्द मात्र आम्हांला पुष्कळसे कळत होते. 'ताडीमाडी नाम रे भंडारी दादा!' असें त्याचें पालुपद होतें. 'नाम' म्हणजे 'वाढ'. नवऱ्या मुलाचें नांव होतें 'जऱ्या'. त्याला उद्देशून गाण्याचीं कांहीं कडवीं होतीं. तीं अशीं कीं, "हे जऱ्या, तुझ्या लग्नांत जमलेल्या सर्व पाहुण्यांना तूं उत्तम तऱ्हेनें ताडी वाढ!" अर्ध्यापाऊण तासाच्या आंत सारा

मांडव आंवळलेल्या ताडीच्या वासानें असा कांहीं घमघमूं लागला कीं सांगतां सोय नाहीं. ताडीचीं दोन मोठीं मडकीं फस्त झालीं. स्त्रिया, पुरुष आणि मुलें हळूहळू झिंगत चाललीं. त्यांच्या बडबडीचा गलगा एकदम इतका वाढला कीं कोण काय बोलतें आहे हेंच कळेनासें झालें. क्षणभर आपण कोणत्या जगांत येऊन पडलों आहोंत हेंच मुळीं आम्हांला कळेना! एक वृद्ध वारली मोठ्या-मोठ्यानें ओरडून सर्वांना सांगत होता कीं, "घरांत ताडीचीं मडकीं अजून पुष्कळ भरलेलीं आहेत. तेव्हां ताडी पिण्याच्या कामीं कोणींहि हात आखडता घेऊं नये!" माझ्या मागच्या बाजूस एक लेकुरवाळी वारली स्त्री बसली होती. तिनें एका करवंटीमध्यें ताडी भरुन ती शेजारच्या झुडुपामध्यें नीट ठेवून दिली होती. मीं तिला विचारलें "ही ताडी कशाला काढून ठेवलीस ग!" तेव्हां ती म्हणाली, "माझा लहान मुलगा घरीं झोपला आहे. तो उठल्यावर माझ्याकडे ताडी मागेल म्हणून मी त्याला ती घेऊन जाणार आहें!"

एका तासाच्या आंत सारा मांडव झिंगून बेहोषपणें डोलूं लागला. वारली स्त्रीपुरुषांचें नृत्य कधीं सुरू होतें आहे म्हणून वाट पाहून पाहून आम्ही थकून गेलों! तोंच एक तरुण "हुय! हः—हः—हः—!" असें मोठयानें ओरडत डोक्यावर हात नाचवीत आणि अंगामध्यें आल्यासारखें शरीर मागेंपुढें घुसळीत मांडवाच्या मध्यभागीं शिरला. नाचाचा कार्यक्रम सुरू झाल्याची ती निशाणी होती. बाकीचे सारे पुरुषहि तसेच ओरडत आणि नाचत त्या माणसाच्या मागें धावले. पांचसहा तरुण 'लोठ्या'हि त्या नाचामध्यें सामील झाल्या. पिपाणीवाला आणि ढोलकेवाला मांडवाच्या मधोमध उभे राहून मोठमोठ्यानें आपलीं वाद्यें वाजवूं लागले. आणि स्त्रीपुरुषांचें कडें आरोळ्या मारीत त्यांच्याभोवतीं फिरूं लागलें. तें दृश्य बघून आपण हिंदुस्थानांत नसून आफ्रिकेच्या कोठल्यातरी निबिड जंगलांत आहोंत असाच कांहीं वेळ तरी मला भास झाला.

वारली स्त्रीपुरुषांच्या या संमिश्र नृत्यांत आकर्षक असें कांहींच नव्हतें. बायकांचें नाचणें कांहींतरी प्रमाणशीर आणि आकर्षक वाटलें. पण पुरुषांचें नाचणें म्हणजे नुसता धांगडधिंगा होता. कांहीं वेळानें नाचांतला दुसरा प्रकार सुरू झाला. कांहीं पुरुषांनीं दुसऱ्या पुरुषांना उचलून खांद्यावर घेतलें, आणि त्यांच्या-सकट 'गाड्या गाड्या भिंगोऱ्या' करावयाला सुरवात केली. नवरानवरीला डोक्यावर घेऊन दोघेजण नाचूं लागले. तर दुसऱ्या पुरुषांनीं नाचणाऱ्या कांहीं

तरुण स्त्रियांना एकदम हातांनीं उचलून छातीवर घेतलें आणि त्यांच्यासकट ते गिरक्या मारूं लागले. तें दृश्य बघून पडवींत बसलेल्या स्त्रीवर्गांत खूपच कल्लोळ उडाला. त्या लगबग उठून बाहेर आल्या आणि बाजूला येऊन उभ्या राहिल्या. ह्या नाचाच्या वेळीं पुरुषाला कोणत्याहि स्त्रीला उचलून कडेवर घेतां येतें आणि नाचतां येतें. त्या बाबतींत त्याला कसलाहि निर्बंध नसतो. नाचणारा पुरुष जेव्हां एखाद्या स्त्रीला उचलूं लागतो तेव्हां ती त्याच्या कचाट्यामधून सुटण्याची खूपच धडपड करते. तथापि, तो पुरुष जर ताकद्वान् असेल तर जबरदस्तीनें तो तिची मोटकुळी करून तिला वर उचलतो आणि नाचूं लागतो. नाचणें सुरू होतांच मात्र ती स्त्री त्याच्या खांद्यावर मान टाकून निपचित पडून राहते. वारली नृत्यामधला एवढाच भाग काय तो आम्हांला अतिशय रोमहर्षक वाटला.

"पाश्चात्य बॉलरूम नृत्यापेक्षां हें नृत्य कितीतरी रोमांचकारक आहे !" मी काणेकरांना म्हणालों.

काणेकर म्हणाले, "कमरेला लंगोटी लावून आपल्याला देखील ह्या नाचांत घुसण्याची इच्छा झाली आहे बुवा !"

"बाकी हे लोक इतके झिंगले आहेत कीं आपण त्यांच्या नाचांत घुसलों तर तें त्यांच्या लक्षांत येणेंहि कठीण आहे !" नेवाळकर पुटपुटले.

अर्धापाऊण तास तें नृत्य पाहिल्यानंतर डोकें अगदीं गिरगिरायला लागलें. आतां त्यामध्यें नवीन पाहण्यासारखें कांहीं राहिलें नाहीं अशी आमची खात्री झाली. तसे आम्ही मुकाट्यानें उठलों, कोणाचाहि निरोप न घेतांना मागल्या मागें हळूच निसटलों, आणि आल्या वाटेनें चालूं लागलों. या वेळीं मध्यरात्रीचा सुमार झाला होता. आणि आकाशांत चांदण्याचें नृत्य ऐन भराला आलें होतें.

झिंगलेल्या वारली स्त्रीपुरुषांचें तें संमिश्र नृत्य बघून आणि बेसूर वाद्यांचा नि बेहोष किंकाळ्यांचा त्यांचा तो गलगा ऐकून आमचीं डोकीं जितकीं सुन्न होऊन गेलीं होतीं, तितकींच तीं उद्विग्नहि पण झालीं होतीं. लग्नाच्या मांडवापासून दूर दूर आम्ही जात होतों आणि पिपाण्यांचा नि ढोलक्यांचा कर्कश आवाज मागें असलेल्या काळोखाच्या डोहांत बुडत चालला होता. मुख्य रस्त्याला जेव्हां आम्ही नीट लागलों तेव्हां तो आवाज मागून ऐकूं येईनासा झाला. कोठल्यातरी विलक्षण आणि चमत्कारिक स्वप्नामधून आपण जागे झाले आहोंत, असा त्यावेळीं आम्हांला भास झाला. कलेचा किंवा संगीताचा आणि संस्कृतीचा फार निकट

संबंध आहे. त्या दृष्टीनें नुकत्याच पाहिलेल्या आणि ऐकलेल्या वारल्यांच्या नृत्य-संगीताबद्दल मी विचार करूं लागलों. आणि त्यावरून वारल्यांचा सांस्कृतिक विकास कितपत झाला आहे असें आपल्याला म्हणतां येईल, याचा मी ठोकताळा मनाशीं बांधूं लागलों. इतक्यांत मला मारवाडी बायकांच्या 'संगीता'ची आठवण झाली. लग्नाच्या प्रसंगीं ह्या मारवाडी बायका रस्त्यानें संगीत परवचा म्हणत जातात, तो पुष्कळांनीं ऐकला असेल. त्या परवचावरून मारवाडी समाजाच्या बौद्धिक पातळीबद्दल कितपत कयास बांधतां येईल, असा विचार माझ्या मनांत आला आणि मी स्वतःशींच हसलों. शामराव माझ्याकडे वळून म्हणाले, "का हो, हसताय् का?"

"कांहीं नाहीं" मी पुटपुटलों, "मला मघांच्या त्यांच्या त्या वाद्यांची आठवण झाली! आपल्याकडच्या महारांच्या वाजंत्र्या असतात, त्या याच्यापेक्षां कितीतरी वरचढ असतात! ह्या लोकांना संगीताचें 'इंद्रीय'च नसावें असें मला वाटतें!"

"तसें नका म्हणूं!" शामराव गंभीरपणें म्हणाले, "ह्यांचें संगीत कसें का असेना, पण त्या संगीताला ह्यांच्या जीवनांत निश्चित स्थान आहे हें मात्र मी तुम्हांला सांगतों."

"तें कसें काय?" मीं चमकून विचारलें.

"ह्या लोकांचीं निरनिराळीं वाद्यें आहेत." शामराव सांगूं लागले. "पावा, तारपें, पावी किंवा नळकांडें हीं वाद्यें निरनिराळ्या ऋतूंमध्यें वाजवितात. त्या वाद्यांचे सूर कानीं पडले कीं वारल्यांच्या मनांत निरनिराळ्या भावना निर्माण होत असतात. उदाहरणार्थ, होळीच्या दिवसांत हे लोक पावा वाजवितात. त्याचा एकच एक सूर वातावरणांत उठला कीं, आतां कांहीं महिने कण्हेरी पिकून आपल्याला कशीतरी गुजराण करावी लागेल, याची अप्रिय आठवण वारल्यांना होते आणि त्यांना 'धास' (धास्ती) वाटूं लागते. भाद्रपद–कार्तिक महिन्यांत हे लोक तारपें वाजवतात. हा कणसरीचा (धान्याचा) हंगाम असल्यानें तारप्याचा आवाज ऐकून वारली लोक अत्यंत उल्हासित होतात. आतां दोन वेळां आपल्याला भात खायला मिळेल, हें त्यांना त्या सुरावरून कळतें व मग त्यांना 'हास' वाटूं लागते. शिमग्यानंतर कधीं कधीं ते पावी वाजवितात. पावी ऐकून ते उदास होतात. करवंदाचीं पानें आणि कंदमुळें खाण्याचे दिवस आले, हें त्यांना त्या पावीच्या उदास सुरावरून कळून चुकतें. म्हणजे सांगायची गोष्ट अशी कीं, साऱ्या वर्षाची

विभागणी ह्या वारल्यांनीं विरनिराळ्या वाद्यांमध्यें करून टाककेली आहे. भाद्रपद ते कार्तिक शुद्ध पंचमीपर्यंत तारपें, माघ महिन्यापासून शिमगाअखेरपर्यंत पावा आणि शिमग्यानंतर पावी !"

वारल्यांच्या स्वरमय जीवनाची हकीकत शामरावांच्या तोंडून ऐकून मी चकितच झालों. बोलतां बोलतां आम्ही 'तपासणी बंगल्या'वर आलों आणि थोडासा फलाहार करून अंथरुणावर पडलों. डोक्यांत शिल्लक असलेल्या वारली नृत्यसंगीताच्या अस्पष्ट पडसादाच्या तालावर कधीं झोप लागली, तें आम्हांला कळलेंच नाहीं.

सकाळीं सातच्या सुमाराला आम्ही जागे झालों. आधल्या दोन दिवसांच्या सतत श्रमानें आणि प्रवासानें अंग अगदीं मोडून आल्यासारखें वाटत होतें. आणि त्यांतून वारली मुलुखामधला तो आमचा शेवटचा दिवस होता. संध्याकाळीं आपल्याला मुंबईला परतायचें आहे ही जाणीव सकाळपासूनच मनांत जागी झाली. चहा आणि न्याहारी संपेपर्यंत साडेआठ-नवाचा सुमार झाला. उन्हें चांगलींच वर आलीं होतीं; तपासणी बंगल्याच्या मागलें मिशनचें आवार आतां स्पष्टपणें दिसत होतें. वारली मुलांच्या खेळण्याचे आणि बोलण्याचे आवाज तिकडून आमच्या कानांवर पडत होते. मिशनच्या इमारतींत डोकावण्याची इच्छा होती. पण पाद्रीसाहेबांनीं आधल्या रात्रीं, आम्हीं मिशनच्या हद्दींत प्रवेश करूं नये म्हणून, जी सावधगिरी बाळगली होती ती आम्हीं ओळखली होती. म्हणून त्यांची विनाकारण गैरसोय आणि तारांबळ करण्याची आम्हांला इच्छा नव्हती. आमच्या वारली मुलुखांत परदेशी ख्रिस्ती मिशननें इतक्या लांबून येऊन स्वार्थ-त्यागपूर्वक कार्य करीत राहावें आणि येथल्या येथें राहणाऱ्या आम्हीं हिंदूंनीं स्वतःच्या धर्माच्या श्रेष्ठतेची नुसती पोकळ घमेंड मिरवून आमच्या आदिवासी बांधवांच्या उन्नतीसाठीं आपल्या हाताची करंगळी देखील वर उचलूं नये, या विचारानें माझें मन विपण्ण झालें. हिंदु धर्म हा आपल्या अनुयायांच्या उद्धारा-साठीं किंवा उन्नतीसाठीं कोणताहि प्रयत्न करूं इच्छीत नाहीं. खरोखर जगामध्यें इतका आळशी आणि सुस्त असा कोणताहि दुसरा धर्म नसेल ! 'राहिले लोक हिंदुधर्मात तर राहोत, गेले लोक हिंदु धर्मांतून तर जावोत,' असली मगरूर आणि बेपर्वाईची ह्या धर्माची वृत्ति आहे. ह्या वृत्तीमुळें गेलीं हजारों वर्षें आपण आपल्यामधलें मनुष्यबळ एकसारखें सांडीत सांडीत आलों आहोंत. एखाद्या

कातडीच्या पखालीसारखा हिंदु धर्म आहे. सतरा ठिकाणीं त्याला भोकें पडलेलीं आहेत आणि त्यांतून पाणी एकसारखें गळतें आहे आणि ठिबकतें आहे. राहिलें एवढें पाणी तरी त्याच्यांत अजून कसें उरूं शकलें, ह्याबद्दल मनाला आश्चर्य वाटतें! आदिवासी लोक तर या धर्माच्या दृष्टीनें अस्पृश्यापेक्षांहि अस्पृश्य आहेत. ह्या लोकांसाठीं हिंदु धर्मानें आतांपर्यंत कांहींहि केलेलें नाहीं, आणि अजूनहि त्यांच्याकरितां कांहीं करण्याची त्याला इच्छा वाटत नाहीं. हे लोक उद्यां ख्रिस्ती किंवा मुसलमान झाले म्हणजे मग आमचे जरिपुराणे हिंदु धर्माभिमानी जागे होऊन दोन्ही हातांनीं ठणाणा करावयाला लागतील !

वारली लोकांच्या देवधर्माविषयींच्या कल्पना अत्यंत विकृत आणि विपर्यस्त आहेत. ते 'नारन' देवाची किंवा 'वाघोबा' ची पूजा करतात. 'भगता'च्या तंत्रमंत्रावर आणि जादूटोण्यावर त्यांची अंधश्रद्धा असते. शारीरिक रोग आणि आजार हे दैवी कोपामुळें उद्भवतात, असा त्यांचा विश्वास आहे. घरांत माणूस मेलें कीं तें घर सोडून दुसऱ्या ठिकाणीं राहावयाला जाणारेहि वारली कांहीं थोडे नाहींत. त्यामुळें त्यांच्या जीवनांत स्थैर्य उत्पन्न होत नाहीं. भगताच्या कचाट्यांतून सोडविल्यावांचून वारल्यांचा उद्धार होणें शक्य नाहीं. हें काम अतिशय कठिण आहे. भगताच्या बदली आपण त्यांच्या जीवनांत तितकेंच सामर्थ्यवान् वर्चस्व निर्माण केलें पाहिजे. केवळ धर्मच तें सामर्थ्य निर्माण करूं शकेल असें मला वाटतें. वारली मुलुखांत पांच दहा ठिकाणीं जर रामाचीं देवळें बांधलीं आणि त्या देवळांत सामुदायिक भजनाच्या आणि कीर्तनाच्या निमित्तानें जर वारली लोक मोठ्या संख्येनें जमवितां आले, तर त्यांच्या जीवनांत एका वर्षाच्या आंत आपल्याला क्रांति करून दाखवितां येईल. ह्या दृष्टीनें हिंदु धर्माच्या अभिमानी मंडळींनीं विचार करून एखादी संघटना ताबडतोब उभी करावयाला पाहिजे. हे सारे विचार त्या ख्रिस्ती मिशनच्या आवाराकडे पाहात असतां भराभर माझ्या डोक्यांत आले.

हें वाचून कोणी म्हणेल कीं, तुमच्यासारख्या आधुनिक आणि पुरोगामी विचाराच्या माणसानें पारंपरिक देवपूजेच्या मार्गानें वारली लोकांचा उद्धार होईल असें सुचवावें हें फारच विचित्र आहे ! ह्याला माझें उत्तर असें : आदिवासी लोक हे आज प्राथमिक अवस्थेंत आहेत. त्यांना आधुनिक संस्कृतीचा टप्पा एकदम गांठतां यावयाचा नाहीं. तुम्हा आम्हांला देखील तो तसा गांठतां आलेला

नाहीं. आपल्याप्रमाणें त्यांनाहि टराविक उत्क्रांतीच्या मार्गानेंच जावें लागेल. अद्यापिहि आपल्या बहुजनसमाजामध्यें ईश्वरभक्तीच्या ज्या कल्पना, समजुती आणि आचार आहेत, त्या अवस्थेमधून आदिवासी लोकांना कधीं ना कधीं तरी जावें लागणारच आहे. आधीं ईश्वरवादी झाल्यावांचून मनुष्याला निरीश्वरवादी-देखील होतां येत नाहीं. याच दृष्टीनें आदिवासी लोकांना एकदम 'आधुनिक' बनविणें अशक्य आहे. त्यांची उत्क्रांति रूढ मार्गानींच हळू हळू घडवून आणली पाहिजे.

साडेनवाच्या सुमारास आम्ही आमच्या मोटारींत बसून पुढील प्रवासाला निघतों आहोंत, तोंच कांहीं अंतरावर पांचदहा तरुण वारली 'लोढ्या' गात गात चाललेल्या आम्हांला दिसल्या. ह्या कुठें चालल्या आहेत म्हणून आम्हीं चौकशी केली. तेव्हां, आधल्या रात्रीं आम्ही ज्या लग्नाला गेलों होतों त्याच लग्नामधल्या ह्या मुली असून नवरदेवासाठीं रानांतलीं फुलें वेचून आणावयासाठीं त्या निघाल्या आहेत, असें आम्हांला कळलें. नवऱ्या मुलासाठीं तरुण मुलींनीं वनामधून फुलें वेचून आणणें, ही पद्धत आम्हांला फारच रम्य आणि काव्यमय वाटली. तळासरी सोडून आम्ही उपलाटच्या रस्त्यानें निघालों. उपलाट येथें सरकारनें वारली शेतकऱ्यांना शेतासाठीं जे प्लॉट दिलेले आहेत, ते आम्हांला पहावयाचे होते. पंधरा वीस मैलांच्या अंतरावर काजळी गांव लागतें. तेथून आंत उपलाटला जावें लागतें. रस्त्यावर एक सरकारी बंगला होता. तेथें पोलीसपार्टीचा तळ पडलेला होता. आम्हांला बघून त्यांमधला एक तरुण पोलीस पुढें आला आणि त्यानें मला नमस्कार केला.

"मला ओळखतां तुम्ही?" मीं त्याला विचारलें.

"हो, परवांच मुंबईला शिवाजी पार्कवर भगतसिंग दिनानिमित्त तुमचें जें व्याख्यान झालें त्याला मी होतों!" तो म्हणाला. तें ऐकून मी अगदीं चकितच झालों.

काणेकरांचें नांव ऐकतांच तो उद्गारला, "म्हणजे हे अनंत काणेकर ना? रशियांतून जाऊन आलेले? ह्यांचा 'लाल तारा' मीं वाचला आहे!"

पोलीसदळामध्यें मराठी साहित्य इतक्या आस्थेनें वाचणारे तरुण लोक आहेत, हें बघून आम्हांला आनंद वाटला. मी हसून काणेकरांना म्हणालों, "पोलीस लोकांविषयीं आतां मला पुष्कळच आशा वाटूं लागली आहे!"

आम्हांला उपलाटला जावयाचें आहे, असें आम्हीं त्या पोलीसाला सांगितलें तेव्हां, आल्या मार्गानें चारपांच मैल तुम्हांला मागें जावें लागेल, असें त्यानें सांगितलें व बरोबर एक वाटाड्याहि दिला.

आम्ही परत फिरून दोनतीन मैल गेलों असूं, तोंच डाव्या बाजूनें घंटेचा आवाज आम्हांला ऐकूं आला. "ही घंटा कसली बुवा! देऊळ बिऊळ तर येथें दिसत नाहीं!" मीं वाटाड्याला विचारलें. तेव्हां तो म्हणाला, "ह्या पारशाच्या आवारांत वारली मुलांची एक खाजगी शाळा आहे." तें ऐकतांच माझ्यांतला शाळामास्तर जागा झाला. गाडी सरळ आवारांतच वळवून घ्यावयाला मीं ड्रायव्हरला सांगितलें. आवार पुष्कळच मोठें होतें. आणि मध्यभागीं एक भला मोठा जुनाट बंगला होता. हें आवार माणेकजी फ्रामजी हवेवाला नांवाच्या एका नारगोळच्या पारशाचें आहे. बंगल्यांत त्याचा भय्या होता. शाळा ज्या भागांत भरते, तिकडे तो आम्हांला घेऊन गेला. शाळा कसली ती? अवघा एकच वर्ग. त्यांत दहाअकरा वर्षांच्या आंतलीं पंधरावीस वारली मुलें बाकावर बसलेलीं होतीं. एका कोपऱ्याला दोन मुलीहि होत्या. पाठीमागच्या बाजूला एक विटक्या रंगाचा फळा होता. मास्तर गुजराती होते. मी मास्तरना विचारलें, "केम मेहताजी, सूं चाले छे?" मास्तर म्हणाले, "कई नई साहेब, छोकराओ आवे छे!" आजूबाजूच्या पाड्यांमधलीं मुलें बारा-एक वाजेपर्यंत येतच असतात. हें आम्ही बोलतों आहोंत, तोंच एक छोटासा मुलगा आंत आला. डोक्यावर लहानशी शेंडी भुरुभुरु उडते आहे, अंगांत फाटका सदरा, कमरेला एक चिंधीची आवळून बांधलेली लंगोटी, एका हातांत दोरीला बांधलेला पाटीचा फाटका तुकडा आणि दुसऱ्या हातांत एक चुरगाळलेलें बिनपुठ्याचें पुस्तक, अशा थाटांत गंभीर चेहरा करून वर्गांत शिरणारा तो आठ वर्षांचा वारली विद्यार्थी बघून मौज वाटण्यापेक्षां पोटांत कांहीं तरी उन्ह उन्ह फिरल्यासारखें वाटलें. शिक्षणासाठीं तळमळणाऱ्या व्याकुळतेचें तें एक चिमुकलेंसें केविलवाणें प्रतीक होतें!

"वारली मुलांना तुम्ही मराठी शिकवायचें सोडून गुजराती कां शिकवतां?" असा मीं मास्तरांना प्रश्न केला. त्याचें त्यांना कांहीं उत्तर देतां आलें नाहीं. पारशी मालकानें गुजराती शाळा काढली म्हणून तीं मुलें गुजराती शिकतात एवढाच त्याचा अर्थ. वारली मुलांच्या शिक्षणाचा कुणीं मुद्दाम होऊन विचार केला आहे? जो जें शिकवील तें तीं शिकावयाला आपणीं तयार आहेत.

उद्यां एखाद्यानें त्या ठिकाणीं तामिळ शाळा काढली, तर तीं मुलें तामिळ शिकूं लागतील! पारशी सावकारानें आपल्या आवारांत वारल्यांसाठीं गुजराती का होईना पण एक लहानशी शाळा काढली, ही कांहीं कमी गोष्ट नाहीं. ज्याच्या सद्बुद्धीला जें वाटतें तें तो आपला करीत असतो. "मुलांकडून वाचून घ्या पाहूं थोडेंसें!" मीं मास्तरांना सांगितलें. एक मुलगा उभा राहून वाचूं लागला. वर्गांत माझ्या 'नवयुग वाचन माले'ची गुजराती आवृत्ति वापरण्यांत येत असलेली बघून साहजिकच मला आनंद झाला. मुलांना चांगल्या तऱ्हेनें वाचतां येत होतें, असें आम्हांला आढळून आलें. मुलांचा व मास्तरांचा निरोप घेऊन आम्ही वर्गाबाहेर पडलों. मालकाचा भय्या आम्हीं चहा घेतल्यावांचून आम्हांला आवारा-बाहेर जाऊं देईना. "चहा दिल्यावांचून एवढ्या मोठ्या पाहुण्यांना तूं आपल्या बंगल्यावरून कसें जाऊं दिलेंस असें मला माझ्या शेटनें विचारलें तर मी त्यांना काय उत्तर देऊं!" असा भय्यानें आम्हांला टणटणीत सवाल केला! तो भय्या शेठच्या पुढें जितका निरुत्तर झाला असता, तितकेच आम्ही त्याच्यापुढें त्यावेळीं निरुत्तर झालों. कांहीं वेळानें चहा घेतल्यानंतर भय्याच्या हातावर 'चिरीमिरी' ठेवून आम्ही आमच्या रस्त्याला लागलों.

मुख्य रस्त्यापासून गांव आंत दोनतीन मैल आहे. गांवाचे पाडे एकमेका-पासून पुष्कळच अंतरावर पसरलेले आहेत. सर्वच पाडे बघून येणें अशक्य होतें आणि त्याची आवश्यकताहि पण नव्हती. पहिल्या पाड्यावरच आम्हीं आमची मोटार थांबवली. साडेअकरा-बाराचा सुमार होता तो. डोक्यावर उन्ह फारच तापलें होतें. पाड्यांत आठदहा झोपड्या होत्या. लोक झोपले होते. आम्ही दोनतीन झोपड्यांतल्या लोकांना हाका मारून उठविलें आणि त्यांना आजूबाजूच्या मंडळींना बोलावून आणायला सांगितलें. थोड्या वेळांत सात-आठ पुरुष, सात-आठ बायका आणि दहा-पांच पोरें जमा झालीं. एका झोपडीच्या आडोशाला अंथऱ्या टाकून आम्ही बसलों. गेल्या दोन दिवसांत आम्हीं जे जे वारली पाहिले होते, त्यांच्यापेक्षां या पाड्यांतले वारली आम्हांला सर्वच तऱ्हेनें अत्यंत निकृष्ट आणि दरिद्री वाटले. वारल्यांमध्येंहि संस्कृतीचे निरनिराळे थर आहेत ही पूर्वीं झालेली आमची समजूत त्या वारल्यांना पाहून दृढ झाली. प्रत्येक झोपडीमध्यें आम्ही डोकावून आलों. भयंकर दारिद्य आणि गलिच्छपणा ह्याखेरीज त्या ठिकाणीं आम्हांला कांहींहि आढळलें नाहीं. डहाणू-

उंबरगांव विभागांतल्या वारल्यांच्या घरांत जी टापटीप आणि स्वच्छता आढळून येते, त्याचा अवशेषहि या उपलाटच्या वारल्यांच्या घरांत आम्हांला दिसला नाहीं. लहान पोरें तर खरजेनें आणि कातडीच्या रोगानें अगदीं पिळून गेलेलीं होतीं.

"कायरे वाड्यो," शामरावांनीं बोलावयाला सुरवात केली, "तुम्ही लोक इथं सरकारचा 'पलाट' करतां ना? मग, कसें काय तुमचें चाललें आहे?" त्यावर तो म्हातारा वारली म्हणाला, "अहो, कसचा पलाट अन् काय घेऊन बसलां आहांत? सगळ्यांत अगदीं भिकार जमिनी ज्या उरल्या होत्या, त्यांचे पलाट पाडून ते सरकारनें आम्हांला वाटून दिले. ह्या पलाटावर आमचें कसें काय भागणार?"

"काय पेरतां रे तुम्ही या पलाटांत?" नेवाळकरांनीं विचारलें.

तेव्हां एक वारली उठून घरांत गेला आणि 'कोद्रा' नांवाचा एक निकृष्ट तांदूळ आणि 'हरिक' नांवाचें नाचणीसारखें एक धान्य मुठींत घेऊन बाहेर आला. हे 'हरिक' शिजवून खाल्ले कीं, माणसांना गुंगी येते आणि कधीं कधीं तो बेशुद्धहि होतो, असें ते म्हणाले. "मग ह्या पलाटावर जर तुमचें पोट भरत नाहीं तर तुमचें भागतें कसें?" मी त्यांना विचारलें. तेव्हां म्हातारा वारली म्हणाला, "तेवढ्यासाठीं कोठल्यातरी सावकाराची जमीनहि आम्हांला करावी लागतेच!" तें ऐकून आम्ही चकित झालों आणि आश्चर्यानें एकमेकांच्या चेहऱ्याकडे बघूं लागलों. म्हणजे, सरकारी प्लॉट्स दिले तरी वारली शेतकरी हा सावकाराच्या कचाट्यामधून कांहीं निसटूं शकत नाहीं तर!

"ह्यावर उपाय एकच आहे!" नेवाळकर म्हणाले, "सरकारनें ह्यांना भिकार जमिनीचे प्लॉट्स पाडून देण्यापेक्षां चांगल्या चांगल्या जमिनीचे प्लॉट्स करून द्यावयाला हवेत!"

"पण चांगल्या जमिनी ह्या भागांत शिल्लक आहेतच मुळीं कुठें!" त्रिविक्रम उद्गारले, "त्या सगळ्या सावकार आधींच बळकावून बसले आहेत!"

वारल्यांना सरकारनें जमिनीचे प्लॉट्स करून दिले तर त्यांची स्थिति सुधारेल आणि ते आपल्या पायावर उभे राहून आपली सुधारणा करूं शकतील, ही जी आम्हीं आमची समजूत करून घेतली होती, ती उपलाटची परिस्थिति बघून तरी आम्हांला बदलणें भाग पडलें. त्याच प्रमाणें उपलाटची जमीन चांगली असूनहि आळशी आणि ताडीबाज वारल्यांनीं तिचा मगदूर कमी करून टाकलेला आहे, हें आधल्या दिवशीं सखारामपंत कारूळकरांनीं आम्हांला जें सांगितलें

होतें, तें त्यांचें म्हणणें बरोबर नाहीं असें आम्हांला त्या ठिकाणीं आढळून आलें. कम्युनिस्ट लोकांनीं त्या विभागांत काय दंगल केली, ह्याची माहिती आम्हीं त्यांना विचारली. पण त्याबाबत उत्तर देण्याची कोणाचीच तयारी दिसली नाहीं हें बघून आम्हीं अगदीं चकित झालों. अधिक पाडे पाहण्याची आम्हांला जरुरी वाटली नाहीं. परत निघण्यापूर्वी आम्हीं प्रत्येक झोपडीमधून जाऊन येण्याचें ठरविलें. एका झोपडींत एक बाई आणि तिची मुलगी स्वयंपाक करीत होती. मुलगी सतरा-अठरा वर्षांची होती. "काय बाई, मुलीचें लग्न झालें कीं नाहीं?" मीं विचारलें. तेव्हां लग्न करावयाला पैसे नसल्यामुळें घरांत मुलीचा 'खंदाड्या' आहे असें तिनें सांगितलें. 'खंदाड्या' हा मुलीच्या घरांत तिच्या नवऱ्याप्रमाणें राहतो. पांचसहा वर्षांत सांठले तर 'खंदाड्या'चें त्या मुलीशीं लग्न होऊन तो तिचा रीतसर नवरा होतो. 'खंदाड्या' हा घरजांवई झाला तर त्याला 'घरोर' म्हणतात. "मग खंदाड्या कुठें दिसत नाहीं तो? कामावर गेला कीं काय?" शामरावांनीं विचारलें. "त्याला सरकारनें पकडून नेलें आहे!" बाई म्हणाली. त्यावर आम्ही चपापलों. ही काय भानगड आहे? चार-पांच निरनिराळे प्रश्न तिला विचारले, तेव्हां त्या पाड्यांतले सात-आठ वारली तरुण ताडीचा एक मांडव जाळल्याच्या आरोपावरून पोलिसांनीं पकडून नेले असल्याचें आम्हांला तिच्याकडून कळलें. इतका वेळ आम्ही त्या पाड्यांत गप्पा मारीत बसलों होतों. पण ही महत्त्वाची गोष्ट त्यांपैकीं एकानेंहि कुणीं आम्हांला सांगितली नाहीं. स्वतःच्या तक्रारी किंवा दुःखें दुसऱ्याला सांगण्याच्या बाबतींत ते वारली आम्हांला फारच उदासीन वाटले. प्रत्येक झोपडींतला एक एक तरी माणूस पोलिसांनीं पकडून नेलेला होता. पण त्याबाबत ते अगदींच शांत होते. "अरे, तुमच्या माणसांना तुम्हीं जामिनावर सोडवून कां आणलें नाहीं?" शामरावांनीं त्यांना विचारलें. तेव्हां एक म्हातारा म्हणाला, "आम्हांला जामीन कोण मिळणार?"

"मग तुमच्या सावकाराकडे कां गेलां नाहींत?" नेवाळकरांनीं विचारलेल्या प्रश्नाला कोणींच उत्तर दिलें नाहीं. सर्व बाबतींत ते अतिशय असहाय आणि निराधार आहेत असें आम्हांला दिसून आलें. त्यांच्या सुखदुःखाची परवा करणारे आणि त्यांना कसल्याहि तऱ्हेचें साहाय्य करणारे ह्या जगांत कोणीहि नाहींत अशीच त्यांची भावना असावी, असें आम्हांला वाटलें. एकदोन बायका तुरुंगांत

जाऊन आपल्या नवऱ्यांना भेटून आलेल्या होत्या. एक बाई म्हणाली, "मी नाहीं गेलें माझ्या नवऱ्याला भेटायला!"

"कां गे असें?" मीं विचारलें. तेव्हां ती म्हणाली, "सरकारनें त्याला सोडलें म्हणजे येईल तो घरीं आपोआप परत!" घरांतली तरणीताठी मंडळी पोलिसांनीं पकडून नेल्याबद्दल म्हाताऱ्यांना किंवा बायकांना विशेष दुःख वाटतें आहे, असें आम्हांला मुळींच दिसलें नाहीं. सगळें जीवनच मुळीं ज्यांना संकटासारखें आहे, त्यांना ह्या बारक्यासारख्या आपत्तीचें काय विशेष वाटणार? पोलिसांनीं त्या पाड्यांतल्या पकडून नेलेल्या लोकांची नांवनिशीसह यादी शामरावांनीं तावडतोब तयार करून घेतली आणि 'लौकरच आपण त्याबाबत कांहीं तरी करूं' असें त्यांनीं त्यांना आश्वासन दिलें. आठदहा झोपड्यांच्या त्या लहानशा पाड्यांतहि एक ताडीचा लहानसा मांडव होता. तथापि, कम्युनिस्टांच्या दंगलीपासून तो बंद पडलेला होता. जाण्यापूर्वी आम्हीं प्रत्येकाच्या हातावर चारचार-आठआठ आणे ठेवले. पण त्यामुळें त्यांना आनंद झाला असें कांहीं त्यांच्या तोंडावरून आम्हांला कळून आलें नाहीं. पैसे घेतांना ते हसलेहि नाहींत किंवा कोणत्याहि तऱ्हेनें त्यांनीं आमचे उपकार मानले नाहींत. हें असें कां ह्याचा मी विचार करूं लागलों, तेव्हां माझ्या लक्षांत आलें कीं, मनांतली भावना आपल्या चेहऱ्यावर व्यक्त करतां येणें हें बुद्धीच्या विकासाचें किंवा संस्कृतीचें लक्षण आहे. प्राथमिक माणूस हा त्या दृष्टीनें पशूसारखाच असतो. आपण गाईला किंवा शेळीला गवत घातलें तर ती कुठें हसते? जनावरांचा चेहरा नेहमींच गंभीर असल्याचें आपल्याला आढळून येतें.

उपलाटच्या वारल्यांचा निरोप घेऊन आम्ही तळासरीवरून मुंबईच्या मार्गानें परत फिरलों. तळासरी मुंबईपासून एकशेंचौदा मैल दूर आहे. दीड-दोन वाजण्याचा सुमार होता. धुळीच्या त्रासांत प्रखर उन्हाची भर पडल्यामुळें मोटारींतला तो प्रवास अगदीं असह्य वाटूं लागला. पण करायचें काय? आणि थांबायचें कुठें? सागाच्या रुक्ष जंगलामधून सरळचे सरळ जाणाऱ्या रस्त्यांच्या धुळींतून आमची मोटार एकसारखी भरधाव चाललेली होती. वाटेंत सायवन लागलें. तेथें एका टेकडीवर डाकबंगला आहे. अतिशय मनोरम स्थळ आहे तें. त्या ठिकाणीं थोडासा मुक्काम करावयाचें आम्हीं ठरविलें. खेरीज प्रांत ऑफिस सावे ह्यांची तेथें गांठ पडेल अशी आमची कल्पना होती. आमच्या या सर्व मुशाफरीमध्यें

श्री. सावे ह्यांची आणि आमची गांठ पडली नाहीं हें एक मोठें वैगुण्य राहून गेलें होतें. तें दूर व्हावें अशी मनापासून आमची इच्छा होती. पण त्या ठिकाणीं सावे आम्हांला भेटले नाहींत. त्यांचा मुक्काम आधींच तेथून उठलेला होता. डाक-बंगल्याच्या आवारांत पोलिस पार्टीचा मात्र तळ होता. बंगल्याभोंवतीं काजूचीं अनेक झाडें होतीं. आणि त्या झाडांवर काजूफळें लटकलेलीं होतीं. त्यांच्या मादक वासानें सारें वातावरण भरून धुंद झालें होतें. पोलिसाकडून आम्हीं थंड पाणी मागून घेतलें आणि एका झाडाच्या ओट्यावर सावलींत बसून आमच्या टोपली-मधल्या सफरचंदांवर आणि टरबुजावर आम्हीं यथेच्छ हात मारला. गार पाणी प्याल्यानंतर आम्हांला पुष्कळच हुशारी वाटली. पोलिसाशीं थोड्याशा गप्पा मारून आम्ही पुन्हा चालू लागलों.

मनोरला पोहोंचावयाला आम्हांला तीन वाजले. येतांना आम्ही मनोरला थांबलोंच होतों. आम्हांला मासवणला जावयाचें होतें. मासवणचा रस्ता मनोर गांवांतून जातो. मनोरपासून तें पंधरा मैलांवर सूर्या नदीच्या कांठीं आहे. सूर्या नदीवर पूल ओलांडून आम्ही पलीकडे गेलों. पाण्यानें तुडुंब भरलेलें नदीचें विस्तीर्ण पात्र बघून प्रवासाचे सारे श्रम आम्ही एकदम विसरून गेलों. नदीचा एक काठ उंचवट्याचा आहे. ह्या उंचवट्याच्या पठारावर कोऱ्या करकरीत तीन सुंदर इमारती आमच्या दृष्टीस पडल्या. ह्या इमारती एकमजली असून त्या एकमेकां-पासून अलग अलग आहेत. तिकडेच आम्हांला जावयाचें होतें. आदिवासी मंडळाच्या मासवण येथील कार्याचें हेंच तें केंद्र होय. ह्या तीन इमारतींचें काम नुकतेंच पुरें झालेलें आहे. आजूबाजूला एकरोंवीस एकरांची जागा सरकारनें मंडळाला बक्षिस दिलेली आहे. दोन इमारतींमध्यें आदिवासी लोकांसाठीं एक इस्पितळ आणि एक दवाखाना सुरू करण्याचा आदिवासी मंडळाचा विचार असून, एक इमारत आदिवासी कार्यकर्त्यांना राहण्यासाठीं राखून ठेवण्यांत येणार आहे. आम्ही गेलों तेव्हां त्या ठिकाणीं आम्हांला शिंदेगुरुजी भेटले. ते आपलें कुटुंब घेऊन तेथें नुकतेच राहावयाला आले असल्याचें त्यांनीं आम्हांला सांगितलें. शिंदेगुरुजी हे 'आदिवासी मंडळा'चे एक अत्यंत निष्ठावंत आणि बुद्धिमान् कार्यकर्ते आहेत. तीस-बत्तीस वर्षांचें त्यांचें वय आहे. वारली समाजांत गेलीं दहा वर्षें ते उत्तम काम करीत आहेत. अगदीं अनपेक्षितपणें आम्ही त्या ठिकाणीं आलेले पाहून त्यांना अतिशय आनंद झाला. त्यांच्याशीं दुसरें कांहीं बोलायच्या

आधीं आम्ही त्यांना म्हणालों, "हें पाहा, आम्हांला आधीं तुमच्या नदीचा रस्ता दाखवा. उन्हानें आम्ही अगदीं भाजून निघालों आहोंत. थंडगार पाण्यांत डुंबल्याखेरीज आम्हांला बरें वाटावयाचें नाहीं!" शिंदेमास्तर पुढें झाले. खांद्यावर टॉवेल टाकून आम्ही त्यांच्या मागोमाग दरड उतरूं लागलों. नदीकांठचे दगड इतके तापले होते कीं, अनवाणी पायांनीं एक क्षणभरहि त्यांवर उभें राहणें शक्य नव्हतें. सर्वांच्या आधीं मींच नदींत उडी घेतली! थंडगार पाण्यांत शरीर अक्षरशः फेकूनच दिलें म्हणानात! जवळ जवळ तासभर आम्ही या नदींत डुंबत होतों. अडीच दिवसांच्या प्रवासाचा, धुळीचा आणि उन्हाचा सर्व शीण जणुं कांहीं आम्हीं या नदींत धुऊन टाकला म्हणानात! ह्या नदींतून गरम पाण्याचा एक झरा वाहतो असें म्हणतात. तो हातानें पाहण्याचा मीं प्रयत्न केला. पण तो हाताला कुठें लागला नाहीं. नदीचें पाणी तोंडाला मात्र जरा उग्र आणि मचूळ वाटलें खरें.

आंघोळी आटपून आणि ताजेतवाने होऊन आम्ही वर शिंदेगुरुजींच्या इमारतींत आलों. व्हरांड्यांतच त्यांनीं बैठक घातलेली होती. तेथें चहा तयार होईपर्यंत आम्ही चीज आणि बिस्किटें खात खात गप्पा मारूं लागलों.

"कम्युनिस्टांच्या एकंदर प्रचाराचा तुमच्या आदिवासी मंडळाच्या कार्याला किती उपसर्ग झाला?" मीं शिंद्यांना विचारलें.

ते म्हणाले, "खरें सांगूं? आमच्या कार्यावर कम्युनिस्टांचा कांहींएक परिणाम झालेला नाहीं. त्या बाबतींत माझें स्वतःचें धोरण असें असे. मी वारल्यांपाशीं कम्युनिस्टांच्या विरुद्ध एक अक्षर देखील कधीं बोलत नसें. कांहीं वारली त्यांच्याबद्दल मला माझें मत विचारीत, तेव्हां मी सांगें कीं, आम्ही जसे तुमच्या हितासाठीं झटतों तसे तेहि तुमच्या कल्याणासाठीं काम करीत आहेत. कम्युनिस्टांच्या प्रचाराचा जेव्हां या ठिकाणीं जोर होता आणि त्यांच्या मोठमोठ्या सभा ह्या भागांत जेव्हां भरत होत्या, तेव्हां त्या सभा ऐकून परत आलेले कांहीं वारली मला म्हणायचे, 'दादा, तुमच्या आणि त्यांच्या म्हणण्यांत आम्हांला तरी कांहीं फरक वाटत नाहीं.' त्यावर मी कांहींच बोलत नसें. त्यांचें म्हणणें मुकाट्यानें ऐकून घेई. पुढें एके दिवशीं तेच वारली माझ्याकडे आले आणि म्हणूं लागले, 'दादा, तुमच्यांत आणि लाल बावटेवाल्यांत फरक आहे बरें का! ते तुमच्यापेक्षां कांहीं तरी निराळेंच सांगतात!' कांहीं दिवसांनंतर कम्युनिस्टांचें खरें स्वरूप त्यांना हळूहळू कळून येऊं लागलें. पार्टीची वर्गणी एकेक रुपया प्रत्येक वारल्या-

करून जेव्हां सक्तीनें वसूल करण्यांत येऊं लागली आणि वर्गणी न देणाऱ्या वारल्यांना जेव्हां मारपीट होऊं लागली, तेव्हां अत्याचारी कम्युनिस्टांपासून वारली शेतकरी आपोआपच दूर सरकूं लागले आणि मग त्यांना आमच्या कार्यांचा चांगुलपणा कळून आला. सर्वसामान्य वारली शेतकऱ्याच्या मनांत आज कम्युनिस्टांबद्दल प्रेम नाहीं हें मी तुम्हांला सांगतों !"

"काय म्हणतां ?" मी उद्गारलों. "याचें कारण ?"

"त्याचें कारण असें," शिंदे म्हणाले, "कीं ह्या वारली लोकांतले मवाली आणि गुंड म्हणून जे जे कांहीं लोक होते ते ह्या कम्युनिस्ट लोकांनीं हातांत धरले आणि 'गोदाराणीचे शिपाई' म्हणून त्यांची निरनिराळ्या भागांत नेमणूक करून टाकली. ह्या वारली गुंडांनीं बाकीच्या वारली जनतेवर जुलूमजबरदस्ती केली नसती, तर वारली लोक कम्युनिस्टांना इतक्या लौकर विटले नसते !"

वारल्यांच्या प्रश्नावर शिंदेगुरुजींनीं फारच बारकाईनें विचार केला आहे असें आमचें मत झालें. चहा घेतल्यानंतर आम्हांला त्या ठिकाणीं फार वेळ थांबतां येणें शक्य नव्हतें. संध्याकाळच्या आंत आम्हांला मुंबईला पोहोंचावयाचें होतें. आजूबाजूच्या विस्तीर्ण आवाराची आम्हीं पाहणी केली. त्या ठिकाणीं कांहीं वारल्यांची वसाहत करण्याचा 'आदिवासी मंडळा'चा विचार आहे असें शिंदेगुरुजींनीं सांगितलें. एकंदरींत मासवण येथें 'आदिवासी मंडळा'नें उघडलेल्या ह्या केंद्राला थोड्या दिवसांनीं फारच महत्त्व आल्यावांचून राहणार नाहीं, अशी आमची खात्री झाली. शिंद्यांचा निरोप घेऊन आम्ही निघालों. पंचवीस-तीस मैलांनंतर वाडें लागतें. तेथें आदिवासी मंडळाचें 'छात्रालय' आहे. त्याला भेट देण्यासाठीं आम्ही गांवांत शिरलों. 'छात्रालय' फारच चांगलें आहे. तेथें पंचवीस-तीस वारली विद्यार्थी राहतात. सर्व विद्यार्थी स्वच्छ आणि तरतरीत वाटले. बहुतेकांनीं आपापल्या डोक्यावरच्या शेंड्यांना काट देऊन केस राखलेले होते. दहा-पंधरा मिनिटें एकत्र बसून आम्हीं त्यांच्याशीं गप्पा मारल्या. तथापि मनोरच्या वसतिगृहांत वारली मुलांचा आम्हांला जो अनुभव आला, तोच वाड्याच्या त्या छात्रालयांतहि आला. वारली मुलें बोलण्यांत चलाख नाहींत. एकसारखे पुष्कळ प्रश्न त्यांना जेव्हां विचारावे तेव्हां कुठें एखादें उत्तर त्यांच्या तोंडून निघतें. "वारली भाषेंतलें एखादें गाणें म्हणून दाखवा पाहूं !" ह्या आमच्या प्रश्नाला कोणींहि उत्तर दिलें नाहीं. वारली भाषा बोलणें किंवा त्या

भाषेंतलें गाणें म्हणणें ही एक कमीपणाची गोष्ट आहे अशी त्या मुलांची समजूत झालेली असावी, असें मला वाटलें आणि तेथल्या एका शिक्षकांना मीं तें बोलूनहि दाखविलें. मी त्यांना म्हणालों, "वारली जीवन किंवा आचार हे आपल्यापेक्षां कनिष्ठ तऱ्हेचे आहेत अशी तुम्ही ह्या मुलांची कृपा करून समजूत करून देऊं नका. त्यांच्या भाषेंत त्यांचीं गाणीं गावयाला आणि त्यांच्या गोष्टी सांगावयाला तुम्हीं एकसारखें त्यांना उत्तेजन द्यायला पाहिजे."

"बरें, मुलांनो!" बऱ्याच वेळानें मीं त्यांना विचारलें, "तुमच्यापैकीं कोणीं कोणीं आयुष्यांत काय काय व्हायचें ठरविलें आहे, तें तर आम्हांला सांगा!"

बराच वेळ कोणी बोललें नाहीं. मग एक वारली मुलगा अगदीं 'ब्राह्मणी' भाषेंत आणि उच्चारांत म्हणाला, "आयुष्याचें ध्येय मीं अजून निश्चित केलें नाहीं!" तें उत्तर ऐकून आम्ही चकितच झालों. पांच वर्षांचा मेकॉले लहानपणीं एका बाईच्या घरीं चहाला गेला असतां चहाचा कप त्याच्या अंगावर सांडून त्याचें अंग भाजलें. कांहीं वेळानें यजमानीणबाईनीं त्याला विचारलें, "बाळ, आतां तुला कसें वाटतें?" त्यावर चिमुकला मेकॉले गंभीर चेहरा करून उत्तरला, "Madam, now the agony is abated!" 'आयुष्याचें ध्येय मीं निश्चित केलें नाहीं!' हें त्या वारली विद्यार्थ्याच्या तोंडचें वाक्य ऐकून मला मेकॉलेच्या त्या उद्गारांची आठवण झाली. दुसऱ्या एका वारली विद्यार्थ्यानें तर खूपच गंमत केली. मला त्यानें ओळखलें होतें कीं नाहीं हें मला माहीत नाहीं. पण "तुला आयुष्यांत काय व्हायचें आहे?" ह्या माझ्या प्रश्नाला त्यानें "मला अत्रे व्हायचंय्!" असें जेव्हां उत्तर दिलें, तेव्हां हसून हसून आमच्या मुरकुंड्या वळल्या. मी त्याला म्हणालों, "वेड्या, जवाहरलाल नेहरू अन् सुभाषचंद्र बोस व्हायचें सोडून 'अत्रे' होण्याचा हा भलताच विचार तुझ्या डोक्यांत कुठून रे शिरला?"

छात्रालयाचा निरोप घेऊन आम्ही वाड्यामधून बाहेर पडलों तेव्हां सूर्य मावळत होता. वाड्याला आम्हांला फारच उकडत होतें. या महिन्यांत बाजूचे डोंगर पेटविण्यांत येत असल्यामुळें त्या गांवाचें उष्णतेचें मान फारच असतें, असें आम्हांला समजलें. मोटार जेव्हां चालू लागली आणि वारा जेव्हां तोंडावर आदळूं लागला तेव्हां आम्हांला बरें वाटलें.

"आदिवासी मंडळाच्या शैक्षणिक कार्याबद्दल मला कांहीं म्हणावयाचें नाहीं."

मीं बोलावयाला सुरुवात केली. "त्यांचा प्रयत्न योग्य आहे. पण ह्या जिल्ह्यांतल्या तीन लक्ष वारली लोकांपैकीं अवघ्या पांचपन्नास मुलांना शिक्षण दिलें जात आहे, ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे मंडळाचें कार्य किती अपुरें आहे ह्याची जाणीव मात्र होते. वारली मुलांना शिक्षण देण्यासाठीं ह्या विभागांत शेकडों वसतिगृहें सरकारनें उघडावयाला पाहिजेत!"

"तथापि, त्यांच्या मुलांना आपल्या मुलांपेक्षां फार निराळें शिक्षण दिलें पाहिजे!" नेवाळकर म्हणाले. "शेतापासून आणि जंगलापासून त्यांना तोडून शहरांत नेणारें आणि त्या ठिकाणीं त्यांना मजूर किंवा कारकून बनविणारें शिक्षण त्यांना आपण मुळींच देतां कामा नये!"

काणेकरांच्या डोक्यांत दुसराच कांहीं तरी विचार चालला होता. ते एकदम आवेशानें म्हणाले, "सावकारांच्या हातून जमिनी हिरावून घेऊन त्या वारल्यांच्या ताब्यांत दिल्या म्हणजे वारल्यांचा उद्धार होईल, हें कम्युनिस्टांचें म्हणणें चूक आहे! सावकारांच्या हातीं जमीन असणें हें जितकें वाईट तितकेंच ती वारल्यांच्या हातीं जाणें हेंहि पण वाईटच आहे. 'तुम्ही जमिनीचे मालक आहांत!' हें जें कम्युनिस्ट लोक वारल्यांना सांगत आहेत तें बरोबर नाहीं. सावकार वर्ग एकदम नाहींसा करण्याचा प्रयोग रशियांत यशस्वी झालेला नाहीं!"

"म्हणजे, सावकार वर्ग राहिला पाहिजे अशा मताचे तुम्ही आहांत कीं काय?" मीं आश्चर्यानें विचारलें.

"गैरसमज करून घेऊं नका!" काणेकर म्हणाले. "सावकार आणि वारली ह्यांचा प्रत्यक्ष संबंध न येईल याची सरकारनें काळजी घेतली पाहिजे. सावकाराकडून सरकारनें खंडानें जमिनी घ्याव्यात आणि त्या लागवडीसाठीं वारल्यांना द्याव्यात. जमिनीचा व पिकाचा मगदूर सुधारण्यासाठीं सरकारनें वारल्यांना शक्य ती मदत करावी!"

"वारली मुलुखामधल्या ह्या मुशाफरीमुळें ह्या गोष्टीबद्दल माझें मत मात्र आतां अगदीं निश्चित झालें आहे!" कांहीं वेळानें मी म्हणालों. "कम्युनिस्टांच्या अत्याचारी आणि हिंसात्मक मार्गानें वारल्यांचा उद्धार कदापि होणें शक्य नाहीं!"

"शाबास!" शामराव माझ्या पाठीवर थाप मारून म्हणाले, "म्हणजे शेवटीं तुम्ही आमच्या मतावर आलांत! म्हणूनच तर आपल्या कॉंग्रेस सरकारनें कम्युनिस्ट कार्यकर्त्यांना येथून हद्दपार केलें!"

"कॉंग्रेस सरकारनें ती खरोखरच उत्तम गोष्ट केली!" मी म्हणालों. "आणि कम्युनिस्ट कार्यकर्त्यांना ह्या मुलुखांत कॉंग्रेस सरकारनें कांहीं दिवस तरी मुळींच पाऊल टाकूं देतां कामा नये अशा मताचा मी झालों आहें!"

"वा, तुमचें हें मत 'नवयुग' मध्यें जाहीर करा, म्हणजे कॉंग्रेस सरकार तुमच्यावर खूप होऊन तुमचें सहा हजारांचें डिपॉझिट तावडतोब परत करून टाकील!" नेवाळकर मोठमोठ्यानें हसत म्हणाले.

ठाणें येईपर्यंत पुष्कळच अंधार पडला होता. ठाण्यापासून पुढें मुंबईपर्यंत वाटेनें मोटार लॉरींच्या रहदारीचा मात्र इतका त्रास झाला कीं विचारतां सोय नाहीं. कधीं मुंबईला येऊन पोहोंचतों आहोंत असें आम्हांला होऊन गेलें. सर्वांना आपापल्या जागीं पोहोंचवून मी घरीं आलों, तेव्हां चांगले आठ वाजून गेले होते. आंघोळ आणि जेवण उरकून बिछान्यावर पडलों नाहीं तोंच मी एकदम घोरूं लागलों. त्या रात्रीं स्वप्नामध्यें मी वारली मुलुखांतल्या मुशाफरीचीं किती आवर्तनें केलीं असतील कोणास ठाऊक! पहाटे पहाटे तर ह्या स्वप्नमय मुशाफरीमध्यें विलक्षण गतिमानता उत्पन्न झाली. आणि त्याला भलतीच कलाटणी मिळाली. आम्ही सारे लंगोट्या नेसून आणि डोक्यावर शेंड्या ठेवून एका ताडीच्या मांडवाखालीं बसलों आहोंत, वडाचीं पानें तोंडाला लावून ताडी पितों आहोंत आणि नंतर वारली 'लोठ्यां'ना कडेवर घेऊन बेहोषपणें 'गाड्या गाड्या भिंगोऱ्या' खेळतों आहोंत, अशा अद्भुत स्वप्नांचा प्रकार सुरू झाला! आणि ह्या स्वप्नांची अखेर तर फारच नाट्यपूर्ण झाली. एका वारल्याची लंगोटी धरून काणेकर त्याला फरफटत ओढून आपल्याकडे आणीत आहेत आणि तो वारली मोठमोठ्यानें ओरडत आहे असें एकाएकीं मला दिसूं लागलें. मी काणेकरांना म्हणालों, "सोडून द्या त्या वारल्याला! कशाला उगीच त्याला छळतां आहांत!" काणेकर विजयानंदानें गर्जना करीत म्हणाले, "नाहीं, हा वारली नाहीं! वारल्यांचा पोशाख करून त्यांच्यांत गुप्तपणें वावरणारा हा एक मुंबईचा लालभाई आहे. मी त्याला चांगला ओळखतों. चला आपण त्याला पोलिसाच्या ताब्यांत देऊं!" असें म्हणून काणेकरांनीं त्या लालभाईला एक जोराची गचांडी मारली. आम्ही सर्व काणेकरांच्या मागें धावलों. पण पोलिसचौकीवर पोहोंचायच्या आधींच मी जागा झालों होतों! किलकिले डोळे करून मी समोर पाहूं लागलों तों घड्याळांत आठ वाजून गेले होते.

# नाशिक कॉंग्रेसच्या जत्रेंत : १ :

भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू हे नाशिक कॉंग्रेसला जाण्यासाठीं मुंबईहून शनिवारीं सकाळीं मोटारनें निघणार असल्याचें मला कळलें. तेव्हां मींहि ठरविलें कीं आपणहि त्याच दिवशीं, त्याच वेळीं, त्याच रस्त्यानें आणि मोटारनेंच नाशकाला जावें म्हणून. अर्थात् पंडितजींच्या मोटारमधून मला थोडेंच जातां येणार? तेव्हां मीं माझी स्वतःचीच मोटार घेतली. सकाळीं सहा वाजतां दिशा फटफटूं लागायच्या आधींच मीं मुंबई सोडली. उत्तर रात्रीं पाऊस पडून गेल्यामुळें रस्ते ओलसर झाले होते व हवेंत गारठा पडला होता. पण मुंबईची हवा अशी चमत्कारिक कीं कुर्ला सोडून बरेंच पुढें जाईपर्यंत सारखें उकडत होतें. अगदीं सकाळची वेळ होती म्हणून रस्त्यावर रहदारी मुळींच नव्हती. पण दोनदोन फर्लांगांच्या अंतरावर पोलिस शिपाई रस्त्याच्या बाजूनें लाठ्या घेऊन उभे होते. रस्त्यानें एखादी मोटार गेली अन् त्यांत खादीचे कपडे घातलेले कोणी असले कीं ते 'सावधान'च्या पवित्र्यांत एकदम ताठ उभे राहात. गांधीटोपी-मुळें आजकाल सगळ्यांत जर कोणाची जास्त पंचाईत झाली असेल तर ती पोलिसांची. मोटारींत बसून जाणारा प्रत्येक खादीधारी माणूस त्यांना कॉंग्रेसचा मंत्री किंवा पुढारी वाटतो आणि त्यामुळें बिचाऱ्यांची अशी कांहीं त्रेधा आणि

तिरपीट उडते कीं विचारूं नका. मुंबईपासून तों ठाण्यापर्यंत जवळजवळ वीस मैलांचें अंतर आहे. पण वीस मैलांच्या या साऱ्या रस्त्यावर जागजागीं लाठीबंद पोलिस पेरण्यांत आलेले होते. माझी समजूत आहे कीं पहाटे पांच-साडेपांच वाजल्यापासून हे पोलिस आपापल्या जागेवर उभे असले पाहिजेत. मला तर त्यांची खरोखरच दया आली.

मध्येंच एके ठिकाणीं मोटार थांबवून मीं एका पोलिसाला त्याबद्दल सहज बोललों सुद्धां.

मी म्हणालों, "शिपाईदादा, इंग्रजांच्या राज्यांत व्हाइसरॉय साहेबासाठीं देखील एवढा बंदोबस्त नव्हता."

त्या शिपायाची विनोदबुद्धि तल्लख असावी असें वाटतें. तो मिस्किल चेहरा करून मला म्हणाला, "स्वातंत्र्यामुळें आपल्यावरची जबाबदारी जास्त वाढली नाहीं का साहेब?"

पोलिस अधिकाऱ्यांच्या 'जीप' गाड्याहि आघाडीवर टेहळणी करावयास चाललेल्या आम्हांला भेटल्या. ठाण्याला मोटारीच्या कांहीं कामासाठीं अर्धा तास मला थांबावें लागलें. मुख्य रस्त्याच्याच बाजूला मी उभा होतों. तेथें पांच-दहा तरुण जमा होऊन कांहीं तरी बोलत होते. त्यांपैकीं एकानें मला ओळखलें. मीं त्याला विचारलें,

"कां बुवा, तुम्ही कां इथें उभे?"

तो तरुण हसत म्हणाला, "वाः! आतां या रस्त्यानें जवाहरलाल नेहरू जाणार आहेत कीं!"

मी म्हणालों, "तुम्हां लोकांना बरी लौकर ही बातमी कळली!"

त्या तरुणानें मला विचारलें, "पण काय हो, जवाहरलाल एस्. टी. च्या बसनें आतां जाणार आहेत असें आम्हीं ऐकलें आहे तें खरें आहे का?"

मी म्हणालों, "मला कांहीं माहीत नाहीं! पण एखादे वेळीं ते एस्. टी. च्या बसनें जातील सुद्धां. काल नाहीं का दिल्लीहून ते सामान्य उतारूंच्या विमानामधून आले?"

ठाण्यासारख्या शहरांत जवाहरलालजींच्या दर्शनासाठीं फारच मोठा जनसमूह रस्त्याच्या कडेला जमा होईल अशी माझी अपेक्षा होती. पण मी ज्या जागीं उभा होतों तें अगदीं नाक्याचें ठिकाण असूनहि तेथें दहावीस तरुण मुलांपेक्षां अधिक

कोणी जमा झालेलें मला दिसलें नाहीं. आणि हीं मुलें देखील कॉंग्रेसबद्दल आदर बाळगणारीं असावींत असें कांहीं मला त्यांच्या बोलण्यावरून वाटलें नाहीं.

नाशिकच्या दिशेनें जाणाऱ्या एका भल्या मोठ्या मोटारींत गांधी टोप्या घातलेलीं बरींच माणसें दाटीवाटीनें बसलेलीं बघून, ह्या तरुण मुलांनीं मोठ्यानें गर्जना केली, "सफेत टोपी, काळा बाजार!" तेव्हां मी हसून म्हणालों, "आहे, आमच्या महाराष्ट्रांतल्या तरुणांची बुद्धिमत्ता अद्यापि शाबूत आहे."

पुण्याकडे जाणारा रस्ता उजव्या बाजूला जेथें फुटतो तेथें मात्र दहावीस पार्शी स्त्रीपुरुष आणि शेंपन्नास विद्यार्थी नेहरूंच्या दर्शनासाठीं मोठ्या उत्सुकतेनें रस्त्याच्या दोन्ही बाजूंना उभे होते. ठाणें सोडून मी जसा दहापांच मैल पुढें गेलों तशी पावसाला जोरानें सुरुवात झाली. मुंबईहून निघतांना वाटेंत पाऊस लागणार नाहीं असें मला वाटत होतें. पण ती कल्पना अजिबात चुकीची ठरली. या पावसानें ठाण्यापासून आमचा पाठलाग करावयास सुरुवात केली आणि अगदीं शेवटपर्यंत त्यानें आमचा पिच्छा पुरविला. अधूनमधून पाऊस थोडासा उघडल्यासारखा वाटे. पण पुन्हा त्याची अशी जोरानें झड लागून राही कीं कांहीं विचारूं नका. रस्ता सिमिटाचा असल्यानें फारच चांगला आहे. म्हणून पावसाचा त्रास तसा कांहीं विशेष जाणवला नाहीं. पण पावसानें प्रवासाच्या उत्साहावर मात्र पाणी पडलें. आणि मन आंतून एखाद्या पालीप्रमाणें चुकचुकून सांगूं लागलें कीं, यंदाचें नाशिकचें हें कॉंग्रेसचें अधिवेशन कांहीं विशेषसें यशस्वी होणार नाहीं. एखादी गोष्ट चांगली होणार असली, म्हणजे तिचे आधींपासूनच शकुन होऊं लागतात. त्याचप्रमाणें वाईट गोष्ट होणार असली म्हणजे अनेक दुश्चिन्हें आगाऊच तिची सूचना देऊं लागतात. पाऊस हें दुश्चिन्ह तर खचितच नव्हे, आणि महाराष्ट्राला तर ह्या वेळीं पावसाची फारच जरुरी होती. पण कॉंग्रेसच्या ह्या अधिवेशनाला मात्र पावसाचा हा मुहूर्त कांहीं चांगला नाहीं हें बरीक खरें. आधीं ठरलेल्या कॉंग्रेस अधिवेशनाच्या तारखा पुढें ढकलत ढकलत शेवटीं अशी वेळ येऊन ठेपली कीं तें अधिवेशन नेमकें पावसाच्याच तोंडांत येऊन पडलें. मोटार हाकतां हाकतां हाच एक विचार माझ्या मनांत चालला होता.

वाटेंत भिवंडी आणि पडघा नांवाचें एक दुसरें गांव आहे. तेथें मात्र नेहरूंना पाहण्यासाठीं लोकांची बरीच गर्दी झालेली होती. कांहीं कांहीं लोक तर हातांत फुलांचे हार घेऊन उभे होते. पण स्वातंत्र्यपूर्व काळांत नेहरूंसंबंधीं लोकांचा जो

उत्साह होता तो कांहीं आतां उरला नाहीं, एवढी मात्र गोष्ट माझ्या लक्षांत आल्यावांचून राहिली नाहीं. काँग्रेसचीं निशाणें आणि घोषणा ह्यांची उणीव ह्या जनसमुदायांत मला विशेष तीव्रतेनें भासली. पंडित नेहरू मागाहून येत आहेत असा इशारा देत एक पोलिसगाडी जेव्हां झपाट्यानें आमच्या मागून येऊन पुढें गेली, तेव्हां मीं माझ्या मोटारीचा वेग कमी केला. थोड्या वेळांतच, पुढें पोलिसांची पायलट गाडी, मध्यें पंडित नेहरूंची गाडी, त्यानंतर एक संरक्षक गाडी आणि सर्वांच्या मागें मोटारसायकलीवर एक पोलिस अधिकारी अशा थाटानें नेहरूंचा काफिला आमच्या अंगावरून गेला. नेहरू ज्या गाडींत बसले होते ती मुंबईच्या गव्हर्नरांची गाडी होती. तिच्या टपावर एक लाल दिवा चमकत होता आणि काँग्रेसचा तिरंगी झेंडा फडकत होता. नेहरू एका कोपऱ्यांत मान मागें टाकून शांतपणें झोपले होते. प्रवासामध्यें नेहरू झोपतात असें मीं मागें कुठें तरी वाचलें होतें तें खरें असावें असें मला या वेळीं वाटलें. नेहरूंच्या मागोमाग आठदहा मैलपर्यंत तरी मी झपाट्यानें गेलों. नेहरूंना पाहण्यासाठीं आणि त्यांना हार घालण्यासाठीं जमलेल्या लोकांची मात्र निराशा झाली. कारण नेहरूंची गाडी कांहीं कुठें थांबली नाहीं आणि लोकांचे हार मात्र तसेच त्यांच्या हातांत राहिले. भिवंडी व पडघा ह्या दोन गांवांत जमलेल्या शेंपांचशें लोकांपेक्षां मात्र वाटेंत गर्दी कुठेंच आढळली नाहीं.

नेहरूंच्या मागून आम्ही चाललों होतों, म्हणून मुंबईपासून सत्तेचाळिसाव्या मैलावर नेहरूंच्या मागून चाललेल्या संरक्षक 'जीप'ला जो भयंकर अपघात झाला तो मात्र ताबडतोब मला पाहावयाला मिळाला. बाकीच्या वृत्तपत्रांना मींच पुढें ही बातमी सांगितली. ह्या ठिकाणीं 'वाघमारी खिंड' म्हणून एक लागते. रस्ता उताराचा आणि नागमोडी वळणाचा आहे. रस्ता पावसानें ओला झाला असल्यानें वास्तविक मोटारड्रायव्हरनें गाडी अगदीं जपून हाकायला पाहिजे. कारण गाडी केव्हां घसरेल याचा अशा वेळीं नेम नसतो. पण नेहरूंच्या मोटारीमागें सारखें अंतर ठेवून चालण्याच्या झपाट्यांत संरक्षक जीपच्या ड्रायव्हरला कांहीं भान राहिलें नाहीं. त्याची गाडी वळणावर जी 'स्लाइड' झाली ती डाव्या हाताकडे असलेल्या उतारावरून एकदम खालीं सत्तर फूट कोलमडून एका शेतांत पडली. ह्या गाडींत दिल्लीच्या मध्यवर्ती पोलिसखात्यांतले चार पोलिस अधिकारी होते. त्यांचें नशीब खरोखरच बलवत्तर म्हणायला पाहिजे. कारण ह्या अपघातामध्यें

जिवंत राहणें सर्वस्वीं अशक्यच होतें. गाडीचा तर चेंदामेंदा झाला. पण ह्या पोलिसांना थोडेंसें खरचटण्यापलीकडे मात्र विशेष दुखापत झाली नाहीं. मागून येणाऱ्या दुसऱ्या एका मोटारीमध्यें त्यांना घालून तावडतोब पुढें नेण्यांत आलें. मध्यें शहापूरला चहा घेण्यासाठीं मी थांबलों होतों म्हणून अपघात झाल्यानंतर दहापंधरा मिनिटांनींच मी तेथें येऊन ठेपलों. तो उतार बघून तर माझे डोळेच फिरले. चाळीसपन्नास खेडूत जमा करून त्यांच्या साहाय्यानें मोटारीचा मुडदा वर ओढून आणण्याचा कांहीं पोलिस अधिकारी प्रयत्न करीत होते.

पावसाबरोबरच वाटेंत पोलिसांची मात्र आम्हांला कुठेंच उणीव भासली नाहीं. मुंबईपासून ठाण्यापर्यंत दोन दोन फर्लांगांवर जसे लाठीबंद पोलिस उभे होते तसेच ते पुढें साठसत्तर मैलपर्यंत म्हणजे जवळजवळ कसाऱ्याचा घाट लागेपर्यंत रस्त्याच्या कडेला ठिकठिकाणीं उभे असलेले आम्हांला दिसले. नेहरूंची गाडी जाऊन किती वेळ झाला तरी पोलिस आपले मागें उभेच. मीं माझ्या एका ओळखीच्या पोलिस अधिकाऱ्याला विचारलेंसुद्धां कीं, "का हो, अजून कां ही पोलिसांची पलटण उभी ठेविली आहे ?"

तो म्हणाला, "अहो, नेहरू गेले म्हणून आमच्या मागची कटकट थोडीच संपली आहे ? आणखीन् कोणी तरी एखादा खादीवाला काका अन् मामा मागून जायचा."

खरोखरच, नेहरूंच्या रक्षणासाठीं पोलिसांचा हा बंदोबस्त वाजवीपेक्षां फारच फाजील प्रमाणांत केला जात आहे, असें मला त्या दिवशीं वाटल्यावांचून राहिलें नाहीं. साठसत्तर मैलपर्यंत रस्त्यावर पोलिस उभे करून ठेवायचे हा काय प्रकार आहे ? जगांत कोणत्या राष्ट्राच्या पंतप्रधानासाठीं असा बंदोबस्त करण्यांत येत असेल बरें ? आणि हे काठीवाले पोलिस रस्त्यावर नुसते उभे करून ठेवण्याचा तरी संरक्षणाच्या दृष्टीनें कांहीं उपयोग आहे ? नुसतें बंदोबस्ताचें प्रदर्शन ! दुसरें काय ? बरें, नेहरू जे नाशिकला जात होते ते कॉंग्रेसच्या कामासाठीं जात होते. ते कांहीं भारत सरकारच्या कामासाठीं नव्हे.

देशांतील एका राजकीय पक्षाचा थोर पुढारी रस्त्यानें जाऊं लागला म्हणजे त्याच्या संरक्षणासाठीं सरकारला एवढा आटापिटा करावा लागतो ? इंग्लंडमध्यें कॉंझर्व्हेटिव्ह पक्षाच्या सभेला पूर्वी चर्चिल जेव्हां जात असतील किंवा आतां पक्षाच्या वार्षिक अधिवेशनाला ॲटली जेव्हां जात असतील, तेव्हां त्यांच्या जाण्याच्या

वाटेनें पोलिसांचा असा का बंदोबस्त केला जात असेल? कॉंग्रेस पक्ष अधिकारारूढ असला म्हणून आपल्या खाजगी कामासाठीं सरकारी अधिकाऱ्यांचा, नोकरांचा आणि राज्ययंत्राचा अशा तऱ्हेनें उपयोग करून घेण्याचा त्याला काय अधिकार आहे हो? ‘काळा बाजार — काळा बाजार’ म्हणून आपण ज्याला म्हणतों, तो कांहीं ह्याच्यापेक्षां का निराळा असतो? हातीं आलेल्या सत्तेचा आणि अधिकाराचा हा काळा बाजारच होय! नाहीं तर काय? हिटलर आणि मुसोलिनीच्या राजवटींत सरकारी राज्ययंत्राचा ह्याच्यापेक्षां आणखीन् तो काय निराळा उपयोग केला जात होता? अधिकारारूढ कॉंग्रेस पक्ष हळूहळू देशाला हुकूमशाहीकडेच ओढून नेत आहे हाच ह्याचा अर्थ नव्हे काय? मग लोकशाहीच्या पोकळ गप्पा नुसत्या तोंडानें करण्यांत काय अर्थ आहे? नेहरूंसारख्या जगविख्यात आणि लोकप्रिय नेत्याच्या कीर्तीला तर हा अतिरिक्त पोलिशी बंदोबस्त म्हणजे एक अमंगळ लांछनच होतें.

कसाऱ्याचा घाट आणि थळघाट चढत असतांना माझ्या मनांत अशा तऱ्हेचे विचार चालले होते. घाटमाथ्यावर भयंकर धुकें पसरलें होतें. आजूबाजूला कांहीं दिसत नव्हतें. इगतपुरीपासून तर पावसाचा सपाटा असा जोरानें सुरू झाला कीं कांहीं विचारूं नका. नाशिकच्या जवळ आम्ही जसजसे येऊं लागलों तसतशा टेकड्या धुक्यानें, ढगांनीं आणि पावसानें व्यापून गेलेल्या आम्हांला दिसल्या. शेंदोनशें यार्डांच्या पुढें तर डोळ्यांना कांहीं दिसत नव्हतें. अशा तऱ्हेनें धुंद, कुंद आणि मलिन वातावरणांत खिन्न आणि विषण्ण मनःस्थितीमध्यें मीं नाशिकच्या परिसरांत प्रवेश केला.

नाशिकमध्यें प्रवेश केला मात्र, आणि पुन्हा पोलिसांच्या आणि होमगार्डांच्या राज्यांतच आपण शिरतों आहों कीं काय असें मला वाटलें. जिथें तिथें पोलिस अधिकारी, पोलिस शिपाई अन् होमगार्ड. कोणी शिट्या वाजवताहेत, कोणी हातवारे करताहेत, तर कोणी रस्त्यावरून जाणाऱ्या रहदारीला अन् जनतेला वाटेल तसे दम देताहेत किंवा हुकूम सोडताहेत! हें काय कॉंग्रेसचें अधिवेशन आहे कीं पोलिस शिपायांचें अधिवेशन आहे, असाच पावलोपावलीं मनाला भास होत होता. शिपायांच्या मदतीला आणखी पाऊस अन् चिखल ह्यांची भर. त्यामुळें नाशिक शहराला अशी कांहीं कळा प्राप्त झालेली होती कीं कांहीं विचारूं नका. कॉंग्रेसचे अध्यक्ष बाबू पुरुषोत्तमदास टंडन हे साडेदहा वाजतांच एका खास गाडीनें आले होते. त्यांच्या गाडीला पांचसहा डबे होते. पण

टंडनबाबू ज्या डब्यांत बसले होते तो मात्र बायकांचा डबा होता. बायकांच्या डब्यांत बसून कॉंग्रेसच्या अध्यक्षाला नाशिक येथें घेऊन येण्याची अद्भुत योजना कोणत्या कॉंग्रेसवाल्याच्या डोक्यांतून निघालेली असावी, ह्याचा त्यांच्या सत्कारार्थ स्टेशनवर जमलेली मंडळी तोंडांत बोटें घालून अचंब्यानें विचार करूं लागली. टंडनबाबूंबरोबर शेंदीडशें कॉंग्रेस प्रतिनिधि आलेले होते. नाशिक शहराच्या रस्त्यामधून अध्यक्षांची जी मिरवणूक काढण्यांत आली तोहि एक विनोदाचा अजबच प्रकार होता.

ज्या अध्यक्षीय जागेसाठीं अटीतटीचा एवढा सामना झाला अन् जिकडे साऱ्या भारताचें लक्ष लागून राहिलें त्या जागेवर निवडून आलेल्या माणसाचा सत्कार अधिवेशनाच्या गांवीं अशा तऱ्हेनें केला जाईल असें स्वप्नांत तरी कोणाला वाटलें असेल काय? कॉंग्रेसच्या अध्यक्षपदीं शंकरराव देव निवडून आले असते तर त्यांच्या योग्यतेला मात्र साजेल अशाच तऱ्हेची ही अध्यक्षीय मिरवणूक होती, एवढें सांगितलें म्हणजे या मिरवणुकीची लोकांना यथार्थ कल्पना येऊं शकेल. एखाद्या श्रीमंताच्या लग्नाची मिरवणूक ह्यापेक्षां जास्त भव्य आणि टोलेजंग निघत असते. आघाडीला गांवांतल्या 'रेमन सर्कशीं'तला एक हत्ती चालला होता. हत्ती कसला तो? हत्तीचें तें पिलूंच होतें. त्यावर तिरंगी झेंडा हातांत घेऊन एक माणूस बसला होता. ज्या 'ग्रेट रेमन सर्कशी'नें हा आपला हत्ती ह्या मिरवणुकीला उसनवार दिला होता, तिनें आपल्या सर्कशीची जाहिरात करण्याची ही संधि मात्र मुळींच दवडली नाहीं. हत्तीमागून भोसले लष्करी शाळेंतले कांहीं विद्यार्थी हातांत भाले घेऊन घोड्यावर बसून चालले होते. त्यांच्यामागून सात-आठ बॅण्ड गलगा करीत आणि हिंदी चित्रपटांतलीं लोकप्रिय गाणीं वाजवीत चालले होते. एका बोटीसारख्या आकाराच्या आणि रुपेरी रंगाच्या लहानशा उघड्या 'जीप'मधून अध्यक्ष टंडनबाबू आणि स्वागताध्यक्ष भाऊसाहेब हिरे बसून चालले होते. भाऊसाहेब हिऱ्यांना तर आपण स्वतःच कॉंग्रेसचे अध्यक्ष आहोंत असें वाटत होतें. आणि त्या भावनेनें ते रस्त्याच्या दुतर्फा गाड्यांच्या ग्यालरींत जमलेल्या लोकांकडे मधून मधून पाहात होते. अध्यक्षांच्या मागून गांवांतल्या निरनिराळ्या व्यापाऱ्यांच्या नि दुकानदारांच्या मोटारी चालल्या होत्या. त्यांनींहि आपापल्या मोटारीवर स्वतःचीं नांवें लिहून आपली जाहिरात करण्यास कमी केलें नव्हतें.

'कोठारी ह्यांची तंबाखू', 'भिकूसा यमासांची विडी' आणि 'बिटकोची टूथपावडर' ह्यांची जाहिरात काँग्रेसच्या अध्यक्षीय मिरवणुकींत व्हावी यापेक्षां या मिरवणुकीची अधिक विटंबना कोणती असूं शकेल? ह्या मोटारीच्या मागें नाशिकच्या स्थानिक शाळेंतले विद्यार्थी आणि शिक्षक पायीं चाललेले होते. अध्यक्षीय मिरवणुकींत विद्यार्थ्यांनीं आणि शिक्षकांनीं हजर राहिलेंच पाहिजे असें सक्तीचें 'सर्क्युलर' निघालें होतें म्हणून एवढी तरी मंडळी ह्या मिरवणुकींत सामील झालेली दिसली. सर्व मिळून या मिरवणुकींत पांचसहाशें माणसेंदेखील नसतील. त्यांतून काँग्रेसच्या निशाणांच्या किंवा घोषणांच्या अभावामुळें तर या मिरवणुकींत कसलाहि जीव नव्हता. स्वातंत्र्य मिळविण्यापूर्वी काँग्रेसवाल्यांना पुष्कळ घोषणा करतां येत होत्या. पण आतां काँग्रेसवाले कसल्या घोषणा करणार? 'अधिक झाडें लावा', 'अधिक धान्य पिकवा', किंवा 'आठवड्यांतून एक दिवस उपास करा' असल्या का ते घोषणा करणार? नाशिकच्या ग्रामस्थ लोकांना अध्यक्षीय मिरवणुकीबाबत किती आस्था वाटत होती तें त्यांनीं आपापल्या घराच्या सज्जांत किंवा ओट्यावर उभें राहून दाखविलें. लग्नाची मिरवणूक चालली किंवा बँडचा आवाज रस्त्यावरून वाजूं लागला म्हणजे आपापल्या घरांतून लोक जसे डोकावून बाहेर बघूं लागतात तितक्याच उत्सुकतेनें आणि आदरानें नाशिककरांनीं या अध्यक्षीय मिरवणुकीचें दहा हात दूर उभें राहून अवलोकन केलें. जनता आणि काँग्रेस ह्यांच्यामधलें अंतर किती वाढत चाललें आहे ह्याचा पडताळा मात्र ह्या मिरवणुकीच्या वेळीं उत्कृष्टपणें आला. आग्रा रोडवर आणि मेन रोडवर कमानी अन् तोरणें यांची गर्दी उडाली नसती तर ही काँग्रेसच्या अध्यक्षांची मिरवणूक आहे ह्याची जाणीवदेखील कुणाला झाली नसती. तथापि, मेन रोडवरील दुकानदारांनीं आपल्या दुकानांवर लावलेल्या तोरणांवर स्वतःच्या मालाचीहि भरपूर जाहिरात करून घ्यावयाला सोडलें नाहीं!

साऱ्या गांवामधून एक फेरफटका मारून आणि काँग्रेस अधिवेशनासंबंधींच्या जनतेच्या प्रतिक्रियांचें प्रत्यक्ष अवलोकन करून मी जो आलों तो तसाच थेट 'गांधीनगर'कडे वळलों. नाशिक शहर आणि नाशिकरोड स्टेशन ह्यांच्यामध्यें पांच मैलांचें अंतर आहे. ह्याच स्टेशन रस्त्यावर अगदीं मधोमध 'गांधीनगर'ची उभारणी केलेली होती. शहरापासून तों 'गांधीनगरा'पर्यंत आणि 'गांधीनगरा'पासून तों स्टेशनपर्यंत दुतर्फा पोलिस आणि होमगार्ड अंतराअंतरावर उभे

होते. आणि 'गांधीनगरा'च्या प्रवेशद्वारासमोर तर पोलीसशिपायांनीं आणि अधिकाऱ्यांनीं गर्दी करून सोडली होती. 'इथें उभे राहूं नका', 'तिथें जाऊं नका', 'गाडी इकडून आणूं नका', 'गाडी तिकडे उभी करा' अशीं फर्मानें सोडून पायीं आणि मोटारींतून जाणाऱ्या लोकांना हैराण करून टाकण्याची पोलिसांनीं तर अगदीं पराकाष्ठा चालविली होती. ह्या कामासाठीं निरनिराळ्या जिल्ह्यांतून तेथले शिपाई व अधिकारी मुद्दाम कॉंग्रेस अधिवेशनासाठीं नाशिक येथें आणविण्यांत आले होते. पोलिसांच्या व होमगार्डांच्या पाळ्या (shifts) करून सतत चोवीस तासभर त्यांचा सबंध स्टेशनरोडवर पहारा ठेवण्याची व्यवस्था करण्यांत आली होती हें जेव्हां मीं ऐकलें तेव्हां तर मी थक्कच झालों. नाशिक शहरांत कॉंग्रेसवाल्यांसारखा आपाद सफेत खादीचा पोषाख करून पांचशें गुप्त पोलिस सोडण्यांत आले आहेत असेंहि मला माझ्या परिचयाच्या अधिकृत कॉंग्रेस कार्यकर्त्यांकडून त्याच वेळीं समजलें. 'गांधीनगर'मध्यें खादी विकत मिळूं शकेल कीं काय अशी माझ्या ओळखीच्या एका माणसानें जेव्हां चौकशी केली, तेव्हां पोलिसांनीं (म्हणजे गुप्त पोलिसांनीं) आल्याबरोबरच फार मोठ्या प्रमाणावर खादीची खरेदी केली असल्यामुळें ती आतां शिल्लक नाहीं असें त्याला सांगण्यांत आलें. 'गांधीनगर'समोर मी माझ्या मोटारीनें येऊन ठेपलों तों पावसानें अगदीं कहर करून सोडलेला होता. आजूबाजूचा सर्व प्रदेश पाण्यानें आणि चिखलानें भरून गेला होता. प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूला 'प्रदर्शना'चीं तिकिटें विकण्याच्या खिडक्या होत्या. आणि त्याच्याच जवळ 'पूछताछ'ची म्हणजे 'चौकशी करण्याची कचेरी' होती. 'पूछताछ' हा शब्द माझ्या परिचयाचा नव्हता. म्हणून मी मोठ्या अचंब्यानें पाटीवरील तीं अक्षरें वाचूं लागलों. एका स्थानिक माणसानें मला हसून सांगितलें कीं ज्या पेंटरनें ती पाटी प्रथम रंगविली त्यालाही 'पूछताछ' चा अर्थ प्रथम माहीत नव्हता. त्यानें 'पू' वर अनुस्वार देऊन खूपच हशा पिकविला होता.

गांधीनगरचें प्रवेशद्वार मात्र फारच टोलेजंग, भव्य व कलापूर्ण होतें. महाराष्ट्रांतील शिवकालीन किल्ल्याच्या दरवाजासारखें तें चिरेबंदी दगडाच्या स्वरूपाचें (अर्थात् रंगवूनच) बनविण्यांत आलें होतें. मध्यें एक मोठी कमान असून दोन्ही बाजूंना दोन दोन कमानी होत्या. प्रवेशद्वाराची उंची तीसच्चाळीस फुटांची तरी असावी, असें मला वाटतें. मुख्य कमानीच्या मधोमध 'गांधीनगर' हीं अक्षरें आणि

वरच्या चौकटीवर छप्पन्नावें कॉंग्रेसचें अधिवेशन असें लिहिण्यांत आलेलें होतें. प्रवेशद्वाराच्या पांचीहि कमानींच्या खालपासून वरपर्यंतच्या सर्व कडा आणि मुख्य कमानीवरचीं अक्षरें रात्रीच्या वेळीं विजेच्या नळ्यांनीं प्रकाशित करण्याचीहि व्यवस्था करण्यांत आलेली होती. प्रवेशद्वाराच्या सौधभागीं सनईचौघड्याची सोय करण्यांत आलेली होती आणि त्यांचा आवाज भोवतालच्या सर्व भागामध्यें ऐकूं यावा म्हणून सर्व बाजूंना ध्वनिक्षेपकहि बसविण्यांत आलेले होते; मी प्रवेशद्वाराशीं प्रथम येऊन पोहोंचलों तो 'गांधीनगर'च्या उद्घाटनाचा पहिला दिवस असूनहि प्रवेशद्वारावरील सनईचौघडा कांहीं मला ऐकूं आला नाहीं. कारण पावसानें चोहोंकडे असा कांहीं गोंधळ उडवून दिला होता कीं सागतां सोय नाहीं. 'पूछताछ'च्या कचेरीसमोर आणि 'तिकिटां'च्या खिडक्यांपुढें शेकडों लोक तसेच पावसांत भिजत ओलेचिंब होऊन उभे होते. लोकांना पाहिजे होती ती माहितीहि मिळत नव्हती आणि प्रदर्शनाचीं तिकिटेंहि पण विकत मिळत नव्हतीं. त्यामुळें लोक अगदीं गोंधळून गेले होते. त्यांना काय करावें अन् कोणाकडे दाद मागावी हेंच मुळीं कळेनासें झालेलें होतें. पोलिसांच्या, पावसाच्या, चिखलाच्या अन् गैरव्यवस्थेच्या ह्या चौरंगी माऱ्यामुळें लोक पुरेसे हैराण झाले नव्हते म्हणूनच कीं काय, तो उणेपणा भरून काढण्याकरतां 'स्वयंसेवक'हि आपल्या परीनें पराकाष्ठा करून राहिले होते. प्रत्येक बाबतींत लोकांना अडवायचें अन् छळावयाचें हा जो गेल्या तीन वर्षांत कॉंग्रेस सरकारनें शिरस्ता घालून दिलेला आहे, त्याचेंच अनुकरण करण्याची थोड्याफार प्रमाणांत कॉंग्रेसच्या तरुण सेवकांनाहि पण बुद्धि व्हावी ह्यांत आश्चर्य तें कसलें?

मी माझ्या मोटारींतून गांधीनगरांत शिरूं लागतांच मला पोलिसांनीं हटकलें अन् स्वयंसेवकांनींहि पण अडविलें. पोलिस म्हणाले, "मोटारीचा पास कुठें आहे?" अन् स्वयंसेवकांनीं विचारलें, "तुमचा स्वतःचा पास कुठें आहे?"

मीं त्यांना नम्रतेनें सांगितलें कीं, "ते दोन्ही पास मिळविण्यासाठीं म्हणूनच मी आंत जातों आहें."

तेव्हां ते म्हणाले, "पास नाहीं तर तुम्हांला आंत जातां येणार नाहीं."

मोठ्या पेंचप्रसंगातच सांपडलों मी. 'गांधीनगरां'त प्रवेश केल्यावांचून पास मिळणार नाहींत अन् पास मिळाल्यावांचून 'गांधीनगरां'त प्रवेश करतां येणार नाहीं. आतां काय करावें? विचार करावयालाहि मला वेळ नव्हता. कारण,

रस्त्यावरून मोटार ताबडतोब हलवा, असा पोलिसांनीं माझ्यामागें लकडा लावला. मीं मोटार चालू केली. पण ती ठेवायची कुठें? रस्त्याच्या दोन्ही बाजूंना मैदानेंच मैदानें मोकळीं होतीं, पण जरा कुठें गाडी उभी केली कीं एखादा पोलिस नाहीं तर होमगार्ड चटकन् माझ्या रोखानें धावत यावयाचा आणि 'इथें गाडी तुम्हांला ठेवतां येणार नाहीं' असें सांगून मला पुढें पिटाळावयाचा. करतां करतां मी दोन फर्लांग पुढें गेलों. तेथें ढोपरभर चिखल झालेल्या एका शेतांत मोटारी उभ्या करण्याची 'सोय' करण्यांत आली होती. तेथें शेवटीं मला माझी गाडी ठेवावी लागली. गाडी बंद करून मी तसाच भिजत भिजत 'गांधीनगर'-कडे आलों. आणि 'गांधीनगर' मध्यें प्रवेश कसा मिळवावा ह्याचा विचार करीत एका झाडाखालीं उभा राहिलों. इतक्यांत माझ्या ओळखीचे दोन वार्ताहर मला भेटले. ते मोटारींतून गांवांत चालले होते. त्यांना मीं थांबविलें व गांवामधून कुठून तरी 'फोन' करून 'गांधीनगर' मधील 'व्यवस्थासमिती' ला मी बाहेर अशा स्थितीमध्यें उभा आहें असें कळविण्याची मीं त्यांना विनंति केली. तेव्हां त्यांपैकीं एक वार्ताहर म्हणाले, "गांधीनगरला फोनच्या चार लाइन्स जरी दिलेल्या असल्या तरी गांवांतून गांधीनगरचा फोन मिळूं शकत नाहीं. त्याच्या आधीं आपल्याला मुंबईचा फोन लौकर मिळतो."

दुसरे वार्ताहर म्हणाले, "काल मला गांवांतून गांधीनगरला फोन करावयाचा होता. शेवटीं कंटाळून मीं मुंबईच्या माझ्या ऑफिसला फोन केला व त्यांना गांधीनगरला फोन करून माझ्याशीं गांवांत फोनवरून बोलावयाची सूचना करायला सांगितलें!"

एवढ्यांत माझ्या 'असहाय्य स्थिती'ची बातमी आंत कोणाला तरी कळली आणि त्यांनीं मला आंत घेऊन जाण्यासाठीं एका कार्यकर्त्यांना ताबडतोब पाठवून दिलें. मग मला पाहिजे होते ते दोन्ही पास मिळावयाला क्षणाचाहि विलंब लागला नाहीं. आणि त्यानंतर मी माझ्या मोटारीसह सन्मानानें 'गांधीनगरां'त प्रवेश करूं शकलों.

प्रवेशद्वारापासून आंतमध्यें सरळ एक मोठा रस्ता काढण्यांत आला होता. त्याची समाप्ति जवळजवळ एक मैलाच्या अंतरावर एका मोठ्या पत्र्याच्या टोलेजंग इमारतीपाशीं झाली होती. ह्याला 'हॅनगार' म्हणजे विमानाचा तबेला असें नांव होतें. या मुख्य रस्त्याच्या डाव्याउजव्या बाजूला 'गांधीनगरां'तील

निरनिराळ्या विभागांच्या मांडवांची लांब लांब अंतरावर मांडणी करण्यांत आली होती. आरंभीं डाव्या बाजूला 'व्यवस्था समिती'चें लांबलचक कार्यालय होतें. त्यानंतर पुढें पुष्कळच अंतरावर डाव्या बाजूला 'प्रदर्शन' व त्याच्यासमोर उजव्या बाजूला अधिवेशनाचा प्रचंड मांडव घालण्यांत आलेला होता. दोन्हीकडे जाण्यासाठीं मोठमोठीं महाद्वारें होतीं. प्रदर्शनाच्या महाद्वारावर 'प्रदर्शन' अशीं अक्षरें लिहिलेलीं होतीं, व त्याच्या समोरील अधिवेशनाच्या महाद्वाराला तीन कमानी असून त्यांपैकीं एका बाजूच्या कमानीवर 'सत्य' व दुसऱ्या बाजूच्या कमानीवर 'नीति' असे शब्द लिहिलेले होते. मधल्या कमानीवर मात्र कांहींच लिहिलें नव्हतें.

"मधल्या कमानीवर कांहींच कां लिहिलेलें नाहीं?" असें मला कोणींसें विचारलें. तेव्हां मीं त्याला सांगितलें,

"गेल्या तीन वर्षांत कॉंग्रेसनें कांहींच केलेलें नाहीं आणि आतांहि ह्या अधिवेशनांतून कांहींहि निष्पन्न होणार नाहीं, म्हणून मधल्या कमानीचा शिरोभाग तसाच मोकळा ठेवण्यांत आलेला आहे."

तेव्हां त्यानें मला विचारलें कीं, "एका बाजूला प्रदर्शन व दुसऱ्या बाजूला 'सत्य' व 'नीति' अशीं अक्षरें तरी लिहिण्याचें काय मोठेंसें प्रयोजन होतें?"

तेव्हां मीं त्याला गंभीर चेहरा करून सांगितलें, "नाहीं, नाहीं. तीं अक्षरें लिहिण्यांत फार मोठा खोल अर्थ आहे. त्यांचा नीट अन्वय लावा म्हणजे तो तुमच्या ध्यानांत येईल. आजची 'कॉंग्रेस' ही 'सत्य' व 'नीति' ह्यांचें नुसतें 'प्रदर्शन' आहे हें अधिवेशनाच्या चालकांनीं मोठ्या कौशल्यानें ह्या ठिकाणीं सूचित करून ठेविलें आहे!"

मला विचारणारा माणूस तोंड वासून आणि रस्त्याच्या मधोमध उभा राहून डाव्याउजव्या कमानीवर लिहिलेल्या अक्षरांचा अन्वय मीं सांगितल्याप्रमाणें आळीपाळीनें लावीत किती वेळ तरी उभा होता.

तेवढ्यांत मी सटकून 'प्रदर्शना'च्या आवारांत शिरलों. समोर गांधीजींचा उभा पुतळा ठेवण्यांत आलेला होता व त्याच्या मागें एक उंचच उंच ध्वजस्तंभ रोवण्यांत आलेला होता. प्रदर्शनाचें आवार म्हणजे एक प्रचंड वर्तुळच होतें आणि ह्या वर्तुळामध्यें प्रदर्शनीय वस्तूंचे, उद्योगांचे व विक्रीचे अनेक 'स्टॉल्स' ओळीनें मांडण्यांत आले होते. मी गेलों तेव्हां पावसानें आणि चिखलानें

'प्रदर्शना' ची अशी कांहीं धुळधाण करून ठेवली होती कीं तें निराळ्या अर्थानेंच 'प्रदर्शनीय' झालेलें होतें. भारताच्या लांबलांबच्या भागांतून ग्रामोद्योगांचे आणि हस्तव्यवसायाचे उत्तमोत्तम नमुने, वस्तु, नकाशे आणि चित्रें आणण्यांत आलेलीं होतीं. मुंबई सरकारच्या निरनिराळ्या खात्यांनीं प्रदर्शनाचा बराच मोठा भाग व्यापलेला होता. प्रदर्शनाचें उद्घाटन दुपारीं चार वाजतां श्री. आप्पा पटवर्धन ह्यांच्या हस्तें जरी होणार होतें, तरी प्रदर्शनाच्या निरनिराळ्या स्टॉल्समधील मांडणी व व्यवस्था पुरी झालेली नव्हती. कांहीं कांहीं स्टॉल्स तर पाण्यानें आणि चिखलानें नुसते भरूनच राहिले होते. तथापि, जें मीं घाईघाईनें थोडक्यांत त्या वेळीं पाहून घेतलें त्यावरून प्रदर्शनाची मला नीट कल्पना आली व त्याबद्दल माझें चांगलें मत झालें. 'प्रदर्शना'च्या आवारांतून बाहेर पडल्यावर मी समोरच्या अधिवेशनाच्या मंडपांत 'नीती'च्या कमानीमधून शिरलों. ह्या मंडपाची लांबी चारशें फूट आणि रुंदी तीनशें फूट होती. मंडपाचे खांब तिरंगी कापडानें वेष्टिलेले होते. एका बाजूला जवळ जवळ मंडपाच्या रुंदीचें व चारसाडेचार फूट उंचीचें व्यासपीठ बनविण्यांत आलें होतें व त्याचा दर्शनी भाग तिरंगी कापडानें आच्छादित केलेला होता. व्यासपीठाच्या डाव्याउजव्या बाजूला 'त्र्यंबकेश्वरा'च्या देवळाचें एक आणि 'नारोशंकरा'च्या देवळाचें एक अशीं दोन भव्य तीनरंगी चित्रें मंडपाच्या सफेत कापडावर रंगविण्यांत आलेलीं होतीं. त्यामुळें व्यासपीठाला फारच शोभा अलेली होती. मी गेलों तेव्हां साऱ्या मांडवांत गळत होतें. आणि ठिकठिकाणीं पाण्याचीं आणि चिखलाचीं थारोळीं होऊन बसलीं होतीं. खुर्च्यांचा आणि कोचांचा ढिगारा एका कोपऱ्यांत पडला होता. आणि एका विभागांत पांचपन्नास शिंप्यांचें टोळकें आपल्या शिवणयंत्रावर मंडपाचें अपुरें काम पूर्ण करण्याची झपाट्यानें 'कोशीस' करीत बसलें होतें.

सर्व मांडव ओका ओका, उजाड आणि उदासवाणा असा मला भासला. माझ्याबरोबर असलेल्या एका मित्राला मी म्हणालों, "आज देशांत निरनिराळ्या कॉंग्रेस सरकारांची जी स्थिति आहे तिचें उत्तम चित्र तुम्हांला थोडक्यांत या वेळीं ह्या मांडवांत पाहावयाला मिळेल. ठिकठिकाणीं गळतें आहे. जागोजाग चिखल झाला आहे. कुठें कामाची घिसाडघाई चाललेली आहे, तर कुठें कामाचे डोंगर साचून राहिलेले आहेत. जिकडेतिकडे घाई, गोंधळ, अर्धवटपणा आणि अव्यवस्था ह्यावांचून कांहींच पाहावयाला मिळत नाहीं."

माझा मित्र मला म्हणाला, "पण ह्या मांडवांतील परिस्थितीला काँग्रेस अधिवेशनाचे चालक थोडेच जबाबदार आहेत? हा सारा गोंधळ पावसानें केलेला आहे!"

तेव्हां मी म्हणालों, "आणि देशांत सर्वत्र दिसून येणाऱ्या दुरवस्थेला तरी काँग्रेसनेते कुठें जबाबदार आहेत? सर्व दोषांचें खापर परिस्थितीच्या किंवा जनतेच्या डोक्यावरच नाहीं का फोडण्यांत येतें?" गांधीनगराच्या विस्तीर्ण आवाराचें थोड्या अवकाशांत घाईघाईनें अवलोकन करून मी बाहेर पडलों. 'गांधी नगरां'तील निरनिराळ्या मांडवांची उभारणी करण्यांत पांढऱ्या पत्र्यांचा सर्रास उपयोग करण्यांत आलेला होता. त्यामुळें आभाळांतून जर 'गांधी-नगरा'चें कोणीं विहंगावलोकन केलें असतें तर त्याला हें 'गांधीनगर' नसून 'पत्रानगर' आहे असाच भास झाला असता. गांधीनगराच्या डाव्या बाजूला समोरच्या एका विस्तीर्ण मैदानांत एस्. टी. च्या मोटारगाड्यांचा एक तात्पुरता तळ उभारण्यांत आलेला होता. गांवांतून गांधीनगरपर्यंत किंवा गांधीनगरपासून स्टेशनपर्यंत जाण्यासाठीं तेथून गाड्या सुटत. शेकडों लोक गाड्यांसाठीं 'रांगा' धरून पावसांत भिजत उभे राहिलेले मला दिसले.

'गांधीनगर'च्या गांवाकडील बाजूला पाऊण मैलाच्या अंतरावर 'वृत्त-प्रतिनिधीं'चा तळ होता. आणि स्टेशनाकडील बाजूला अर्ध्या मैलावर काँग्रेस-प्रतिनिधींचा तळ होता. हा प्रतिनिधींचा तळ देखील मुख्य रस्त्यापासून आंत चांगला अर्धा मैल तरी लांब असेल. हें विस्तारानें सांगण्याचा माझा उद्देश एवढाच आहे कीं नाशिकच्या काँग्रेस अधिवेशनाचा हा सर्व संसार एवढ्या अलगअलगपणें आणि लांब लांब अंतरावर मांडण्यांत आलेला होता कीं नुसतें एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जावयाचें म्हटलें तर टांचा किती तरी घासाव्या लागत होत्या आणि तंगड्या किती तरी मोडाव्या लागत होत्या. अर्थात्, काँग्रेस कार्यकर्त्यांसाठीं नि प्रतिनिधींसाठीं वाहतुकीच्या गाड्यांची भरपूर सोय होती. तरी पण पायांनीं इकडून तिकडे फिरणाऱ्या सामान्य नि गरीब माणसांना हें अंतर म्हणजे कोण संकट होतें! माझ्याजवळ जर माझी मोटार नसती तर पहिल्याच दिवशीं माझा निकाल लागला असता. मग मला इकडून तिकडे जाण्यासाठीं एखाद्या डोलीचा किंवा 'स्ट्रेचर'चाच उपयोग करावा लागला असता. पत्रकारनिवासांत भोजनाची मात्र फारच उत्तम सोय होती. ही सर्व व्यवस्था

'बॉइज टाउन' च्या मुलींनीं केली होती. येथें घासवाल्यांना आणि मांसवाल्यांना उत्तम भोजन मिळत असे. कॉंग्रेस प्रतिनिधिनिवासांत पुण्याच्या 'गेस्ट हाउस'-नें आपली शाखा उघडली होती. तेथें चहा व टोस्ट फारच सुरेख मिळत असे. म्हणून 'पत्रकारनिवासां'त 'मसालेदार मुर्गी' खाऊन चहा पिण्यास आम्ही 'प्रतिनिधिनिवासां'तील 'गेस्ट हाउस' मध्यें जात असूं. पण हीसुद्धां दोन-अडीच मैलांची चक्कर होती!

नाशिक स्टेशनजवळच्या 'जेल रोड' वर शेट धरमदास ह्यांच्या 'राम बागे'-मध्यें पंडित जवाहरलाल नेहरू ह्यांच्या राहण्याची व्यवस्था केली होती. ह्या 'राम बागे'चें आवार खूपच विस्तृत आणि मनोहर होतें. पंडित नेहरू ज्या बंगल्यांत उतरले होते तो एकमजली आणि लहानच असला तरी मोठा आटोपशीर आणि टुमदार होता. बंगल्यासमोर छायाशील वृक्षांची हिरवीगार दाटी होती. त्यांतला बदामाचा वृक्ष तर फारच शोभिवंत होता, बंगल्यापुढची बागहि मोठी मनोरम होती. तिच्यांत मधोमध पाण्याचें कारंजें व ठिकठिकाणीं प्राजक्ताचीं डवरलेलीं झाडें आणि जाईच्या पांढऱ्या आणि टपोऱ्या फुलांनीं बहरलेले मांडव होते. ह्या फुलांचा सुगंध साऱ्या आसमंतांत दरवळून राहिला होता. बागेच्या प्रवेशद्वाराजवळ एक राहुटी ठोकण्यांत आलेली होती व तिच्यांत प्रकट आणि गुप्त पोलिस अधिकाऱ्यांचा तळ होता. त्याखेरीज बंगल्याच्या समोर एक दाढीवाला शीख 'सरदारजी' कमरेला पिस्तूल लावून पहारा करीत उभा होता आणि बागेच्या आवारांत प्रत्येक वेळीं दोनतीन गुप्त पोलिस साध्या पोषाखांत अंग चोरून कोठल्या तरी झाडाच्या किंवा लतामंडपाच्या आडोशाला उभे असतच.

बंगल्याच्या मागल्या बाजूला कांहीं अंतरावर एक लांबच लांब भिंत होती व त्या भिंतीच्या पलीकडील आवारांत पूर्वी 'नाशिक व्हिस्की' बनविणारी व आतां बंद झालेली सुप्रसिद्ध 'नाशिक डिस्टिलरी' होती. बंद झालेल्या कां होईना, पण 'डिस्टिलरी'च्या इतक्या जवळ नेहरूंच्या राहण्याची व्यवस्था व्हावी हा एक विलक्षण योगायोगच होता. मी मनांत म्हणालों किंवा कुणाला तरी बोललोंहि कीं, "नुसत्या 'वासा' वरच पंडितजींची 'वासलात' लावण्याचा मुंबई राज्य सरकारचा हा कुशल डाव असावा!"

नेहरूंच्या बंगल्यापासून त्याच आवारांत कांहीं अंतरावर दुसरा एक बंगला होता. तेथें कॉंग्रेसचे चिटणीस काला व्यंकटराव यांची राहण्याची व्यवस्था केली

होती. त्याहि बंगल्याचा परिसर मोठा मोहक होता. 'गांधीनगर'हून मी तीनचारचे सुमारास निघालों तो सरळ 'राम बागे'तच गेलों. तेथें अडीच वाजल्यापासून काँग्रेसच्या वर्किंग कमिटीची सभा सुरू झालेली होती. काला व्यंकटराव पत्रकारांना सहा वाजतां मुलाखत देणार असल्याचें आम्हांला सांगण्यांत आलें. तेव्हां कार्य-कारिणीची बैठक त्याच सुमारास संपेल अशी आमची अपेक्षा होती. आम्ही सर्व पत्रकार पांचसाडेपांच वाजल्यापासून नेहरूंच्या बंगल्यासमोरील बागेंत निरनिराळीं टोळकीं करून एकमेकांशीं बोलत उभे होतों. जाईचा एक फुललेला मांडव पाहून फुलें तोडण्यासाठीं मी त्याच्याजवळ गेलों आणि हात पुढें केला तों टक्कल पडलेला दाढीवाला आणि बटबटीत डोळ्यांचा एक भयंकर चेहरा एकाद्या नागाप्रमाणें फुस्स करून बाहेर आला. तो अर्थात् गुप्त पोलिस होता, हें सांगायला नको. माझ्या छातींत त्या वेळीं असें धस्स झालें कीं मागल्या मागेंच मी कोलमडलों. मग कसलीं फुलें तोडतोंय् अन् कसला वास घेतोंय् !

जसजसा वेळ होऊं लागला तसतसे हळूहळू सरकत सरकत आम्ही थेट नेहरूंच्या बंगल्यासमोर गेलों अन् तेंथल्या बाकावरच जाऊन मुक्काम ठोकला. आजूबाजूला काँग्रेस श्रेष्ठींच्या मोटारी उभ्या होत्या. त्यांत आमच्या सदोबा पाटलांची 'मेयर मोटार' विशेषच ठळकपणें उठून दिसत होती. आमच्या थट्टाविनोदांत थोड्या वेळानें पोलिस अधिकारी आणि काँग्रेसश्रेष्ठींचे ड्रायव्हरहि येऊन निःशंकपणें सामील झाले. नेहरूंचे खाजगी चिटणीस श्री. उपाध्याय आणि मृदुलाबेन साराभाई ह्याहि मधून मधून कांहीं पत्रकारांशीं खेळीमेळीनें येऊन बोलत होत्या. प्राजक्ताच्या झाडाखालीं फुलांचा खूपच सडा पडला होता. त्यांपैकीं चांगलीं टपोरीं फुलें वेचून मृदुलबेननीं आपल्या 'उपरण्या'च्या पदरांत बांधलीं व तीं कोणाला तरी देण्यासाठीं त्या आंत गेल्या.

साडेसहा वाजले तेव्हां सरदार पटेल प्रथम बाहेर पडले. त्यांच्या समवेत त्यांचें 'कन्यारत्न' होतेंच. सरदारांच्या अंगावर तपकिरी शाल होती. ते ह्या वेळीं विशेष थकल्यासारखे मला वाटले. त्यांच्याशीं बोलण्याचा कोणींहि प्रयत्न केला नाहीं. ते बिर्लांच्या मोटारींतून बसून निघून गेले. त्यानंतर अर्ध्या तासानें मौलाना आझाद बाहेर पडले. तेहि मला ह्या वेळीं जास्तच थकल्यासारखे व वृद्ध झाल्यासारखे दिसले. पटेल व मौलाना निघून गेले. तेव्हां कार्यकारिणीची सभा संपली किंवा काय तें आम्हांला कळेना. बाहेर चांगलाच अंधार पडला होता.

नाशिकची हवा अशी चमत्कारिक आहे कीं जसजशी संध्याकाळ होते तसतसें उष्णतामान एकदम खालीं जातें व हवेंत विलक्षण गारठा व थंडी उत्पन्न होते. आमच्यापैकीं पुष्कळांजवळ गरम कपडे नसल्यानें आम्ही त्या थंडीनें अगदीं गारठून गेलों व अंधारांत बाकावर तसेच काकडत बसलों.

मी म्हणालों, "दारूबंदी झाली तरी दारूच्या गप्पा मारायला तर बंदी झाली नाहीं. चला, तेवढ्या गप्पा मारून तरी आपण आपल्या अंगांत उष्णता निर्माण करूं या!"

दुसरा एकजण म्हणाला, "नाशिक डिस्टिलरीवरून या वेळीं निदान 'दोन परसेंट'ची झुळूक आली तरी किती मौज होईल बरें!"

साडेसात-आठ वाजण्याच्या सुमारास कार्यकारिणीची बैठक संपली व मग सर्व सभासद बाहेर पडले. कॉंग्रेस कार्यकारिणीचे एकोणीसचे एकोणीस सभासद या बैठकीला हजर होते. रफी अहंमद किडवाईशीं दोस्ती करून एका पत्रकारानें त्यांच्याकडून कांहीं तरी बातमी बाहेर काढण्याचा प्रयत्न केला, पण रफीसाहेब कसले खमके! त्यांनीं ताकास तूर लावूं दिला नाहीं. शंकरराव देवांची लहानशी बुटबैंगण मूर्ति हरेकृष्ण मेहतावांच्या धिप्पाड आकृतीसमवेत जेव्हां बाहेर पडली तेव्हां अभावितपणेंच विनोद पिकला. सर्वांच्या शेवटीं टंडनबाबू व सदोबा पाटील बाहेर आले. टंडनबाबूंची मध्यम बांध्याची कृश आकृति बघून आणि निर्मळ-पणाचें तेज पाहून कोणाच्याहि मनांत प्रथमदर्शनींच आदराची भावना उत्पन्न होते. पण त्याचबरोबर पटेल, मौलाना किंवा नेहरू ह्यांच्या व्यक्तिमत्वाभोंवतीं अनेक वर्षांच्या लौकिकामुळें जें एक प्रकारचें आकर्षणाचें वलय निर्माण झाल्याचा भास होतो, त्याचा अभाव टंडनबाबूंच्या बाबतींत मात्र जाणवल्याखेरीज राहात नाहीं.

बाहेर उभ्या असलेल्या पत्रकारांनीं काला व्यंकटरावांना आंत चिठ्ठ्या पाठवून सतावून सोडलें होतें. तेव्हां ते चिडूनच बाहेर आले. ते संतापून आम्हांला म्हणाले, "कार्यकारिणीची सभा चालू असतां तुम्ही मला काय म्हणून त्रास देत होतां? तुम्हांला बातम्या जर पाहिजे आहेत तर वाटेल तितका वेळ निमूटपणें थांबणें हें तुमचें कर्तव्य होतें." आमच्यापैकीं एका पत्रकारानें काला व्यंकटरावांच्या खांद्यावर प्रेमानें हात ठेवून "अहो, एवढें चिडायला काय झालें?" असें जेव्हां सौम्य स्वरांत विचारलें तेव्हां कालासाहेब शांत झाले व मग आम्ही त्यांच्या बंगल्यावर गेलों. येथें जातां जातां हें सांगितलें पाहिजे कीं काला व्यंकटराव हे

पुष्कळांना काळ्या रंगाचे आहेत असें वाटतें. पण तसें नसून ते चांगले गौर-वर्णाचे आणि आकर्षक व्यक्तिमत्त्वाचे गृहस्थ आहेत. काला व्यंकटरावांची मुलाखत दहा मिनिटांतच संपली. कार्यकारिणींत सर्व विषयांवर सामान्यपणें चर्चा झाली, विशेष कांहीं ठरलें नाहीं, एवढेंच त्यांनीं आम्हांला सांगितलें. तेव्हां कांहीं तरी 'प्रक्षोभक' बातम्या मिळविण्याच्या आशेनें आमच्यापैकीं जे तिथें जमले होते त्यांना हात हलवीतच परत यावें लागलें. तथापि, निवासस्थानीं गेल्यावर रात्रौ आम्हांला असें कळलें कीं, पंडित नेहरू आणि टंडनबाबू ह्यांच्यामध्यें चांगलाच झगडा होणार अशी आरंभापासून पुष्कळांची जी अपेक्षा होती ती कांहीं या अधिवेशनांत फलद्रूप होणार नाहीं. नेहरूंनीं कार्यकारिणीला सांगितलें कीं अध्यक्षीय निवडणुकीमुळें देशांत जे गैरसमज निर्माण झाले होते ते नाहींसे करण्यासाटीं मला माझें निवेदन काढावें लागलें. टंडनबाबू म्हणाले कीं, माझेंहि दुसरें कांहीं म्हणणें नसून पाकिस्तानसंबंधींचें आपलें धोरण प्रखर असावें एवढेंच मला सांगायचें आहे.

रविवार म्हणजे दुसरा दिवस जसा उजाडला तसा पाऊस एकदम नाहींसा झाला आणि अगदीं सकाळपासून लख्ख ऊन पडलें. त्यामुळें एकंदर सर्वच वातावरणाचें स्वरूप बदलून गेलें. निसर्ग म्हणजे खरोखरच जादू आहे. कधीं तो रडेल नि रुसेल आणि कधीं तो खुद्कन् हसेल कांहीं सांगतां येणार नाहीं. ऊन पडल्यानंतर नाशिकच्या नैसर्गिक सौंदर्यावर जो कांहीं तजेला चढला त्याचें वर्णन काय करणार? तथापि हवेमधला गारठा मात्र कमी झाला नाहीं. आणि वाऱ्याला तर असा कांहीं जोर चढला कीं कांहीं विचारूं नका. रस्त्यानें माणसाला सरळ चालतां येईना, इतका वाऱ्याचा झपाटा. मागून किंवा पुढून तो आपला चालणाराला सरळ धक्केच देऊं लागला. लोक वाऱ्याला उद्देशून जणुं काय मनांतल्या मनांत असेंच म्हणूं लागले कीं, "बाबा, पोलिस आम्हांला रस्त्यांतून धक्के देत आहेत ते काय कमी आहेत? त्यांत तुझी आणखीन् भर कशाला?" 'गांधीनगरा'च्या प्रवेशद्वारावर आज चौघडा अन् सनई मोठ्या उत्साहानें वाजूं लागलीं होतीं, अन् 'प्रदर्शन' पाहावयास येणाऱ्या लोकांच्या संख्येमध्येंहि आज एकदम विलक्षण वाढ झालेली होती. 'प्रदर्शन' चांगल्यापैकीं होतें हें मीं मागेंच सांगितलें आहे. पण लोक कांहीं केवळ प्रदर्शन पाहावयास 'गांधीनगरा'मध्यें येत नव्हते. त्यांना नेहरू नि पटेलांचें दर्शन घ्यावयाचें होतें. पण 'प्रदर्शना'चें दोन

आण्यांचें तिकीट काढल्यावांचून कांहीं त्यांना गांधीनगरींत प्रवेश मिळत नसे. बरें, बाहेर रस्त्याच्या कडेला उभें राहावयाची तर सोयच नव्हती. म्हणून बिचारी भोळी अन् अडाणी जनता दोन दोन आण्यांचीं प्रदर्शनाचीं तिकिटें काढून आंत जात असे आणि आंतील लांबलचक रस्त्याच्या कडेला जातांयेतां कधीं मोटारींतून नेहरू-पटेलांचें ओझरतें दर्शन मिळेल अशा अपेक्षेनें तासन् तास ताटकळत उभी राहात असे.

# नाशिक काँग्रेसच्या जत्रेंत : २ :

रविवारीं सकाळीं दहाच्या सुमारास 'हॅनगार' मध्यें 'महाराष्ट्र यूथ काँग्रेस'चें पहिलें अधिवेशन आचार्य दादा धर्माधिकारी ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरणार होतें. परिषदेचें उद्घाटन पंडित जवाहरलाल नेहरू करणार होते आणि समारोप सरदार पटेलांच्या हस्तें होणार होता. देशांतल्या सर्व तरुणांना आज काँग्रेसचें कांहींहि आकर्षण राहिलेलें नाहीं. स्वातंत्र्य जसें मिळालें आणि काँग्रेस ही जशी भांडवलवाल्यांच्या आणि काळाबाजारवाल्यांच्या आहारीं गेली तसे तरुण एकजात काँग्रेसमधून बाहेर पडले. आज काँग्रेस हें साठी उलटलेल्या म्हाताऱ्यांचें 'विश्राम-धाम मंडळ' होऊन बसलेलें आहे. म्हणून तरुणांना कांहीं आमिष दाखवून काँग्रेसमध्यें पुन्हा खेचण्यासाठीं त्यांनीं 'यूथ काँग्रेस' ही एक नवीन संघटना निर्माण केली अन् नाशिक काँग्रेसची संधि साधून या संघटनेचें पहिलें अधिवेशन भरविण्याचें ठरविलें. या 'यूथ काँग्रेस'चे संघटक पंढरपूरचे बब्रन बडवे आणि वर्ध्याचे राजा मंत्री म्हणून कोणी आहेत. बब्रन बडवे हे पंढरपूरच्या सुप्रसिद्ध 'बडवे' कुळांतले आहेत एवढें सांगितलें म्हणजे त्यांच्याबद्दल अधिक कांहीं सांगावयाला नको. त्यांची उमर चवेचाळीस-पंचेचाळीस वर्षांची असावी. त्यांच्या डोक्याचा एकूणएक केस पांढरा झालेला आहे. या गृहस्थांचा चेहरा

बघून महाराष्ट्रांतल्या तरुणांना काय बरें आकर्षण वाटणार? 'हॅनगार'मध्यें 'अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटी'च्या 'विषय नियामक समिती'ची बैठक दुसऱ्या दिवसापासून भरणार होती. आज ही जागा मोकळीच होती. म्हणून 'यूथ कॉंग्रेस'चें हें नाटक तेवढ्या वेळांत त्या ठिकाणीं उरकून घेण्याचें ठरविण्यांत आलें असावें.

'हॅनगार' ही एक टोलेजंग पत्र्याची इमारत मुद्दाम उभारण्यांत आलेली होती. हिच्यांत कमींत कमी चार हजार माणसें बसण्याची सोय होती. मागल्या बाजूला बसण्यासाठीं लाकडी फळ्यांची उतरती सोपानपरंपरा केलेली होती व समोर लांब-रुंद व्यासपीठ होतें. व्यासपीठाच्या डाव्या व उजव्या बाजूला पत्रकारांची बसण्याची व्यवस्था करण्यांत आलेली होती. सभागृहाच्या डाव्या भिंतीवर टिळक, कस्तुरबा, नेताजी बोस व दादाभाई नौरोजी ह्यांच्या व उजव्या भिंतीवर लाला लजपतराय, ॲनी बिझांट, गोखले व मौलाना आझाद ह्यांच्या तसबिरी लावलेल्या होत्या व समोर व्यासपीठावर एका बाजूला पटेल नि दुसऱ्या बाजूला नेहरू अन् मध्यें राजेंद्रबाबू व गांधी-नेहरू ह्यांचीं चित्रें झळकत होतीं. 'यूथ कॉंग्रेस' मध्यें पंधरा ते पस्तीस वर्षें वयापर्यंतच्याच तरुणांना प्रवेश होता. पण सभागृहांत प्रत्यक्ष पाहिलें तों पंधराच्या खालच्या अन् पस्तीसच्या वरच्याच लोकांचा भरणा जास्त झालेला दिसत होता. बायका तर आपलीं पोरेंबाळें घेऊनच आलेल्या होत्या.

बबन बडवे हे प्रारंभींचें भाषण करतांना म्हणाले, "रामानें मारुतीच्या अन् वानरांच्या साहाय्यानें रामराज्य स्थापन केलें. आतां कॉंग्रेसला देशांत रामराज्य स्थापन करण्यासाठीं तरुणांमधून मारुती आणि वानर निर्माण करावयाचे आहेत!" त्या वेळेला सभागृहांतील सर्व तरुणांना आपल्या माकडहाडांतून मागल्यामागें शेपट्या फुटल्याचा भास झाला व 'हूप-हूप' अशा गर्जना करण्याची त्यांना मनांतून अतिशय इच्छा झाली.

परिषदेचे अध्यक्ष आचार्य दादा धर्माधिकारी ह्यांचें मुख्य भाषण मात्र फारच उत्कृष्ट झालें. ज्या दोनतीन गांधीवादी माणसांबद्दल व्यक्तिशः माझ्या मनांत आदर आहे, त्यांत मी दादांचा निःसंकोचपणें समावेश करतों. दादांच्या वाणींतून निर्मल आणि सुंदर विचारांचा काव्यप्रवाह अस्खलितपणें बाहेर पडतो. समर्पक उपमा देण्यांत अन् सर्वांना पटतील अशीं उदाहरणें सांगण्यांत दादांचा अगदीं हातखंडा आहे. दादांनीं आपलें भाषण लिहून आणलें नव्हतें. ते उभे राहिले कीं त्यांच्या

वक्तृत्वाचा झरा आपोआपच वाहूं लागतो. आजची राजसत्ता हा एक निव्वळ फुगा आहे, देशांत ऐक्य निर्माण झाल्याचा जो देखावा दिसतो आहे तो फसवा आहे, असें सांगतांना त्यांनीं राजसत्तेला 'राजगिऱ्याच्या लाडू'ची जी उपमा दिली ती मला अतिशय आवडली. ते म्हणाले, "राजगिऱ्याचा लाडू दिसायला दिसतो मोठा गोड अन् गोल. पण जरा धक्का लागला कीं तो एकदम फुटतो अन् त्यांतील राजगिऱ्याचा प्रत्येक दाणा न् दाणा वेगळा होतो." भारताचें एकजिनसी नागरिकत्व अद्यापि निर्माण झालेलें नाहीं, हा त्यांच्या बोलण्याचा मुख्य आशय होता. ताजमहाल एवढी सुंदर नि भव्य इमारत आहे ! पण तिचा उपयोग काय ? तिच्यांत राजाराणीचीं दोन थडगीं आहेत. तसें सुंदर नि विशाल भारताला मानवतेचें थडगें बनवायचें आहे, कीं मंदिर बनवायचें आहे, असा त्यांनीं तरुणांना सवाल केला ? 'तरुण' काय उत्तर देणार ! ते त्या ठिकाणीं नेहरू-पटेलांना पाहावयास आले होते. दादा धर्माधिकाऱ्यांचें भाषण त्यांना थोडेंच ऐकावयाचें होतें ? इतक्यांत 'नेहरू आले, नेहरू आले' अशी बाहेरून एकदम आरोळी उठली. त्याबरोबर सभागृहां-तील सर्व 'तरुण' एकदम उठून उभे राहिले व दाराकडे धावूं लागले. सभागृहांत हलकल्लोळ उडाला. बिचाऱ्या दादांना आपलें भाषण तसेंच अर्धवट सोडून मुकाट्यानें बाजूला व्हावें लागलें.

सभागृहाच्या बाहेर नेहरूंना पाहावयास सहा-सात हजार लोक जमले होते व ते वाटेच्या दोन्ही बाजूंना ओळीनें उभे राहिले होते. नेहरू उघड्या मोटारींत एखाद्या विजयी रोमन वीराप्रमाणें उभे राहून उजव्या हातानें जनतेला अभिवादन करीत करीत सभागृहाच्या दारापाशीं येऊन ठेपले. सकाळच्या सौम्य आणि सोनेरी उन्हांत सफेत कपडे घातलेली नेहरूंची कमनीय आकृति व गौरवर्णाची तेजःपुंज मुद्रा अगदीं दृष्ट लागण्याइतकी आकर्षक दिसत होती. फोटोमध्यें नेहरू वृद्ध दिसतात खरे, अन् त्यांचे केसहि रुपेरी झाले आहेत, पण त्यांच्या गोऱ्या रंगांत असें कांहीं विलक्षण तेज भरलेलें आहे आणि त्यांच्या आकृतीमध्यें असा कांहीं रेखीवपणा त्यांनीं अद्यापि राखलेला आहे कीं त्यांचा शत्रूदेखील त्यांना वृद्ध म्हणणार नाहीं. जगांत गोऱ्या रंगाचीं माणसें आपण पुष्कळ पाहतों. पण नेहरूंचा गोरा रंग हा इतर गोऱ्या माणसांच्या रंगापेक्षां फार निराळा आहे. गुलाबाच्या पाकळ्या केशरांत खलून परमेश्वरानें त्यांचा गोरा रंग निर्माण केला आहे असें वाटतें. नेहरूंच्या व्यक्तिमत्त्वांत ही जबरदस्त नजरबंदी आहे म्हणून तर गेल्या तीन वर्षांत कांहींहि

न करतांसुद्धां जनमनावरची आपली पकड त्यांना अद्यापि कायम राखतां आलेली आहे. मी मनांत म्हणालों, 'साहेब ह्या देशांतून जरी गेला असला तरी त्याच्या गोऱ्या रंगाचें आकर्षण अजूनहि मागें रेंगाळतेंच आहे.' 'यूथ कॉंग्रेस'मध्यें नेहरूंनीं दिमाखानें आणि हसतमुख मुद्रेनें प्रवेश केला त्याच वेळीं मीं मनांत ताडलें कीं स्वारी कॉंग्रेस कार्यकारिणीच्या सभेंत टंडनबाबूंवर विजय मिळवून आलेली असावी. तथापि, नेहरूंनीं जेव्हां भाषण करावयास सुरुवात केली तेव्हां मात्र त्यांच्या तारुण्याचा आभास नष्ट होऊन ते 'वृद्ध' आहेत असें वाटूं लागलें आणि नेहरू जितके 'प्रेक्षणीय' वाटतात तितके ते 'श्रवणीय' राहिलेले नाहींत हें मला कळून आलें.

तरुणांनीं नुसतें काम करावें हें नेहरूंनीं सांगितलें. पण काय काम करावें हें मात्र त्यांनीं सांगण्याचें टाळलें. जाण्यापूर्वी नेहरू म्हणाले, "इंडोनेशियांत प्रत्येक सभेच्या शेवटीं पुढारी राष्ट्रगीत म्हणतात. पण मला गळा नाहीं. मी फक्त 'जय हिंद' म्हणतों. तुम्ही मला साद द्या!" नेहरूंनीं 'जय हिंद'ची घोषणा करतांच सर्व लोकांनीं 'जय हिंद'ची प्रचंड गर्जना केली. मागून एक जण ध्वनिक्षेपकावरून ओरडले, "बोला, जय जवाहर, जय हिंद!" पण त्याला मात्र कोणींहि साद दिली नाहीं. नेहरू ज्या झपाट्यानें आले त्याच झपाट्यानें निघून गेले. ते गेल्यानंतर 'यूथ कॉंग्रेस'चें सकाळचें अधिवेशन संपलें. दुपारच्या अधिवेशनांत सरदार पटेल येणार होते म्हणून पुन्हा 'तरुणां'ची तेथें गर्दी जमली.

दादा धर्माधिकाऱ्यांनीं सकाळीं अर्धवट तुटलेलें आपलें व्याख्यानाचें सूत्र पुन्हा चालू केलें. सरदार पटेल येईपर्यंत एकसारखें बोलत राहावयाचें ही कामगिरी आचार्य दादा धर्माधिकारी ह्यांच्यावर पडल्यानें त्यांना अनेक विषयांवर एकसारखें बोलतच राहावें लागलें. त्यांचें भाषण विचारप्रवर्तक होतें हें खरें. पण ऐकणारांचें त्यांच्याकडे लक्ष असेल तर ना? शेवटीं दादा थकले व खालीं बसले. मग ठरावांचें काम सुरू झालें. गेल्या वर्षी मरण पावलेल्या थोर लोकांबद्दल दुःख व्यक्त करण्यांत आलें. त्यांत सानेगुरुजींचें नांव होतें. माझ्या शेजारीं एक 'तरुण' बसला होता. तो म्हणाला, "बघा, आम्हांला तुमच्या सानेगुरुजींबद्दल आदर वाटतो आहे कीं नाहीं?"

मी म्हणालों, "सानेगुरुजींच्या वतीनें मी तुमचे आभार मानतों. पण साने-

गुरुजींबद्दल तुम्हांला आदर आहे तर मरतांना तुम्हां तरुणांना त्यांनीं जो संदेश देऊन ठेवला आहे तो पाळायची तुमची तयारी आहे काय ?"

'तरुणा'नें विचारलें, 'कोणता संदेश ?"

मी म्हणालों, "लोकशाही समाजवादाचा पुरस्कार करा हा !"

त्याबरोबर त्या 'तरुणा'चा चेहरा खर्रकन् उतरला. ह्यानंतर 'यूथ कॉंग्रेस'मध्यें एक फारच मौज झाली. एका खांद्यावर घोंगडी घेतलेला अन् डोक्याला मुंडासें बांधलेला एक अडाणी शेतकरी एकदम व्यासपीठावर प्रकट झाला. तो म्हणाला, "मला बोलायचें आहे." त्याची ती मूर्ति व्यासपीठावर उभी राहिलेली पाहून साऱ्या सभागृहांतून टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. 'यूथ कॉंग्रेस'च्या चालकांना तर हा आपला विजयच झाला असें वाटलें. कॉंग्रेसमध्यें शेतकरी नाहीं, शेतकरी नाहीं असें कोण म्हणतें ? हा बघा शेतकरी, अगदीं शंभर टक्के शेतकरी ! सर्वांनीं त्याला बोलायला सांगितलें. शेतकरी 'लाउड स्पीकर'समोर उभा राहिला. वार्ताहरांनीं 'फ्लॅश लाइट'नें त्याचे फोटो काढले. सारी सभा चित्राप्रमाणें स्तब्ध झाली. महाराष्ट्रांतील कॉंग्रेसतरुणांना हा अडाणी शेतकरी कोणता बरें संदेश देणार आहे ह्याची सर्वांना आतुरता लागून राहिली. शेतकरी अस्खलितपणें बोलूं लागला :

"माझें नांव गोविंदा रावजी चव्हाण. कळवण तालुक्यांतला गोरदैवत गांवचा मी. पुजाजी रघुनाथ सावकाराची शेती करतों. एक मण धान्य त्याला द्यावें लागतें. तेवढें देऊन आम्हीं काय खायचें अन् कसें जगायचें ? आम्ही उपाशी मरतों आहोंत. आपल्या साऱ्या शेतकऱ्यांची अशीच स्थिति आहे. गांवाबाहेर फारेस्टाची लई जमीन पडली आहे. ती आम्हांला लागवडीला द्यावी म्हणून सरकारकडे आम्हीं अर्ज केले. पण आमची कोण दाद घेतो ? इथें कॉंग्रेसमध्यें नेहरू व पटेल येणार म्हणून मला समजलें; तेव्हां मी दोन रुपये देऊन या सभेचा मेंबर झालों. आमची पुढाऱ्यांना एवढीच विनंति आहे कीं आम्हां शेतकऱ्यांना लागवडीला त्यांनीं जमीन द्यावी अन् आमच्या मुलाबाळांना सुखासमाधानानें जगूं द्यावें !" एवढें बोलून गोविंदा चव्हाण खालीं उतरला. 'यूथ कॉंग्रेस'वाल्यांचे चेहरे ह्या वेळीं पाहण्यासारखे झाले. बबन बडव्यांच्या चेहऱ्याचा तर एकदम मला 'मारुती' झालेला दिसला. गोविंदाचें तें हृदयद्रावक भाषण ऐकायला त्या ठिकाणीं नेहरू-पटेल नव्हते हें बघून मला अतिशय वाईट वाटलें. मी मनांत म्हणालों, 'जनतेचा विजय असो ! कॉंग्रेसवाल्यांनीं बाहेर पोलिसांचा पहारा ठेवला अन्

जनतेला आंत यायची बंदी केली तरी जनताजनार्दनानें गोविंदा चव्हाणाचें रूप घेऊन अखेर आंत प्रवेश केलाच केला!'

सरदार पटेल चार वाजतां येणार होते. पण ते सहा वाजतां आले. सरदार फारच थकल्यासारखे दिसत होते. त्यांच्या तोंडावर आतां निराळीच कांहीं कळा दिसूं लागली आहे. त्यांनीं बसूनच भाषण केलें. त्यांचें भाषण अतिशयच सामान्य झालें. अधिक धान्य निर्माण करणें, चरखा चालवून स्वावलंबी होणें, अस्पृश्यता-निवारण करणें, खेडेगांवची सुधारणा करणें ह्या विधायक कार्याकडे लक्ष द्या, असा तरुणांना त्यांनीं उपदेश केला.

शेवटीं त्यांनीं महाराष्ट्रांतील तरुणांना जातिद्वेषापासून आणि अराजकापासून दूर राहण्याचा उपदेश करून आपलें भाषण संपविलें. सरदार वल्लभभाई पटेल सभागृहाबाहेर जात असतांना 'सरदार वल्लभभाई पटेल की जय' अशी घोषणा करण्याचा कांहीं जणांनीं प्रयत्न केला. पण त्याला साद मिळाली नाहीं. अशा तऱ्हेनें 'यूथ कॉंग्रेस'चें पहिलें अधिवेशन संपलें.

सभागृहाबाहेर आल्यानंतर अनेक तरुण स्वाक्षरी अन् संदेश मागावयाला माझ्याभोंवतीं जमले. मीं त्यांना सांगितलें, "मी येथें पत्रकार म्हणून आलों आहें. समाजवादी कार्यकर्ता म्हणून आलेलों नाहीं. अन् शिवाय मीं दिलेला संदेश तुम्हांला परवडणार नाहीं."

तरुणांनीं विचारलें, "काय संदेश देणार तुम्ही?"

मी म्हणालों, "माझा संदेश हा आहे कीं, आतां आंत तुम्हीं जें ऐकलें तें विसरून जा!" तेव्हां त्यांपैकीं कांहीं तरुण म्हणाले, "आम्ही कॉंग्रेसवाल्यांचीं येथें भाषणें का ऐकायला आलों आहोंत? मुळींच नाहीं. आम्ही नेहरू-पटेलांना पाहावयाला आलों आहोंत. म्हणूनच आम्हीं प्रतिनिधित्वाची दोन रुपये वर्गणी भरली. एक रुपया नेहरूंसाठीं अन् दुसरा रुपया पटेलांसाठीं. ती आमची वर्गणी आज वसूल झाली." तें ऐकून त्या तरुणांच्या चेहऱ्याकडे मी तर पाहातच उभा राहिलों.

सोमवारीं सकाळीं विशेष असें कांहीं मला काम नव्हतें. कॉंग्रेस कार्यकारिणीचे निरनिराळे ठराव मुक्रर करण्याचें काम तिकडे चालूच होतें. पण नेहरू आणि टंडन ह्यांच्या विरोधाचे आणि झगड्याचे जे काल्पनिक ढग नाशिकमध्यें प्रवेश करतांना वातावरणांत जमा झाल्यासारखे वाटत होते ते पावसाच्या ढगांबरोबरच

आपोआप नाहींसे झाले होते. आणि काँग्रेस प्रतिनिधींच्या मनांतली तंगी आणि संदिग्धता नाहींशी होऊन चोहोंकडे लख्ख ऊन पडलें होतें. काँग्रेस कार्यकारिणी-मधल्या अंतर्गत बातम्या मिळविण्यासाठीं आम्हां पत्रकारांना पूर्वी जी एक आतुरता लागून राहिली होती ती त्यामुळें अर्थातच नाहींशी झाली. पंडित नेहरूंच्या निवासस्थानाभोंवतीं घुटमळत बसण्याचें सोडून मी दुसऱ्या आणखी कांहीं मनोरंजक बातम्या मिळताहेत कीं नाहीं तें पाहण्यासाठीं भटकावयास बाहेर पडलों. स्टेशनच्या जवळच 'ब्रिटको' ह्यांचें जें सिनेमाचें थिएटर आहे तें काँग्रेस अधिवेशनानिमित्त बंद करण्यांत आलें असून तेथें बाहेरगांवाहून मुद्दाम आलेल्या पोलिसांच्या राहण्याची सोय करण्यांत आलेली आहे, ही पहिलीच बातमी मला मिळाली. एकंदर किती पोलीस काँग्रेस अधिवेशनाच्या बंदोबस्तासाठीं बाहेर-गांवाहून आणविण्यांत आले ह्याची मीं जेव्हां चौकशी केली तेव्हां मला असें कळलें कीं जवळ जवळ चार ते पांच हजार पोलीस आलेले असावेत. त्याखेरीज होमगार्ड निराळेच.

एवढ्यानेंच थांबतें तर पुष्कळ होतें. पण गांधीनगराच्या पिछाडीला एक लष्कराची तुकडी आणून ठेवण्यांत आली आहे असें जेव्हां मला कळलें तेव्हां तर मी सर्दच झालों. त्याशिवाय 'गांधीनगरा'च्या सभोवार आणि 'हॅनगार'च्या भोंवतीं लष्करी तुरुंगतळाप्रमाणें कांटेरी तारांचें छातीइतकें उंच कुंपणहि बनविण्यांत आलेलें होतें. एवढा कडेकोट बंदोबस्त कशासाठीं आणि कुणासाठीं केलेला होता हें एक काँग्रेसवाल्यांना आणि परमेश्वरालाच माहिती. प्रजासत्ताक भारतांत भरणाऱ्या राष्ट्रीय सभेच्या पहिल्याच वार्षिक अधिवेशनाचा अशा तऱ्हेनें एक भला मोठा तुरुंग बनविला जावा हें बघून दादाभाई नौरोजी, गोखले, फिरोजशहा मेहता, टिळक अन् गांधीजी हे स्वर्गामध्यें खचित अश्रु ढाळत बसले असतील असें मला वाटलें. 'गांधीनगर'च्या उद्घाटनाच्या दिवशीं नाशिकला जो जोराचा पाऊस पडला तो ह्या स्वर्गीय महात्म्यांच्या डोळ्यांतून सांडलेल्या दुःखाश्रूंचा वर्षाव तर नसावा अशीहि माझ्या मनांत एक कल्पना येऊन गेली.

त्यानंतर मी काँग्रेसप्रतिनिधीनिवासस्थानांत गेलों. भारताच्या निरनिराळ्या विभागांतून एकंदर तीन हजार प्रतिनिधि येणार अशी अपेक्षा होती. पण हजार-बाराशेंपेक्षां अधिक प्रतिनिधी निदान त्या दिवसापर्यंत तरी आलेले नव्हते. कांहीं मद्रासी प्रतिनिधी मला भेटले. प्रतिनिधिनिवासांत त्यांची कशी काय सोय

आहे ह्याची मीं सहज त्यांच्यापाशीं चौकशी केली. ते म्हणाले, "जेवणाची व पाण्याची सोय ठीक आहे. पण येथें तपकीर कोठें मिळत नाहीं हो! तपकीर आणायला गांवांत जावें तर तें इथून तीन मैल दूर अन् स्टेशनवर जावें तर तेंहि अडीच मैल लांब!"

पुण्याच्या 'गेस्ट हाऊस'च्या शाखेंत चक्कर मारून त्यांचें कसें काय चाललें आहे ती चौकशी करून आलों. 'गेस्ट हाऊस'चे मालक म्हणाले, "चहा आणि बिस्किटें ह्यापेक्षां येथें कांहींच ठेवायला आम्हांला परवानगी नाहीं. डाळ अन् तांदुळाचे पदार्थ म्हणून आम्हांला येथें भजीं बनवितां येत नाहींत अन् चिवडा विकतां येत नाहीं. अन् कॉंग्रेसच्या अहिंसेच्या धोरणामुळें आम्हांला येथें मांसाचे पदार्थहि बनवितां येत नाहींत. अशी आमची पंचाईत होऊन गेली आहे." तें ऐकून दारूबंदीनंतर कांहीं दिवसांनीं तरी मांसाहारावर कॉंग्रेसची गदा येईल याविषयीं माझी अगदीं खात्री झाली. हे विचित्र कॉंग्रेसवाले कोणत्या वेळीं काय काय करतील ह्याचा मनाशीं अचंबा करीत करीत मी 'पत्रकारनिवासां'त गेलों आणि तेथें जेवण करून मी 'अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटी'च्या 'विषय नियामक समिती'च्या बैठकीसाठीं 'हॅनगार'मध्यें गेलों. ही बैठक अडीच वाजतां सुरू होणार होती.

माझी 'विषय नियामक समिती'ची कल्पना अशी होती कीं जास्तींत जास्त तीनशें कॉंग्रेस प्रतिनिधी, शंभर आमंत्रित पाहुणे आणि दोनअडीचशें पत्रप्रतिनिधी अशीं सर्व मिळून सहासाडेसहाशें माणसें सभागृहांत जमा होतील. पण प्रत्यक्ष जेव्हां मीं तेथें प्रवेश केला तेव्हां सारें सभागृह फुलून गेलेलें मला दिसलें. अजमासें तीन ते चार हजार माणसें तरी विषयनियामक समितीच्या बैठकीला हजर असतील असें मला वाटतें. कॉंग्रेसवाल्यांच्या नात्याचीं, मैत्रीचीं किंवा वशिल्याचीं बरींच माणसें सभागृहांत घुसलेलीं असावींत असा माझा तरी समज झाला. देशाच्या निरनिराळ्या विभागांतून आलेल्या निरनिराळ्या रंगांच्या, निरनिराळ्या वेषांच्या, निरनिराळ्या भाषांच्या आणि निरनिराळ्या लांबीरुंदीच्या कॉंग्रेस प्रतिनिधींचा तो संमिश्र मेळावा पाहून मनाला क्षणभर मौज वाटली. मुसलमान प्रतिनिधी मात्र अवघे चारपांचच होते. बाळासाहेब खेर, मोरारजी देसाई, रविशंकर शुक्ल वगैरे निरनिराळ्या प्रांतांचे मंत्री सभागृहांत सामान्य प्रतिनिधींच्या मेळाव्यांत बसले होते. उच्चासनावर बसण्याची त्यांना नेहमीं संवय असल्यानें

खालीं सभागृहांत आज बसतांना त्यांच्या मनाला कांहीं तरी चमत्कारिक वाटत असावें असें मला वाटलें. व्यासपीठावर सरदार पटेल, मौलाना आझाद, पंडित नेहरू, राजगोपालाचारियर, गोविंदवल्लभ पंत इत्यादि वृद्ध व सुपरिचित कॉंग्रेस नेते पुन्हा एकत्र पाहावयास मिळालेले पाहून स्वातंत्र्यपूर्व काळांतील अनेक हृदयंगम चित्रें निदान माझ्या तरी स्मृतिचक्षूंसमोर उभीं राहिलीं. त्यांच्याबद्दल त्यावेळीं माझ्या मनांत असलेल्या भावना आणि आज स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या बदललेल्या स्वरूपाकडे बघतांना मला वाटत असलेल्या भावना ह्यांची मनांतल्या मनांत विषण्णपणें तुलना करीत मी किती वेळ तरी बसलों होतों.

इतक्यांत कॉंग्रेसचे उगवते अध्यक्ष पं. बाबू पुरुषोत्तमदास टंडन ह्यांनीं सभास्थानीं प्रवेश केला आणि सर्वांनीं त्यांना आदरानें उत्थापन दिलें. कॉंग्रेसचे मावळते अध्यक्ष डॉ. पट्टाभि ह्यांनीं शेवटचें निरोपाचें भाषण थोडक्यांत पण गंमतीचें केलें. ते म्हणाले, "मी जेव्हां 'राष्ट्रपति' झालों, तेव्हां 'राष्ट्र' हलकेंच माझ्यापासून हिरावून घेण्यांत आलें व मी नुसताच 'पति' राहिलों. पण पुढें तर माझ्यावर राजरोस 'दरवडा' घालण्यांत आला व माझी पदवी माझ्यापासून हिरावून घेऊन ती प्रजासत्ताक राज्याच्या अध्यक्षांना अर्पण करण्यांत आली. मला आनंद एवढाच वाटतो कीं प्रजासत्ताक राज्यासाठीं मीं कांहींच केलें नसलें तरी निदान माझी पदवी तर मीं त्यांना देऊन टाकली! ड्यूक ऑफ विंडसरनें आपल्या आत्मचरित्रांत 'प्रिन्स ऑफ वेल्स' ह्या पदवीबद्दल जें म्हटलें तेंच मी कॉंग्रेसच्या अध्यक्षस्थानाबद्दल म्हणतों कीं अध्यक्षाची जागा म्हणजे अधिकार नाहीं, पण नुसतीच जबाबदारी; संधि नाहीं, पण नुसतीच अपेक्षा; अन् सत्ता नाहीं, पण नुसतीच इभ्रत!" त्यानंतर टंडनबाबूंच्या गळ्यांत त्यांनीं सुताचा हार घातला आणि टाळ्यांच्या गजरांत बाबूजी कॉंग्रेसच्या अध्यक्षस्थानावर जाऊन बसले.

टंडनबाबू अध्यक्षपदीं विराजमान झाल्यावर मी त्यांच्या मूर्तीकडे एका निराळ्या दृष्टीनें पाहूं लागलों. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विचार करूं लागलों. एका महान् संस्थेच्या अध्यक्षस्थानीं शोभण्यासारखी ही व्यक्ति आहे यांत मुळींच शंका नाहीं, असा चटकन् माझ्या मनानें निर्णय दिला. त्यांच्या दाढीमुळें आणि चेहऱ्यावरील सात्त्विक भावामुळें ते एखाद्या पुराणकालीन ऋषीसारखे शुचि आणि ज्ञानी दिसतात. त्यांच्या डोळ्यांमध्यें कांहींतरी एक विशेष आकर्षण आहे असें वाटतें. अर्थात्, तो त्या क्षणाचा निर्णय होता हें लक्षांत ठेवावें. खरें पाहतां भविष्यकालीन कर्तृत्वा-

वर टंडनबाबूंच्या व्यक्तिमत्त्वाच्या लहानमोठेपणाची कसोटी लागावयाची आहे. पण प्रथमदर्शनीं त्यांना बघून मला काय वाटलें तें मी सांगतों. ह्या जगांत माणसाच्या मोठेपणांत त्याच्या शारीरिक स्वरूपाचा फार मोठा भाग आहे असा माझा अनेक वर्षांपासूनचा सिद्धांत आहे. गांधीजी, नेहरू, पटेल, मौलाना, राजाजी ह्यांच्या आकृति डोळ्यांपुढें आणून मी सांगतों त्या दृष्टीनें त्यांच्याकडे बघा म्हणजे तुमच्या लक्षांत येईल कीं, ह्या लोकांच्या शारीरिक रूपांत आणि ठेवणींत फार मोठें प्रभावी वैशिष्ट्य होतें आणि आहे. नेहरूंच्या लौकिकाला आणि लोकप्रियतेला त्यांच्या शारीरिक सौंदर्याचा केवढातरी मोठा आधार आहे. नेहरू हे शंकरराव देवांसारखे दिसत असते तर आज राष्ट्रांत जें सर्वश्रेष्ठ स्थान त्यांना प्राप्त झालें आहे तें त्यांना मिळालें असतें का हा एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे. शंकरराव देव टंडनबाबूंच्या डाव्या बाजूला व्यासपीठाच्या कडेला बसले होते. व्यासपीठावरील बाकीच्या मोठमोठ्या पुढाऱ्यांशीं मी शंकररावांच्या आकृतीची तुलना करून पाहूं लागलों आणि माझ्या मनानें चटकन् निर्णय दिला कीं, अध्यक्षीय निवडणुकींत शंकरराव पडले हेंच ठीक झालें. कॉंग्रेसच्या आजच्या अधोगतीच्या परिस्थितींतसुद्धां अध्यक्षपदीं विराजमान होण्यास लागणारें व्यक्तिमत्त्व शंकररावांपाशीं नाहींच नाहीं. व्यासपीठावरील बसलेल्या सर्व कॉंग्रेसश्रेष्ठींत अत्यंत भिकार व्यक्तिमत्व जर कोणाचें असेल तर तें शंकरराव देव आणि प्रफुल्लचंद्र घोष यांचें. ह्या दोघांमध्यें विलक्षण साम्य आहे. दोघेहि तितकेच तुटके, फाटके आणि क्षुद्र दिसतात. असो. हें 'व्यक्तिमहात्म्या'चें पुराण संपवून मी पुढें वळतों.

अध्यक्षपदावर नियुक्त झाल्यानंतर टंडनबाबू चपलतेनें उठले व 'ध्वनिक्षेपका'समोर उभे राहून त्यांनीं आपलें प्रारंभींचें लहानसें भाषण केलें. "सहयोगिओं!" हें सभाजनांना उद्देशून त्यांनीं वापरलेलें शुद्ध हिंदी संबोधन ऐकून सर्व सभेंत एक कौतुकाची आणि स्मिताची लकेर उसळली. आजपर्यंतच्या कॉंग्रेसच्या नेहमींच्या वातावरणांत त्या एका शब्दानें निराळीच भावना उत्पन्न केली. "सहयोगिओं, आपने दायित्व रखके मुझमें जो विश्वास प्रकट किया उसके लिये मैं आपका कृतज्ञ हूँ!" ह्या त्यांच्या पहिल्याच वाक्यांतली संस्कृतप्रचुर रचना पाहून 'आतां कॉंग्रेसमध्यें हिंदीचा जमाना सुरू झाला बरें का' असें हळूच लोक आपापसांत कुजबुजले. आणि त्याचा प्रत्यय थोड्याच वेळांत सगळ्यांना आला. आसामाच्या भूकंपाला 'प्राकृतिक आपत्तियाँ,' परराष्ट्रीय

राजकारणाला ‘वैदेशिक नीत’, जातीयवादाला ‘सांप्रदायिकता,’ घटनेला ‘विधान’, उपसूचनेला ‘संशोधन’, सभेला ‘भवन’ अशा एकेक शुद्ध हिंदी शब्दांचा जेव्हां व्यासपीठावर उपयोग होऊं लागला तेव्हां जुन्या वातावरणांत वाढलेल्या काँग्रेस-वाल्यांना अगदीं गुदमरल्यासारखेंच वाटलें. ‘प्रो. रंगा’ ह्यांचा उल्लेख जेव्हां ‘आचार्य रंगा’ असा अध्यक्षांनीं केला तेव्हां सभागृहांत खूपच हशा पिकला. आतांपर्यंत काँग्रेसजनांना आचार्य कृपलानी हे माहित होते. पण ‘आचार्य रंगा’ त्यांनीं कधींच ऐकले नव्हते. माझ्या मागें एक धिप्पाड दाढीवाले शीख गृहस्थ बसले होते. त्यांची तर फारच पंचाईत झाली. मीं त्यांना विचारलें कीं, “सरदारजी, ह्या हिंदींतला किती हिस्से भाग आपल्याला कळतो?” ते वेडा-वाकडा चेहरा करून म्हणाले, “अजमासें चाळीस टक्के म्हणानात! आतां आम्हांला आमच्याजवळ एक हिंदी कोशच आणून ठेवावयाला पाहिजे.” शुद्ध हिंदीच्या आगमनामुळें मराठी माणसांची मात्र उत्तम सोय झाली आहे. कारण त्यांना आतां सर्वच शब्द कळतात. मौलाना आझादांच्या कारकीर्दींत मराठी माणसें वेड्यासारखीं वक्त्यांच्या चेहऱ्याकडे पाहात बसावयाचीं. त्यांच्या तोंडून निघणारें एखादें तरी अक्षर त्यांना कळत होतें कीं नाहीं ह्याची शंका आहे. तो काँग्रेसमधला ‘तरमीम’ (उपसूचना)चा काळ संपून आतां ‘संशोधना’चा काळ सुरू झाला. दुसऱ्या कोणत्या बाबतींत नसली तरी निदान भाषेच्या दृष्टीनें तरी काँग्रेसमध्यें क्रांति झाल्याचा सर्वांना ताबडतोबच प्रत्यय आला.

सभेच्या प्रारंभींच उत्तर प्रदेशच्या महावीर सिंगांनीं एक कायदेशीर हरकत उपस्थित केली. ते म्हणाले, “ही विषयनियामक समिति बेकायदेशीर आहे.” ती हरकत उडवून लावतांना टंडनबाबू ताडकन् म्हणाले, “ही समिति जर बेकायदेशीर आहे तर तुम्ही इथें कसे आलांत आणि तुम्हांला या ठिकाणीं बोलण्याचा काय अधि-कार आहे?” त्याबरोबर सभागृहांत हास्याचा प्रचंड कल्लोळ उसळला आणि महावीर सिंग आपल्या जागेवर कोसळले. अशा रीतीनें विनोदाच्या पहिल्या फटकाऱ्यानें टंडनबाबूंनीं सर्वांचीं मनें आपल्या कबजांत घेऊन टाकलीं. मधून मधून टंडनबाबू इंग्रजींतहि बोलत. आणि मला स्वतःला विचाराल तर त्यांच्या हिंदीपेक्षां मला त्यांचें इंग्रजी अधिक सफाईदार आणि ऐटबाज वाटलें. हिंदी तर त्यांची मातृ-भाषाच आहे. आणि त्या भाषेवर तर त्यांचें मोठेंच प्रभुत्व आहे. पण हिंदी बोलण्याची त्यांची पद्धति फारच धीमेपणाची आहे आणि त्यांच्या संस्कृतप्रचुर

शब्दांनीं श्रोत्यांच्या दृष्टीनें तरी त्यांच्या वक्तृत्वांत बरेच अडथळे उत्पन्न झाल्यासारखे वाटतात.

विषयनियामक समितीच्या ह्या बैठकींत परराष्ट्रीय धोरणाचा एकच ठराव महत्त्वाचा होता. गोविंदवल्लभ पंतांनीं हा ठराव मांडला. पंतांच्या शरीरांत वार्धक्यानें आतां इतका कंप निर्माण झालेला आहे कीं एकसारखी थरथर कांपणारी त्यांची ती धिप्पाड मूर्ति बघून बघणाऱ्यांच्या मनांत आदराबरोबरच अनुकंपेची भावना निर्माण झाल्यावांचून राहात नाहीं. तथापि, पंतांच्या बोलण्यांत मात्र त्या कंपाचा लवलेशहि आढळून येत नाहीं हें आश्चर्यच म्हणावयाला पाहिजे. पंतांनीं लांबलचक भाषण केलें. तथापि, तें विशेषसें परिणामकारक वाटलें नाहीं. पंडित नेहरूंच्या परराष्ट्रीय धोरणाला पाठिंबा देण्याचा तो ठराव होता. त्यावर विशेष वाद होण्याची अपेक्षा नव्हती. सहा उपसूचना आल्या पण त्या सर्व परत घेण्यांत आल्या. प्रो. शिबनलाल सक्सेना ह्यांनीं एक लांबलचक उपसूचना पाठवून पंडित नेहरूंच्या परराष्ट्रीय धोरणाची थोडक्यांत पण स्पष्ट शब्दांत हजेरी घेतली. ते म्हणाले, "नेहरू पंतप्रधान असतील. पण ते चुकत असतील तर आपण त्यांना स्पष्टपणें सांगितलें पाहिजे कीं 'पंडितजी, तुम्ही इथें चुकतां आहांत.'" नाशिकचे 'विद्वान्' कॉंग्रेसपुढारी श्री. गोविंदराव देशपांडे ह्यांनीं शिबनलालांची उपसूचना मूळ ठरावाच्या विरोधी आहे अशी हरकत घेतली होती. पण ती टंडनबाबूंनीं उधळून लावली. एक तुटपुंजें इंग्रजी वाक्य बोलून महाराष्ट्रांतल्या कॉंग्रेसवाल्यांनाहि इंग्रजी बोलतां येतें, हें गोविंदरावांनीं सर्व परप्रांतीयांना दाखवून दिलें आणि महाराष्ट्राची अब्रू सांभाळली. मुंबईचे दुसरे एक 'कामगार पुढारी' अबीदभाई जाफरअल्ली व्यासपीठाकडे मोठ्या वेगानें धांवत गेले. तेव्हां हा महाभाग आतां कोणतें महान् वक्तव्य करून सभेला जिंकतो आहे त्याची सर्व सभाजनांना चिंता पडून राहिली. पण 'चर्चा पुष्कळ झाली. ती बंद करावी अशी मी उपसूचना मांडतों.' असें एकच एक वाक्य बोलून जेव्हां अबीदभाई आपल्या नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें मागल्या मागें पळाले तेव्हां साऱ्या सभेची हसतां हसतां पुरेवाट झाली.

सर्व चर्चेला उत्तर देतांना पंडित जवाहरलाल नेहरू ह्यांनीं आरंभीं हिंदींत अन् मागून इंग्रजींत जें सव्वा तास वक्तृत्व केलें तसें त्यांचें वक्तृत्व पुष्कळ वर्षांत कोणाला ऐकावयाला मिळालें नसेल. विचार, भाषा, कोटिक्रम, माहिती आणि संयम ह्या सर्व गुणांच्या पराकाष्ठेचा तो अत्यंत मनोहर आणि तेजस्वी संगम

होता असेंच म्हटलें पाहिजे. एखादा जागतिक कीर्तीचा राजकारणधुरंधर विद्वान् महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसमोर 'परराष्ट्रीय राजकारणा'चा जणुं कांहीं तासच घेतो आहे असें वाटलें. पंडित नेहरू असे कधीं कधीं आपल्या प्रतिभेचे आणि बुद्धिमत्तेचे देदीप्यमान उन्मेष दाखवितात म्हणूनच भारताच्या कोट्यवधि जनतेवर त्यांची एवढी मोहिनी पडलेली आहे. पंचपक्वान्नांची एकादी चमचमीत मेजवानी जेवल्यानंतर आपल्याला जसें वाटतें तशा समाधानाच्या भावनेनें आणि प्रसन्न चित्तानें त्या दिवशीं सभा संपल्यानंतर घरोघर परततांना आम्हां सर्वांना वाटत होतें. त्या दिवशीं तरी लोक नेहरूंवर खूष होते.

मंगळवारीं बाहेरगांवाहून येणाऱ्या लोकांच्या गर्दींत एकाएकीं विलक्षण वाढ होत असल्याचें मला दिसून आलें. नाशिकच्या आजूबाजूच्या गांवांतून किंवा तालुक्यांतून लोकांच्या प्रचंड झुंडीच्या झुंडी येऊं लागल्या. आणि त्यामुळें 'गांधी-नगर'च्या रस्त्यावरील रहदारीचा प्रश्न फारच बिकट होऊं लागला. अकरासाडे-अकराच्या सुमारास प्रतिनिधिनिवासांत कांहीं पत्रकार मित्रांसमवेत मी जेवावयास गेलों. हजारपंधराशें माणसें एका वेळीं जेवावयास बसतील असा त्या ठिकाणीं एक लांबलचक मांडव घालण्यांत आलेला होता. जेवावयास टेबलांच्या नि खुर्च्यांच्या आडव्या रांगा करण्यांत आल्या होत्या. जेवणास एका वेळीं एक रुपया आकार होता. एकंदर जेवणाची व्यवस्था उत्तमच होती असें मला दिसून आलें. वाढावयास स्त्रिया होत्या. भात, पोळ्या, तूप, वरण, भाजी, पंचामृत असा जेवणाचा बेत रुचकर होता. माझ्या पलिकडे कांहीं कर्नाटकी प्रतिनिधी जेवत होते. त्यांनीं प्रत्येकीं आठ-आठ दहा-दहा तरी पोळ्यांचा फडशा पाडला. एक माणूस पानांत बराचसा भात टाकून गेला होता. या पानाकडे पाहात पाहात वाढणाऱ्या दोन कॉंग्रेस भगिनी वेडावाकडा चेहरा करून म्हणाल्या, "कोणीतरी हा सुशिक्षित अन् पांढरपेशा माणूस दिसतो आहे बरें का! आमचा शेतकरी बंधु असता तर तो कांहीं असा भात टाकून गेला नसता." मी मनांत म्हणालों, "शेतकरी बंधूंना खायला अन्न मिळत असेल तर तो टाकणार की नई!" एकंदरींत कॉंग्रेस अधि-वेशनांत दिसून येणारा शेतकऱ्यांचा अभाव सर्वांच्या मनाला विशेष लागून राहिला होता. आणि त्यामुळें त्यांच्या कल्याणाचा त्यांना मधून मधून पुळका येत होता. हात धुवायला बाहेर लांबलचक पत्र्याचे पन्हाळे केले होते व त्यांवर नळ लावले होते.

जेवण संपल्यावर आम्ही गांवांत जाऊं लागलों, तोंच मागून पोलिसांची 'पायलट' गाडी 'बाजूला व्हा, रस्ता द्या' असें ध्वनिक्षेपकावरून मोठ्यानें ओरडत झपाट्यानें आली. पुढें दोन मोटारसायकलीवर बसलेले पोलीस अधिकारी, मध्यें दोन पोलिसांच्या मोटारी, त्यानंतर नेहरूंची उघडी मोटार आणि त्यांच्या मागें पुन्हा दोन पोलिसांच्या मोटारी अशा कडेकोट बंदोबस्तांत नेहरू नाशिक शहरांत भरणाऱ्या महिलांच्या सभेसाठीं चालले होते. कोर्टाच्या मागील 'पोलीसग्राउंड'वर स्त्रियांची ही प्रचंड सभा भरली होती. पंचवीस ते तीस हजार तरी स्त्रिया 'लेकी, बाळी, मुलें आणि सुनां'सह जमल्या होत्या. आणि त्यामुळें त्या मैदानावर एवढा कांहीं गलगा निर्माण झाला होता कीं सांगतां सोय नाहीं. ध्वनिक्षेपक कांहीं नीट चालला नाहीं अन् नेहरूंच्या पंधरा मिनिटें झालेल्या भाषणांतला एक शब्दहि कोणाला ऐकूं आला नाहीं. पण महिलांना त्याबद्दल कांहीं खंत वाटली नाहीं. त्या नेहरूंना पाहावयाला आल्या होत्या. त्यांचें भाषण त्यांना थोडेंच ऐकावयाचें होतें? 'साखर नाहीं, तेल नाहीं, धान्य नाहीं अशा नुसत्या तक्रारी करीत बसूं नका' असा नेहरूंनीं महिला वर्गाला 'महत्त्वाचा' संदेश दिला.

दुपारीं अडीच वाजतां 'हॅनगार'वर 'विषयनियामक समिती'चें अधिवेशन होतें. 'प्रदर्शना'चें दोन आण्यांचें तिकीट घेऊन नेहरूंचें 'दर्शन' घ्यावयास 'गांधीनगरां'त शिरलेल्या लोकांनीं अगदीं प्रवेशद्वारापासून तों थेट 'हॅनगार' पर्यंतच्या रस्त्यावर दुतर्फा अगदीं गर्दी करून सोडली होती. 'विषयनियामक समिती'च्या सभेंतहि भाऊसाहेब हिऱ्यांकडून वशिल्याचे आणि फुकट पास घेऊन आलतू फालतू लोकांनीं अशी कांहीं गर्दी करून सोडली होती कीं प्रतिनिधींना सुद्धां बसावयाला जागा नव्हती. प्रतिनिधींच्या रांगेंत अगदीं मागल्या बाजूला आचार्य कृपलानी अगदीं सामान्य प्रतिनिधीप्रमाणें गुपचुप बसलेले पाहून मला आश्चर्यच वाटलें. पहिला ठराव 'घटनेंत बदल' हा होता. तो आदल्या दिवशींच सदोबा पाटलांनीं मांडला होता. आज त्याची चर्चा सुरू होती. अध्यक्ष टंडनबाबू ह्यांच्या कडकपणाला आज विलक्षणच धार चढलेली होती. कोणीं मध्येंच कांहींतरी त्यांना सुचविलें, तेव्हां म्हातारा एकदम उसळून म्हणाला, "माझा गुरु होण्याचा कोणींहि प्रयत्न करूं नये, अन् सभा कशी चालवायची त्याची अक्कलहि मला कोणीं शिकवूं नये." टंडनबाबूंचे ते उद्गार कॉंग्रेसमधल्या त्यांच्या विरोधकांना उद्देशून असावेत असा मला तरी त्यावेळीं भास झाला. आपला कडकपणा प्रतिनिधींना

फार असह्य होऊं नये म्हणून टंडनबाबू मधून मधून त्यांच्यावर विनोदानें गुलाबपाणीहि शिंपडीत होते. एका उपसूचकाचें नांव त्यांना वाचतां येईना तेव्हां ते म्हणाले, "हें नांव प्रेमनाथ होऊं शकेल अन् प्रभुनाथहि होऊं शकेल!" तेव्हां खूपच हशा पिकला. पण उपसूचक उठून जेव्हां म्हणाला, "हमारा नाम प्रभुनाथ है (आमचें नांव प्रभुनाथ आहे)" तेव्हां अधिकच हशा पिकला. ठरावावर चर्चा करतांना शेट गोविंददास म्हणाले, "वाटेल त्या दगडाला शेंदूर फासून त्याला काँग्रेसचा उमेदवार म्हणून निवडणुकींत उभें करण्याचे दिवस आतां संपले. तसें जर आपण केलें तर काँग्रेसची इभ्रत नष्ट होईल."

मुंबई सरकारचे पार्लमेंटरी सेक्रेटरी यशवंतराव चव्हाण जेव्हां बोलावयास पुढें आले तेव्हां भाऊसाहेब हिऱ्यांचे हे 'ब्रेनट्रस्ट' आतां कोणतें वक्तव्य करणार म्हणून मराठी माणसें डोकीं उंच करून अभिमानानें बघूं लागलीं. पण यशवंत-रावांनीं जेव्हां 'चर्चाबंदी'ची सूचना मांडली तेव्हां सर्वांनीं लाजेनें माना खालीं घातल्या. सरड्याची धाव कुंपणापर्यंत, त्याप्रमाणें मराठी माणसाची धाव 'कायदेशीर हरकती' उपस्थित करण्यापर्यंत किंवा 'चर्चाबंदी'ची सूचना आणण्यापर्यंत—दुसरें काय? पण महाराष्ट्राची इंग्रजीची अब्रू काँग्रेसमध्यें आमच्या सदोबांनीं मात्र राखली. चर्चेला उत्तर देतांना सदोबा ठणकावून बोलले आणि त्यांनीं सभागृह दणाणून सोडलें. "आजकाल काँग्रेस कार्यकर्त्यांत अनेक दोष उत्पन्न झाले आहेत अशी आमचे काँग्रेस नेते आमची वारंवार निर्भर्त्सना करतात. पण मी असें सांगतों कीं आमचा काँग्रेसपक्ष आणि व्यक्तिशः काँग्रेसजन हे दुसऱ्या कोणत्याहि पक्षापेक्षां किंवा त्या पक्षांतील व्यक्तीपेक्षां नैतिक दृष्टया किंवा कोणत्याहि बाबतींत श्रेष्ठच आहेत." त्याबरोबर सभागृहांतील काँग्रेस प्रतिनिधींनीं टाळ्यांचा कडकडाट केला. आई ज्या ममतेनें मुलाची कानउघाडणी करते तशी आमच्या नेत्यांनीं आमच्यावर टीका करावी, तुरुंगाचा अधिकारी कैद्यांना ज्या तऱ्हेनें वागवतो तसें त्यांनीं आम्हांला वागवूं नये असें शेवटीं सदोबा हसत हसत म्हणाले. हे शब्द, कां कोण जाणे, नेहरूंच्या अगदीं काळजाला जाऊन झोंबले. 'जातीयवाद, भारत व पाकिस्तान' हा ठराव मांडण्यासाठीं त्यानंतर जेव्हां टाळ्यांच्या गजरांत नेहरू उठले तेव्हां चारपांच वाक्यांनंतरच ते एकदम सदोबांवर कडाडले. ते म्हणाले, "मला ठाऊक आहे, काँग्रेसजनांना उद्देशून मीं कांहीं दिवसांपूर्वी जें एक परिपत्रक काढलें त्यावर पाटील ह्यांचा रोख होता. पण काँग्रेसवाल्यांच्या

अंगांतला बारीकसारीक दोष देखील मी सहन करणार नाहीं. माझा सारा पिंड कॅाँग्रेसनिष्ठ बनलेला आहे. आजची कॅाँग्रेसची परिस्थिति बघून मला शरम वाटते." नेहरूंच्या संतापाचा तो भडका पाहून सभागृह एकदम घाबरल्यासारखें झालें.

जातीयवादाच्या ठरावावर विषयाला धरून ते एकहि शब्द बोलले नाहींत. डोळे लाल करून, स्वर उंच चढवून आणखी आवेशानें हातवारे करून त्यांनीं सभागृहाला अगदीं सरळ सरळ धमकी दिली कीं तुम्ही हा ठराव मुकाट्यानें मंजूर करा, नाहीं तर माझ्याशीं गांठ आहे, लक्षांत ठेवा! "देशाला आणि कॅाँग्रेसला माझें नेतृत्व हवें असेल तर तुम्हांला हा ठराव मान्य करावाच लागेल! हा ठराव तुम्ही मान्य करणार नाहीं तर दुसरा कोणता मार्ग आहे? बोला, दुसरा कोणता मार्ग आहे? काय, चालवलें आहे काय तुम्हीं? महात्मा गांधींचा झेंडा तुम्ही उंच धरणार, कीं खालीं पाडणार?" असें तडातडा बोलून नेहरू एकदम आपल्या जागेवर जाऊन बसले. अंगावर वीज पडावी तशी सभा भेदरून अन् गर्भगळित होऊन गेली. आतां या ठरावाला उपसूचना तरी कोण करणार अन् त्यावर चर्चा तरी काय होणार ह्याची मला शंकाच पडली. पण थोड्याथोडक्या नाहीं, चांगल्या दहाबारा उपसूचना आल्या आणि त्यांपैकीं बहुतेक वक्त्यांनीं उपसूचना करण्याच्या मिषानें जातीयवादाच्या ठरावाची अन् नेहरूंची सडकून हजेरी घेतली.

नेहरूंच्या संतापावर अगदीं पहिल्याच धडाक्याला अलगुराय शास्त्री ह्यांनीं बादलीभर पाणी ओतलें. ते सरळ नेहरूंना म्हणाले, "आम्ही कांहींएक न बोलतां तुमच्या ठरावाला मुकाट्यानें पाठिंबा द्यावा असें तुम्ही आम्हांला सांगतां, त्यापेक्षां या सभेंत आम्हीं येऊंच नये असें कां तुम्ही आम्हांला सांगत नाहीं हो? संस्कृत-मध्यें एक वचन आहेः 'सभा वा न प्रवेष्टव्या, वक्तव्यं वा समंजसं!' शहाण्या माणसांनीं आधीं सभेंत जाऊं नये अन् गेलें तर तेथें अगदीं निर्भीडपणें आणि सरळपणें बोलावें. आम्हांला काय वाटतें तें आम्ही येथें बोलून दाखविणार. कृपा करून आमचे हातपाय अन् तोंड अशा रीतीनें बांधून टाकूं नका."

मूळ ठरावाला उपसूचना करण्याचें निमित्त करून एकेक वक्ता जेव्हां ठरावावर टीका करूं लागला, तेव्हां पंडित नेहरू अत्यंत अस्वस्थ झाल्यासारखे दिसले, आणि डाव्या हातानें डोकें व डोळे जोराजोरानें चोळूं लागले. सर्वांत जबरदस्त हल्ला कराचीचे कृष्णानंदस्वामी ह्यांनीं चढविला. स्वामीजी हे अतिशय प्रभावी वक्ते आहेत. ते म्हणाले,

"पाकिस्तानाशीं निर्माण होणारे सर्व वाद शांततेनेंच मिटविले जावेत, युद्धाचा आश्रय करण्यांत येऊं नये, ह्या ठरावांतील भागाला माझा विरोध आहे. शांततामय मार्गांनीं पाकिस्तानचे वाद तुम्हांला मिटवायचे असतील तर जरूर मिटवा. पण युद्ध मुळीं करणारच नाहीं असा ठराव करून आपले हातपाय बांधून घेऊं नका. अन्यायाविरुद्ध लढाई करावयास शरम वाटण्याचें काय कारण आहे? वेळ पडली तर पाकिस्तानशीं आपण लढाई करावयाला पाहिजे."

टाळ्यांच्या कडकडाटांत स्वामीजी खालीं बसले. ह्यावेळीं सभेचें वातावरण अतिशय प्रक्षुब्ध झालें होतें. भाषणें जशीं लांबू लागलीं तशीं अध्यक्ष टंडनजींनीं इशारत दिली कीं, "मीं घंटा वाजविली कीं फक्त तें वाक्य तेवढें मी वक्त्याला पुरें करूं देईन. अर्थात् मी व्याकरणाच्या दृष्टीनें बोलतों, कारण वाक्य हें पुरें झालेंच पाहिजे!" तेव्हां हशा पिकला.

ठरावाला पाठिंबा देण्यासाठीं म्हणून सदोबा पाटील उठले आणि पंडितजींनीं त्यांच्यावर केलेल्या हल्लयाची त्यांनीं सव्याज फेड करून टाकली. ते म्हणाले, "पंडितजींचा माझ्याबद्दल गैरसमज झालेला आहे. मी त्यांना उद्देशून मुळींच बोललों नव्हतों. त्यांच्यावर जर मला टीका करावयाची असती, तर मी त्यांचें नांव स्पष्टपणें घेतलें असतें. तेवढें धैर्य मजजवळ खात्रीनें आहे. मी काँग्रेसचा गेलीं तीस वर्षें अखंड सभासद आहें. आणि काँग्रेसचा कितीहि लहान सभासद असला तरी त्याला आपलीं मतें निर्भयपणें व्यक्त करण्याचें पूर्ण स्वातंत्र्य आहे हा धडा मी काँग्रेसपासून शिकलों आहें!" सदोबांनीं अत्यंत रुबाबानें आणि दिमाखानें पंडितजींवर जी मात केली ती सर्वांना अतिशयच आवडली. मी सदोबांचा टीकाकार आहें. पण ह्यावेळीं त्यांच्या जवळ जाऊन 'शाबास सदोबा' असें म्हणून त्यांची पाठ थोपटावी असें मला वाटलें.

उत्तरादाखल जेव्हां पंडितजी उठले तेव्हां त्यांचा तो पहिला संताप आणि आवेश कुठल्याकुठें वितळून गेला होता. रागावून आणि धमक्या देऊन आतां आपला निभाव लागणार नाहीं हें पंडितजींनीं ओळखलें आणि म्हणून उत्तराचें भाषण करतांना पंडितजींनीं निराळ्याच तंत्राचा अवलंब केला. नवीन असें त्यांनीं ह्या भाषणांत कांहींच सांगितलें नाहीं. बऱ्याचशा असंबद्ध गोष्टी सांगण्यांत अन् मामुली विनोद करण्यांत पंडितजींनीं चांगला पाऊण तास घालविला आणि शेवटीं कुठला तरी निराळाच मुद्दा काढून भाषण मध्येंच एकदम संपविलें. आधल्या

दिवशींच्या त्यांच्या उत्कृष्ट भाषणाची ह्या भाषणाशीं तुलना करावयाची म्हणजे चंद्राबरोबर काजव्याची तुलना करण्यासारखें होतें. प्रतिकूल टीकेमुळें पंडितजी किती अस्वस्थ होतात अन् मग त्यांच्या विचारांचा कसा गोंधळ उडतो हें त्या दिवशीं सर्वांना भरपूर पाहावयाला मिळालें. अर्थात् पंडितजींचें भाषण कसेंहि झालें असलें तरी त्यांचा ठराव प्रचंड मतांनीं पास झाला हें सांगावयास नको. कारण हा ठराव जर नापास करावयाचा तर मग 'दुसरा रस्ता कोणता?' हा पंडितजींचा प्रश्न कॉंग्रेसप्रतिनिधींपुढें दत्त म्हणून उभा होताच.

दुसऱ्या दिवशीं वृत्तपत्रांत 'नेहरूंच्या भारतपाक कराराला आणि जातीयवादा-संबंधींच्या धोरणाला प्रचंड पाठिंबा' अशा मथळ्यानें ही बातमी प्रसिद्ध झाली. त्यामुळें बाहेरील लोकांच्या काय कल्पना झाल्या असतील कोणास ठाऊक! पण नेहरूंच्या ह्या धोरणाला खुद्द कॉंग्रेसमध्यें अत्यंत प्रखर विरोध आहे आणि ह्या विरोधाला निरुत्तर करण्याचें कौशल्य नेहरूंजवळ खास नाहीं हें 'विषयनियामक समिती' मध्यें मला प्रत्यक्षच पाहावयाला मिळालें. या दिवशीं 'विषयनियामक समिती' मध्यें भाऊसाहेब 'हिरे' ह्यांच्या इंग्रजी भाषेचा जो 'चमकदार' नमुना पाहावयाला मिळाला तो सांगण्यासारखा आहे. दुसऱ्या दिवशींच्या कांहीं कार्यक्रमांचा तपशील जाहीर करण्यासाठी हें 'रत्न' उभें राहिलें. ते म्हणाले, "I want to make some amendments—No—No I am sorry—announcements! Tomorrow in the evening—in evening Tandanji will speak. इ. इ. आगामी निवडणुकीनंतर हिरे हे 'मंत्री' होणार असल्याचा नाशकांत पुष्कळच बोलवा आहे. हिरे ह्यांचें हें भाषानैपुण्य बघून ते कॉंग्रेस सरकारचे मंत्री होण्यास निश्चित लायक आहेत ह्याबद्दल मला तरी शंकाच उरली नाहीं.

बुधवारीं सकाळीं 'विषयनियामक समितीं'त 'निर्वासितां'संबंधींचा ठराव सरदार प्रतापसिंग ह्यांनीं मांडला. पाकिस्तानामधून आलेल्या निर्वासितांपैकीं पुष्कळ लोकांची अद्यापि कांहींही सोय लागलेली नाहीं. तरी त्यांच्या राहण्याची आणि त्यांना फायदेशीर व्यवसाय मिळवून देण्याची सरकारनें सोय करावी, त्याचप्रमाणें पाकिस्तानांत राहिलेल्या निर्वासितांच्या मालमत्तेचा प्रश्न शक्य तितक्या लवकर निकालांत काढावा, अशी सरकारला विनंति करणारा हा ठराव होता. ह्या ठरावावर एकंदर बारा वक्त्यांनीं भाषणें केलीं; पण त्यांपैकीं एकांतहि मला विशेष दम वाटला नाहीं.

सर्वांत उत्कृष्ट भाषण डॉ. चोइतराम गिडवानी ह्यांचें झालें. ते अखिल भारतीय कॉंग्रेस समितीचे सभासद् नसतांनाहि ह्या विषयांतले एक अधिकारी पुरुष म्हणून अध्यक्षांनीं त्यांना बोलावयास पाचारण केलें. डॉ. गिडवानी म्हणाले, "पूर्व आणि पश्चिम पाकिस्तानामधून आतांपर्यंत एक कोटि निर्वासित भारतांत आले. ह्या सर्वांना घरें देणें, व्यवसाय पुरविणें किंवा त्यांच्यासाठीं शाळा इस्पितळें ह्यांची सोय करणें हें अत्यंत कठिण आहे हें मी ओळखतों. पण त्या दृष्टीनें सरकारनें आजपर्यंत काय केलें? सरकारनें आपल्या यंदाच्या बजेटांत निर्वासितांसाठीं कमींत कमी शंभर कोटी रुपये तरी बाजूला ठेवले पाहिजेत. नाहीं तर हा प्रश्न सुटणें अगदीं अशक्य आहे, अशक्य आहे, अशक्य आहे!"

चोइतरामांच्या भाषणानें सभेचें वातावरण इतकें तापून गेलें कीं सांगतां सोयच नाहीं. त्यानंतर नागपुरचे सेनापति आवारी ह्यांनीं त्या प्रक्षोभाचा पारा आणखीन् वर चढवला. त्यांनीं ठणकावून सवाल केला कीं, "तीन वर्षांपूर्वी लोकप्रियतेच्या शिखरावर असलेले आमचे नेते आज अप्रियतेच्या खोल दरींत जाऊन कां पडले आहेत? आजच्या आमच्या सरकारवर देशामधला एक माणूस खूष नाहीं. श्रीमंत नाहींत, गरीब नाहींत, मजूर नाहींत, कोणीहि नाहीं! स्वातंत्र्याची एवढी बदनामी कां व्हावी?" ह्यावेळीं आवारींनीं आपल्या आवाजाचा सूर एवढा उंच चढविला कीं 'मुद्द्याला धरून बोला' असा अध्यक्षांनीं घंटा वाजवून त्यांना इशारा दिला. त्याबरोबर आवारी गोंधळले व आपलें भाषण अर्धवट सोडून तसेच पळत पळत जाऊन आपल्या जागेवर बसले. त्यानंतर सरदार प्रतापसिंगांचें उत्तरादाखल भाषण होऊन ठराव ठरल्याप्रमाणेंच मंजूर झाला.

आज नाशिकच्या वातावरणांत आणखीन् एक तंगीची भर पडली. ती म्हणजे मिरवणूक आणि सभाबंदीच्या सरकारी हुकुमाची. १४४ कलम पुकारलें असें कांहीं वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाल्याचें त्या दिवशीं मीं सकाळीं वाचलें. पण नाशिकच्या कलेक्टरांचें जें एक पत्रक मला त्या दिवशीं वाचायला मिळालें त्यांत १४४ कलमाचा उल्लेख नव्हता. फक्त मिरवणुकी अन् मोर्चे काढल्यास कायदेशीर इलाज करण्यांत येईल असें सांगण्यांत आलें होतें. शेतकरी-कामकरी पक्षानें त्या दिवशीं आपण मोर्चा काढणार असें आगाऊ जाहीर केलें होतें, त्याला उद्देशून ही सरकारी तजवीज होती हें उघड आहे. तथापि सरकारी हुकुमाला धाब्यावर बसवून दुपारीं एकच्या सुमारास आग्रा रोडवरून शे. का. पक्षाची एक लांबलचक

मिरवणूक निघाली. या मिरवणुकींत दोन-तीन हजार लोक सरकारविरोधी घोषणा करीत गेले. एका खाजगी ठिकाणीं सभा भरून केशवराव जेधे व इतर पक्षांचे पुढारी ह्यांचीं भाषणेंहि पण झालीं. ह्या सभेला सात-आठ हजार लोक होते. तथापि कॉंग्रेसचें अधिवेशन ह्या दिवशीं सुरू होणार असल्यानें नेहरूंना बघण्यासाठीं बाहेरगांवाहून येणाऱ्या जनतेची गांवांत एवढी रीघ लागून राहिली कीं विरोधी निदर्शनाचा कांहींहि परिणाम होऊं शकला नाहीं.

# नाशिक कॉंग्रेसच्या जत्रेंत : ३ :

दोन वाजावयाच्या सुमारास 'गांधीनगरा' बाहेर कमींत कमी एक लाख लोक तरी एखाद्या सागरासारखे पसरलेले होते. एवढे लोक एकाएकीं आले तरी कुठून ह्याचा मी अचंबा करीत होतों. मोटारींची संख्या तर एकदम इतकी वाढली कीं कांहीं विचारूं नका. स्टेशन रोडवर पायीं चालणें सुद्धां कठीण झालें तर मोटार हाकणें किती मुष्किलीचें झालें असेल ह्याची कल्पनाच केलेली बरी. गर्दी आवरतां आवरतां आणि रहदारीवर नियंत्रण घालतां घालतां पोलीस अगदीं मेटाकुटीला आले. ह्या गर्दीमधून वाट काढणें आणि गांधीनगरांत प्रवेश मिळविणें हें तर एक अग्निदिव्यच होऊन बसलें. बरें, गांधीनगरांत फिरल्यावरहि प्रवेशद्वारापासून तों मंडपापर्यंत पुन्हा पन्नासएक हजार माणसांची थाप लागून राहिली होती. मंडपाच्या प्रवेशद्वारापाशींहि आंत जाणारांचे पास तपासून त्यांचा नाना तऱ्हेनें छळ करण्याची 'स्वयंसेवक' अगदीं कोशीस करीत होते. त्यामुळें लोक अगदीं रडकुंडीला आले. नको ही गर्दी अन् नको ही कॉंग्रेस असें त्यांना होऊन गेलें. पहिल्या दिवशीं मी मुख्य मंडपाच्या अंतर्भागाचें जें वर्णन केलें होतें त्यांत अर्थातच आतां बदल झालेला होता. पंचवीस हजार माणसांची तरी बसण्याची आंत सोय करण्यांत आली होती. एकंदर सर्वच देखावा भव्य आणि रुबाबदार

होता. मंडप माणसांनीं अगदीं फुलून गेला होता. तथापि, नायकांच्या विभागांत आणि त्यांच्या पाठीमागील देणगीदारांच्या विभागांत शेकडों खुर्च्या मोकळ्या होत्या.

बरोबर पावणेतीन वाजतां टाळ्यांच्या गजरांत आणि जयजयकारांत नेहरू-पटेल यांच्या समवेत अध्यक्ष टंडनजी सभागृहांत प्रविष्ट झाले. कॉंग्रेसच्या बहुतेक सर्व परिचित पुढाऱ्यांचे चेहरे व्यासपीठावर दिसूं लागले. राष्ट्रगीत झाल्यानंतर स्वागताध्यक्ष हिरे यांनीं आपलें हिंदी भाषण पंधरा मिनिटांत वाचून दाखविलें. हिरे ह्यांचे गांवठी हिंदी उच्चार आणि एखादा लांडगा पाठीमागें लागला आहे अशा भेदरट घाईनें झालेलें त्यांचें वाचन बघून अखिल भारतांतले प्रतिनिधी त्यांच्याकडे टकमक बघतच राहिले. राम आणि सीता पंचवटींत राहात होतीं. तेव्हां रामराज्याच्या स्थापनेचा विचार करण्यासाठीं कॉंग्रेसचें अधिवेशन नाशिक येथें भरत आहे हा एक पवित्र योगायोग आहे, असें हिरे म्हणाले. पण पंचवटीमध्यें राम आपल्या वनवासाचा काळ कंठीत होता, हें हिरे अजिबात विसरले. माझ्या शेजारचे एक गृहस्थ म्हणाले, "रामराज्याच्या गोष्टी करतां करतां जनतेच्या कपाळीं गेल्या तीन वर्षांमध्यें जो 'वनवास' आला, तो लक्षांत घेतां रामाच्या वनवासभूमींत कॉंग्रेसचें अधिवेशन भरत आहे हा खरा योगायोग आहे."

आज देशांत कॉंग्रेसच्या राज्यकारभारावर जी टीका होत आहे ती लक्षांत घेऊनच हिरे ह्यांनीं आपलें भाषण लिहिलेलें होतें, त्यामुळें तें बऱ्याच अंशांनीं वास्तववादी झालें होतें. तथापि, हिरे ह्यांच्या भिकार वाचनानें त्या भाषणाचा कांहींहि परिणाम होऊं शकला नाहीं. भाषणाच्या अखेरीस छापलेली 'जयहिंद' ची घोषणा करावयास देखील हिरे विसरले, यावरून त्यांची मनःस्थिति किती गोंधळली असली पाहिजे त्याची कल्पना येते.

बरोबर तीन वाजतां काकासाहेब गाडगीळ अध्यक्षांना उच्चासनावर घेऊन आले. आणि अत्यंत शांतपणें अध्यक्षांनीं आपलें भाषण वाचावयास सुरुवात केली. अध्यक्षांचा हा धिमेपणा पहिल्या अर्ध्यापाऊण तासांत इतका असह्य झाला कीं दहा मिनिटांत एक पान ह्या हिशेबानें सबंध अठ्ठावीस पानांचें भाषण वाचावयास कमींत कमी त्यांना साडेचार तास तरी लागतील असें लोकांना वाटलें. पुढें पुढें आपल्या वाचनाबरोबर ते 'प्रवचन'हि करूं लागले. तास दीड तासानंतर

मात्र अध्यक्षांची स्वारी रंगांत आली आणि त्यांच्या वाचनाची गति वाढली. जोराजोरानें त्यांचे हातवारे होऊं लागले. सभागृहांत टाळ्यांचा कडकडाट होऊं लागला. मग अध्यक्षांच्या भाषणांत कांहींतरी मौज आहे असें श्रोत्यांना वाटलें अन् सभागृहांतील वातावरण पुष्कळच सुसह्य झालें. आपल्या भाषणांतील कठीण हिंदी शब्दांचें विवरण मधून मधून हिंदी आणि उर्दू शब्दांनींहि अध्यक्ष करीत होते. सर्व भाषण संपायला तब्बल तीन तास लागले. भाषणाच्या अखेरीस अध्यक्षांनीं त्याचा सारांश इंग्रजीमधून सांगितला. भाषण संपतांच 'जय भारत' अशी अध्यक्षांनीं खणखणीत आवाजांत घोषणा केली त्यांत त्यांचें वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्व प्रकट झालें. सदुसष्ट-अडुसष्ट वर्षांच्या वयांत पाण्याचा एक घोटहि न पितां किंवा मध्यें न खोकतां खाकरतां सतत तीन तास उभें राहून खड्या आवाजांत आपलें भाषण वाचून दाखविणें ही खरोखरच अद्भुत गोष्ट आहे. टंडनजींचा हा पराक्रम बघून श्रोते स्तिमित होऊन गेले.

टंडनजी हे जातीयवादी आहेत असा आधींपासून त्यांच्या विरुद्ध जो विनाकारण प्रचार करण्यांत आला होता त्याला त्यांनीं आपल्या भाषणांत चांगलाच टोला मारला. त्याचप्रमाणें कांहीं मौलिक प्रश्नांवर पंडित नेहरूंचे आणि त्यांचे मतभेद आहेत आणि म्हणून त्याचें प्रतिबिंब त्यांच्या भाषणांत पडल्यावांचून राहणार नाहीं, अशाहि ज्यांच्या अपेक्षा होत्या त्यांचीहि टंडनजींच्या भाषणानें चांगलीच निराशा केली. नेहरूंच्या परराष्ट्रीय धोरणाचा आणि धर्मातीत राजकारणाचा त्यांनीं अगदीं निःसंदिग्धपणें पुरस्कार केला. पाकिस्तानबाबत अधिक कडक धोरणाचा आपण अवलंब केला पाहिजे असें ते म्हणाले. "काश्मीरांतून पाकिस्तानी सैन्याला हाकून देऊन त्या ठिकाणीं शेख अबदुल्ला ह्यांच्या नेतृत्वाखालीं भारतीय घटनेनुसार संपूर्ण अंमल प्रस्थापित करण्याचा मध्यवर्ती सरकारनें जर प्रयत्न केला तर त्याला काँग्रेसचा आणि जनतेचा पाठिंबा मिळेल." असें जेव्हां टंडनजी म्हणाले तेव्हां साऱ्या सभागृहांतून टाळ्यांचा कडकडाट झाला. निर्वासितांना मदत करण्यासाठीं सरकारनें 'राष्ट्रीय कर' तरी उभारावा नाहीं तर अन्य मार्गानें पैशाची व्यवस्था करावी असें ते म्हणाले. पंधरा वर्षांच्या आंत इंग्रजीची जागा हिंदीला देण्यांत यावी असा त्यांनीं अभिप्राय व्यक्त केला. नियंत्रणांबाबत आवश्यक असतील तरच तीं बसवावींत असें त्यांचें मत पडलें. आजपर्यंतच्या काँग्रेसच्या परंपरेला किंवा सर्वसामान्य विचारसरणीला

कुठेंहि धक्का न लावतां आणि त्याचबरोबर स्वतःच्या मतांना कुठेंहि मुरड न घालतां अत्यंत स्पष्टपणें आणि निर्भीडपणें टंडनजींनीं भाषण केलें ह्यांत मुळींच संशय नाहीं. एका विद्वान्, तपस्वी अन् तळमळीच्या थोर माणसानें जसें भाषण करावें तसेंच तें होतें.

आर्थिक बाबतींत टंडनबाबूंचा दृष्टिकोन आधुनिक किंवा पुरोगामी नाहीं किंवा त्यांनीं केलेलें मार्गदर्शन जनतेच्या विशेष उपयोगाचें नाहीं यांत शका नाहीं. पण त्याला त्यांचा काय इलाज आहे? ज्या वातावरणांत ते आजपर्यंत वाढले आणि ज्या संस्थेचे आज ते अध्यक्ष आहेत त्याचा विचार करतां ते ह्यापेक्षां अधिक काय बोलूं शकणार? आणि त्यांच्या आजूबाजूचीं दुसरीं माणसें तरी ह्या विषया-संबंधीं काय बोलताहेत?

तीन-साडेतीन तासांची एवढी मेहनत करून टंडनजी पुन्हा नाशिक शहरांत गेले. तेथें वीसपंचवीस हजारांची सभा त्यांच्या सत्कारासाठीं वाट पाहात होतीच. त्या सभेंतील भाषणांत मानवाच्या समतेचा त्यांनीं पुरस्कार केला. ते म्हणाले, "जन्मतः सर्वच मुलें सारखीं असतात. त्यांपैकीं हा हिंदु हा मुसलमान असें ओळखतां येणार नाहीं. पुढें शिंपी आणि न्हावी त्यांच्या वेषभूषेंत आणि केश-भूषेंत फरक करून त्यांच्यामधले धार्मिक भेद अधिक अधिक वाढवीत नेतात." हिंदु धर्म व इतर धर्म ह्यांच्यांतला भेद समजावून सांगतांना ते म्हणाले कीं, "प्राचीन काळीं आमच्या भारतांत अन्नपाण्याचा मुळीं तुटवडाच नव्हता. म्हणून इतर धर्मांप्रमाणें, 'हे देवा, रोजची भाकरी आम्हांला नीट मिळूं दे' अशी देवाला प्रार्थना करण्याची आम्हांला मुळीं जरुरीच पडली नाहीं. 'आम्हांला बुद्धि दे, कांति दे,' अशीच देवाकडे आम्ही मागणी करीत होतों." शहरांतला हा कार्यक्रम संपवून पुन्हा 'विषयनियामक समिती'च्या रात्रीच्या बैठकीसाठीं साडेनऊ वाजतां टंडनजी आपले हजरच. 'विलक्षण कणखर म्हातारा आहे हा!' असेंच पुष्कळांनीं उद्गार काढले.

ज्या ठरावाचा उल्लेख प्रत्येक वक्ता 'ह्या काँग्रेस अधिवेशनामधला अत्यंत महत्त्वाचा ठराव' असा करीत होता आणि जो ठराव सर्वांच्या शेवटीं विषय-नियामक समितीच्या रात्रीच्या सभेंत साडेदहा वाजतां घाईघाईनें आणण्यांत आला आणि ज्यावरील एकतीस उपसूचना स्वतः अध्यक्षांनीं मांडून आणि त्यांची विल्हेवाट लावून जो अर्ध्या तासाच्या चर्चेमध्येंच कसाबसा पास करून घेण्यांत

आला तो ठराव म्हणजे 'आर्थिक कार्यक्रमा' चा होय. काँग्रेस प्रतिनिधींना ह्या ठरावाबद्दल किती आस्था वाटत होती हें त्यांच्या ह्या बैठकीला उपस्थित असलेल्या संख्येवरून दिसून आले. सत्तावीसशें किंवा अठ्ठावीसशें प्रतिनिधींपैकीं एकशेंआठ प्रतिनिधी हजर होते. सर्व काँग्रेस अधिवेशनांत माझें लक्ष फक्त ह्या ठरावाकडे होतें. देशांतील बिकट आर्थिक समस्या काँग्रेस कशी सोडविते, एवढेंच मला पाहावयाचें होतें.

हा ठराव चांगला लांबलचक दोन पानांचा होता. ह्या ठरावांत सर्वोदयी राज्याच्या ( Welfare State ) ध्येयाचा पुरस्कार केलेला होता. भांडवलशाहीच्या मनधरणीचें आणि सामान्य माणसांच्या अवहेलनेचें भारत सरकारचें सध्यांचें जें संदिग्ध, गुळमुळीत आणि दिरंगाईचें आर्थिक धोरण आहे त्यालाच पाठिंबा देण्यासाठीं हा ठराव काँग्रेस अधिवेशनांत आणण्यांत आला होता.

हा ठराव मजूरमंत्री जगजीवनराम ह्यांनीं मांडला. तीनचार दिवस मी व्यासपीठावर जगजीवनरामांना पाहात होतों. त्यांचा तो जाड ओठांचा, चपट्या नाकाचा आणि पक्क्या काळ्या रंगाचा चेहरा बघून ह्यांच्याविषयीं कोणाचाहि अनुकूल ग्रह होणें अशक्यच आहे. त्यामध्यें त्यांच्या चेहऱ्यावर एकसारखें चमत्कारिक हास्य चमकत असतें. अन् त्यांच्या अर्ध्याउघड्या ओठांमधून त्यांचे सफेत दांत सारखे दिसत असतात. तें पाहून तर हा कोणीतरी वेडसर आणि अर्धवट माणूस असावा असें आपल्याला वाटूं लागतें. पण आर्थिक ठराव मांडतांना जगजीवनराम जेव्हां बोलूं लागले, तेव्हां त्यांच्याविषयींचे माझ्या मनांतील हे सर्व प्रतिकूल पूर्वग्रह एका क्षणांत कोलमडून पडले. इतक्या गोड आणि शांत आवाजानें बोलणारा दुसरा एकहि वक्ता मला सबंध काँग्रेस अधिवेशनांत आढळला नाहीं. जो वक्ता येई तो ध्वनिक्षेपकामध्यें तोंड खुपसून तिसऱ्या सप्तकांत ओरडूं लागे. त्यामुळें आपल्या कानांचीं टाळीं आतां फुटतात कीं काय असें साऱ्या श्रोत्यांना भय वाटे. पण जगजीवनराम बोलूं लागले तेव्हां कानाला अशा कांहीं गुदगुल्या होऊं लागल्या कीं विचारूं नका. ध्वनिक्षेपकाला जगजीवनरामांचा आवाज अतिशय जुळतो. सोप्या आणि शैलीदार हिंदीमध्यें मुद्द्याला न सोडतां अतिशय रुबाबानें जगजीवनराम बोलतात. अर्थात् मूळ ठरावांतच जीव नव्हता त्याला जगजीवनराम बिचारे काय करणार? आणि त्यांतून ते पडले 'नेहरू सरकारां'तले एक मंत्रि. ठराव मांडतांना जगजीवनराम म्हणाले, "कोणत्याहि राज्याचें रक्षण

कुठेंहि धक्का न लावतां आणि त्याचबरोबर स्वतःच्या मतांना कुठेंहि मुरड न घालतां अत्यंत स्पष्टपणें आणि निर्भीडपणें टंडनजींनीं भाषण केलें ह्यांत मुळींच संशय नाहीं. एका विद्वान्, तपस्वी अन् तळमळीच्या थोर माणसानें जसें भाषण करावें तसेंच तें होतें.

आर्थिक बाबतींत टंडनबाबूंचा दृष्टिकोन आधुनिक किंवा पुरोगामी नाहीं किंवा त्यांनीं केलेलें मार्गदर्शन जनतेच्या विशेष उपयोगाचें नाहीं यांत शका नाहीं. पण त्याला त्यांचा काय इलाज आहे? ज्या वातावरणांत ते आजपर्यंत वाढले आणि ज्या संस्थेचे आज ते अध्यक्ष आहेत त्याचा विचार करतां ते ह्यापेक्षां अधिक काय बोलूं शकणार? आणि त्यांच्या आजूबाजूचीं दुसरीं माणसें तरी ह्या विषया-संबंधीं काय बोलताहेत?

तीन-साडेतीन तासांची एवढी मेहनत करून टंडनजी पुन्हा नाशिक शहरांत गेले. तेथें वीसपंचवीस हजारांची सभा त्यांच्या सत्कारासाठीं वाट पाहात होतीच. त्या सभेंतील भाषणांत मानवाच्या समतेचा त्यांनीं पुरस्कार केला. ते म्हणाले, "जन्मतः सर्वच मुलें सारखीं असतात. त्यांपैकीं हा हिंदु हा मुसल्मान असें ओळखतां येणार नाहीं. पुढें शिंपी आणि न्हावी त्यांच्या वेषभूषेंत आणि केश-भूषेंत फरक करून त्यांच्यामधले धार्मिक भेद अधिक अधिक वाढवीत नेतात." हिंदु धर्म व इतर धर्म ह्यांच्यांतला भेद समजावून सांगतांना ते म्हणाले कीं, "प्राचीन काळीं आमच्या भारतांत अन्नपाण्याचा मुळीं तुटवडाच नव्हता. म्हणून इतर धर्मांप्रमाणें, 'हे देवा, रोजची भाकरी आम्हांला नीट मिळूं दे' अशी देवाला प्रार्थना करण्याची आम्हांला मुळीं जरुरीच पडली नाहीं. 'आम्हांला बुद्धि दे, कांति दे,' अशीच देवाकडे आम्ही मागणी करीत होतों." शहरांतला हा कार्यक्रम संपवून पुन्हा 'विषयनियामक समिती'च्या रात्रीच्या बैठकीसाठीं साडेनऊ वाजतां टंडनजी आपले हजरच. 'विलक्षण कणखर म्हातारा आहे हा!' असेंच पुष्कळांनीं उद्गार काढले.

ज्या ठरावाचा उल्लेख प्रत्येक वक्ता 'ह्या काँग्रेस अधिवेशनामधला अत्यंत महत्त्वाचा ठराव' असा करीत होता आणि जो ठराव सर्वांच्या शेवटीं विषय-नियामक समितीच्या रात्रीच्या सभेत साडेदहा वाजतां घाईघाईनें आणण्यांत आला आणि ज्यावरील एकतीस उपसूचना स्वतः अध्यक्षांनीं मांडून आणि त्यांची विल्हेवाट लावून जो अर्ध्या तासाच्या चर्चेमध्येंच कसाबसा पास करून घेण्यांत

आला तो ठराव म्हणजे 'आर्थिक कार्यक्रमा' चा होय. कॉंग्रेस प्रतिनिधींना ह्या ठरावाबद्दल किती आस्था वाटत होती हें त्यांच्या ह्या बैठकीला उपस्थित असलेल्या संख्येवरून दिसून आलें. सत्तावीसशें किंवा अठ्ठावीसशें प्रतिनिधींपैकीं एकशेंआठ प्रतिनिधी हजर होते. सर्व कॉंग्रेस अधिवेशनांत माझें लक्ष फक्त ह्या ठरावाकडे होतें. देशांतील बिकट आर्थिक समस्या कॉंग्रेस कशी सोडविते, एवढेंच मला पाहावयाचें होतें.

हा ठराव चांगला लांबलचक दोन पानांचा होता. ह्या ठरावांत सर्वोदयी राज्याच्या ( Welfare State ) ध्येयाचा पुरस्कार केलेला होता. भांडवलशाहीच्या मनधरणीचें आणि सामान्य माणसांच्या अवहेलनेचें भारत सरकारचें सध्यांचें जें संदिग्ध, गुळमुळीत आणि दिरंगाईचें आर्थिक धोरण आहे त्यालाच पाठिंबा देण्यासाठीं हा ठराव कॉंग्रेस अधिवेशनांत आणण्यांत आला होता.

हा ठराव मजूरमंत्री जगजीवनराम ह्यांनीं मांडला. तीनचार दिवस मी व्यासपीठावर जगजीवनरामांना पाहात होतों. त्यांचा तो जाड ओठांचा, चपट्या नाकाचा आणि पक्क्या काळ्या रंगाचा चेहरा बघून ह्यांच्याविषयीं कोणाचाहि अनुकूल ग्रह होणें अशक्यच आहे. त्यामध्यें त्यांच्या चेहऱ्यावर एकसारखें चमत्कारिक हास्य चमकत असतें. अन् त्यांच्या अर्ध्याउघड्या ओठांमधून त्यांचे सफेत दांत सारखे दिसत असतात. तें पाहून तर हा कोणीतरी वेडसर आणि अर्धवट माणूस असावा असें आपल्याला वाटूं लागतें. पण आर्थिक ठराव मांडतांना जगजीवनराम जेव्हां बोलूं लागले, तेव्हां त्यांच्याविषयींचे माझ्या मनांतील हे सर्व प्रतिकूल पूर्वग्रह एका क्षणांत कोलमडून पडले. इतक्या गोड आणि शांत आवाजानें बोलणारा दुसरा एकहि वक्ता मला सबंध कॉंग्रेस अधिवेशनांत आढळला नाहीं. जो वक्ता येई तो ध्वनिक्षेपकामध्यें तोंड खुपसून तिसऱ्या सप्तकांत ओरडूं लागे. त्यामुळें आपल्या कानांचीं टाळीं आतां फुटतात कीं काय असें साऱ्या श्रोत्यांना भय वाटे. पण जगजीवनराम बोलूं लागले तेव्हां कानाला अशा कांहीं गुदगुल्या होऊं लागल्या कीं विचारूं नका. ध्वनिक्षेपकाला जगजीवनरामांचा आवाज अतिशय जुळतो. सोप्या आणि शैलीदार हिंदीमध्यें मुद्द्याला न सोडतां अतिशय रुबाबानें जगजीवनराम बोलतात. अर्थात् मूळ ठरावांतच जीव नव्हता त्याला जगजीवनराम बिचारे काय करणार? आणि त्यांतून ते पडले 'नेहरू सरकारां'तले एक मंत्रि. ठराव मांडतांना जगजीवनराम म्हणाले, "कोणत्याहि राज्याचें रक्षण

पोलीस किंवा लष्कर ह्यांनीं होत नाहीं. जनतेच्या मूलभूत गरजा भागवून समाधानाची भावना तिच्यांत निर्माण केल्यानें देशाला सुरक्षितता प्राप्त होते. देशाचें उत्पादन अतिशय घटलें आहे. म्हणून आहेत तीं साधनें वापरून आम्हांला राष्ट्रीय संपत्ति वाढविली पाहिजे."

ह्या ठरावाला पाठिंबा देतांना उद्योगमंत्री हरेकृष्ण मेहेताब म्हणाले, "आज देशांत भांडवलशाही अर्थव्यवस्था आहे असें म्हणणें चूक आहे. १८५७ सालच्या बंडांतून जर देशाला स्वातंत्र्य मिळालें असतें तर मात्र देशांत भांडवलशाही अर्थव्यवस्था नक्की सुरू झाली असती. कारण सत्तावन सालचें तें बंड जनतेचें नव्हतें. आजचें स्वातंत्र्य गरिबांनीं मिळविलेलें आहे. गरिबांनीं प्रस्थापित केलेल्या या स्वराज्यांत भांडवलशाही येऊंच मुळीं कशी शकेल?" हरेकृष्ण मेहेताब हे शरीरानें उंचेपुरे आणि धिप्पाड आहेत. त्यांचें व्यक्तिमत्त्व आकर्षक आहे. पण त्यांचे इंग्रजी उच्चार चमत्कारिक आहेत. त्यांना 'श' म्हणतां येत नाहीं. ते 'रेव्होल्यूसन' 'डिस्ट्रिबूसन' असा उच्चार करतात. ठराव रीतसर मांडल्यानंतर उपसूचनेचा प्रश्न आला. एकंदर एकतीस उपसूचना होत्या आणि वेळ तर अर्धापाऊण तासापेक्षां जास्त नव्हता. अध्यक्षांनीं 'उपसूचना ज्याच्या त्यांनीं परत घ्याव्यात' अशी विनंति केली. पण कोणीहि आपली उपसूचना परत घेईना. तेव्हां अध्यक्ष म्हणाले, "मग मी ह्या उपसूचना नुसत्या वाचून दाखवतों. तेवढ्यानें त्या रीतसर मांडल्या गेल्या असें समजावें.' अध्यक्षांचें हें म्हणणें पुष्कळांना मान्य होईना. सभेंत दहापंधरा मिनिटें खूपच गलगा व आरडाओरड झाली. शेवटीं, अध्यक्षांनीं आपला सूर चढविला. तेव्हां अखेर त्यांचेंच म्हणणें मान्य करावें लागलें. अध्यक्षांनीं साऱ्या उपसूचना वाचून दाखविल्यानंतर चार वक्त्यांना पांच पांच मिनिटें बोलूं देण्यांत आलें. मोहनलाल गौतम व जनरल आवारी ह्यांनीं ठरावावर सडकून टीका केली. गोविंद सहाय व कमलापति त्रिपाठी ह्यांचीं भाषणें झाल्यानंतर सीताराम जाजू ह्यांनीं चर्चाबंदीची सूचना आणली. तिला ७१ विरुद्ध ३७ मतें पडून ती पास झाली. जगजीवनराम चर्चेला उत्तर देतांना म्हणाले कीं, "वर्गविहीन समाज व सर्वोदयी राज्य ह्या दोन्ही ध्येयांत मुळींत फरक नाहीं." शेवटीं ठराव मताला टाकून तो मंजूर करण्यांत आला. जहागिरदारी अन् जमीनदारी नष्ट करणें ही एक उपसूचना जगजीवनरामांनीं मान्य केल्यामुळें व्यावहारिक कार्यक्रमांत तिचा समावेश

करण्यांत आला. तीस कोटी जनतेच्या जीवनमरणाचा प्रश्न ज्या आर्थिक परिस्थितीवर अवलंबून आहे ती सोडविण्याचा प्रयत्न काँग्रेसनें इतक्या घाईघाईनें व बेपर्वाईनें करावा हें बघून काँग्रेसच्या हातून जनतेचें कल्याण होणें अशक्य आहे ही गोष्ट मला अगदीं पुरेपूर कळून चुकली. ह्या ठरावाची चर्चा चालू असतांना पंतप्रधान नेहरू मागच्या कोचावर आरामांत बसले होते व शांतपणें सिगारेट ओढीत होते. दुसरी एक महत्त्वाची गोष्ट सांगावयाची ती ही कीं प्रतिनिधीमध्यें आणि पत्रकारांमध्यें अनेक गुप्त पोलीस गांधी टोप्या आणि जवाहिर जाकिटें घालून मोठ्या संभावितपणें बसलेले होते. माझ्या ओळखींचा एक पोलीस अधिकारी मला दिसला. त्याची अन् माझी नजरानजर होतांच बिचारा ओशाळा होऊन त्यानें आपली दृष्टि एकदम वळविली. अशा रीतीनें 'विषयनियामक समिती'चें कार्य रात्रीं बाराच्या सुमारास संपलें.

गुरुवारीं जनतेची गर्दी आणि मोटारींची संख्या आधल्या दिवसापेक्षांहि अधिक वाढली. रस्त्यानें लोकांना धक्के मारल्यावांचून चालतां येईना व मोटारवाल्यांना मिरवणुकींतल्यापेक्षां अधिक वेगानें जातां येईना. काँग्रेसच्या सकाळच्या बैठकींत नेहरू बोलतील अशी अपेक्षा होती म्हणून लोकांची विशेष खेचाखेच झाली होती. प्रवेशद्वारापासून मंडपापर्यंत जावयाचें म्हणजे एक महान् अग्निदिव्य होतें. 'वैदेशिक नीत' म्हणजे 'परराष्ट्रीय धोरणा'वरच्या ठरावानें सकाळच्या कार्यक्रमाला प्रारंभ झाला. तो कारण नसतांना बराच लांबला. त्यानंतर 'जातीयवाद, भारत आणि पाकिस्तान' हा ठराव काकासाहेब गाडगिळांनीं मांडला. विषयनियामक समितीमध्यें हा ठराव नेहरूंनीं मांडलेला होता. प्रकट काँग्रेसमध्यें ही कामगिरी काकासाहेबांना कां द्यावी ह्याचें मला जरा आश्चर्यच वाटलें. काकासाहेबांनीं आपलें भाषण अगोदर इंग्रजीमध्यें सुरू केलें. पण अध्यक्षांच्या आज्ञेवरून त्यांना मराठींत बोलावें लागलें. तेव्हां बहुसंख्य महाराष्ट्रीय श्रोत्यांनीं आनंदानें टाळ्या पिटल्या. सबंध अधिवेशनांत (शेवटचें भाऊसाहेब हिऱ्यांचें आभाराचें भाषण सोडलें तर) मराठी भाषेंत झालेलें एवढें एकच भाषण. काकासाहेबांच्या भाषणाला वारंवार टाळ्या पडत होत्या. त्यांचें भाषण एकंदरींत बरें झालें. पण उत्तम झालें असें मात्र मी म्हणणार नाहीं. त्यानंतर प्रफुल्लचंद्र घोषांनीं ठरावाला दुजोरा दिल्यानंतर टाळ्यांच्या कडकडाटांत अन् जयजयकारांच्या गर्जनेंत पंडित नेहरू बोलावयास

उभे राहिले. नेहरू पाऊण तास बोलले. पण त्यांच्या भाषणाला विशेष रंग असा कांहीं चढला नाहीं. नवीन असें त्यांना कांहीं सांगावयाचें नव्हतें. मध्यंतरीं ते आपल्या नेहमींच्या पालुपदावर आले व संतापून म्हणाले, "ह्या राष्ट्राचीं सूत्रें जर मीं चालवावीं असें तुम्हांला वाटत असेल तर तुम्हांला माझ्या धोरणानें चालावें लागेल. तुम्हांला माझें धोरण जर पसंत नसेल तर मी माझ्या जागेचा राजीनामा देऊन बाहेर पडेन अन् माझ्या अंगांत असेल नसेल तेवढें सामर्थ्य वापरून मी तुम्हांला विरोध करीत राहीन, समजून असा!" कॅांग्रेसश्रेष्ठींमध्यें आधले दोनतीन दिवस गुप्तपणें कांहींतरी कारवाया चालल्याच्या बातम्या ऐकूं येत होत्या. त्यांना उद्देशूनच नेहरूंची ही धमकी असावी अशी 'अंदरकी बात' जाणणाऱ्यांचें मत पडलें. नेहरूंचें भाषण चालू असतां व्यासपीठावर बसलेले कांहीं कॅांग्रेसपुढारी मोठमोठ्यानें गप्पा मारूं लागले. तेव्हां टंडनबाबूंनीं त्यांची चांगली खरडपट्टी काढली. पण त्यामुळें नेहरू मात्र क्षणभर गोंधळून गेले आणि त्यांच्या भाषणाचें सूत्र तुटल्यासारखें झालें. सकाळच्या बैठकींत हा ठराव संपला नाहीं. दुपारच्या बैठकींत पुन्हा त्याची चर्चा सुरू झाली.

दुपारच्या बैठकीसाठीं मी जेव्हां मंडपांत शिरूं लागलों तेव्हां बाहेरच्या बाजूला मला एक निराळाच देखावा दिसला. मंडपाभोंवतीं कांटेरी तारांचें छातीएवढें उंच असें जें कुंपण घालण्यांत आलें होतें त्या कुंपणाच्या प्रत्येक खांबाखांबाजवळ सशस्त्र लष्करी शिपई उभे करण्यांत आलेले होते. त्यांना पाहून लोक थक्कच झाले.

सकाळच्या ठरावावर एकंदर दहा वक्त्यांचीं भाषणें झालीं. गोविंदराव देशपांडे ह्यांनीं एका उपसूचनेला विरोध करतांना इंग्रजींत भाषण केलें तें चांगलें झालें. सर्व भाषणांत डॉ. चोइतराम गिडवानी ह्यांचें विरोधाचें भाषण अत्यंत परिणाम-कारक झालें. त्यांनीं श्रोत्यांच्या काळजाला अक्षरशः पीळ पाडला. ते म्हणाले, "भारत-पाक करारानें उभय पक्षांत 'समझौता' झाला हें म्हणणें चूक आहे. समझौता दोन्ही बाजूंनीं होत असतो. केवळ एका बाजूनें होत नाहीं. तुमच्या-विरुद्ध राजरोसपणें पाकिस्तानचीं कारस्थानें चालू असतांना पाकिस्तान करार पाळतें असें तुम्हांला कसें म्हणतां येईल? एकच गोष्ट सांगतों. पूर्व पाकिस्तानांत राहणारा एक हिंदू माणूस पश्चिम बंगालमध्यें अधिकारी आहे. त्याचें कुटुंब पूर्व पाकिस्तानमध्यें आहे. त्यानें पत्र लिहून त्यांची खुशाली विचारली. तेव्हां त्याच्या मुलीचें पत्र आलें कीं, आईचा निका काल लागला. माझा उद्यां लागणार

आहे!' महात्मा गांधींचा ज्या दिवशीं खून झाला त्याच दिवशीं दुपारीं तीन वाजतां त्यांना मी भेटावयास गेलों होतों. त्यावेळीं अनेकजण तेथें हजर होते. सिंधमधें हिंदूवर होणारे अत्याचार मीं महात्माजींना वर्णन करून सांगितले. तेव्हां महात्माजी म्हणाले कीं, "अशी जर सिंधमध्यें परिस्थिति असेल तर पाकिस्तानशीं युद्ध करण्यांत कांहींही चूक होणार नाहीं!"

भाषणाच्या शेवटीं शेवटीं डॉ. चोइतराम ह्यांचा आवाज एवढा चढला आणि त्यांच्या भावना इतक्या प्रक्षुब्ध झाल्या कीं हजारों श्रोत्यांच्या अंगांवर कांटा उभा राहिला. आणि सगळ्यांत आश्चर्याची गोष्ट ही कीं, गेले तीन दिवस नाहींसा झालेला पाऊस त्याच क्षणाला धो धो आवाज करीत एकदम मंडपावर कोसळला. इतकी नाट्यमय घटना सबंध अधिवेशनांत दुसरी घडली नसेल. पाकिस्तानी अत्याचारांचें वर्णन स्वर्गांतील देवांना असह्य होऊन ते ढळढळा रडूं लागले असावेत अशी कल्पना अनेकांच्या मनांत त्या क्षणीं आली. पाऊस एकसारखा वाढतच गेला आणि त्याचा आवाज मंडपाच्या पत्र्यांवर प्रतिध्वनित होऊन साऱ्या सभागृहांतलें वातावरण एकदम बिघडून गेलें. आंतमध्यें लावलेल्या कापडी छता-मधून शेकडों पाण्याच्या धारा ठिकठिकाणीं गळूं लागल्या आणि त्या चुकविण्यासाठीं श्रोते आपापल्या खुर्च्या सोडून अधिक सुरक्षित भागांत पळूं लागले. स्वयंसेवक बादल्या घेऊन धावत सुटले. त्यामुळें साऱ्या मंडपांत एकच गोंधळ व दंगल उडून गेली. पाऊस गेला पाऊस गेला म्हणून खुषींत आणि समाधानांत असणारे लोक अगदीं शेवटच्या दिवशीं पावसानें अचानकपणें येऊन अधिवेशनाला असा तडाका दिला हें बघून अगदीं गांगरून गेले. एकंदरींत पाऊस आल्यापासून दुपारच्या सर्व बैठकीचा अगदीं बेरंग होऊन गेला. मध्यें थोडा वेळ पाऊस बंद पडल्यासारखा वाटे. पण पुन्हा जोराची अशी सर येई कीं कांहीं विचारूं नका. शेवटीं अध्यक्षांच्या उच्चासनावर पाण्याची धार गळूं लागली तेव्हां हातांत उंच बादली धरून एका स्वयंसेवकाला तेथें उभें राहावें लागलें. त्यावेळीं सभागृहांत हास्याची एक मंद लकेर उसळून गेली.

पावसाच्या आवाजामध्यें आपला आवाज ऐकूं जावा म्हणून प्रत्येक वक्ता अधिक जोरजोरानें किंचाळूं लागला. त्यामुळें श्रोत्यांना आपलें डोकें अगदीं फुटतें कीं काय असें वाटूं लागलें. सुभद्रा जोशी नांवाच्या एका बाईनें तर किंचाळ्या मारण्याचा अगदीं उच्चांक मोडला. जातीयवादाचा ठराव पास झाल्यानंतर

'भारतांतल्या परराष्ट्रीय वसाहतीं' चा ठराव आला. ह्या ठरावावर 'गोवा नॅशनल काँग्रेस' च्या अध्यक्षांना टंडनबाबूंनीं बोलावयास पाचारण केलें. पंडित नेहरूहि ह्या ठरावावर बोलावयास उठले. हिंदींत व इंग्रजींत दहापंधरा मिनिटें भाषण करून ते निघून गेले. नेहरूंच्या अशा अधूनमधून जाण्यानें सभागृहांतील कामकाजांत फार व्यत्यय उत्पन्न होत असे, हें ह्या ठिकाणीं मला मुद्दाम सांगितलें पाहिजे. कारण सभागृहाच्या मागल्या बाजूस बसलेले शेकडों 'बघे' लोक आपापल्या खुर्च्या सोडून नेहरूंना बघण्यासाठीं बाहेर पळत सुटत. अन् नेहरूंच्या नांवाच्या जयजयकारांचा गलगा बाहेर सुरू होई. त्यांमुळें आंतील वक्त्यांचें भाषण श्रोत्यांना ऐकूं येत नसे.

नेहरू गेले. पाऊस जोरानें पडूं लागला. मंडपाच्या बाहेर चिखलाची अगदीं 'रबडी' झाली. निरनिराळ्या ठरावांवरचीं भाषणें रुक्ष आणि कंटाळवाणीं होऊं लागलीं. सभागृहांतून श्रोते हळूहळू बाहेर पाय काढूं लागले. सहा वाजले, सात वाजले, आठ वाजले. बाहेर अंधार पडूं लागला. आतां सगळे ठराव संपणार केव्हां अन् काँग्रेसचें अधिवेशन समाप्त होणार केव्हां, ह्याची ज्याला त्याला काळजी पडली. जवळ जवळ सहासात तास एका जागेवर बसून माझ्या अंगांतला कण न् कण ठणकूं लागला होता व आणखीन् दोनतीन तास तरी अधिवेशन संपत नाहीं ह्या जाणिवेनें प्राण अगदीं गुदमरताहेत असें वाटत होतें. चहा पिण्यासाठीं अन् कांहींतरी खाऊन येणासाठीं कांहीं पत्रकार बाहेर पडले आणि थोड्या वेळानें हात हलवीतच परत आले. 'बाहेरच्या हॉटेलांतला सर्व माल संपून गेला आहे, कोठें कांहीं मिळत नाहीं!' असें ते आम्हांस सांगूं लागले. त्यांचीं पादत्राणें, विजारी नि धोतरें चिखलानें बरबटून गेलेलीं बघून आपण त्यांच्याबरोबर बाहेर पडलों नाहीं हें फार उत्तम केलें ह्या विचारानें मला स्वतःला समाधान वाटलें. ठरावावरचीं भाषणें रें रें करीत आपलीं चाललींच होतीं. अन् मंडप हळूहळू इकडे मोकळा पडत होताच. ठरावावरची चर्चा कमी कंटाळवाणी होत होती म्हणूनच कीं काय प्रत्येक ठरावावरच्या सर्व उपसूचना वाचून दाखवून त्यावर मतदान घेण्याचें तांत्रिक कार्य अगदीं विधिपूर्वक करून टंडनबाबू सभागृहाच्या रुक्षपणांत आणखी भर घालीत होते. मध्येंच एकदां 'खाजगी कामा'साठीं टंडनबाबू ह्यांना बाहेर जाण्याची 'निकड' भासली. तेव्हां आपल्या खुर्चीवर स्वागताध्यक्ष भाऊसाहेब हिरे ह्यांना बसवून ते बाहेर गेले.

काँग्रेस अध्यक्षाच्या खुर्चीवर पांचदहा मिनिटें हिरे बसले असतील. पण

तेवढ्या वेळांत त्यांचा पैलूदार चेहरा असा कांहीं चमकत होता कीं कांहीं विचारूं नका. कोणी तरी फोटोग्राफर 'फ्लॅश लाइट'नें आपला फोटो घेईल या अपेक्षेनें त्यांनीं आजूबाजूला दोनतीन वेळ पाहिलें. पण फोटोग्राफर कसले नतद्रष्ट! बहुतेक फोटोग्राफर मंडपांत मुळीं उरलेच नव्हते. जे थोडेसे उरले होते, त्यांच्या डोक्यांत कांहीं ती कल्पना आलीच नाहीं.

निर्वासितांचा ठराव रंगेल अशी अपेक्षा होती. पण तो मुळींच रंगला नाहीं. उलट तो अपेक्षेपेक्षां लौकरच संपला. साडेनवाच्या सुमारास सर्वांत महत्त्वाचा म्हणजे 'आर्थिक कार्यक्रमा'चा ठराव आला. त्यावेळीं मंडपाचा देखावा खरोखरच पाहण्यासारखा होता. व्यासपीठावर शेंदीडशें माणसें आळोखेपिळोखे देत लोळत पडलीं होतीं. पत्रकारांच्या विभागांत पन्नासएक माणसें असतील. आमच्या मागच्या खुर्च्यांवरून पांचपंचवीस गडी माणसें मांड्या घालून ऐटीनें बसलीं होतीं. कॉंग्रेस प्रतिनिधी अजमासें तीनशें होते. भगिनी विभागांत तर बरोबर अकरा भगिनी आणि चार पोरें बसलेलीं मीं उभा राहून मोजलींच. दहा रुपयांच्या मागल्या घडवंच्या सगळ्या ओस पडल्या होत्या. जास्तींत जास्त तिथें पन्नास माणसें असतील. आणि 'व्हिजिटर्स' च्या विभागांत दोनशें माणसें असतील. म्हणजे दुपारीं पंचवीसतीस हजारांनीं गजबजून गेलेल्या त्या मांडवांत सर्व मिळून अवघीं सातआठशें माणसें हजर होतीं. ह्यावरून सभागृहाचा तो देखावा कसा दिसत असला पाहिजे ह्याची माझ्या वाचकांना कल्पना येईल. कसेंतरी करून कॉंग्रेसचें अधिवेशन एकदांचें संपवावयाचें ह्याच भावनेनें एवढीं माणसें तरी जमलेलीं होतीं. पण प्रत्येकजण मनामधून तरी अगदीं मेटाकुटीला आलेला होता. आर्थिक ठराव जगजीवनरामांनीं मांडला. त्यानंतर उपसूचकांचीं भाषणें होऊं लागलीं. मुंबई सरकारचे पार्लमेंटरी सेक्रेटरी यशवंतराव चव्हाण हे एक उपसूचक होते. पण अध्यक्षांनीं त्यांचें नांव जेव्हां पुकारलें तेव्हां यशवंतरावांचा पत्ताच नव्हता. यावरून देशांतील आर्थिक परिस्थिति सुधारावी याबद्दल यशवंतरावांना किती तळमळ वाटते हें मराठी श्रोत्यांना कळून आलें.

बन्सीलाल जोहारिया ह्यांनीं ठरावाला विरोध केला आणि नियंत्रणें काढून टाकलीं पाहिजेत अशी जोरानें घोषणा केली. त्याबरोबर कॉंग्रेसप्रतिनिधींपैकीं पुष्कळांनीं टाळ्यांचा गजर केला. त्यानंतर बहुतेक उपसूचक जे आले त्यांनीं नियंत्रणावर हल्ला चढवला. अन् कॉंग्रेसप्रतिनिधी टाळ्या वाजवून त्यांच्या नियंत्रण-

विरोधी विधानांचें स्वागत करूं लागले. सभेच्या वातावरणांत हळूहळू कांहीं-तरी चमत्कारिकपणें बदल होत चालला आहे अशी मला जाणीव होऊं लागली, आणि मी विशेष बारकाईनें परिस्थितीचें अवलोकन करूं लागलों.

शेवटीं कमलापति त्रिपाठी आले आणि ते नियंत्रणांचें समर्थन करतांना म्हणाले, "जे नियंत्रणें नको आहेत असें म्हणतात, ते भांडवलवाले आणि काळाबाजारवाले ह्यांचे हस्तक आहेत!" त्याबरोबर 'शेम! शेम!' असा बहुसंख्य कॉंग्रेसप्रतिनिधींनीं आरडा केला. अध्यक्ष आपल्या उच्चासनावरून शांतता प्रस्थापित करण्यासाठीं प्रतिनिधींवर खेकसूं लागले. पण त्याचा कांहीं परिणाम होईना. सभागृहांत सातआठशें माणसें होतीं तरी मोकळ्या आभाळांत पावसाचे ढग एकाएकीं जमा व्हावेत त्याप्रमाणें त्या ओक्या वातावरणांत चहूबाजूंनीं प्रक्षोभाचीं चिन्हें एकाएकीं जमूं लागलीं. मोहनलाल गौतम ह्यांनीं चर्चाबंदीची सूचना आणली. ती मान्य होतांच प्रत्येक उपसूचनेवर मतें घेण्याचें काम अध्यक्षांनीं सुरू केलें. चारदोन उपसूचना नापास झाल्या व मग नियंत्रणें काढून टाकण्याची अचलसिंग ह्यांची उपसूचना पुढें आली. त्या उपसूचनेला बहुसंख्य कॉंग्रेस प्रतिनिधींनीं हात वर करून पाठिंबा देतांच एखादा बॉंबगोळा सभेवर पडावा तशी स्थिति झाली. सरकारी पक्ष गडबडून गेला. जगजीवनरामांच्या तोंडचें पाणी पळालें. व्यासपीठा-वरील सर्व मंडळी उठून एकदम व्यासपीठाच्या कांठावर येऊन उभी राहिली. उपसूचनेच्या विरुद्ध कोण आहे असें अध्यक्षांनीं विचारतांच बरेचसे हात वर झालेले दिसले. पण सकृद्दर्शनीं तरी उपसूचनेला पाठिंबा देणारे म्हणजे नियंत्रणें काढून टाकावींत अशाच मताचे बहुसंख्य कॉंग्रेस प्रतिनिधी असावेत, अशी माझी तरी समजूत झाली. कोणत्या बाजूला किती मतें आहेत हें काकासाहेब गाडगीळ आणि काला व्यंकटराव सभागृहांत खालीं उतरून मोजूं लागले. उपसूचनेचा काय निर्णय लागतो आहे ह्याबद्दल सर्वांना कमालीची उत्सुकता वाटूं लागली. बाकीचे बहुतेक सर्व पत्रकार निघून गेले असतां आपण चिकाटीनें इतका वेळ मंडपांत ठाण मांडून बसलों त्याचें शेवटीं सार्थक झालें, आतां कांहींतरी खळबळकारी बातमी आपल्या हातीं निश्चित लागणार अशा विचारानें मागें उरलेल्या मूठभर पत्रकारांचे चेहरे चमकूं लागले व ते टेबलावर तरातरा चढून उभे राहिले. अध्यक्षांनीं मतमोजणीचा निर्णय जाहीर केला व उपसूचनेला अनुकूल १२८ व विरुद्ध १७२ मतें पडल्याचें सांगितलें. त्याबरोबर सरकारी पक्षांतल्या कॉंग्रेसवाल्यांनीं

टाळ्यांचा गजर करून आपला विजय झाल्याचें जाहीर केलें व उपसूचनेला पाठिंबा देणाऱ्यांनीं आरोळ्या ठोकून 'पोल'ची मागणी केली.

त्याबरोबर पुन्हा सरकारी गोटांत खळबळ माजली. नेहरूंना 'जसे असाल तसे येण्यासाठीं' टेलिफोन करण्यांत आला. आणि प्रतिनिधिनिवासांतून प्रतिनिधी पकडून आणण्यासाठीं मोटारी पिटाळण्यांत आल्या. सभागृहाची विभागणी करण्यांत येऊन डाव्या बाजूला उपसूचनेच्या पुरस्कर्त्यांनीं व उजव्या बाजूला विरोधकांनीं जावें असें सांगण्यांत आलें. त्याबरोबर उपसूचनेच्या पुरस्कर्त्यांमध्यें फोडाफोडी करण्याच्या हालचाली विरोधकांनीं सुरू केल्या. कांहीं प्रतिनिधींना तर कमरेला मिठ्या मारून आणि कांहींना त्यांचे हात धरून विरोधकांनीं आपल्या बाजूला ओढून नेलें. म्युनिसिपल निवडणुकींत मतदारांची जशी पळवापळवी होते, जवळ जवळ तसा देखावा मला त्या ठिकाणीं त्या वेळीं दिसून आला. आणि ह्या पळवापळवींत भारत सरकारच्या मोठमोठ्या मंत्र्यांनीं भाग घ्यावा हें पाहून तर मला विशेषच अचंबा वाटला. नेहरू जेव्हां घाईघाईनें सभास्थानीं प्रकट झाले तेव्हां सरकारी पक्षाला भलताच जोर चढला आणि त्यांनीं टाळ्यांचा कडकडाट केला. आपापलीं तिकिटें हातांत धरून उभें राहण्याला अध्यक्षांनीं प्रतिनिधींना सांगितलें. नेहरूंना कांहीं त्यांचें तिकीट लवकर सांपडेना. त्यामुळें क्षणभर ते गांगरून गेले आणि खूपच मौज उडाली. एका म्हाताऱ्या आजारी बाईला तर सरकारी गोटांतल्या दोन माणसांनीं उचलून सभागृहांत आणून ठेवलें. फेरमत-मोजणीचा निर्णय उपसूचनेच्या बाजूनें ११७ मतें व विरुद्ध १९० मतें असा लागला व सरकारी पक्षाची अब्रू शेवटीं कशीबशी शाबूत राहिली. 'नियंत्रणें काढावींत अशा मताची संख्या कांहीं लहान नाहीं हेंहि माझ्या लक्षांत आलें' असें जेव्हां अध्यक्ष म्हणाले, तेव्हां पराभूत प्रतिनिधींनीं टाळ्या वाजवून आपलें समाधान व्यक्त केलें. अशा रीतीनें काँग्रेसच्या दोन दिवसांच्या अधिवेशनांत एकदांचें निर्माण झालेलें हें नाट्यपूर्ण वादळ बराचसा धुमाकूळ माजवून पण विशेष कांहींहि अपाय न करतां वरच्यावर वितळून गेलें. त्यानंतर खादीचा शेवटचा ठराव अध्यक्षांनींच मांडून पास करून घेतला.

काँग्रेस अधिवेशनाच्या नाटकाचा शेवटचा अंक ह्यानंतर सुरू झाला. काँग्रेसचे चिटणीस काला व्यंकटराव हे स्वागतमंडळाचे आभार मानावयास उभे राहिले. त्यांनीं इंग्रजींत भाषण केलें. कालास्वामींना ध्वनिक्षेपकावर मुळींच बोलतां येत

विरोधी विधानांचें स्वागत करूं लागले. सभेच्या वातावरणांत हळूहळू कांहीं-तरी चमत्कारिकपणें बदल होत चालला आहे अशी मला जाणीव होऊं लागली, आणि मी विशेष बारकाईनें परिस्थितीचें अवलोकन करूं लागलों.

शेवटीं कमलापति त्रिपाठी आले आणि ते नियंत्रणांचें समर्थन करतांना म्हणाले, "जे नियंत्रणें नको आहेत असें म्हणतात, ते भांडवलवाले आणि काळाबाजारवाले ह्यांचे हस्तक आहेत!" त्याबरोबर 'शेम! शेम!' असा बहुसंख्य कॉंग्रेसप्रतिनिधींनीं आरडा केला. अध्यक्ष आपल्या उच्चासनावरून शांतता प्रस्थापित करण्यासाठीं प्रतिनिधींवर खेकसूं लागले. पण त्याचा कांहीं परिणाम होईना. सभागृहांत सातआठशें माणसें होतीं तरी मोकळ्या आभाळांत पावसाचे ढग एकाएकीं जमा व्हावेत त्याप्रमाणें त्या ओक्या वातावरणांत चहूबाजूंनीं प्रक्षोभाचीं चिन्हें एकाएकीं जमूं लागलीं. मोहनलाल गौतम ह्यांनीं चर्चाबंदीची सूचना आणली. ती मान्य होतांच प्रत्येक उपसूचनेवर मतें घेण्याचें काम अध्यक्षांनीं सुरू केलें. चारदोन उपसूचना नापास झाल्या व मग नियंत्रणें काढून टाकण्याची अचलसिंग ह्यांची उपसूचना पुढें आली. त्या उपसूचनेला बहुसंख्य कॉंग्रेस प्रतिनिधींनीं हात वर करून पाठिंबा देतांच एखादा बॉंबगोळा सभेवर पडावा तशी स्थिति झाली. सरकारी पक्ष गडबडून गेला. जगजीवनरामांच्या तोंडचें पाणी पळालें. व्यासपीठा-वरील सर्व मंडळी उठून एकदम व्यासपीठाच्या कांठावर येऊन उभी राहिली. उपसूचनेच्या विरुद्ध कोण आहे असें अध्यक्षांनीं विचारतांच बरेचसे हात वर झालेले दिसले. पण सकृद्दर्शनीं तरी उपसूचनेला पाठिंबा देणारे म्हणजे नियंत्रणें काढून टाकावींत अशाच मताचे बहुसंख्य कॉंग्रेस प्रतिनिधी असावेत, अशी माझी तरी समजूत झाली. कोणत्या बाजूला किती मतें आहेत हें काकासाहेब गाडगीळ आणि काला व्यंकटराव सभागृहांत खालीं उतरून मोजूं लागले. उपसूचनेचा काय निर्णय लागतो आहे ह्याबद्दल सर्वांना कमालीची उत्सुकता वाटूं लागली. बाकीचे बहुतेक सर्व पत्रकार निघून गेले असतां आपण चिकाटीनें इतका वेळ मंडपांत ठाण मांडून बसलों त्याचें शेवटीं सार्थक झालें, आतां कांहींतरी खळबळकारी बातमी आपल्या हातीं निश्चित लागणार अशा विचारानें मागें उरलेल्या मूठभर पत्रकारांचे चेहरे चमकूं लागले व ते टेबलावर तरातरा चढून उभे राहिले. अध्यक्षांनीं मतमोजणीचा निर्णय जाहीर केला व उपसूचनेला अनुकूल १२८ व विरुद्ध १७२ मतें पडल्याचें सांगितलें. त्याबरोबर सरकारी पक्षांतल्या कॉंग्रेसवाल्यांनीं

टाळ्यांचा गजर करून आपला विजय झाल्याचें जाहीर केलें व उपसूचनेला पाठिंबा देणाऱ्यांनीं आरोळ्या ठोकून 'पोल'ची मागणी केली.

त्याबरोबर पुन्हा सरकारी गोटांत खळबळ माजली. नेहरूंना 'जसे असाल तसे येण्यासाठीं' टेलिफोन करण्यांत आला. आणि प्रतिनिधिनिवासांतून प्रतिनिधी पकडून आणण्यासाठीं मोटारी पिटाळण्यांत आल्या. सभागृहाची विभागणी करण्यांत येऊन डाव्या बाजूला उपसूचनेच्या पुरस्कर्त्यांनीं व उजव्या बाजूला विरोधकांनीं जावें असें सांगण्यांत आलें. त्याबरोबर उपसूचनेच्या पुरस्कर्त्यांमध्यें फोडाफोडी करण्याच्या हालचाली विरोधकांनीं सुरू केल्या. कांहीं प्रतिनिधींना तर कमरेला मिठ्या मारून आणि कांहींना त्याचे हात धरून विरोधकांनीं आपल्या बाजूला ओढून नेलें. म्युनिसिपल निवडणुकींत मतदारांची जशी पळवापळवी होते, जवळ जवळ तसा देखावा मला त्या ठिकाणीं त्या वेळीं दिसून आला. आणि ह्या पळवापळवींत भारत सरकारच्या मोठमोठ्या मंत्र्यांनीं भाग घ्यावा हें पाहून तर मला विशेषच अचंबा वाटला. नेहरू जेव्हां घाईघाईनें सभास्थानीं प्रकट झाले तेव्हां सरकारी पक्षाला भलताच जोर चढला आणि त्यांनीं टाळ्यांचा कडकडाट केला. आपापलीं तिकिटें हातांत धरून उभें राहण्याला अध्यक्षांनीं प्रतिनिधींना सांगितलें. नेहरूंना कांहीं त्यांचें तिकीट लवकर सांपडेना. त्यामुळें क्षणभर ते गांगरून गेले आणि खूपच मौज उडाली. एका म्हाताऱ्या आजारी बाईला तर सरकारी गोटांतल्या दोन माणसांनीं उचलून सभागृहांत आणून ठेवलें. फेरमत-मोजणीचा निर्णय उपसूचनेच्या बाजूनें ११७ मतें व विरुद्ध १९० मतें असा लागला व सरकारी पक्षाची अब्रू शेवटीं कशीबशी शाबूत राहिली. 'नियंत्रणें काढावींत अशा मताची संख्या कांहीं लहान नाहीं हेंहि माझ्या लक्षांत आलें' असें जेव्हां अध्यक्ष म्हणाले, तेव्हां पराभूत प्रतिनिधींनीं टाळ्या वाजवून आपलें समाधान व्यक्त केलें. अशा रीतीनें कॉंग्रेसच्या दोन दिवसांच्या अधिवेशनांत एकदांचें निर्माण झालेलें हें नाट्यपूर्ण वादळ बराचसा धुमाकूळ माजवून पण विशेष कांहींहि अपाय न करतां वरचेवर वितळून गेलें. त्यानंतर खादीचा शेवटचा ठराव अध्यक्षांनींच मांडून पास करून घेतला.

कॉंग्रेस अधिवेशनाच्या नाटकाचा शेवटचा अंक ह्यानंतर सुरू झाला. कॉंग्रेसचे चिटणीस काला व्यंकटराव हे स्वागतमंडळाचे आभार मानावयास उभे राहिले. त्यांनीं इंग्रजींत भाषण केलें. कालास्वामींना ध्वनिक्षेपकावर मुळींच बोलतां येत

नाहीं. ते त्यामध्यें आपलें तोंड खुपसतात. त्यामुळें त्यांच्या आवाजाची रुंदी एवढी वाढली कीं, त्यांच्या भाषणाचा आशय कळणें कठीण जाई. मी एका दक्षिण भारतीय पत्रकाराला म्हणालों, "Why is he kissing the mike?" तेव्हां तो म्हणाला, "He is embracing it too!" कालास्वामींनीं सर्वांचे आभार मानले. भाऊसाहेब हिरे यांचे आभार मानतांना ते म्हणाले, 'हिरे या अधिवेशनांत परमेश्वराप्रमाणें सर्वत्र भरून राहिले होते. जेथें पाहावें तेथें ते आपले असत!"

त्यानंतर अध्यक्ष व प्रतिनिधी ह्यांचे आभार मानावयास स्वागताध्यक्ष हिरे उभे राहिले. त्यांनीं मराठींत भाषण केलें. तें कोणाला कळणार? आभाराचें भाषण हिंदीमध्यें त्यांनीं तयार केलें असतें आणि तें त्यांनीं तेथें वाचून दाखविलें असतें तर कांहीं बिघडलें असतें? बरें, इंग्रजींत बोलायला त्यांना काय अडचण होती? ते एल्एल्. बी. च्या परीक्षेंत पहिल्या वर्गांत पहिले आले आहेत ना? शेवटचें भाषण मराठीमध्यें करून हिरे ह्यांनीं फार घाण केली. परप्रांतांच्या प्रतिनिधींचा महाराष्ट्रीय माणसाबद्दल काय ग्रह झाला असेल बरें? तथापि ह्या भाषणांत एक सत्य मात्र ते बोलून गेले. ते म्हणाले, "माझा उर्मट स्वभाव सगळ्यांनीं सहन केला ह्याबद्दल मी सर्वांचा आभारी आहें." हिरे ह्यांच्याशीं ज्यांचा परिचय असेल त्यांचें मत त्यांच्या स्वभावाबद्दल काय असेल तें कांहीं मी सांगू शकत नाहीं. पण माझ्यासारख्या तिऱ्हाइताला सहासात दिवसांत ह्या 'हिऱ्याचे जे पैलू' पाहावयाला मिळाले त्यावरून कांहीं माझें त्यांच्याबद्दल चांगलें मत झालें नाहीं. हा एक उर्मट, ओबडधोबड नि गांवरान माणूस आहे असेंच माझें त्यांच्याबद्दल मत झालें. संस्कृतीची (polish) एवढीशी देखील चकाकी मला त्यांच्या वागण्यांत कुठें दिसली नाहीं. परिस्थितिपरत्वें फारच लहान आणि सामान्य माणूस एका महत्त्वाच्या जागेवर जाऊन बसला आहे ह्या जाणिवेनें मला विशेषच विषाद वाटला.

टाळ्यांच्या गजरांत अध्यक्ष व पंडित जवाहरलाल ह्यांना हार घालण्यांत आले आणि त्यानंतर आपलें समारोपाचें भाषण करावयास अध्यक्ष उभे राहिले. सर्व अधिवेशनांत जर अत्यंत कोमल, हृदयस्पर्शी आणि संस्मरणीय असें कोणाचें भाषण झालें असेल तर तें अध्यक्षांचें हें समारोपाचें भाषण. अध्यक्ष 'वज्राप्रमाणें कठोर' असले, तरी 'कुसुमाप्रमाणें मृदु' हि होऊं शकतात हें ह्यावेळीं माझ्या प्रत्ययाला आलें. भावनाकंपित स्वरांत 'संयोगिओं, मैं सबको हृदयसे बधाई देता

हूं' अशी त्यांनीं आपल्या भाषणास सुरुवात केली. ते म्हणाले, "नियंत्रणाच्या बाबतींत जनतेच्या भावनेचा अंदाज मला ह्या ठिकाणीं आला. नियंत्रणें काढूं नयेत असें बहुसंख्य प्रतिनिधींना वाटतें. पण नियंत्रणें काढून टाकावींत असें वाटणाऱ्यांची संख्या देखील कांहीं लहान नाहीं. मध्यवर्ति सरकार ह्या ठिकाणीं प्रकट झालेल्या निरनिराळ्या मतप्रणालीचा आदर करील अशी मी आशा करतों. काँग्रेसची शक्ति कमी होत चालली आहे असें देशांत पुष्कळांना वाटतें. तथापि, ह्या अधिवेशनांत त्याच्या उलट प्रत्यय आला. अद्यापिहि काँग्रेस ही देशांतली अधिक बलशाली संस्था आहे हें सर्वांना दिसून आलें. काँग्रेसमध्यें फूट पडेल अशा आशेनें जे कोणी ह्या ठिकाणीं आले असतील, त्यांची मात्र निराशा झाली असेल. मला काँग्रेसजनांना एकच विनंति करावयाची आहे. आपल्या हातून कोणतेंहि अनुचित काम न होईल असा त्यांनीं जर दृढ निश्चय केला तर काँग्रेसचा कधींहि अधःपात होणार नाहीं. लोभाला आणि मोहाला आपण बंधन घातलें पाहिजे. भारताचे पंतप्रधान होणें देखील आपल्याला शक्य झालें आहे. पण त्या स्थानावर दृष्टि ठेवून आपल्याला जनतेची सेवा करतां यावयाची नाहीं.

"ह्याबद्दल मी आपल्याला एक गोष्ट सांगतों. एक राजा होता. तो एकदां एका जंगलांत शिकारीला गेला. तेथें एक गुराखी गुरें पाळीत असलेला त्याला दिसला. त्याच्या अंगावरील कपडे फाटके होते. आणि त्याच्या हातांत एक बांसरी होती. गुरें शांतपणें चरत होतीं. आणि गुराखी एका दगडावर बसून बांसरी वाजवीत होता. त्या बांसरीचे गोड सूर ऐकून राजा अगदीं तल्लीन होऊन गेला. आपण शिकार करावयाला ह्या जंगलांत आलों आहोंत हें तो विसरून गेला आणि त्या गुराख्याची बांसरी ऐकत त्या ठिकाणीं किती वेळ तरी उभा राहिला. शेवटीं राजा त्या गुराख्याजवळ गेला व त्याच्या पाठीवरून ममतेनें हात फिरवीत म्हणाला, 'बाळ, तूं इतका गुणी व हुशार आहेस. मग ह्या जंगलांत कां आपलें आयुष्य वायां घालवीत बसला आहेस? चल, माझ्याबरोबर चल. मी तुला माझ्या दरबारांत मोठी नोकरी देतों.' आपल्या गुरांचा कळप दुसऱ्याच्या स्वाधीन करून राजाच्या म्हणण्याप्रमाणें गुराखी त्याच्याबरोबर गेला. राजानें त्याला नवीन कपडे दिले, नोकरी दिली आणि मोठा वाडा बांधून दिला. पुढें आपल्या गुणांनीं चढत चढत तो गुराखी त्या राजाचा मुख्य प्रधान झाला. कांहीं दिवसांनीं

राजाच्या कानांवर प्रधानजीबद्दल नाना तऱ्हेच्या तक्रारी येऊं लागल्या. कोणी त्याला सांगे कीं, 'प्रधानजींनीं अगणित संपत्ति जमा करून आपल्या वाड्याच्या एका गुप्त खोलीमध्यें ठेवली आहे. तेथें जाऊन तो ती तासन् तास मोजीत बसतो.' तर कोणी सांगे कीं, 'तसें नाहीं. आपल्या गुप्त खोलीमध्यें बसून हें राज्य कसें जिंकून घ्यावें ह्याचा प्रधानजी कोणाबरोबर तरी कट करीत बसलेले असतात.' शेवटीं ह्या तक्रारी जेव्हां फारच वाढूं लागल्या तेव्हां राजानें प्रधानजीला एक दिवस समक्ष बोलावून घेतलें आणि त्यासंबंधीं खरा प्रकार काय आहे हें त्याला विचारलें. प्रधानजी मान खालीं घालून म्हणाले, 'मी दिवसाचा कांहीं वेळ माझ्या वाड्यांतल्या खोलींत जाऊन बसतों ही गोष्ट अगदीं खरी आहे.' राजा म्हणाला, 'मला ती खोली पाहावयाची आहे.' प्रधान म्हणाला, 'ठीक आहे. चला.' प्रधान राजाला आपल्या वाड्यांत घेऊन गेला. वाड्याच्या भुयारांत ती खोली होती. खोलीच्या दाराला चांगलीं जाडजाड कुलुपें लावलीं होतीं. क्षणभर राजाला मनांत वाटलें कीं खरेंच, लोक म्हणतात त्याप्रमाणें ह्या खोलींत कांहीं तरी भानगड असावी. त्याची जिज्ञासा जागृत झाली. प्रधानानें खोलीचें कुलूप काढून दार उघडलें. राजा मोठ्या आतुरतेनें आंत शिरला आणि सभोंवार पाहूं लागला. पण आंतमध्यें कांहींहि नव्हतें. सारी खोली मोकळी होती. फक्त मध्य-भागीं एका चटईवर फाटके कपडे आणि बांसरी पडलेली होती. तें पाहून राजा आश्चर्यचकित झाला. त्यानें विचारलें, 'हें काय आहे?' प्रधान म्हणाला, 'मी गुराखी असतांना अंगावर जे कपडे घालीत होतों ते हे फाटके कपडे आणि जी वाजवीत होतों ती ही बांसरी. आपण आपल्या राज्यांत मुख्य प्रधानाच्या हुद्द्यावर माझी नेमणूक केलीत. पण मी मूळचा गुराखी होतों. ती माझी खरी वृत्ति होती. ह्या माझ्या वृत्तीचा मला विसर पडूं नये म्हणून दिवसांतून एक तास तरी मी या खोलींत येतों, खोलीचें दार आंतून बंद करून घेतों आणि हे फाटके कपडे अंगावर घालून मी ही माझी बांसरी वाजवीत बसतों.' तें ऐकून राजा ओशाळा झाला व त्यानें प्रधानाची क्षमा मागितली. तेव्हां प्रधान म्हणाला, 'झालें तें ठीकच झालें. आतां मला कांहीं इथें नोकरीवर राहावयाचें नाहीं. हा माझ्या प्रधानकीचा राजिनामा.' असें म्हणून प्रधानानें आपले मूळचे फाटके कपडे अंगावर घातले आणि तो बांसरी वाजवीत वाजवीत जंगलांत निघून गेला.

"बंधूंनो, ह्या गोष्टींतल्या प्रधानाच्या चरित्रापासून तुम्हांला फार मोठा बोध

घेतां येण्यासारखा आहे. जनतेची सेवा करण्यासाठीं वस्तुतः आपण काँग्रेसमध्यें आलों आहोंत. जनसेवा हीच आपली खरी वृत्ति. फाटके कपडे आणि बांसरी हें आपलें खरें भांडवल. स्वतंत्र भारतांत आपण मुख्य प्रधान झालों किंवा मंत्री झालों तरी त्या जागेवर सदोदित रममाण होऊन आपल्याला बसतां येत नाहीं. अंगावर फाटके कपडे घालून आणि हातांत बांसरी घेऊन आपल्याला पुन्हां जनतेंतच गेलें पाहिजे ! यापेक्षां मला अधिक कांहीं आपल्याला सांगावयाचें नाहीं. काँग्रेसजनहो, आपली तेजस्विता मलिन होईल असें कांहीं करूं नका.''

टाळ्यांच्या कडकडाटांत अध्यक्ष टंडनबाबू खालीं बसले. शेवटीं शेवटीं त्यांचा कंठ सद्गदित झालेला होता आणि त्यांच्या वृद्ध नेत्रांत अश्रु चमकत होते. टंडनबाबूंच्या व्यक्तिमत्त्वाचें फारच ओजस्वी आणि हृदयंगम दर्शन त्यांच्या समारोपाच्या भाषणाच्या वेळीं झालें आणि श्रोत्यांना कांहीं काळ एका उदात्त भावनेच्या वातावरणांत असल्यासारखें वाटलें. जे लोक त्या मंडपांत अध्यक्षांचें हें शेवटचें भाषण ऐकावयाला नव्हते ते खरोखरच अभागी म्हटले पाहिजेत. शेवटीं, 'जनमनगण' हें राष्ट्रगीत होऊन सव्वा अकराचे सुमारास काँग्रेसचें छप्पन्नावें अधिवेशन समाप्त झालें. एकसारखे सव्वानऊ तास एका खुर्चीवर बसून अवघडून गेलेलें अंग आणि बधिर झालेलें डोकें ह्यांचें ओझें कंटाळवाण्या काळोखांतून आणि ढोपरभर चिखलांतून हळूहळू कसेंबसें ओढीत ओढीत पाय 'गांधीनगरा'च्या बाहेर पडले.

नाशिकच्या भरलेल्या या काँग्रेस अधिवेशनाची एकंदरींत फलप्राप्ति काय? ह्या प्रश्नाचा विचार करण्यापूर्वीं आतांपर्यंत सांगायच्या राहिलेल्या दुसऱ्या कांहीं गोष्टी सांगून टाकतों. एवढ्या मोठ्या प्रमाणावर अधिवेशन भरविणें, त्याच्या निरनिराळ्या अंगोपांगांची तपशीलवार तरतूद करणें आणि अडचणी नि गैरसोयी बऱ्याच असल्या तरी विशेष गोंधळ न होतां अधिवेशनाचा हा प्रचंड गाडा मुरळीतपणें शेवटपर्यंत रेटीत नेणें हें खरोखरीच अतिशय अवघड काम होतें. तें काम अत्यंत यशस्वी रीतीनें पार पाडल्याबद्दल नाशिकची स्वागतसमिति खरोखरीच अभिनंदनास पात्र आहे. स्वयंसेवकांच्या व्यवस्थेबद्दल मात्र कोण जबाबदार होते हें कांहीं ठाऊक नाहीं. बहुतेक बबनराव बडव्यांच्या 'हनुमान आखाड्यां'त तयार झालेली ही 'वानरसेना' असावी. पण स्वयंसेवकांनीं मात्र आपल्या उमेट

आणि आडमुठ्या वर्तनानें पत्रकारांना आणि प्रतिनिधींना खूपच भंडावून सोडलें. माहीत असलेल्या चेहऱ्यांच्या लोकांना मुद्दाम पास विचारावयाचा. एका माणसाला एका वेळीं दोन-दोन चार-चार स्वयंसेवकांनीं पास दाखवा म्हणावयाचें. मंडपांतून बाहेर जाणाऱ्या प्रतिनिधींच्या पासांची देखील तपासणी करायची. लववीचा पास घेऊन बाहेर गेलेल्या प्रतिनिधींना पुन्हा परत यावयाच्या वेळीं त्या पासाखेरीज पुन्हा मूळ पास दाखवा म्हणून मागणी करावयाची. अशा अनेक तऱ्हांनीं स्वयंसेवकांनीं प्रतिनिधींची मानहानि करण्याची अगदीं पराकाष्ठा केली. वास्तविक बाकीचा सर्व बंदोबस्त ठेवण्याचें काम पोलीस आणि होमगार्ड ह्यांच्याकडे असतां, एका जागेवर उभे राहून नुसते पास तपासण्यापलीकडे स्वयंसेवकांस दुसरें कांहींहि काम नव्हतें. पण तेवढ्या कामामध्यें देखील त्यांनीं कोण गोंधळ घालून ठेविला.

एके दिवशीं सकाळीं शंकरराव देव ह्यांना अडवून अन् दुसऱ्या एका वेळीं टंडनबाबूंची मोटार थांबवून कांहीं स्वयंसेवकांनीं तर 'परमवीरचक्र' मिळविण्या-एवढा पराक्रम केला. कॉंग्रेसच्या अधिवेशनाच्या शेवटीं तर मंडपांच्या दारांवरून त्यांनीं सहा वाजतांच पळ काढला—ही तर त्यांची कार्यनिष्ठा. दोन स्वयंसेवक नेहरूंचें भाषण चाललें असतां पत्रकारांच्या विभागामध्यें घुसले आणि एक पत्रकार सिगरेट ओढीत होता त्याला दम देऊं लागले कीं, "अहो, धूम्रपान करण्याची येथें मनाई आहे. तुम्हांला ती पाटी दिसत नाहीं का?"

तो पत्रकार होता खमक्या. तो त्यांना म्हणाला, "तो तुमचा बाप मौलाना आझाद व्यासपीठावर तिकडे अग्निहोत्र पेटवून बसला आहे त्याला तुम्ही हें सांगा. मला कशाला सांगताय्?" तेव्हां ते स्वयंसेवक कांहीं न बोलतां चरफडत निघून गेले. अशा स्वयंसेवकांच्या खोडसाळपणाच्या अनेक गोष्टी सांगतां येतील.

पोलीस अधिकारी, शिपाई आणि होमगार्ड ह्यांनीं मात्र एक आठवडाभर उन्हातान्हांत, थंडींत, पावसांत अन् चिखलांत उभें राहून श्रमाचे आणि कष्टाचे जे डोंगर उपसले त्याबद्दल त्यांना जेवढे धन्यवाद द्यावेत तेवढे थोडे आहेत. एवढ्या प्रचंड प्रमाणावर पोलिसांचा जो कडेकोट बंदोबस्त ठेवण्यांत आलेला होता तें या कॉंग्रेस अधिवेशनाला लागलेलें सर्वांत मोठें लांछन होतें. पण त्यामध्यें पोलिसांचा बिचाऱ्यांचा काय दोष? शेवटच्या दोन दिवसांत 'गांधीनगरा'भोंवतीं

अनुक्र 20C03 वि
क्रमांक ... नों: दि:

गर्दीचें व रहदारीचें नियंत्रण करणें जवळ जवळ अशक्यच होतें. पण तें काम पोलीस अधिकाऱ्यांनीं आणि शिपायांनीं फारच उत्कृष्टपणें केलें. जनतेशीं पोलिसांचें वर्तन अत्यंत नम्रपणाचें आणि आदबीचें होतें. आणि त्याच्या तुलनेमुळें स्वयंसेवक तर फारच उर्मट नि आडमुठे भासत होते. आतां उर्मटपणाविषयीं लिहितों आहें म्हणून बोलायला हरकत नाहीं कीं, या अधिवेशनांत उर्मटपणाचेंच फार प्रदर्शन झालें. भाऊसाहेब हिऱ्यांनीं तर आपल्या उर्मटपणाची शेवटीं स्वमुखानें कबुली दिली. पण पंडित नेहरूंसारख्या महापुरुषाच्या उर्मटपणाविषयीं कोण काय बोलणार? उलट बोलणाराच मूर्ख ठरावयाचा! पण कोणी कांहींहि म्हणो, पंडितजींचा हा चिडखोरपणा आणि बेमुर्वतखोरपणा दिवसेंदिवस अगदीं असह्य होत चाललेला आहे. त्यांना आतां कोणाची पर्वाच राहिली नाहीं.

आपण काय वाटेल तें केलें (किंवा केलें नाहीं) अथवा काय वाटेल तें जरी बोललों तरी आतां आपली लोकप्रियता कमी होऊं शकत नाहीं असें त्यांना आतां निश्चितपणें मनामधून वाटत असावें. बोलतां बोलतां ते एकदम भडकतात काय अन् डोळे गरगरा फिरवून खुशाल धमक्या काय देऊं लागतात! 'माझें नेतृत्व तुम्हांला पाहिजे असेल तर मी सांगतों तसेंच तुम्ही वागलें पाहिजे नाहीं तर मी राजीनामा देऊन बाहेर पडेन अन् कसून तुम्हांला विरोध करीन' असा काँग्रेस प्रनिनिधींच्या छातीवर सरळ पिस्तूल रोखून त्यांची आपल्या धोरणाला मान्यता मिळविणारा माणूस हा लोकशाहीचा पुरस्कर्ता खचित नव्हे! लोकांचा आवडता नेता कालांतरानें हुकूमशहा बनतो असा युरोपांतला आतांपर्यंतचा अनुभव आहे. पंडित नेहरू हे त्या मार्गानें हळूहळू वाटचाल करीत आहेत किंवा काय, असा संशय येतो. नेहरूंच्या स्वभावाची आतां लोकांना भीति वाटते. आपण त्यांच्याजवळ गेलों किंवा कांहीं त्यांना प्रश्न विचारला तर हा माणूस कदाचित् आपल्याला एखादी थप्पड मारील कीं काय असें लोकाना वाटतें. सर्व गुणांनीं परिपूर्ण असलेल्या नेहरूंसारख्या थोर माणसाचा स्वभाव असा रागीट, चिडखोर आणि संतापी बनावा हें राष्ट्राचें खचित दुर्दैव आहे. एखाद्या गरीब मुलाच्या पाठीवरून नेहरू प्रेमानें कधीं कधीं हात फिरवितात किंवा एखाद्या मुलीला तिची शाळेची फी ते दिल्लीहून पाठवून देतात हें खरें आहे. पण तो कांहीं त्यांच्या स्वभावाचा स्थायीभाव नाहीं. विनोदबुद्धीचा अभाव हा तर नेहरूंच्या अंगांतला सर्वांत मोठा दोष आहे. कधीं म्हणून लोकांशीं ते आनंदानें बोलतील

किंवा कांहींतरी गमतीदार बोलून त्यांना हसवतील, किंवा स्वतः हसतील, अगदीं नांव नाहीं ! सदान् कदा त्यांच्या कपाळाला आपल्या आठ्या आणि चेहरा नेहमीं धुसफुसलेला. प्रत्येक भाषणांत लोकांना दोष द्यायचा अन् लोकांच्या कपाळावर सारें खापर फोडायचें.

पण या देशांतले लोकहि असे बेवकूफ आहेत कीं नेहरूंच्या शिव्या आणि थपडा खाऊनहि त्यांच्या चेहऱ्याचें नुसतें ओझरतें दर्शन व्हावें म्हणून दहा दहा मैल तंगड्या तोडीत जमतील अन् दहा-दहा तास उन्हांत अन् पावसांत ताटकळत उभे राहतील. त्याबद्दल नेहरूंचें अभिनंदन करावें कीं लोकांची कींव करावी हेंच कळत नाहीं. कॉंग्रेसमधले नेहरूंचे मित्र म्हणून सुप्रसिद्ध असलेले एक पुढारी एका खाजगी संभाषणांत तर चक्क म्हणाले कीं, "आत्मप्रसिद्धीची नेहरूंना आतां इतकी हाव सुटली आहे कीं, त्यामुळें त्यांच्या सद्गुणांचा दिवसेंदिवस लोप होत चाललेला आहे." नेहरूंच्या निकट मित्रांचें त्यांच्या संबंधींचें मत सध्यां जर इतकें बदलून गेलें आहे तर मग डाव्या गटांतील लोकांना 'नेहरू कायमचे गमावल्या'-सारखे आतां वाटूं लागले असल्यास त्यांत आश्चर्य तें काय? जनसमुदायाला आपलें दर्शन घडावें म्हणून नेहरू हल्लीं फारच आतुर झालेले दिसतात. उघड्या मोटारींत उभे राहून उजवा हात उडवीत जें 'कथाकली नृत्य' ते आजकाल करीत असतात तें गांधीजींचा स्वतःला वारसदार म्हणविणाऱ्याला तरी मुळींच शोभत नाहीं. नाशिक अधिवेशनांत मी नेहरूंच्या चेहऱ्याचें चारपांच दिवस बारकाईनें निरीक्षण करीत होतों. आजकाल नेहरू स्वतःवर भलतेच संतुष्ट झाल्यासारखे दिसताहेत.

नेहरूंच्या स्वभावांतली ही मख्खी सरदार पटेलांनीं अगदीं पुरती ओळखल्यासारखी दिसते. म्हणून नेहरूंची वावडी नाशिकच्या वातावरणांत जितकी उंच चढवितां येईल तेवढी चढूं द्यावयाची, आणि आपण मात्र तिचें सूक्ष्म सूत्र हातांत धरून मुकाट्यानें कोपऱ्यांत जाऊन बसावयाचें हें सरदार पटेलांनीं या प्रसंगीं धोरण पत्करलें होतें. सबंध अधिवेशनांत सरदारांनीं एकदांहि आपलें तोंड उघडलें नाहीं. एवढेंच नव्हे तर मौलाना आझाद, राजगोपालाचारिअर, आचार्य कृपलानी ह्या तिघांनींहि अक्षर देखील तोंडांतून काढलें नाहीं. नेहरूंचें जास्तींत जास्त प्रदर्शन व्हावें आणि त्यांचा जास्तींत जास्त जयजयकार व्हावा याबद्दल हे ज्येष्ठ कॉंग्रेसश्रेष्ठी आटोकाट काळजी घेत होते. म्हणून कॉंग्रेसमधल्या

फारच लहान आणि सामान्य माणसांना ठरावावर बोलावयास पुढें यावें लागलें. त्यामुळें झालें काय कीं कोणतीहि चर्चा मुळीं रंगूंच शकली नाहीं.

नेहरूंच्या सरकारी धोरणाला पाठिंबा देणें हाच मुळीं सर्व ठरावांचा हेतु होता. ठरावांचा आशय सर्वांच्या पूर्ण परिचयाचा होता. त्यांत नवीन असें कांहींएक नव्हतें. त्यामुळें कोणत्याहि ठरावाबद्दल कोणालाहि विशेष उत्सुकता वाटत नव्हती. प्रत्येक ठराव हा पास झालाच पाहिजे अशा पवित्र्यानें आणला जात होता. ठरावावर टीका करण्याची ज्यांची इच्छा होती ते ठरावाला उपसूचना पाठवीत आणि त्या उपसूचनेवर बोलतांना मूळ ठरावावर टीका करीत. पण बहुतेक उपसूचना उपसूचक शेवटीं मागें तरी घेत, नाहीं तर त्या नापास तरी होत. डॉ. चोइतराम गिडवानी सोडले तर नेहरूंना कडकडीत विरोध करण्याचें धैर्य काँग्रेसमधल्या कोणत्याहि माणसाच्या अंगीं आज नाहीं. नेहरू सांगतील तें धोरण आणि नेहरू बांधतील तें तोरण अशी काँग्रेसची आज स्थिति झाली आहे हें नाशिकच्या अधिवेशनांत सर्वांना पाहावयाला मिळालें. काँग्रेसचें हें फार मोठें अधःपतन आहे असें मला तरी वाटतें.

वास्तविक काँग्रेसच्या आज्ञेप्रमाणें नेहरूंनीं राज्यकारभार चालवावयाचा असा क्रम असायला पाहिजे. पण त्याच्या उलट होऊन बसलें आहे. नेहरूंनीं राज्य-कारभार करावयाचा आणि त्याजवर मागाहून काँग्रेसनें आपल्या पसंतीचा खरी शिक्का मारावयाचा, असा नाशिकच्या अधिवेशनापासून आतां नवा जमाना सुरू झालेला आहे. आणि सगळ्यांत मौज ही कीं नेहरूंना आपण कुठें चुकतों आहोंत ह्याची नुसती शंका देखील येत नाहीं. आपण गेल्या तीन वर्षांत जें जें म्हणून कांहीं केलें त्यांतील प्रत्येक बाब न् बाब बरोबर आहे अशी नेहरूंची खात्री आहे. आपल्या हातून चूक घडणें अशक्य आहे अन् आपले विरोधक आणि टीकाकार हे एकजात मूर्ख आणि बेवकूफ असून सर्व दोषांना फक्त जनता हीच जबाबदार आहे असें नेहरूंना ठामपणें वाटतें. आपला शब्द देशानें शिरसामान्य केला पाहिजे व आपण सांगतों त्याच रस्त्यानें जनतेनें गेलें पाहिजे. कारण त्याखेरीज दुसरा रस्ता मुळीं असूंच शकत नाहीं, अशी नेहरूंची अपेक्षा आहे. यापुढें देशाला नेहरूंचें धोरण हेंच वेदवाक्य आणि नेहरूंचा शब्द ह्याच श्रुतिस्मृति मानाव्या लागतील. नाशिकच्या अधिवेशनांत काँग्रेसनें आपली मान व आपले कान नेहरूंच्या हातांत देऊन लोकशाहीच्या अस्थि गोदावरीच्या उदकांत विसर्जन

करून टाकल्या आणि नेहरूंच्या सर्वाधिकारशाहीला मान्यता दिली असेंच म्हणावयाला पाहिजे.

नेहरूंच्या या सर्वाधिकारशाहीला हळूहळू लष्करी हुकूमशाहीचें स्वरूप येईल असेंहि मला भय वाटतें. नेहरूंच्या प्राणाविरुद्ध महाराष्ट्रांत कांहीं तरी भयंकर कट शिजतो आहे या सबबीवर नाशिकच्या कॉंग्रेस अधिवेशनांत त्यांच्या भोंवतीं कडेकोट लष्करी व पोलिशी बंदोबस्त ठेवण्यांत आला. पण हा बंदोबस्त कांहीं तात्पुरत्या स्वरूपाचा आहे असें मला वाटत नाहीं. नेहरूंच्या सार्वजनिक जीवनाचा आणि संचाराचा तो यामुळें एक कायमचा भाग होऊन बसेल असा माझा होरा आहे. आणि त्याचें पर्यवसान लष्करी हुकूमशाहींत पुढेंमागें झालें तर आश्चर्य वाटावयाचें कारण नाहीं. प्रत्येक हुकूमशहा अशाच रीतीनें मुळीं बनत असतो.

नाशिक कॉंग्रेस अत्यंत यशस्वी झाली अशा गर्जना कॉंग्रेस पुढारी आणि कॉंग्रेस वृत्तपत्रें करीत सुटलेलीं आहेत. कॉंग्रेसची ही यशस्विता कोणत्या कसोटीवर घासून पाहावयाची ? नेहरूंना पाहावयाला दीडदोन लाख लोक नाशकांत जमले म्हणून कॉंग्रेस यशस्वी झाली असें म्हणावयाचें ? गर्दी म्हणजे कांहीं यश नव्हे ! आणि ह्या देशांत गर्दी जमविण्यास कांहीं फार पराक्रम करावा लागत नाहीं. केडगांवच्या नारायणमहाराजांनीं जेव्हां एक हजार एकशेंआठ सत्यनारायण केले तेव्हां ह्याच्यापेक्षांहि अधिक लोक त्या ठिकाणीं जमले होते.

★ ★ ★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम .................. वि: ..........
क्रमांक ...................... नों: दि: ..............

REFBK-0009226

REFBK-0009226